
# चिटणिसाची कार्यपद्धती

## इयत्ता बारावी



शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३०.०१.२०२० रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२०–२१ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# चिटणिसाची कार्यपद्धती

## इयत्ता : बारावी

२०२०

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे –४११ ००४.

C9K4R4

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृक्–श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : 2020
© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे – ४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**वाणिज्य शाखा मुख्य समिती**

**डॉ. नरेंद्र पाठक**
**(अध्यक्ष वाणिज्य समिती)**

| | |
|---|---|
| डॉ. ज्योती गायकवाड | (सदस्य) |
| डॉ. मुकुंद तापकीर | (सदस्य) |
| डॉ. प्रशांत साठे | (सदस्य) |
| डॉ. संगीता मांडके | (सदस्य) |
| श्री. मोहन साळवी | (सदस्य) |
| श्री. सुरेंद्र निरगुडे | (सदस्य) |
| श्री. महेश आठवले | (सदस्य) |
| श्री. नारायण पाटील | (सदस्य) |
| श्रीमती अनंतलक्ष्मी कैलासन | (सदस्य) |
| श्रीमती लक्ष्मी पिल्लई | (सदस्य) |
| श्रीमती मृणाल फडके | (सदस्य) |
| श्री. अनिल कापरे | (सदस्य) |
| श्रीमती उज्ज्वला गोडबोले | (सदस्य-सचिव) |

**डॉ. ज्योती गायकवाड**
**(चिटणिसाची कार्यपद्धती : अध्यक्ष आणि समन्वयक)**

**चिटणिसाची कार्यपद्धती– राज्य अभ्यासगट**

**सदस्य**

श्रीमती लक्ष्मी पिल्लई
श्री. नितीन गुजराथी
श्रीमती झुबेदा सुरती
श्री. ओंकार प्रसादे
श्री. विजय खुडे
श्री. गोविंद हरे
श्री. प्रशांत शेळके
श्रीमती अंजली सावंत
श्रीमती नयना पदकी

**भाषांतरकार**

श्री. प्रशांत शेळके
श्री. गोविंद हरे
श्रीमती नयना पदकी
श्री. विजय खुडे
श्री. ओंकार प्रसादे

**समीक्षक**

डॉ. ज्योती गायकवाड

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री. संदिप कोळी, चित्रकार, मुंबई

**अक्षरजुळणी**

श्री प्रिंटर्स, पुणे

**समन्वयक**

**उज्ज्वला श्रीकांत गोडबोले**
प्र. विशेषाधिकारी गणित,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती**

**सच्चितानंद आफळे**
मुख्य निर्मिती अधिकारी
**संजय कांबळे**
निर्मिती अधिकारी
**प्रशांत हरणे**
सहायक निर्मिती अधिकारी

**कागद**

७० जी.एस.एम.क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश**

N/PB/2020-21/1,00,000

**मुद्रक**

SOHAIL ENTERPRISES, THANE

**प्रकाशक**

**विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक**
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई २५

# भारताचे संविधान

**उद्देशिका**

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून पुनर्रचित अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यपुस्तक सादर करताना आम्हांला आनंद होत आहे.

चिटणिसाची कार्यपद्‌धती हा वाणिज्य शाखेतील असा विषय आहे, जो व्यवसाय जगातील सर्वांत मोठ्या व लोकप्रिय व्यवसाय संघटना प्रकार म्हणजेच संयुक्त भांडवली संस्था, अर्थातच कंपनी, या प्रकाराशी संबंधित आहे. इयत्ता ११ वीच्या अभ्यासक्रमात कंपनीची वैशिष्ट्ये, कंपनीची नोंदणी, तिचे व्यवस्थापन, कंपनी चिटणिसाची भूमिका इ. घटकांचा समावेश आहे. इयत्ता १२ वीच्या अभ्यासक्रमात भाग, कर्ज रोखे, सार्वजनिक ठेवी इ. द्‌वारे कंपनी वित्तीय बाजारात करत असलेल्या भांडवल उभारणीच्या पद्‌धतींवर भर देण्यात आला आहे. भांडवलाच्या महत्त्वाच्या स्रोतांपैकी भाग, कर्जरोखे, सार्वजनिक ठेवी यासंबंधी प्रकरणांमध्ये भांडवल उभारणी संबंधी तरतुदी व कार्यपद्‌धतींचा समावेश आहे. या प्रकरणांनंतर सदर भांडवल पुरवणाऱ्या गुंतवणूकदारांशी पत्रव्यवहारसंबंधी प्रकरणांची रचना केली आहे.

या विषयाचे घटक हे कंपनी कायदा २०१३ मधून मिळतात. कायद्यातील कायदेशीर व तांत्रिक बाबी विद्यार्थ्यांना सहज समजाव्यात यासाठी साध्या भाषेत मांडणी करून आवश्यक ती काळजी घेतली आहे. आवश्यक तेथे तक्ते व आकृत्यांचा उपयोग केला आहे. नवीन संज्ञेचा किंवा शब्दाचा अर्थ लगेचच चौकटीत स्पष्ट केला आहे. अध्ययनास उत्तेजन देण्यासाठी अधिकची माहिती आणि आवड निर्माण करण्याऱ्या कृती प्रकरणांमध्ये दिल्या आहेत. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी परिपूर्ण स्वाध्याय दिले आहेत. संकल्पनांची स्पष्टता समजण्यासाठी विविध प्रकारचे प्रश्न विचारले असून तार्किक विचार आणि कारणमीमांसेला प्रोत्साहन दिले आहे. उपयोजनांवर आधारित प्रश्न विद्यार्थ्यांना विशिष्ट प्रसंग/ परिस्थितीत सैद्‌धान्तिक ज्ञानाच्या उपयोजनाची संधी देतील. कागदपत्रे, कागदपत्रांचे नमुने इ. पुस्तकाच्या सुरूवातीला क्यू आर कोडच्या माध्यमातून दिले आहेत.

कंपनी कायदा २०१३ मध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. या पाठ्यपुस्तकात कंपनी कायदा आणि सेबीच्या नियमांमधील नोव्हेंबर २०१९ पर्यंतच्या सुधारणांचा विचार केला आहे.

या पाठ्यपुस्तकासाठी योगदान दिलेल्या विषय समिती सदस्य, अभ्यासगट सदस्य, भाषांतरकार, समीक्षक अशा सर्वांचे आम्ही आभारी आहोत.

सदर पुस्तक शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या अपेक्षा पूर्ण करेल अशी आम्हाला आशा आहे.

**पुणे**

**दिनांक : २१ फेब्रुवारी २०२०**

**भारतीय सौर : २ फाल्गुन १९४१**



**(विवेक गोसावी)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

## इयत्ता १२ वी वाणिज्य

# चिटणिसाची कार्यपद्धती

## घटक व क्षमता विधाने

| घटक क्रमांक | घटक | क्षमता विधाने |
|---|---|---|
| १ | संस्थात्मक (कॉर्पोरेट) वित्त स्त्रोत | • कॉर्पोरेट फायनान्सचा अर्थ, महत्व समजणे<br>• भांडवल संरचनेचा अर्थ समजणे<br>• मालकी व कर्जाऊ भांडवलाच्या स्त्रोतविषयी माहिती मिळणे.<br>• भांडवलाच्या विविध स्त्रोतांची तुलना करणे. |
| २ | भांडवल उभारणी | • भाग, कर्जरोखे वाटप आणि सार्वजनिक ठेवी स्वीकारणे. यासंबंधी तरतुदी व कार्यपध्दती समजणे. |
| ३ | चिटणिसाचा पत्रव्यवहार | • सभासद, कर्जरोखेधारक, ठेवीदार यांच्याशी पत्रव्यवहाराचे (संज्ञापनाचे) कौशल्य विकसित होणे. |
| ४ | भागपेढी पद्धती (Depository system) | • भागपेढी पध्दतीचा अर्थ व महत्त्व समजणे.<br>• भागपेढी पध्दतीतील समाविष्ट घटक ज्ञात होणे.<br>• भागपेढी पध्दतीची कार्यपध्दती अवगत होणे. |
| ५ | लाभांश व व्याजाचे वाटप | • लाभांश आणि व्याज या संकल्पना समजणे<br>• अंतरिम व अंतिम लाभांश यामध्ये तुलना करणे<br>• लाभांश स्रोत, लाभांश जाहीर करणे व वाटप करणे यासंबंधी तरतुदींचे आकलन होणे. |

| घटक क्रमांक | घटक | क्षमता विधाने |
|---|---|---|
| ६ | वित्तीय बाजार | • वित्तीय बाजाराचा अर्थ समजणे.<br>• वित्तीय बाजाराचे प्रकार ज्ञात होणे.<br>• वित्तीय बाजारातील विविध साधनांची ओळख होणे.<br>• भाग बाजाराचा अर्थ व कार्ये समजणे.<br>• बॉम्बे स्टॉक एक्सचेंज व नॅशनल स्टॉक एक्सचेंज विषयी माहिती मिळणे.<br>• भाग बाजारासंबंधी विविध संज्ञा समजणे.<br>• भांडवली बाजारातील 'सेबी' ची भूमिका समजणे. |

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | संस्थात्मक वित्त व्यवस्थापनाची ओळख | १ |
| २. | संस्थात्मक वित्त व्यवस्थेचे स्रोत | १३ |
| ३. | भाग विक्री | ३६ |
| ४. | कर्जरोखे विक्री | ६४ |
| ५. | ठेवी | ७६ |
| ६. | सभासदांशी पत्रव्यवहार | ९० |
| ७. | कर्जरोखेधारकांशी पत्रव्यवहार | १०१ |
| ८. | ठेवीदारांशी पत्रव्यवहार | ११२ |
| ९. | भागपेढी पद्धती | १२३ |
| १०. | लाभांश आणि व्याज | १३९ |
| ११. | वित्तीय बाजार | १५३ |
| १२. | भाग बाजार | १६५ |
| | उत्तरसूची | १७५ |

# १ संस्थात्मक वित्त व्यवस्थापनाची ओळख


१.१ **अर्थ**

१.२ **महत्त्व**

१.३ **भांडवलाची आवश्यकता**
(अ) स्थिर भांडवल (ब) खेळते भांडवल

१.४ **भांडवल संरचना**
१.४.१ व्याख्या
१.४.२ घटक

१.५ **फरक**


## प्रस्तावना

वित्त ही संकल्पना पैसे व पैशाचे व्यवस्थापन यांच्याशी निगडित आहे. निधींचे गमन (inflow) व निर्गमन (outflow) यांच्याशी ते संबंधित आहे. व्यावसायिक संस्थेचे यश हे निधी उभारणीची क्षमता व निधीचा विनियोग करण्याची कार्यक्षमता यावर अवलंबून असते.

हेन्री फोर्ड यांच्या म्हणण्यानुसार "पैसा हा एक हात किंवा पाय आहे. एकतर आपण त्याचा वापर करा किंवा गमवा." व्यवसायात यश मिळविण्यासाठी पैसा किती आवश्यक आहे हे येथे अधोरेखित केले आहे.

## १.१ संस्थात्मक वित्तव्यवस्था : अर्थ

संस्थात्मक वित्तव्यवस्था ही संस्थेसाठी निधी उपलब्धता व त्याचा योग्य विनियोग याच्याशी संबंधित असते. संस्थेच्या कार्यांना वित्त पुरवठा करणे, भांडवल संरचना, गुंतवणूक निर्णय यांच्याशी ती संबंधित असते.

### व्याख्या :

हेन्री हॉगलँड यांच्या मतानुसार, "संस्थात्मक वित्तव्यवस्था, व्यावसायिक संस्थेने केलेले भांडवल संपादन व त्याचा विनियोग या गोष्टींची हाताळणी करते."

संस्थात्मक वित्त व्यवस्थेमध्ये वित्तिय नियोजन, भांडवली बाजारपेठ, मुद्राबाजार, भाग भांडवल बाजार यांचा अभ्यास अंतर्भूत आहे. भांडवल निर्मिती, विदेशी भांडवल यांचाही समावेश यात केला आहे. वित्तीय संस्था तसेच बँकांनाही यात अनन्य साधारण महत्त्व दिले आहे.

वित्त व्यवस्थापक खाली नमूद केलेल्या गोष्टींची खात्री देतो :

अ) संस्थेकडे पुरेशी व समाधानकारक वित्त व्यवस्था उपलब्ध आहे.

ब) संस्था, किमान मूल्य असलेल्या योग्य प्रकारच्या निधीचा वापर करत आहे.

क) संस्था उभ्या केलेल्या निधीचा योग्य वापर करत आहे.

ड) संस्थेच्या मालकांसाठी कमाल लाभांश निर्मितीसाठी प्रयत्न करत आहे.

खाली नमूद केलेले दोन निर्णय हे संस्थात्मक वित्त व्यवस्थेचे आधार आहेत. या दोन संकल्पनांचा आपण सखोल अभ्यास करू या.

१) **वित्तीय निश्चितीचा निर्णय :** व्यावसायिक संस्थेला वित्तीय गरज भागविण्यासाठी भांडवल बाजारात प्रवेश करण्याचा पर्याय उपलब्ध असतो. या ठिकाणी वित्त उभारणीचे विविध पर्याय संस्थेसमोर असतात. समहक्क भाग भांडवल किंवा कर्जाऊ भांडवल यामधील योग्य पर्यायाची निवड संस्था करते. बँकेतून कर्ज किंवा सार्वजनिक ठेवी किंवा कर्जरोख्यांचा पर्याय संस्थेकडे असतो. वित्तीय व्यवस्थापक योग्य भांडवल उभारणीची खात्री देतो. 'योग्य भांडवल उभारणी म्हणजे भांडवलाची योग्य रक्कम तसेच योग्य प्रमाणातील कर्जाऊ रक्कम व समहक्क भाग भांडवल यांचे मिश्रण होय.'

*भांडवली बाजारपेठ ही दीर्घ मुदतीच्या कर्जाची व समहक्क भागांची बाजारपेठ असते. या बाजारात समहक्क भाग व कर्जाऊ प्रतिभूतींचे वाटप व खरेदी-विक्री केली जाते.*

२) **वित्त गुंतवणुकीचा निर्णय :** व्यावसायिक संस्थेला जेव्हा भांडवल प्राप्त करण्याचे विविध पर्याय उपलब्ध होतात तेव्हा वित्तिय व्यवस्थापक पुढील निर्णय घेण्यास सज्ज होतो. हे निर्णय म्हणजे निधीचा योग्य रितीने उपयोग करून भागधारकांना कमाल लाभांश मिळवून देणे. याकरिता संस्थेला 'भांडवलाचे मूल्य' विचारात घ्यावे लागते. एकदा भांडवलाचे मूल्य कळले की, मग भांडवलावरील परतावा हा भांडवली मूल्यापेक्षा जास्त असेल, अशा पद्धतीने निधींचे नियोजन संस्था करू शकते. गुंतवणूक करण्यासाठी निधी मिळविणे व व्यवसायामध्ये त्याचा यशस्वीरित्या उपयोग करणे यालाच 'गुंतवणुकीचा निर्णय' असे म्हणतात. या संकल्पनेला 'भांडवली अर्थसंकल्प' असेही संबोधले जाते.

*भांडवलाचे मूल्य म्हणजे गुंतवणूकदारांकडून अपेक्षित असणारा किमान परतावा होय.*

## १.२ संस्थात्मक वित्त व्यवस्थेचे महत्त्व :

व्यावसायिक संस्थेच्या कार्यात्मक व्यवस्थापनेत उत्पादन, वित्त, विपणन तसेच कर्मचाऱ्यांच्या कृती या सर्वांना खूप महत्त्व आहे, पण या सर्वांमध्ये सगळ्यांत जास्त महत्त्व दिले आहे ते वित्तिय कामकाजाला! आता आपण संस्थात्मक वित्त व्यवस्थेचे महत्त्व जाणून घेऊ या.

१) **निर्णय प्रक्रियेत मदत करते :** व्यावसायिक संस्थांचे बहुतेक सर्व निर्णय हे निधीच्या उपलब्धतेवर अवलंबून असतात. व्यवसायातील कोणतेही कार्य निधीशिवाय स्वतंत्रपणे पार पाडता येत नाही. व्यवसायामधील प्रत्येक निर्णय, 'त्याचा नफ्यावरील परिणाम' नजरे समोर ठेवून घेणे आवश्यक असते. समोर निरनिराळे पर्याय उपलब्ध असताना जो कमाल नफा मिळवून देईल अशाच पर्यायाचा व्यवस्थापन स्वीकार करते. जो प्रकल्प आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य असेल त्याच प्रकल्पाला व्यावसायिक संस्था हिरवा कंदिल दाखविते. अशाप्रकारे संस्थात्मक वित्तव्यवस्था निर्णय प्रक्रियेमध्ये मोलाची भूमिका बजावते.

२) **प्रकल्पासाठी भांडवल उभारणी करणे :** जेव्हा एखादी व्यावसायिक संस्था नवीन उपक्रमात पाऊल टाकते तेव्हा तिला भांडवल उभारणी करणे आवश्यक असते. भांडवल उभारणीसाठी व्यावसायिक संस्था समभाग. कर्जरोखे, बंधपत्रे यांची विक्री करते किंवा बँकेचे कर्ज घेते.

३) **संशोधन व विकास कार्यात मदत करते :** व्यावसायिक प्रकल्पांसाठी संशोधन, विकास व तपशीलवार शोधकार्य हाती घ्यावे लागते. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी त्याची तांत्रिक बाजू सविस्तरपणे समजून घेणे आवश्यक असते. या प्रक्रियेला बराच कालावधी लागतो. त्यासाठी संशोधनाच्या या कालावधीमध्ये सतत निधी उपलब्ध करून द्यावा लागतो. यासाठी अविरत अशा आर्थिक आधाराची आवश्यकता असते.

जुन्या उत्पादित वस्तूंची श्रेणी सुधारून किंवा नवीन वस्तूंचे उत्पादन विकसित करून ग्राहकांना आकर्षित करावे लागते. अशा कामासाठी कंपनीला बाजार-सर्वेक्षण करण्याकरिता तसेच बाजाराचे विश्लेषण करण्याकरिता व्यक्ती नेमाव्या लागतात. अशा कारणांसाठी आर्थिक आधाराची गरज असते.

४) **व्यवसाय सुरळीत चालण्यास मदत करते :** निधींचा ओघ सुरळीत असेल तरच कर्मचाऱ्यांचे पगार वेळेत देता येतात, कर्जाऊ रक्कमेची परतफेड वेळेत करता येते, कच्च्या मालाची जेव्हा गरज भासते तेव्हा ते विकत घेता येते. उत्पादित वस्तूंचे विक्री संवर्धन (Sales Promotion) तसेच नवीन वस्तूंचे उत्पादन बाजारात आणण्यासाठी याची मदत होते.

५) **विविध व्यावसायिक कार्यांमध्ये समन्वय साधते :** संस्थात्मक वित्तव्यवस्था, संस्थेतील सर्व कार्यांवर नियंत्रण तसेच समन्वय ठेवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका पार पडते. 'वित्त विभाग पुरेशा भांडवलाचा पुरवठा करू शकत नाही',

असा विचार करणे सुद्धा कठीण आहे कारण जर वित्त विभागाने कच्चा मालाच्या खरेदीसाठी आवश्यक निधींचा पुरवठा न केल्यास आणि दैनंदिन व्यवहार सुरळीत चालण्यासाठी लागणाऱ्या आर्थिक गरजांची पूर्तता न केल्यास 'उत्पादन विभागाचे' काम चालविणे खूप कठीण होईल. यामुळे उत्पादन क्षमतेला झळ पोहोचेल व याचे पर्यावसन विक्री, कंपनीचे उत्पन्न, गुंतवणुकीचा दर या सगळ्यांवर त्याचा परिणाम होईल, म्हणूनच प्रत्येक विभागाची कार्यक्षमता प्रभावी आर्थिक व्यवस्थापनावर अवलंबून असते.

६) **विस्तार व विविधीकरणाला प्रोत्साहन देते :** विस्तारीकरण व विविधीकरणासाठी आधुनिक यंत्रसामग्रीची व आधुनिक तंत्रज्ञानाची आवश्यकता असते. संस्थात्मक, वित्त व्यवस्था आधुनिक यंत्रसामग्री तसेच आधुनिक तंत्रज्ञान खरेदी करण्यासाठी पैसे उपलब्ध करते, म्हणूनच कंपनीच्या विस्तारीकरणासाठी तसेच विविधीकरणासाठी वित्त अनिवार्य असते.

७) **व्यवस्थापकीय जोखीम हाताळणे :** अचानक विक्रीत झालेली घट, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेला तोटा, संपामुळे झालेला तोटा अशा प्रकारच्या अनेक जोखिमा कंपनीला हाताळाव्या लागतात. अशा व्यावसायिक जोखिमी हाताळण्यासाठी कंपनीला आर्थिक व्यवस्थापनाची गरज असते.

८) **जुन्या मालमत्ता (assets) बदलणे :** यंत्रसंच व यंत्रसामग्री (plant and machinery) काळानुरूप जुनी झाली की कालबाह्य होतात. नवीन यंत्रसामग्री घेण्यासाठी निधीची आावश्यकता असते.

९) **लाभांश आणि व्याज देण्यासाठी मदत करते :** भागधारकांना लाभांश तसेच कर्जरोखेधारक व बँकांना व्याज देण्यासाठी वित्त व्यवस्था आवश्यक आहे.

१०) **विविध कर व शुल्क भरण्यासाठी मदत करते :** आयकर (Income Tax), वस्तू व सेवा कर (GST) तसेच नोंदणी अधिकाऱ्याला अदा करावयाचे शुल्क अशा प्रकारच्या कर व आकार भरणीसाठी संस्थात्मक वित्त व्यवस्था मदत करते.

## १.३ भांडवल आवश्यकता (Capital Requirement) :

जेव्हा उद्योजक एखाद्या व्यावसायिक प्रकल्पाची कल्पना करतो, तेव्हा तो त्या कल्पनेच्या व्यावसायिक शक्यतांचा शोध घेऊ लागतो. प्रकल्पाच्या व्यवहार्यतेविषयी समाधानकारक उत्तर मिळाल्यावर तो प्रकल्प उभारणीसाठी पावले उचलतो. पहिले व खूप महत्त्वाचे पाऊल म्हणजे व्यवसाय चालविण्यासाठी किती भांडवल आवश्यक आहे व कोणत्या स्वरूपात आवश्यक आहे याचा निर्णय अत्यंत काळजीपूर्वक घेणे. आर्थिक नियोजनाचा मसुदा तयार करताना सद्यस्थिती तसेच भविष्यातील परिस्थितींचा विचार करावा लागतो म्हणूनच भांडवलाच्या आवश्यकतेचे प्रमाण ठरविताना उद्योजकाला 'स्थिर भांडवल' व 'खेळते भांडवल' यांची आवश्यकता विचारात घ्यावी लागते. आता आपण भांडवल आवश्यकतेचा विस्तृत अभ्यास करू.

आर्थिक नियोजन हे भांडवलाची गरज व उपलब्ध साधने यांच्याशी निगडित आहे.

अ) **स्थिर भांडवल (Fixed Capital) :** दीर्घकालावधीसाठी वापरली जाणारी तसेच विक्रीच्या उद्देशाने न घेतलेली मालमत्ता, खरेदी करण्यासाठी जे भांडवल लागते त्याला 'स्थिर भांडवल' असे म्हणतात.

सरळ शब्दात मांडावयाचे झाल्यास स्थिर भांडवल म्हणजे कोणत्याही प्रकारची 'भौतिक मालमत्ता' (Physical asset) म्हणजेच स्थिर मालमत्ता होय. ही संपत्ती व्यवसायामध्ये जवळजवळ कायमस्वरूपी राहते. उदा. जमीन व इमारत (land and building) उपस्कर व अन्वायुक्ती (Furniture and Fixture) यंत्रसंच व यंत्रे (Plant and Machinery) ही स्थिर भांडवल गुंतवणुकीची उदाहरणे आहेत. नवीन कंपनीच्या स्थापनेच्या वेळी अशा प्रकारच्या भांडवलाची आवश्यकता असते. तथापि विद्यमान कंपन्यांना विस्तार व विकास कार्यक्रमांना वित्त पुरवठा करण्यासाठीही अशा भांडवलाची गरज असते. तसेच साधन सामग्री (equipments) बदलण्यासाठी सुद्धा या भांडवलाची आवश्यकता असते.

स्थिर भांडवलाच्या आवश्यकतेची प्रारंभिक योजना कंपनी प्रवर्तक तयार करतात. यासाठी प्रथम त्यांना कंपनीला आवश्यक असलेल्या स्थिर मालमत्तेची यादी तयार करावी लागते व त्यांच्या किमतीचा अंदाज घेतला जातो. जमिनीच्या किमती, इमारत बांधणीचे मूल्य, यंत्रसामग्रींच्या किमती या संबंधित माहिती ते गोळा करतात. वेगवेगळ्या स्थिर मालमत्तेच्या किमतीची बेरीज केली जाते व परिणाम स्वरूपी एकूण स्थिर भांडवलाची आवश्यकता लक्षात येते.

अलिकडच्या वर्षात स्थिर भांडवलाची गरज लक्षात घेऊन त्याला विशेष महत्त्व दिले गेले आहे. विशेषतः आधुनिक औद्योगिक प्रक्रियांमुळे भांडवली साधन सामग्रीचा (capital equipments) वाढता वापर यास कारणीभूत आहे.

भांडवली बाजारातून स्थिर मालमत्ता खरेदीसाठी उद्योजक निधी मिळवितो. यासाठी भाग, कर्जरोखे, बंधपत्रे यांची विक्री केली जाते किंवा दीर्घ मुदतीचे कर्जही घेतले जाते.

## स्थिर भांडवलाच्या आवश्यकतेवर परिणाम करणारे विविध घटक

१) **व्यवसायाचे स्वरूप :** उत्पादन उद्योग व लोकोपयोगी सेवा यांना स्थिर मालमत्ता मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी गुंतवावा लागतो. परंतु खरेदी विक्री व्यवसायात (Trading business) मोठ्या प्रमाणात स्थिर भांडवलाची गरज नसते.

२) **व्यवसायाचे आकारमान :** जेव्हा एखाद्या व्यवसायाची मोठ्या प्रमाणावर 'व्यापार' करण्यासाठी (large scale basis) स्थापना केली जाते तेव्हा नैसर्गिकपणे अधिक स्थिर भांडवलाची गरज असते. कारण या व्यवसायाच्या बहुतेक सर्वच प्रक्रिया स्वयंचलित यंत्रे व उपकरणे यांवर आधारित असतात.

३) **व्यवसायाची व्याप्ती :** एखादी व्यवसायिक संस्था जेव्हा उत्पादन व वितरण अशा संपूर्ण कार्यासाठी स्थापन केली जाते तेव्हा अधिक प्रमाणात स्थिर भांडवलाची आवश्यकता असते.

४) **भाडेतत्त्वाचे प्रमाण (Lease basis) :** जर उद्योजकाने भाडेपट्टीच्या तत्त्वावर मालमत्ता संपादन करण्याचा निर्णय घेतला असेल तर व्यवसायात कमी प्रमाणावर निधीची आवश्यकता भासते.

**भाडेतत्त्वाचा करार (Lease) :** हा एक करार आहे ज्या द्वारे एखादी व्यक्ती विशिष्ट कालावधीसाठी त्यांची काही मालमत्ता दुसऱ्यास वापर करण्यास देतो. उदा. जमीन, इमारत, यंत्रे, इत्यादी.

५) **उपकराराची व्यवस्था (Sub contract) :** उत्पादनाच्या काही प्रक्रिया जर उद्योजकाने करार करून इतरांकडे सुपूर्द करण्याचा विचार केला असेल तर अशा प्रक्रिया पार पाडण्यासाठी त्याला किमान मालमत्तेची गरज असते. त्यामुळे व्यवसायामध्ये स्थिर भांडवलाची गरज कमी भासते.

६) **जुन्या मालमत्तेचे संपादन :** जुने यंत्रसंच किंवा जुनी साधनसामग्री कमी किमतीत उपलब्ध असेल तर स्थिर मालमत्तेत आवश्यक असलेली गुंतवणूक किमान पातळीवर केली जाते.

७) **सवलतीच्या दरात मालमत्ता संपादन :** प्रादेशिक पातळीवर औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी सरकार सवलतीच्या दरात जमीन व बांधकाम साहित्य देऊ करते. यंत्रसंच व साधनसामग्री हप्त्याच्या आधारावर उपलब्ध करून दिली जातात. अशा सुविधांमुळे स्थिर मालमत्तेची आवश्यकता कमी भासते.

८) **आंतरराष्ट्रीय स्थिती :** आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यवसाय करणाऱ्या मोठ्या संस्थांसाठी हा घटक खूप महत्त्वाचा आहे. उदा. युद्धाची शक्यता असताना व पुढे यामुळे सामग्रीची कमतरता भासण्याची शक्यता निर्माण होणार असेल तर कंपनी स्थिर मालमत्तेच्या विस्तारासाठी मोठ्या प्रमाणात निधी गुंतवण्याचा निर्णय घेते.

९) **अर्थव्यवस्थेचा कल :** कंपनीचा भविष्यकाळ उज्ज्वल असण्याची अपेक्षा असेल तर सर्व प्रकारच्या व्यावसायिक विस्तारासाठी हिरवा कंदिल दाखविला जातो. अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणात निधी स्थिर मालमत्तेमध्ये गुंतविला जातो. त्यामुळे भविष्यात त्याचा फायदा मिळायला मदत होते.

१०) **लोकसंख्येचा कल :** लोकसंख्या उच्च दराने वाढत असताना काही उत्पादकांना, व्यवसाय वाढीसाठी ही चांगली संधी आहे, असे वाटते. उदा. ऑटोमोबाईल उद्योग, इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे उत्पादन, तयार कपड्यांचा व्यवसाय इत्यादी उद्योगांना मोठ्या प्रमाणावर स्थिर भांडवलाची गरज भासते.

११) **ग्राहक प्राधान्य :** वस्तू व सेवा प्रदान करणाऱ्या उद्योग व्यवसायाला योग्य मागणी असेल तर त्यांना मोठ्या प्रमाणावर स्थिर भांडवलाची आवश्यकता असते. उदा. मोबाईल फोन उत्पादक तसेच मोबाईल नेटवर्क प्रदाते.

१२) **स्पर्धात्मक घटक :** हा स्थिर भांडवलाच्या आवश्यकतेच्या निर्णय प्रक्रियेतील सर्वांत मुख्य घटक आहे. प्रतिस्पर्धी व्यावसायिकांपैकी एखाद्या व्यावसायिकाने स्वयंचलित यंत्रणा राबविण्यास सुरुवात केली तर त्याच प्रकारच्या व्यवसायात कार्यरत असणारे इतर व्यावसायिक त्याचे अनुकरण करण्यास उद्युक्त होतात.

## ब) खेळते भांडवल (कार्यकारी भांडवल) (Working Capital)

दैनंदिन व्यावसायिक कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असणाऱ्या भांडवलास खेळते भांडवल असे म्हणतात. स्थिर भांडवलाची आवश्यकता लक्षात घेतल्यानंतर प्रवर्तकांना व्यवसायाचे कार्य सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक अशा निधीचा अंदाज घ्यावा लागतो. व्यवसाय करण्यासाठी आवश्यक असा कच्चामालाचा साठा करण्यासाठी निधीची गरज लागते. तयार उत्पादीत वस्तूंचा पुरेसा साठा राखण्यासाठी भांडवलाची गरज असते. प्रत्यक्ष व्यवहार करताना वस्तू रोखीने किंवा उधारीने (on credit) विकल्या जातात. उधारीने विकलेल्या वस्तूंची रोख रक्कम लगेच परत येत नाही. उधार मालाचे येणारे मूल्य (account receivable) व्यवसायामध्ये परत जमा होईपर्यंतच्या कालावधीमध्ये निधीची व्यवस्था करावी लागते. तसेच कारखान्याचे खर्च भागविण्यासाठी रोकड आवश्यक असते. अनिश्चितता हे व्यवसायाचे वैशिष्ट्ये असल्याने 'अनपेक्षित प्रतिकूलतेसाठी' रोख रक्कम राखून ठेवणे जरूरीचे असते.

**इतर अप्रत्यक्ष खर्च :** हा व्यवसाय चालविण्यासाठी लागणारा अप्रत्यक्ष खर्च आहे. लेखापालकाची फी, विमा, व्याज, दुरुस्ती, जाहिरात खर्च, भाडे, टेलिफोन बील, इत्यादींसारख्या खर्चांचा यात समावेश होतो.

अशाप्रकारे उद्योग व्यवसायात खालील प्रकारच्या मालमत्तांसाठी भांडवलाची व्यवस्था करावी लागते :


१) मालसाठा बांधणीसाठी

२) उधार मालाच्या येणाऱ्या मूल्यांच्या वित्त पुरवठ्यासाठी

३) दैनंदिन खर्च भागविण्यासाठी

वरील मालमत्तेमध्ये गुंतविलेले भांडवल म्हणजेच खेळते भांडवल! खेळत्या भांडवलाच्या संकल्पना महत्त्वाच्या अधिकारी व्यक्तींनी भिन्नपणे मांडल्या आहेत. काहींच्या मते, चालू संपत्तीचे चालू दायित्वावर जेवढे आधिक्य असते, ती अतिरिक्त रक्कम म्हणजेच खेळते भांडवल! जेस्टनबर्ग यांच्या मते "खेळते भांडवल म्हणजे चालू संपत्तीचे, चालू दायित्वावरील अधिक्य!" याच दृष्टिकोनातून 'निव्वळ खेळते भांडवल' असे याला संबोधले जाते. जेस्टनबर्ग याला खेळते भांडवल न म्हणता 'अभिसरण भांडवल' असे म्हणतात. काही तज्ज्ञांच्या मते चालू संपत्तीच्या समतुल्य असते ते खेळते भांडवल होय. जे. एस. मिलच्या मते, 'एकूण चालू मालमत्ता म्हणजेच व्यवसायातील खेळते भांडवल!' वरील दृष्टिकोन अधिक व्यापक असून हा कंपनीच्या सर्व चालू संपत्तीचा यामध्ये समावेश करतो. यालाच एकूण खेळते भांडवल (Gross working capital) असे म्हणतात.

### अधिक माहितीसाठी




खेळत्या भांडवलाचे चक्रीय आवर्तन

**खेळत्या भांडवलाचे चक्रीय आवर्तन :**

व्यावसायिक संस्थेला खेळत्या भांडवल मालमत्तेसाठी निधीची आवश्यकता असते. या निधीचा प्रमुख भाग हा कच्चा माल खरेदी करण्यासाठी वापरला जातो व उर्वरित भाग वेतन व इतर खर्च भागविण्यासाठी उपलब्ध केला जातो. अशाप्रकारे खेळते भांडवल जे रोख स्वरूपात होते त्याचे रूपांतर मालसाठ्यामध्ये (inventories) होते. कच्च्या मालावर प्रक्रिया केली जाते व त्याचे परिवर्तन तयार वस्तूमध्ये होते. या तयार वस्तू उधारीवर विकल्या जातात असे गृहीत धरले जाते व वस्तूंच्या विक्रीमुळे त्याचे रूपांतर 'उधार मालाच्या येणाऱ्या मूल्यांमध्ये (account receivable) होते. देयक तारखेपासून एका ठरावीक दिवशी या 'उधार मालाच्या येणाऱ्या मूल्यांची मुदत समाप्त होते. या मुदत समाप्तीनंतर त्याचे रोखीमध्ये परिवर्तन होऊन हे चक्र परत फिरू लागते.

रोख रकमेचा एक हिस्सा धनकोना (creditors) देण्यासाठी, आयकर भरण्यासाठी आणि लाभांश जाहिर करण्यासाठी वापरला जातो व उर्वरित भाग पुन्हा चलनात आणला जातो.

## खेळत्या भांडवलाच्या आवश्यकतेवर परिणाम करणारे घटक

खेळत्या भांडवलाची आवश्यकता मोजण्यासाठी कोणतीही अचूक मानके नाहीत. व्यवसाय ज्या आर्थिक वातावरणात कार्यरत आहे तसेच इतर अनेक गोष्टींवर विचार करून खेळत्या भांडवलाचे प्रमाण निश्चित केले जाते.

### १) व्यवसायाचे स्वरूप :

दैनंदिन वापराच्या आवश्यक वस्तूंच्या उत्पादनात गुंतलेल्या व्यावसायिक संस्थाना तुलनेने कमी खेळत्या भांडवलाची गरज भासते. कारण दायित्वाची (liability) काळजी घेण्यासाठी संस्थेत सतत व पुरेसा रोख रकमेचा ओघ सुरू असतो. त्याचप्रमाणे सार्वजनिक उपक्रमांमध्ये ग्राहकाकडून रोख रकमेचा ओघ सतत सुरू असल्याकारणाने खेळत्या भांडवलाचे प्रमाण खूप कमी असते.

> ***सार्वजनिक उपक्रम :*** *हे स्थानिक प्रवासी वाहतूक, गॅस, वीज, इत्यादी सारख्या सेवा प्रदान करतात.*

या उलट जर व्यवसाय चैनीच्या वस्तूंचा (luxury goods) व्यापार करत असेल तर त्यासाठी मोठ्या प्रमाणावर खेळत्या भांडवलाची आवश्यकता भासते कारण या वस्तूंच्या विक्रीमध्ये सातत्य नसते.

वस्तूंच्या वितरणाशी संबंधित संस्थेकडे ग्राहकांची मागणी पूर्ण करण्यासाठी भरपूर प्रमाणात मालसाठा (inventory) तयार ठेवावा लागतो. तसेच ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी पत सुविधा (credit facility) पुरवावी लागते म्हणून अशा संस्थांना मोठ्या प्रमाणावर खेळत्या भांडवलाची गरज असते.

> *वस्तूंच्या वितरण करणाऱ्या संस्था या भौतिक स्वरूपातील वस्तूंमध्ये बदल न करता खरेदी व विक्रीशी संबंधित असतात. उदा. घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते.*

### २) व्यवसायाचे आकारमान :

व्यवसायाच्या आकारमानाचा अंदाज त्याच्या एकूण कार्यक्षेत्राच्या प्रमाणावरून ठरविला जातो. मोठ्या प्रमाणावर (large scale) व्यापार करणाऱ्या कंपनीस खेळत्या भांडवलाची अधिक गरज असते.

### ३) विक्रीचे प्रमाण :

हा सर्वात महत्वाचा घटक आहे. एकूण विक्रीचे प्रमाण व खेळते भांडवल यांचे एकमेकांशी थेट नाते आहे. जर विक्रीचे प्रमाण वाढते असेल तर त्याच प्रमाणात खेळते भांडवलही उपलब्ध करून द्यावे लागते.

### ४) उत्पादन चक्र :

कच्च्या मालाचे तयार वस्तूमध्ये रूपांतर करण्याच्या प्रक्रियेला 'उत्पादन चक्र' असे म्हणतात. जर उत्पादन चक्राला लागणार कालावधी मोठा असेल तर खेळते भांडवल जास्त प्रमाणात लागते. या उलट जर उत्पादन चक्राचा कालावधी कमी असेल तर खेळते भांडवल कमी प्रमाणात लागते.

### ५) व्यापारी चक्र :

जेव्हा बाजारात 'तेजी' असते तेव्हा विक्रीच्या एकूण प्रमाणात वाढ होत असते. त्यामुळे वस्तूंचा साठा (stock) वाढविणे आवश्यक असते. मालसाठा करून ठेवण्यासाठी जास्त गुंतवणुकीची गरज असते. यासाठी अतिरिक्त खेळत्या भांडवलाचा उपयोग करणे क्रमप्राप्त होते.

या उलट जेव्हा मंदीचा काळ असतो तेव्हा विक्रिचे प्रमाण कमी असते त्यामुळे खेळत्या भांडवलाची आवश्यकता कमी झालेली असते.

### ६) खरेदी व विक्रीच्या अटी :

कंपनी स्वतः खरेदी करताना उधारीच्या सवलतीचा फायदा घेते, पण वस्तूंची विक्री करताना अशी सवलत ग्राहकांना देत नाही असे धोरण राबविणाऱ्या कंपनीस खेळते भांडवल कमी लागते.

या उलट ज्या कंपनीला उधारीवर माल मिळत नाही पण विक्री करताना वस्तू उधारीने द्याव्या लागतात. अशा कंपनीला खेळते भांडवल जास्त लागते.

### ७) उधारीवरील अंकुश :

उधारीवर अंकुश ठेवताना काही गोष्टींकडे लक्ष द्यावे लागते. उदा. उधार विक्रीचे प्रमाण, उधारीच्या अटी, वसुलीचे

धोरण इत्यादींचा समावेश यात करता येईल. उधारीवर अंकुश ठेवण्याचे धोरण जर कठोर असेल तर कंपनीची आवक सुधारते. जर या उलट हेच धोरण जर उदार असेल तर वसुलीचा प्रश्न उद्‌भवतो. योग्य वेळेत वसुली झाली नाही तर बुडीत कर्जाची (bad debt) शक्यता असते. अशा कंपनीला खेळत्या भांडवलाची जास्त गरज भासते.

कंपनी रोखीचा व्यवहार करत असेल तर खेळते भांडवल कमी लागते.

**८) प्रगतीचा व विकासाचा वेग :**

कंपनीच्या उत्कर्षाबरोबर खेळत्या भांडवलाची गरजही वाढते. सातत्याने प्रगतीपथावर असणाऱ्या कंपनीस निधीची आवश्यकता सतत भासते.

**९) व्यवस्थापनेची कुवत :**

उत्पादन व वितरण यामध्ये योग्य समन्वय असेल तर खेळत्या भांडवलाची आवश्यकता कमी असते. तसेच ज्या कंपनीस मालसाठा (stock) करून ठेवावा लागतो त्यांना खेळत्या भांडवलाची जास्त गरज असते.

**१०) बाह्य घटक :**

वित्तीय संस्था तसेच बँका जर जरूरीच्या वेळेत निधी उपलब्ध करून देत असतील तर खेळत्या भांडवलाची आवश्यकता जास्त नसते.

## १.४ भांडवल संरचना :

मालकीचे भांडवल किंवा कर्जाऊ भांडवल अथवा दोन्ही मार्गांनी कंपनी भांडवल उभे करते. मालकी हक्काच्या भांडवलामध्ये समहक्क भाग, अग्रहक्क भाग, राखीव व अतिरिक्त निधी यांचा समावेश होतो. कर्जाऊ भांडवल म्हणजे कर्जरोखे, इतर कर्जे इत्यादी होय. या सर्व स्रोतांचा प्रमाणबद्ध एकत्रित रितीने कंपनीच्या एकूण भांडवलात समावेश केला जातो.

भांडवल संरचना म्हणजे इच्छित प्रमाणानुसार विविध स्रोतांचे निधी एकत्र करणे. भांडवल संरचना ठरविणे म्हणजे, 'एकूण भांडवलामध्ये वेगवेगळ्या प्रतिभूतींचे गुणोत्तर प्रमाण ठरविणे.' यालाच 'प्रतिभूतींचे मिश्रण' असेही म्हटले जाते.

### १.४.१ व्याख्या

**आर. एच. व्हेसल :** 'उद्योग व्यवसायात गुंतविलेले दिर्घमुदतीचे व वैविध्यपूर्ण निधी'.

**जॉन एच हॅम्टन :** 'संस्थेची भांडवल संरचना म्हणजे कर्ज व समहक्क भाग या दोन प्रतिभूतीमधील संबंध, ज्यानुसार कंपनीला मालमत्ता खरेदीसाठी निधी पुरवठा करतो.'

अशाप्रकारे 'भांडवल संरचना' ही मालकीचा निधी व कर्जाऊ निधी यापासून तयार होते. मालकीच्या निधीमध्ये भाग भांडवल आणि राखीव व अतिरिक्त निधींचा समावेश होतो तर कर्जाऊ निधीमध्ये कर्जरोखे तसेच दिर्घमुदतीचे कर्ज यांचा समावेश होतो.

**अधिक माहितीसाठी :**

**भांडवल संरचनेतील तत्त्वे :** भांडवल संरचनेचा निर्णय घेताना दोन मूलभूत तत्त्वे विचारात घेतली जातात.

(१) कर्जाऊ रक्कम व समहक्क भाग (debt equity) यांचे प्रमाण : कमाईच्या स्थिरतेनुसार निश्चित केले जाते.

(२) व्यवसाय चक्रातील धक्के सहन करण्यासाठी व लवचिकतेसाठी, भांडवल संरचनेमध्ये समहक्क भाग भांडवलाचे 'धक्क्या'पासून बचाव करणारे 'आवरण' असणे गरजेचे आहे.

### १.४.२ भांडवल संरचनेचे घटक

भांडवल संरचनेचे चार घटक आहेत ते खालीलप्रमाणे :

१) **समहक्क भाग भांडवल :** हा कंपनीच्या भांडवलाचा प्राथमिक स्रोत आहे. कंपनीची मालकी या भागांकडे असते. तसेच मालकी हक्कांबरोबर येणारी जोखिम ही त्यांनी स्वीकारलेली असते. त्यांना लाभांश दिला जातो जो अस्थिर असतो.

२) **अग्रहक्क भाग भांडवल :** या भागांना लाभांश वाटप व कंपनी विसर्जनावेळी भांडवल परतफेड यासाठी अग्रहक्क दिला जातो. यांना स्थिर दराने लाभांश दिला जातो. या भागांना मतदानाचा हक्क नसतो.

३) **प्रतिधारण (संचयी) नफा :** निधी उभारणीचा हा अंतर्गत स्रोत आहे. याला नफ्याची पुनर्गुंतवणूक असे म्हणतात. वाटप न केलेल्या नफ्याचा व्यवसायासाठी वापर करणे म्हणजेच नफ्याचे भांडवलीकरण होय.

४) **कर्जाऊ भांडवल :** यामध्ये दोन गोष्टींचा समावेश केला आहे.

अ) कर्जरोखे – हा कंपनीने घेतलेल्या कर्जाचा पुरावा आहे. यावर निश्चित दराने व्याज दिले जाते.

ब) मुदतीची कर्जे – बँक किंवा वित्तीय संस्थांनी दिलेली ही कर्जे असतात. यावर निश्चित दराने व्याज दिले जाते.

पुढे दिलेल्या उदाहरणावरून तुम्हाला भांडवल संरचनेची संकल्पना समजून घेता येईल.

**३१ मार्च, २०१९ रोजीचा अबक कंपनीचा ताळेबंद**

| देयता (देणी) | रक्कम ₹ | संपत्ती (मालमत्ता) | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| **भाग भांडवल** | | **स्थिर मालमत्ता** | |
| १०,००० समहक्क भाग ₹. १० प्रत्येकी, पूर्ण किंमत दिलेले. | १,००,००० | इमारत | ४,००,००० |
| | | यंत्र सामग्री | २,००,००० |
| ५,००० अग्रहक्क भाग ₹. १०० प्रत्येकी पूर्ण किंमत दिलेले. | ५,००,००० | **चालू मालमत्ता** | |
| | | ऋणको | १,००,००० |
| **राखीव निधी व अतिरिक्त निधी** | ५०,००० | मालसाठा | ५०,००० |
| **दायित्वे** | | रोख रक्कम | १०,००० |
| १०००, १०% कर्जरोखे ₹. १०० प्रत्येकी पूर्ण किंमत दिलेले | १,००,००० | बँकेतील रक्कम | ४०,००० |
| धनको | ३०,००० | | |
| देय विपत्र | २०,००० | | |
| | ८,००,००० | | ८,००,००० |

भांडवल संरचना = समहक्क भाग + अग्रहक्क भाग + राखीव निधी + कर्जरोखे

= १,००,००० + ५,००,००० + ५०,००० + १,००,०००

= ७,५०,०००

**कृती :** कोणत्याही मर्यादित कंपनीच्या वेबसाईटला भेट द्या आणि तिची भांडवलाची संरचना जाणून घ्या.

## १.५ फरक

| मुद्दे | स्थिर भांडवल | खेळते भांडवल |
|---|---|---|
| १) अर्थ | स्थिर भांडवल म्हणजे कोणत्याही प्रकारची स्थिर मालमत्ता किंवा संपत्ती होय. | खेळते भांडवल म्हणजे एकूण चालू मालमत्तेची बेरीज होय. |
| २) स्वरूप | हे भांडवल व्यवसायात जवळ जवळ कायमस्वरूपी राहते. | खेळते भांडवल हे 'अभिसरण भांडवल' आहे. |
| ३) कारण | हे भांडवल स्थिर संपत्तीमध्ये गुंतविले जाते. उदा. जमीन, इमारत, फर्निचर इत्यादी. | खेळते भांडवल अल्प मुदतीच्या मालमत्तेमध्ये गुंतविले जाते. उदा. रोकड, मालसाठा, उधारी इ. |
| ४) स्रोत | भाग, कर्जरोखे, दीर्घ पल्ल्याचे कर्ज, बंधपत्रे या मार्गाने स्थिर भांडवलाची उभारणी करता येते. | खेळते भांडवल अल्प मुदतीचे कर्ज, ठेवी, व्यापारी कर्जे इत्यादी मार्गाने उभे केले जाते. |
| ५) गुंतवणूक-दाराचे ध्येय | भविष्यामध्ये नफा कमाविण्याच्या उद्देशाने गुंतवणूकदार स्थिर भांडवलात पैसे गुंतवितात. | त्वरित परतावा मिळविण्याच्या उद्देशाने गुंतवणूकदार यात पैसे गुंतवितात. |
| ६) जोखीम | स्थिर भांडवलातील गुंतवणूक जोखमीची असते. | खेळत्या भांडवलातील गुंतवणूक कमी जोखमीची असते. |

## सारांश

- संस्थात्मक वित्तव्यवस्था, व्यावसायिक संस्थेने केलेले भांडवल संपादन व त्याचा विनियोग या गोष्टींची हाताळणी करते.
- स्थिर भांडवल म्हणजे कोणत्याही प्रकारची 'भौतिक मालमत्ता' म्हणजेच स्थिर मालमत्ता होय.
  उदा. जमीन, इमारत, उपकरणे, इ.
- खेळते भांडवल म्हणजे चालू संपत्तीचे चालू दायित्वावरील अधिक्य. जसे : रोकड, उधार मालमत्तेचे येणारे मूल्य इ.
- भांडवल संरचना म्हणजे एकूण भांडवलामध्ये वेगवेगळ्या प्रतिभूतींचे गुणोत्तर प्रमाण ठरविणे. यालाच 'प्रतिभूतींचे मिश्रण' असेही म्हटले जाते.

## स्वाध्याय

**प्र.क्र. १ अ) खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१) .................... हे पैसे व पैशाचे व्यवस्थापन यांच्याशी निगडित आहे.
अ) उत्पादन ब) विपणन क) वित्त

२) वित्त म्हणजेच कंपनीच्या .................... बाबींचे व्यवस्थापन करणे.
अ) आर्थिक ब) विपणन क) उत्पादन

३) संस्थात्मक वित्तव्यवस्था व्यावसायिक संस्थेने केलेल्या .................... चे संपादन व त्याचा विनियोग या गोष्टींची हाताळणी करते.
अ) मालाचे ब) भांडवलाचे क) जमिनीचे

४) कंपनीला सरकारकडे .................... भरावा लागतो.
अ) कर ब) लाभांश क) व्याज

५) .................... म्हणजेच कोणत्याही प्रकारची स्थिर मालमत्ता होय.
अ) अधिकृत भांडवल ब) विक्रीस काढलेले भांडवल क) स्थिर भांडवल

६) चालू संपत्तीचे चालू दायित्वावरील अधिक्य म्हणजेच .................... होय.
अ) खेळते भांडवल ब) भरणा झालेले भांडवल क) अभिदत्त भांडवल.

७) उत्पादन उद्योगाला स्थिर मालमत्ता मिळविण्यासाठी .................... प्रमाणावर निधी गुंतवावा लागतो.
अ) मोठ्या ब) छोट्या क) कमीतकमी

८) लोकसंख्या उच्च दराने वाढत असल्यास काही उत्पादकांना ही व्यवसाय .................... संधी आहे असे वाटते.
अ) बंद करण्यासाठी ब) वाढविण्यासाठी क) कमी करण्यासाठी

९) एकूण .................... म्हणजेच व्यवसायातील खेळते भांडवल.
अ) खर्च ब) चालू मालमत्ता क) चालू दायित्व

१०) .................... म्हणजे इच्छित प्रमाणानुसार विविध स्रोतांचे निधी एकत्र करणे.
अ) भांडवली अर्थसंकल्प ब) भांडवल संरचना क) भांडवली वस्तू

**ब) जोड्या जुळवा.**

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | भांडवली अर्थसंकल्प | १) | एकूण चालू मालमत्ता |
| ब) | स्थिर भांडवल | २) | भांडवल संपादन व त्याचा विनियोग |
| क) | खेळते भांडवल | ३) | स्थिर दायित्व |
| ड) | भांडवल संरचना | ४) | एकूण चालू दायित्व |
| इ) | संस्थात्मक वित्तव्यवस्था | ५) | स्थिर मालमत्ता |
| | | ६) | गुंतवणुकीचा निर्णय |
| | | ७) | वित्तीय निश्चितीचा निर्णय |
| | | ८) | संपत्तीचे संपादन व त्याचा विनियोग |
| | | ९) | विविध वित्त स्रोतांचे मिश्रण |
| | | १०) | वस्तूंचे मिश्रण |

**क) खालील प्रत्येक विधानासाठी एक शब्द किंवा शब्दसमूह किंवा संज्ञा लिहा.**

१) कोणत्याही व्यवसाय कार्याच्या यशाचा निर्धारक.

२) संस्थेकडे पुरेसे भांडवल असल्याची खात्री देणारा वित्त व्यवस्थापकाचा निर्णय.

३) निधीचा यशस्वीरित्या उपयोग करण्याचा वित्तीय व्यवस्थापकाचा निर्णय.

४) दीर्घ कालावधीसाठी वापरली जाणारी स्थिर मालमत्ता मिळविण्यासाठी या भांडवलाची आवश्यकता असते.

५) चालू मालमत्तेची एकूण बेरीज.

६) चालू मालमत्तेचे चालू दायित्वावरील अधिक्य.

७) कच्च्या मालाचे तयार वस्तूमध्ये रूपांतरित करण्याची प्रक्रिया.

८) अर्थव्यवस्थेतील तेजी व मंदीचे चक्र.

९) एकूण भांडवलातील वेगवेगळ्या प्रतिभूतींचे गुणोत्तर.

१०) वित्त पुरवठा करणारा अंतर्गत स्रोत.

**ड) खालील विधाने बरोबर की चूक ते लिहा.**

१) वित्त हे पैसे व पैशाचे व्यवस्थापन यांच्याशी निगडित आहेत.

२) प्रकल्प जर फायदेशीर असेल तरच व्यावसायिक संघटना त्याला हिरवा कंदील दाखविते.

३) संस्थात्मक वित्तव्यवस्था विविध व्यावसायिक कार्यांमध्ये समन्वय साधते.

४) स्थिर भांडवलाला 'अभिसरण भांडवल' असेही म्हणतात.

५) खेळते भांडवल व्यवसायामध्ये शक्यतो कायमस्वरूपी राहते.

६) व्यवसायात भाडेपट्टीच्या तत्त्वावर मालमत्ता संपादन केल्यास जास्त प्रमाणात निधींची आवश्यकता असते.

७) चैनीच्या वस्तूंचे उत्पादन व व्यापार करणाऱ्या व्यवसायास मोठ्या प्रमाणावर खेळत्या भांडवलाची आवश्यकता असते.

८) मोठ्या प्रमाणावर व्यवसाय करणाऱ्या कंपनीला अधिक खेळत्या भांडवलाची गरज असते.

९) उदारमतवादी पतधोरणांमुळे बुडीत कर्जाची (bad bebt) समस्या उद्‌भवते.

१०) वित्तीय संस्था व बँका व्यवसायाच्या खेळत्या भांडवलाची आवश्यकता पूर्ण करतात.

**इ) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) जमीन व इमारत, यंत्रसामग्री, रोख रक्कम.

२) कर्जरोखे भांडवल, समहक्क भाग भांडवल, अग्रहक्क भाग भांडवल.

३) स्थिर भांडवल, भांडवल संरचना, खेळते भांडवल

**फ) खालील विधाने पूर्ण करा.**

१) भांडवलाच्या आवश्यकतेचे प्रारंभिक नियोजन करणाऱ्या व्यक्ती म्हणजेच ..............

२) जेव्हा अर्थव्यवस्थेत तेजी असते तेव्हा विक्रीतही .............. होते.

३) कच्च्या मालाचे तयार वस्तूंमध्ये रूपांतर करण्याची प्रक्रिया म्हणजेच .............. होय.

४) मंदीच्या काळात विक्रीमध्ये .............. होते.

**ग) कंसातील अचूक पर्याय निवडा.**

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | वित्तीय निश्चितीचा निर्णय | १) | ...................................................... |
| ब) | .............................................. | २) | दीर्घ कालावधी |
| क) | वित्त गुंतवणुकीचा निर्णय | ३) | ...................................................... |
| ड) | .............................................. | ४) | अभिसरण भांडवल |
| इ) | विविध वित्त स्रोतांचे मिश्रण | ५) | ...................................................... |

(भांडवल योग्य प्रमाणात असणे, पद्धतशीरपणे निधी तैनात करणे, स्थिर भांडवल, खेळते भांडवल, भांडवल संरचना)

**ह) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) 'संस्थात्मक वित्त व्यवस्था' - व्याख्या लिहा.

२) स्थिर भांडवल म्हणजे काय ?

३) खेळत्या भांडवलाची व्याख्या लिहा.

४) उत्पादन चक्र म्हणजे काय ?

५) 'भांडवल संरचना' - व्याख्या लिहा.

**ई) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१) कर्जरोखे धारकांना लाभांश देण्यासाठी वित्त आवश्यक आहे.

२) जेव्हा अर्थव्यवस्थेत मंदी असते तेव्हा विक्रीमध्ये वाढ होते.

३) 'भाग' हे कंपनीने घेतलेल्या कर्जाऊ भांडवलाची पोचपावती असते.

४) समहक्क भागधारकांना स्थिर दराने लाभांश मिळतो.

**प्र.क्र. २) खालील संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा.**

१) वित्त निश्चितीचा निर्णय

२) वित्त गुंतवणुकीचा निर्णय

३) स्थिर भांडवल

४) खेळते भांडवल

**प्र.क्र. ३) खालील घटना व परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा.**

१) 'महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन मंडळाच्या व्यवस्थापनास खेळत्या भांडवलाचे आकारमान निश्चित करावयाचे आहे.

अ) सार्वजनिक उपयुक्तता सेवा असल्याने कमी खेळत्या भांडवलाची गरज आहे की जास्त ?

ब) सार्वजनिक उपयुक्तता सेवा असल्याने स्थिर भांडवल मोठ्या प्रमाणावर असणे गरजेचे आहे का ?

क) आपल्या दैनंदिन जीवनात नजरेस येणाऱ्या एखाद्या सार्वजनिक उपयुक्तता सेवेचे उदाहरण द्या.

२) कंपनी आपली उत्पादन क्षमता वाढविण्याच्या विचारात आहे. नवीन यंत्रसामग्री (machinery) खरेदीच्या शक्यतेचे मूल्यांकन केले तर त्याची किंमत सुमारे रु. २ कोटी इतकी आहे किंवा भाडेतत्त्वावर जुन्या यंत्रसामग्रीचा पर्याय उपलब्ध आहे.

अ) यंत्रसामग्री ही कोणत्या प्रकारची मालमत्ता आहे ?

ब) यंत्रसामग्री खरेदीसाठी वापरले जाणारे भांडवल हे स्थिर भांडवल आहे की खेळते भांडवल ?

क) व्यवसायाचे आकारमान स्थिर भांडवलाचे प्रमाण निश्चित करते का ?

**प्र.क्र. ४) फरक स्पष्ट करा.**

१) स्थिर भांडवल व खेळते भांडवल.

**प्र.क्र. ५) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) भांडवल संरचनेचा अर्थ स्पष्ट करा व त्याचे घटक सांगा.

२) स्थिर भांडवलाच्या आवश्यकतेवर परिणाम करणारे चार घटक लिहा.

३) संस्थात्मक वित्त व्यवस्था म्हणजे काय? संस्थात्मक वित्त व्यवस्थेच्या नितीचे आधार असणारे दोन निर्णय नमूद करा.

**प्र.क्र. ६) खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१) व्यावसायिक संस्थेकडे वित्त पुरवठा करणाऱ्या स्रोतांचे विविध पर्याय उपलब्ध असतात.

२) स्थिर भांडवलाच्या आवश्यकतेवर विविध घटक परिणाम करतात.

३) स्थिर भांडवल व्यवसायात जवळजवळ कायमस्वरूपी राहते.

४) भांडवल संरचना ही मालकीचा निधी व कर्जाऊ निधी यांच्या मिश्रणाने बनलेली असते.

५) खेळत्या भांडवलाच्या आवश्यकतेवर विविध घटक परिणाम करत असतात.

**प्र.क्र. ७) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) संस्थात्मक वित्त व्यवस्थेचे महत्त्व विशद करा.

२) खेळते भांडवल निश्चित करणाऱ्या घटकांवर चर्चा करा.

❑❑❑

# २ संस्थात्मक वित्त व्यवस्थेचे स्रोत

**२.१ मालकीच्या भांडवलाचे स्रोत**
- २.१.१ भाग
- २.१.२ प्रतिधारण नफा

**२.२ कर्जाऊ भांडवलाचे स्रोत**
- २.२.१ कर्जरोखे
- २.२.२ ठेवींचा स्वीकार
- २.२.३ बंधपत्रे
- २.२.४ अमेरिकन ठेव पावती, जागतिक ठेव पावती (ADR ad G DR)
- २.२.५ व्यावसायिक बँका
- २.२.६ वित्तीय संस्था
- २.२.७ व्यापारी कर्जे

**२.३ फरक**

**प्रस्तावना :**


उद्योग व्यवसायातील प्रत्येक कार्य पार पाडण्याची गुरुकिल्ली 'वित्त' (finance) कडे असते. कोणत्याही व्यावसायिक कार्याचा पाठपुरावा आर्थिक पाठिंब्याशिवाय केला जाऊ शकत नाही. व्यवसाय करताना प्रत्येक टप्प्यावर निधीची गरज असते. कंपनीचे प्रवर्तन, संघटन तसेच उद्योग व्यवसायातील नियमित कार्यांसाठीही याची आवश्यकता असते. व्यवसायातील प्रत्येक कृती ही शेवटी 'वित्ता'शी संबंधितच असते.

व्यावसायिक संस्थेला आवश्यक असलेल्या निधीला 'भांडवल' असे म्हटले जाते. प्रत्येक व्यवसाय संस्थेला त्याच्या कार्यासाठी विशिष्ट भांडवलाची आवश्यकता असते. 'संयुक्त भांडवली संस्था' (कंपनी), ही आधुनिक व्यावसायिक संस्था आहे तसेच हा मोठा उपक्रमही आहे. अशा संस्थेस मोठ्या प्रमाणावर भांडवलाची आवश्यकता असते. संयुक्त भांडवली संस्थेच्या व्यवस्थापनात मोठ्या प्रमाणावर भांडवल संचय किंवा भांडवल निर्मितीला विशेष महत्त्व आहे.

'भांडवल निर्मिती' म्हणजे कंपनीच्या 'आर्थिक योजने'नुसार विविध स्रोतांकडून भांडवल जमा करण्याची प्रक्रिया आहे.

कंपनी वेगवेगळ्या स्रोतांद्वारे मोठ्या प्रमाणावर निधी जमा करते. व्यवसायासाठी उपलब्ध असलेल्या वित्तपुरवठ्याचे विविध स्रोत खालील तक्त्यामध्ये स्पष्ट केले आहेत.

**वित्त पुरवठ्याचे स्त्रोत**




वरील स्रोतांचे अंतर्गत व बहिर्गत (बाह्य) स्रोत असे वर्गीकरण केले जाते.

- बाह्य स्रोत : संस्थे बाहेरच्या मार्गाने जमा केलला निधी.
- अंतर्गत स्रोत : संस्थेने संस्थांतर्गत मार्गाने जमा केलेला निधी.

## २.१ मालकीच्या भांडवलाचे स्रोत

मालकाच्या (भागधारकाच्या) मदतीने कंपनीने उभे केलेले भांडवल म्हणजेच मालकीचे भांडवल होय. भागधारक कंपनीचे भाग खरेदी करतात आणि आवश्यक भांडवल पुरवितात. मालकीच्या भांडवलाचा हा एक प्रकार आहे.

मालकीच्या भांडवलाचा आणखी एक प्रकार म्हणजे संचित नफा किंवा प्रतिधारण नफा! यालाच 'नफ्याची पुनर्गुंतवणूक' (Ploughing back of profit) असेही म्हणतात. कंपनीच्या नफ्याची कंपनीच्याच व्यवसायात पुनर्गुंतवणूक करणे असा याचा अर्थ होतो. निधी उभारणीचा हा अंतर्गत स्रोत आहे.

मालकीचे भांडवल हे कायमस्वरूपी व्यवसायात राहणारे भांडवल मानले जाते. हे कंपनी विसर्जनाच्या वेळीच परत केले जाते.

भाग भांडवलाच्या रूपातील मालकी भांडवल हे नवीन कंपनीसाठी प्रारंभिक स्रोत आहे. नंतरच्या काळातही अतिरिक्त भांडवलाची गरज पूर्ण करण्यासाठीही याचा उपयोग होतो. तथापि संचित नफा हा भांडवलाचा प्राथमिक स्रोत असू शकत नाही परंतु जेव्हा कंपनी आपला व्यवसाय फायदेशीररित्या चालविते तेव्हा हा स्रोत महत्त्वपूर्ण असू शकतो.

भाग भांडवल हा भांडवलाचा सार्वत्रिक आढळणारा असा प्रकार आहे. कंपनीच्या आवश्यक भांडवलाची रक्कम प्रवर्तक ठरवितात. ही भाग-भांडवलाची रक्कम 'अधिकृत भांडवल' (authorised capital) म्हणून ओळखली जाते. ही रक्कम कंपनीच्या घटनापत्रकात नमूद केली जाते. आता आपण याचा सविस्तर अभ्यास करू.

### २.१.१ भाग

कंपनी कायदा २०१३, कलम २ (८४) नुसार 'भाग' या संज्ञेची व्याख्या अशी आहे. 'भाग म्हणजे कंपनीच्या भाग भांडवलातील एक हिस्सा व भाग साठ्याचाही यात समावेश केला जातो.'

भाग भांडवलाची विभागणी ज्या घटकाने केली जाते तो घटक म्हणजे 'भाग' होय. कंपनीचे भांडवल असे छोट्या भागांमध्ये विभागलेले असते. असा प्रत्येक छोटा हिस्सा म्हणजे 'भाग' होय. प्रत्येक छोट्या हिश्श्याचे मूल्य म्हणजेच भागाचे दर्शनी मूल्य! कंपनीचे भाग हे अल्प मूल्याचे असल्यामुळे आम जनता भाग खरेदी करून कंपनीच्या भांडवल उभारणीमध्ये सहभागी होऊ शकते.

कोणतीही व्यक्ती स्वतःच्या इच्छेनुसार कितीही भाग खरेदी करू शकते. जी व्यक्ती असे 'भाग' खरेदी करते त्याला 'भागधारक' अथवा 'कंपनीचा सदस्य' असे संबोधले जाते.

- **भागांची वैशिष्ट्ये :**

१. **अर्थ :** भाग हा भाग भांडवलाचा छोटासा घटक आहे.

२. **मालकी हक्क :** भाग खरेदी करून मालक झालेल्या व्यक्तीला भागधारक असे म्हणतात. भाग हे भागधारकाचा कंपनीवरील मालकी हक्क दर्शवितात.

३. **अनुक्रमांक :** भागांचे डिमटेरिअलायझेशन झाले नसेल (भौतिक स्वरूपात असेल) तर प्रत्येक 'भागा'स स्वतंत्र अनुक्रमांक असतो व तो भाग दाखवल्यावर (share certificate) नमूद केलेला असतो.

४. **हक्क असल्याचा पुरावा :** भाग प्रमाणपत्र हे कंपनीने तिच्या सर्वमान्य मुद्रे अंतर्गत जारी केलेले असते. भाग मालकीचा हक्क दर्शवणारा हा दस्तऐवज आहे. भाग ही कोणतीही दृष्य वस्तू नसून ती 'भाग प्रमाणपत्र' स्वरूपात ठेवलेली असते किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात (D'mat) ही रूपांतरित केली जाते.

५. **भागाचे मूल्य :** प्रत्येक भागाला एक विशिष्ट मूल्य असते ते असे दर्शविले जाते.

अ) **दर्शनी मूल्य (Face Value) :** हे मूल्य 'भाग प्रमाणपत्रा'वर नमूद केलेले असते व कंपनीच्या घटनापत्रकामध्येही नोंदविलेले असते.

ब) **विक्री मूल्य (Issue Price) :** कंपनी या किंमतीला भाग विक्री करते.

क) **बाजार मूल्य (Market Value) :** हे मूल्य भाग बाजारातील मागणी (demand) व पुरवठा (supply) यांच्यानुसार ठरविले जाते.

६. **हक्क :** भागधारकांना काही हक्क प्रदान केले जातात. उदाहरणार्थ – लाभांश प्राप्तीचा अधिकार, लेखापुस्तकांच्या तपासणीचा अधिकार, भागधारकांच्या बैठकीस उपस्थित राहण्याचा अधिकार, भागधारकांच्या बैठकीत मतदानाचा अधिकार इत्यादी.

७. **मिळकत :** भागधारक कंपनीच्या वाटपयोग्य नफ्यातून वाटा मिळविण्यास पात्र असतो. यालाच 'लाभांश' असे म्हणतात.

८. **हस्तांतरण :** नियमावलीतील नियमानुसार सार्वजनिक कंपनीचे भाग मुक्तपणे हस्तांतरित करता येतात.

९. **भागधारकाची मालमत्ता :** भाग ही भागधारकाची 'चल मालमत्ता' (movable property) आहे.

१०. **भागांचे प्रकार :** कंपनी दोन प्रकारच्या भागांची विक्री करू शकते.

(अ) समहक्क भाग (ब) अग्रहक्क भाग

- **भागांचे प्रकार :**

कंपनी कायदा २०१३, कलम ४३ नुसार कंपनी वेगवेगळ्या प्रकारच्या भागांची विक्री करू शकते त्यासाठी त्यांचे हक्क, लाभ, जोखीम अशा गोष्टी लक्षात घेतल्या जातात. खालील तक्ता भागांचे विविध प्रकार दर्शवितो.

**भाग**

| **अ) समहक्क भाग** | **ब) अग्रहक्क भाग** |
|---|---|
| १) मतदानाच्या सर्वसाधारण हक्कांसहित | १) संचयी अग्रहक्क भाग |
| २) मतदानाच्या भेददर्शक हक्कांसहित | २) असंचयी अग्रहक्क भाग |
| | ३) लाभभागी अग्रहक्क भाग |
| | ४) अलाभभागी अग्रहक्क भाग |
| | ५) परिवर्तनीय अग्रहक्क भाग |
| | ६) अपरिवर्तनीय अग्रहक्क भाग |
| | ७) परतफेडीचे अग्रहक्क भाग |
| | ८) न परतफेडीचे अग्रहक्क भाग |

**अ) समहक्क भाग :** समहक्क भागांना 'साधारण भाग' असेही संबोधले जाते.

कंपनी कायद्यानुसार समहक्क भागांची व्याख्या अशी आहे. 'समहक्क भाग म्हणजे असे भाग जे अग्रहक्क भाग नसतात'. वरील व्याख्येनुसार समहक्क भागांची दोन वैशिष्ट्ये आहेत.

अ) अग्रहक्क भागांना लाभांश दिल्यानंतर समहक्कभागांना लाभांश दिला जातो.

ब) कंपनी विसर्जनानंतर भांडवल परतफेडीसाठी समहक्क भागधारकांना अग्रक्रम दिला जात नाही.

उद्योग व्यवसायासाठी लागणाऱ्या प्राथमिक व मूलभूत भांडवलाचा समहक्क भाग हा महत्वाचा स्रोत आहे. समहक्क भागांकडेच कंपनीचा मालकी हक्क असतो पण त्याबरोबर येणारी जोखीमही ते उचलत असतात. कंपनी विसर्जनानंतर सर्व गुंतवणूकदारांची रक्कम प्रथम परत केली जाते व उर्वरित रक्कम समहक्क भागधारकांना दिली जाते. याच कारणासाठी समहक्क भागधारकांना 'मालमत्ता व लाभांशाचे' अवशेष भागाचे हक्कदार' असे म्हटले जाते.

समहक्क भागधारकांसाठी कोणताही निश्चित अथवा बांधीलकी असलेला भार कंपनी उचलत नाही. लाभांशाचा दर नियामक मंडळाने ठरविल्यानुसार दिला जातो. एखाद्या वर्षी कंपनीला कमी नफा झाला तर समहक्क भागधारकांना कमी लाभांश दिला जातो व तोटा झाला असेल तर लाभांश दिला जात नाही. अशाप्रकारे समहक्क भागधारकांचे भाग्य कंपनीच्या चढ-उतारांशी जोडलेले असते. जर कंपनी यशस्वी झाली तर चांगल्या आर्थिक लाभाचा आनंद ते घेऊ शकतात आणि जर कंपनी अयशस्वी झाली तर मुख्यतः सगळी जोखीम त्यांना पेलावी लागते. याच कारणांमुळे समहक्क भागभांडवलाला 'साहसी भांडवल' किंवा जोखमीचे भांडवल असे म्हणतात. समहक्क भागधारकांना 'खरा जोखीम पत्करणारा' असे म्हटले जाते.

तथापि समहक्क भागधारकांचा कंपनीच्या व्यवस्थापनामध्ये सहभाग असतो. त्यांना कंपनीच्या सर्वसाधारण सभेसाठी आमंत्रित केले जाते. प्रत्येक समहक्क भागधारकाला मतदानाचा हक्क असतो. सर्वसाधारण सभेतील चर्चेमध्ये ते सहभागी होतात व मतदानाचा हक्क बजावतात. व्यवस्थापनातील त्यांचे प्रतिनिधी ते निवडतात. अशाप्रकारे ते खऱ्या अर्थाने कंपनीचे 'मालक' असतात.

## ■ समहक्क भागांची वैशिष्ट्ये :

१) **कायमस्वरूपी भागभांडवल :** समहक्क भाग हे 'न परतफेडीचे' भाग आहेत. समहक्क भागांची रक्कम कंपनीच्या जीवनकालामध्ये परत दिली जात नाही. त्यांची परतफेड कंपनी विसर्जनानंतर करता येते. अशाप्रकारे समहक्क भागधारक कंपनीला दीर्घमुदतीचे व कायमस्वरूपी भांडवल उपलब्ध करून देतात.

२) **अस्थिर लाभांशाचे दर :** समहक्क भागांसाठी कंपनीने लाभांशाचा कोणताही दर निश्चित केलेला नसतो. लाभांशाचा दर एकूण नफ्यानुसार कमी वा जास्त होत असतो. जर कंपनीने जास्त प्रमाणात नफा कमावला असेल तर लाभांशाचा दर अधिक दिला जातो. तसेच नफा अपुरा असेल तर व्यवस्थापक लाभांशाचे वाटप लांबणीवर टाकू शकतात. समहक्क भागधारक लाभांशासाठी व्यवस्थापकांवर सक्ती करू शकत नाहीत. समहक्क भाग धारकांचा लांभाश हा नियमित तसेच निश्चित नसतो, तर त्यात चढउतार होत असतात.

३) **हक्क :** समहक्क भाग धारकांना काही हक्क प्रदान केले आहेत ते असे –

अ) **मतदानाचा हक्क :** या हक्कादवारे समहक्क भागधारक संचालकांची निवड करतात, कंपनीची घटना किंवा नियमावलीत दुरुस्ती करू शकतात.

ब) **नफ्यामधील सहभागाचा हक्क :** हा अत्यंत महत्वाचा हक्क आहे. समहक्क भाग धारकांना नफ्यात वाटा मिळण्याचा हक्क आहे, जो लाभांश म्हणून वितरित केला जातो. कंपनी यशस्वी असेल व सढळ नफा कमावत असेल तर समहक्क भाग धारकांना मोठ्या लाभांशाचा फायदा घेता येतो.

क) **लेखा पुस्तकाच्या तपासणीचा हक्क :** समहक्क भागधारकांना ते ज्या कंपनीचे मालक आहेत त्या कंपनीच्या लेखा पुस्तकांची तपासणी करण्याचा हक्क आहे.

ड) **भागांच्या हस्तांतरणाचा हक्क :** समहक्क भागधारक नियमावलीत नमूद केलेल्या तरतुदीनुसार समहक्क भाग हस्तांतरणाचा हक्क उपभोगू शकतात.

४) **अग्रक्रम हक्क नाही :** समहक्क भागधारकांना लाभांश वाटपाकरिता अग्रक्रम दिला जात नाही. याचाच अर्थ अग्रहक्क भागधारकांना प्रथमतः लाभांश दिला जातो व त्यानंतर समहक्क भागधारकांना लाभांश दिला जातो.

कंपनी विसर्जनानंतरही समहक्क भागधारकांना त्यांचे भांडवल सर्वांत शेवटी परत केले जाते. शिल्लक रक्कमेतून कर्ज व अग्रहक्कभागांची परतफेड केल्यानंतर जर रक्कम शिल्लक राहत नसेल तर समहक्क भागधारकांना कोणतीही रक्कम दिली जात नाही.

५) **नियंत्रण :** समहक्क भागधारक कंपनीवर नियंत्रण ठेवून असतो. त्यांचे वर्णन 'कंपनीचे खरे मालक' असे केले जाते. मतदान करण्याचा हक्क केवळ समहक्क भागधारकांना दिला आहे. प्रत्येक समहक्क भागधारकास त्याने धारण केलेल्या भागांच्या प्रमाणानुसार मतदानाचा हक्क असतो. हा हक्क त्यांना कायद्याने प्रदान केला आहे. वैयक्तिकरित्या सभेला हजर न राहता ते प्रतिनिधींच्या (Proxy) मार्फतही मतदानाचा हक्क बजावू शकतात.

मतदानाचा हक्क बजावून ते कंपनीच्या व्यवस्थापन व कामकाजात सहभागी होऊ शकतात. कंपनीच्या व्यवस्थापनासाठी संचालक मंडळाचे प्रतिनिधी ते निवडतात. सर्वसाधारण सभेत चर्चेत असलेल्या सर्व बाबींवर त्यांना मत देण्याची मुभा आहे. अशाप्रकारे समहक्क भागधारक कंपनी व्यवस्थापनावर नियंत्रण ठेवतात.

६) **जोखीम :** समहक्क भागधारकांना कंपनी संबंधित असलेली जास्तीतजास्त जोखीम पेलत असतात. जेव्हा कंपनीवर आर्थिक आणीबाणीची वेळ येते तेव्हा असे संकट पेलायला ते तयार असतात.

कंपनीने एखाद्या वर्षी कमी नफा कमावला असेल तर समहक्क भागधारकास कमी लाभांश दिला जातो. त्यामुळे भागांचे बाजारमूल्य कमी होऊन त्यास 'भांडवली तोटा' सहन करावा लागतो. अशाप्रकारे समहक्क भागाधारक हे सर्व जोखीम उचलणारे भागधारक आहेत.

७) **अवशेष भागाचे दावेदार :** समहक्क भागधारक कंपनीचे मालक असल्यामुळे, कंपनीचे सर्व खर्च, विविध कर दिल्यानंतर कंपनीतील मालमत्तेच्या उर्वरित भागाचे दावेदार असतात.

अवशेष भागाचा दावा म्हणजे कंपनीच्या मिळकतीवरील अंतिम दावा!

समहक्क भागधारक जरी शेवटचे दावेदार असले तरी उर्वरित सर्व मिळकत मिळविण्याचा फायदा त्यांना आहे.

८) **कंपनीच्या मालमत्तेवर अधिकार नाही :** समहक्क भागधारकांना कंपनीच्या कोणत्याही मालमत्तेवर अधिकार सांगता येत नाही.

***मालमत्तेवर बोजा निर्माण करणे :*** *सावकाराच्या वतीने कंपनीने आपल्या मालमत्तेवर निर्माण केलेले हक्क, म्हणजे जर कर्जरोख्यांची परतफेड करण्यास कंपनी दोषी आढळल्यास सावकार तिची मालमत्ता विकून ती रक्कम वसूल करू शकते.*

९) **अधिलाभांश भाग/बोनस भाग :** अधिलाभांश भाग हे समहक्क भागधारकास 'बक्षीस' म्हणून विनामूल्य दिले जातात. हे भाग विद्यमान भागधारकांना विनामूल्य दिले जातात. जमा झालेल्या नफ्यातून हे समभाग दिले जातात. समभागांच्या प्रमाणात अधिलाभांश भाग दिले जातात. समहक्क भागांची 'भांडवली गुंतवणूक' अशा प्रकारे स्वतःच वाढते. हा लाभ फक्त समहक्क भागधारकांना उपलब्ध आहे.

१०) **हक्कभाग :** जेव्हा एखाद्या कंपनीला विस्ताराच्या उद्देशाने अधिक निधींची आवश्यकता असते आणि नवीन भागांची विक्री करून पुढील भांडवल जमा करते, तेव्हा विद्यमान भागधारकांना प्रथम भाग देण्याला प्राधान्य दिले जाते. यालाच 'हक्कभाग' देणे असे म्हणतात. समहक्क भागधारकांना त्यांच्या आधिपासून असलेल्या भागांच्या प्रमाणात हे समभाग दिले जातात.

११) **दर्शनी मूल्य :** समहक्क भागांचे दर्शनीमूल्य कमी असते. हे मूल्य रु. १०/– किंवा अगदी रु.१/– सुद्धा असू शकते.

१२) **बाजारमूल्य :** 'मागणी व पुरवठा' यानुसार समहक्क भागांच्या बाजार मूल्यांचे चढउतार होत असतात. समहक्क भागांची 'मागणी व पुरवठा' ही मिळविलेला एकूण नफा व घोषित लाभांश या दोन गोष्टींवर अवलंबून असते.

जेव्हा कंपनी भरघोस नफा मिळविते तेव्हा त्यांच्या भागांचे मूल्य वधारते पण जेव्हा त्यांचे नुकसान होते तेव्हा त्यांचे बाजारमूल्य कमी होते.

अन्य प्रतिभूतींच्या तुलनेत समहक्क भागांच्या बाजारमूल्यांमध्ये वारंवार चढ उतार झालेले दिसून येतात म्हणूनच या भागांचे सट्टेबाजांना खूप आकर्षण वाटते.

*प्रतिभूतींच्या मूल्य बदलामुळे नफा मिळविण्याचा प्रयत्न सट्टेबाज करतो.*

१३) **भांडवल वृद्धी (Capital appreciation) :** जेव्हा भागबाजारात भागांचे बाजारमूल्य वाढते तेव्हा भाग–भांडवलाची वृद्धी होते. कंपनीचा नफा तसेच कंपनीची समृद्धी हे कंपनीची भागबाजारात प्रतिष्ठा वाढवितात त्यामुळे भागांच्या मूल्यामध्ये वृद्धी होते.

■ **समहक्क भागांचे प्रकार :** समहक्क भागांचे दोन प्रकार आहेत.

१) मतदानाच्या सर्वसाधारण हक्कासहित

२) मतदानाच्या भेददर्शक हक्कासहित

**१) मतदानाच्या सर्वसाधारण हक्कासहित :** अशा प्रकारच्या भागधारकांना मतदानाचे सर्वसाधारण हक्क असतात. हे भागधारक त्यांनी धारण केलेल्या भागांच्या प्रमाणात मते देऊ शकतात.

२) **मतदानाच्या भेददर्शक हक्कासहित :** अशा प्रकारचे भाग धारण करणाऱ्या समहक्क भागधारकांना मतदान, लाभांश किंवा कंपनी नियम २०१४ मधील नियम ४, यानुसार सर्वसामान्य भागधारकांपेक्षा वेगळे हक्क दिले जातात.

कंपनी मतदानाचा हक्क किंवा मतदानाचा हक्कच नसलेले भाग यांची विक्री करू शकते. अशा भागधारकांना लाभांश अतिरिक्त दरानेही मिळण्याचे हक्क दिलेले असतात.

**ब) अग्रहक्क भाग :** या भागांना काही विशेष सवलती व अग्रक्रमहक्क असतात. असे हक्क समहक्क भागांना नसतात. अग्रहक्क भागांचे विशेष हक्क असे आहेत.

अ) लाभांश देण्याच्या वेळी यांचा अग्रक्रमाने विचार केला जातो.

ब) कंपनी विसर्जनाच्या वेळी भाग भांडवलाच्या परतफेडीसाठी यांचा अग्रक्रमाने विचार केला जातो.

अग्रहक्क भागधारकास लाभांश अग्रक्रमाने व निश्चित दराने दिला जातो. लाभांशाचा दर पूर्व निर्धारित असतो व तो विक्रीच्या वेळेस ठरविलेला असतो.

या भागधारकांना मतदानाचा सर्वसाधारण हक्क नसतो परंतु ज्या मुद्द्यांवरील निर्णयाचा अग्रहक्क भागधारकाच्या गुंतवणुकीवर थेट परिणाम होऊ शकतो अशा मुद्द्यांवर ते मतदान करू शकतात. उदाहरणार्थ त्यांच्या हक्कांमध्ये बदल केल्यास अथवा कंपनीची विक्री इत्यादी संदर्भात त्यांना मतदान करता येते.

अग्रहक्क भागधारक हे कंपनीचे सहमालक आहेत, पण ते कंपनीचे 'नियंत्रक' नाहीत. या प्रकारचे भाग जे गुंतवणूकदार सावध असतात ते खरेदी करतात कारण त्यांना त्यांच्या मुद्दलाची सुरक्षितता व नियमित लाभांश यांचीच काळजी असते.

■ **अग्रहक्क भागाची वैशिष्ट्ये :**

१) **लाभांशासाठी अग्रहक्क :** अग्रहक्क भागधारकांचा वार्षिक निव्वळ नफ्याच्या (net profit) वितरणीय रक्कमेवर प्रथम दावा असतो. समहक्क भागांना लाभांश देण्यापूर्वी अग्रहक्क भागांना लाभांश दिला जातो.

२) **भांडवल परतफेडीचा अग्रहक्क :** कंपनी विसर्जनाच्या वेळी भाग भांडवलाच्या परतफेडीसाठी या भागांचा अग्रक्रमाने विचार केला जातो. यामुळे भांडवल नुकसानीपासून अग्रहक्क भागधारकांचे संरक्षण होते.

३) **निश्चित परतावा :** अग्रहक्क भागांना निश्चित दराने लाभांश दिला जातो. हा दर पूर्वनिर्धारित असतो. हा निश्चित रकमेच्या स्वरूपात असतो किंवा नित दराने दिला जातो.

अग्रहक्क भागांना केवळ नफ्यामधूनच लाभांश दिला जातो. लाभांश दर निश्चित असला तरी कर्जावरील निश्चित व्याज दर व या दोन गोष्टींमध्ये फरक आहे. आर्थिक संकटाच्या काळात संचालकांनी कोणताही लाभांश न देण्याचा निर्णय घेतला तर अग्रहक्क भागधारकांना न दिलेल्या लाभांशावर हक्क सांगता येत नाही.

४) **भांडवलाचे स्वरूप :** अग्रहक्क भाग कंपनीला कायमस्वरूपी असलेले भांडवल पुरवत नाहीत. एका ठरावीक कालावधीनंतर त्यांच्या भांडवलाची परतफेड केली जाते. कंपनी 'न परतफेडीच्या' अग्रहक्क भागांची विक्री करू शकत नाही.

कंपनी स्थापनेनंतरच्या काळामध्ये हे अग्रहक्क भाग भांडवल गोळा केले जाते. हे भाग कंपनीच्या अतिरिक्त भांडवलाची गरज भागविण्यासाठी विक्रीस आणले जातात.

लाभांशाचे दर तसेच बाजार मूल्य यात चढ उतार होत नसल्याने अग्रहक्क भाग भांडवल हे 'सुरक्षित भांडवल' समजले जाते.

५) **बाजारमूल्य :** अग्रहक्क भागांना दिला जाणारा लाभांशाचा दर स्थिर असल्यामुळे त्यांचे बाजारमूल्य बदलत नाही. समहक्क भागांशी याची तुलना केल्यास या भागांची मूल्य वृद्धी होत नाही.

६) **मतदानाचा अधिकार :** अग्रहक्क भागांना मतदानाचे सर्वसाधारण हक्क नसतात. परंतु कंपनीच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार यांना नाही. थेट त्यांच्या अधिकारावर परिणाम करणाऱ्या कंपनीच्या कोणत्याही ठरावावर मतदान करण्याचा त्यांना अधिकार आहे. उदाहरणार्थ – भांडवलाच्या परतफेडीच्या अटींमधील बदल किंवा दोन वर्षांपासूनच्या लाभांशाची थकबाकी आहे. अशा मुद्द्यांसाठी ते मतदान करू शकतात.

७) **जोखीम :** सावध असणारे गुंतवणूकदार साधारणपणे अग्रहक्क भागांची खरेदी करतात. भांडवलाची सुरक्षितता व निश्चित लाभांश असे दोन फायदे अग्रहक्क भागांशी निगडित आहेत. त्यामुळे मंदीच्या काळात जेव्हा व्याजदराची सतत घसरण होत असते. अशावेळी या भागधारकांना अग्रहक्क एक वरदानच असते.

८) **दर्शनी मूल्य :** समहक्क भागांपेक्षा अग्रहक्क भागांचे दर्शनी मूल्य जास्त असते. त्यांचे दर्शनी मूल्य साधारण रु. १००/– इतके असते.

९) **हक्कभाग व बोनस भाग :** अग्रहक्क भाग हे हक्क भाग व बोनस भाग मिळण्यास पात्र नसतात.

१०) **गुंतवणूकदाराचे स्वरूप :** माफक अपेक्षा असणाऱ्या गुंतवणूकदारांना हे भाग आकर्षित करतात. परिवर्तनास विरोध करणारा, सावध, भांडवलाच्या सुरक्षिततेत स्वारस्य असणारा, गुंतवणुकीवर स्थिर परताव्याची अपेक्षा करणारा गुंतवणूकदार अशा भागांना पसंती देतो.

■ **अग्रहक्क भागांचे प्रकार :**

**अग्रहक्क भागांचे प्रकार**

| संचयी अग्रहक्क भाग व असंचयी अग्रहक्क भाग | लाभभागी अग्रहक्क भाग व अलाभभागी अग्रहक्क भाग | परिवर्तनीय अग्रहक्क भाग व अपरिवर्तनीय अग्रहक्क भाग | परतफेडीचे अग्रहक्क भाग व न परतफेडीचे अग्रहक्क भाग |
|---|---|---|---|

१) **संचयी अग्रहक्क भाग :** ज्या भागांना, न दिलेला लाभांश पूर्णतः देईपर्यंत संचित होत राहतो, त्यांना संचयी अग्रहक्क भाग असे म्हणतात. जर अपुऱ्या नफ्यामुळे कंपनी एक किंवा अधिक वर्षाचा लाभांश देऊ शकली नाही तर अशा लाभांशाची थकबाकी संचित होत जाते. जेव्हा कंपनी चांगला नफा कमावते, त्या वर्षी लाभांशाची थकबाकी भागधारकांना दिली जाते. समहक्कभागधारकांना लाभांश देण्यापूर्वीच ही थकबाकी अग्रहक्क भागांना दिली जाते.

नियमावलीत वेगळी तरतूद नमूद केलेली नसल्यास कंपनीचे अग्रहक्क भाग हे 'संचयी' अग्रहक्कभाग असतात, पूर्णतः लाभांशाची थकबाकी दिली जात नाही तो पर्यंत अशी थकबाकी पुढील वर्षाकरिता अग्रेसीत (carry forward) होते.

२) **असंचयी अग्रहक्क भाग :** या अग्रहक्क भागांवरील लाभांश संचित होत नाही. त्या वर्षीच्या नफ्यातूनच त्यांना लाभांश दिला जातो. जर कंपनीला एखाद्या वर्षी नफा झाला नाही तर असंचयी अग्रहक्क भागांना लाभांश मिळत नाही. प्रत्येक वर्षाच्या लाभांशाचा हिशोब त्या वर्षापुरताच ठेवला जातो. एखाद्या वर्षी जर कंपनी लाभांश देऊ शकली नाही तर त्या वर्षीच्या लाभांशाला कायमचे मुकतात.

३) **लाभभागी अग्रहक्क भाग :** ज्या अग्रहक्क भागांना निश्चित लाभांश व्यतिरिक्त कंपनीच्या अतिरिक्त नफ्यामध्ये काही वाटा दिला जातो. अशा भागांना लाभभागी अग्रहक्क भाग असे म्हणतात. समहक्क भागधारकाला द्यावयाच्या लाभांशाची कमाल मर्यादा नियमावलीमध्ये नमूद केलेली असते. कमाल लाभांश त्यांना देऊन झाल्यावर जो वाटप योग्य नफा उरतो त्यातील वाटा मिळविण्यास लाभभागी अगहक्क भाग पात्र असतात.

४) **अलाभभागी अग्रहक्क भाग :** जर कंपनीच्या नियमावलीमध्ये कोणतीही तरतूद नसेल तर सर्व अग्रहक्क भाग हे अलाभभागी अग्रहक्क भागच समजले जातात. अशा अग्रभागांचा लाभांशाचा दर भागविक्रीच्या शर्ती/

अटींमध्ये नमूद केलेला असतो. अलाभभागी अग्रहक्क भाग हे फक्त निश्चित केलेला लाभांश मिळण्यासच पात्र असतात.

५) **परिवर्तनीय अग्रहक्क भाग :** या अग्रहक्क भागांचे ठरावीक मुदतीनंतर समहक्क भागांमध्ये रूपांतर केले जाते.

६) **अपरिवर्तनीय अग्रहक्क भाग :** अपरिवर्तनीय अग्रहक्क भागांना समहक्क भागांमध्ये रूपांतरित होण्याचा पर्याय उपलब्ध नसतो.

७) **परतफेडीचे अग्रहक्क भाग :** परतफेडीच्या अग्रहक्क भागांना गुंतविलेले भांडवल ठरावीक मुदतीनंतर परत केले जाते. नियमावलीत तरतूद असेल तरच कंपनी अशाप्रकारच्या अग्रहक्कभागांचे वितरण करू शकतात. भांडवलाची परतफेड वाटप योग्य नफ्यातून किंवा नवीन समहक्क भागांच्या विक्रीतून आलेल्या पैशातून कंपनी करू शकते.

८) **न परत फेडीचे अग्रहक्क भाग :** अग्रहक्क भागांची परतफेड कंपनीच्या विसर्जनानंतरच केली जाते. कंपनी कायदा २०१३, कलम ५५ (१) नुसार कंपनी न परतफेडीच्या अग्रहक्क भागांची विक्री करू शकत नाही.

### २.१.२ प्रतिधारण नफा/संचयी मिळकत (Retained earnings) :

व्यावसायिक संस्थांच्या मिळकतीमध्ये नेहमी बदल होत असतो म्हणून जेव्हा नफ्याचे प्रमाण जास्त असते तेव्हा त्यातील काही भाग बाजूला ठेवणे हा सुज्ञपणाचा निर्णय असतो. दूरदर्शी व धोरणाने वागणारी कंपनी मिळविलेला संपूर्ण नफा भागधारकांमध्ये वाटून टाकत नाही. नफ्याचा काही भाग 'राखीव निधीच्या' रूपात ठेवला जातो. हा राखीव निधीचा साठा म्हणजेच कंपनीची 'संचयी मिळकत' होय. अशी संचयी मिळकत वर्षानुवर्षे जमा होत राहते. हा जमा झालेला नफा, लाभांश म्हणून वितरित न करता व्यवसायात गुंतविला जातो.

"संस्थेच्या नफा जमा (संचय) करण्याच्या प्रक्रियेस आणि त्याचा व्यवसायात वापर करण्याच्या पद्धतीस 'संचयी मिळकत' असे संबोधले जाते."

सोप्या शब्दात सांगावयाचे झाल्यास निव्वळ नफ्याचा (net profit) एक भाग भागधारकांना लाभांश म्हणून वितरित केला जात नाही व तो कंपनीच्या 'राखीव निधी'च्या रूपात साठविला जातो कंपनी राखीव निधीचे रूपांतर 'बोनस भाग भांडवलात' करते व अशा तऱ्हेने नफ्याचे परिवर्तन भांडवलात होते. बोनस भागांचे वाटप करून नफ्याचे भांडवलात रूपांतर करणे यालाच 'नफ्याची पुनर्गुंतवणूक (ploughing back of profit) किंवा 'स्वयं वित्तउभारणी' (Self financing) असे म्हणतात. विद्यमान समहक्क भागधारकांना बोनस भाग विनामूल्य दिले जातात.

व्यवस्थापन बोनस भागांचे वाटप करून संचयी मिळकतीचे रूपांतर कायमस्वरूपी भागभांडवलामध्ये करते. दीर्घ मुदतीचे भांडवल जमा करण्याचा हा एक महत्त्वाचा स्रोत आहे. निधी उभारणीचा हा एक सोपा व स्वस्त असा मार्ग आहे. हा वित्तपुरवठा करण्याचा अंतर्गत स्रोत आहे. भांडवल उभारणीसाठी याचा वापर प्रस्थापित कंपन्या करत असतात.

**संचयी मिळकती निश्चित करणारे घटक :**

१) **कंपनीचा एकूण नफा :** जर नफ्याचे प्रमाण जास्त असेल तर कंपनी त्यातील थोड्या भागाची बचत करून बाजूला ठेवते. जे. एफ. केन्सच्या मते "जास्त प्रमाणात नफा असेल तर जास्त प्रमाणात बचत असे याचे सूत्र आहे." शिवाय संचालक मंडळाची मनोभूमिका सुद्‌धा 'संचयी मिळकतींचे प्रमाण ठरविण्यास कारणीभूत असते.

२) **कर प्रणालीचे धोरण :** कंपनीचे बचत करण्याचे प्रमाण हे सरकारच्या कर आकारणीच्या धोरणावर अवलंबून असते. जर सरकार मोठ्या प्रमाणात कर आकारणी करत असेल तर कंपनी जास्त बचत करू शकत नाही जर बचतच कमी असेल तर 'संचयी/नफा' सुद्‌धा कमी होतो.

३) **लाभांशाचे धोरण :** नफा वाटपाची पद्‌धत ही कंपनीच्या संचालक मंडळाच्या धोरणाचाच एक भाग आहे. जर कंपनी 'सुरक्षित लाभांश धोरण' (conservative dividend policy) अवलंबत असेल तर नफ्याचे संचयीकरण जास्त होते पण अशा धोरणामुळे कंपनीला कमी लाभांश दर घोषित करावा लागतो.

४) **सरकारी नियंत्रण :** देशातील अर्थव्यवस्थेची सूत्रे सरकारच्या हातात असतात. प्रत्येक कंपनीला सरकारी कायद्यांचे पालन करावे लागते व त्यानुसारच लाभांशाचे धोरण राबवावे लागते.

## २.२ कर्जाऊ भांडवलाचे स्रोत :

कंपनीच्या सर्व व्यावसायिक कार्यांसाठी मालकीचे भांडवल पुरेसे नसते. मालकीच्या भांडवलाबरोबर पूरक म्हणून कर्जाऊ भांडवलाची आवश्यकता असते.

व्यवसाय करणाऱ्या प्रत्येक कंपनीला कर्जाऊ रक्कम उभी करण्याचा अधिकार आहे. कंपनीच्या घटनेमध्ये कर्जाऊ रक्कम उभारणीसाठी तातडीची तरतूद केलेली असते. कंपनीला कर्ज घेण्याचे अधिकार कंपनीची घटना देऊ करते. तर कंपनीच्या नियमावलीत हा अधिकार कसा व कोणाद्वारे वापरला जाईल हे नमूद केलेले असते. कर्ज घेण्याचे अधिकार सहसा कंपनीच्या संचालक मंडळास दिलेले असतात.

खाजगी कंपनीला नोंदणी (in orporation) झाल्यानंतर लगेच कर्ज घेण्याचा अधिकार प्राप्त होतो, पण सार्वजनिक कंपनीला व्यवसाय प्रारंभ प्रमाणपत्र घेतल्यानंतर कर्ज घेण्याचे अधिकार प्राप्त होतात.

अल्प, मध्यम किंवा दिर्घ मुदतीचे कर्ज आवश्यकतेनुसार घेतले जाते जेव्हा कंपनीला आपला व्यवसाय वाढवायचा असेल आणि त्यासाठी अतिरिक्त भांडवल आवश्यक असेल अशा कंपनी व्यवसायाच्या नंतरच्या टप्प्यावर कर्जाऊ भांडवल उभे करणे जास्त हितावह असते. अतिरिक्त भांडवल उभारणीसाठी (अ) कर्ज रोख्यांची विक्री (ब) ठेवी स्वीकारणे (क) बंधपत्रे (ड) बँकेचे तसेच वित्तिय संस्थेचे कर्ज इत्यादी पर्याय उपलब्ध असतात. कजाऊ भांडवलावर व्याज दिले जाते. हे व्याज निश्चित दराने दिले जाते. कर्जाऊ भांडवलाची विशिष्ट कालावधीनंतर परतफेड केली जाते.

### २.२.१ कर्जरोखे :

कर्जाऊ भांडवलाच्या उभारणीतील एक मुख्य स्रोत म्हणजेच कर्जरोखे होय. दीर्घ व मध्यम मुदतीच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी याचा उपयोग होतो. कंपनीच्या वित्तीय संरचनेमध्ये कर्जरोख्यांनी महत्त्वपूर्ण स्थान पटकावले आहे. कर्जरोखा (deb n n e) ही संज्ञा मूळ लॅटीन शब्द 'डिबेर' (deb re) यापासून आली असून याचा अर्थ 'ऋणी असणे' असा होतो. कंपनी कायदा २०१३ मध्ये कर्जरोख या शब्दाची स्पष्ट व्याख्या केलेली नाही.

कंपनी कायदा २०१३, कलम २ (३०) मध्ये फक्त असे नमूद केले आहे की, 'कर्जरोखे या शब्दामध्ये कर्जरोखेसाठा, बंधपत्रे तसेच इतर प्रतिभूतींचा समावेश होतो, ज्यासाठी कंपनीची एखादी मालमत्ता तारण ठेवलेली असते किंवा नसतेही!'

या परिभाषेअंतर्गत कर्जरोख्यांमध्ये कर्जरोखे साठ्याचाही समावेश केला आहे. कर्जरोखे म्हणजे असा दस्तावेज जो कर्जनिर्मिती करतो किंवा कर्जाची पोच देतो. साधारण सर्व कर्जरोख्यांसाठी कंपनीची मालमत्ता तारण ठेवलेली असते किंवा विना तारणही कर्जरोखे असू शकतात.

**व्याख्या :**

**पाल्मर :** यांनी नमूद केलेली व्याख्या अशी आहे. "कर्जरोखा म्हणजे कंपनीने घेतलेल्या कर्जाचा मुद्रांकित दस्तावेज, ज्याच्या तत्वानुसार कर्जबाजारीपणाची कबुली देणे."

**टोफन यांनी दिलेली व्याख्या :** "कर्जरोखा हा कंपनीने धारकास दिलेला कर्जाच्या पुराव्याचा दस्तावेज असून साधारणपणे कर्ज घेऊन एखादी मालमत्ता तारण ठेवलेली असते."

वरील दोन्ही व्याख्यांनुसार कर्जरोखा म्हणजे कर्ज घेतल्याचा पुरावा होय. कर्जरोखा म्हणजे कंपनीच्या मुद्रेखाली दिलेला दस्तावेज असून तो कर्जरोखे प्रमाणपत्राच्या स्वरूपात दिला जातो.

- **कर्जरोख्यांची वैशिष्ट्ये :**

१) **वचन :** कर्जरोखे म्हणजे त्यावर नमूद केलेली ठरावीक रक्कम कर्जाऊ घेतल्याने वचन आहे.

२) **दर्शनी मूल्य :** कर्जरोख्यांचे दर्शनीमूल्य हे तुलनेने जास्त असते. उदा. रु. १०० किंवा रु. १०० च्या पटीत असते.

३) **रक्कम परतफेडीची वेळ :** कर्जरोख्यांची मुद्‌दलाची रक्कम ठरावीक मुदतीनंतर परत केली जाते. कर्जरोखे प्रमाणपत्रावर कर्जाऊ रक्कम परत करण्याची तारीख नमूद केलेली असते.

४) **परतफेडीसाठी प्राधान्य :** कंपनीच्या इतर दावेदारांपेक्षा कर्जरोखेधारकांना भांडवल परतफेडीसाठी प्राधान्य दिले जाते.

५) **परतफेडीचे आश्वासन :** कर्जरोखे हे दीर्घमुदतीचे कर्ज उपलब्ध करून देतात. कर्ज ठरावीक मुदतीत परत करण्याची हमी यामध्ये दिलेली असते.

६) **व्याज :** कर्जरोख्यांना निश्चित दराने व ठरावीक कालावधीमध्ये व्याज दिले जाते. व्याज देणे ही कंपनीची जबाबदारी असते. कंपनीने नफा कमावला असेल किंवा नसेल तरीही व्याज देणे कंपनीस बंधनकारक आहे.

७) **कर्जरोख्यांसंबंधित घटक :**

अ) **कंपनी :** कर्ज घेणारी संस्था होय.

ब) **विश्वस्त :** कंपनी जर ५०० पेक्षा जास्त लोकांना कर्जरोखे विकत असेल तर कंपनी कर्जरोखे विश्वस्तांची नेमणूक करते. या विश्वस्तांमार्फत कंपनी कर्जरोखेधारकांशी व्यवहार करते. विश्वस्त व कर्जरोखेधारक यांच्याशी कंपनी करार करते. या करारास 'विश्वस्त करार' असे म्हणतात. यामध्ये कंपनीचे कर्तव्य व कर्जरोखेधारकांचे हक्क नमूद केलेले असतात.

क) **कर्जरोखेधारक :** या व्यक्ती कंपनीस कर्जाऊ रक्कम उपलब्ध करून देतात. त्यांना या कर्जाचा पुरावा म्हणून 'कर्जरोखे प्रमाणपत्र' दिले जाते.

८) **कर्जरोखे वाटपाचा अधिकार :** कंपनी कायदा २०१३, कलम १७९ (३) च्या नुसार संचालक मंडळाकडे कर्जरोखे वाटपाचा अधिकार असतो.

९) **कर्जरोखेधारकांचा दर्जा :** कर्जरोखेधारक हे कंपनीचे 'धनको' आहेत. कर्जरोखा म्हणजे कंपनीने घेतलेले कर्ज असून त्यांना स्थिर दराने व ठरावीक कालावधीमध्ये व्याज दिले जाते व असे व्याज कर्जरोख्यांची परतफेड करेपर्यंत दिले जाते.

१०) **मतदानाचा हक्क नाही :** कंपनी कायदा २०१३ कलम ७१ (२) नुसार कंपनी मतदानाचा हक्क असलेल्या कर्जरोख्यांचे वाटप करू शकत नाही. कर्जरोखेधारक कंपनीच्या साधारण सभेत मतदानाचा हक्क बजावू शकत नाहीत.

११) **तारण :** सामान्यतः स्थिर भार असलेली मालमत्ता (fixed charge) किंवा तरती भार असलेली मालमत्ता (floting charge) तारण देऊन कर्जरोखे सुरक्षित केले जातात. जर कंपनी व्याज देण्यास किंवा भांडवलाची परतफेड करण्यास तयार नसेल तर कर्जरोखेधारक कंपनीची मालमत्ता विकून त्यांचे पैसे वसूल करू शकतात.

१२) **जारीकर्ते (Issurer) :** खाजगी कंपनी तसेच सार्वजनिक कंपनी कर्जरोख्यांचे वाटप करू शकतात.

१३) **नोंदणी (Listing) :** कर्जरोख्यांची किमान एका मान्यताप्राप्त भाग बाजारामध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे.

१४) **हस्तांतरण :** हस्तांतरणाच्या दस्तावेजाद्‌वारे (Instrument of transfer) कर्जरोख्यांचे सहजपणे हस्तांतरण केले जाते.

- **कर्जरोख्यांचे प्रकार**

**कर्जरोखे**

| तारणानुसार | हस्तांतरणानुसार | परतफेडीच्या अटीनुसार | परिवर्तनानुसार |
|---|---|---|---|
| १) तारण असलेले कर्जरोखे | १) वाहक कर्जरोखे | १) परतफेडीचे कर्जरोखे | १) परिवर्तनीय कर्जरोखे |
| २) तारण नसलेले कर्जरोखे | २) नोंदविलेले कर्जरोखे | २) न परतफेडीचे कर्जरोखे | २) अपरिवर्तनीय कर्जरोखे |

१) **तारण असलेले कर्जरोखे :** कर्जरोखे हे तारण ठेऊन सुरक्षित केले जातात. कंपनीच्या मालमत्तेवर प्रभार/बोजा निर्माण करून सुरक्षा दिली जाते. असा प्रभार कंपनीच्या एखाद्या मालमत्तेवर (स्थिर प्रभार) असू शकतो किंवा कोणत्याही मालमत्तेवर (तरता प्रभार) असू शकतो. 'विश्वस्त करार' करून कर्जरोखे सुरक्षित केले जातात.

२) **तारण नसलेले कर्जरोखे :** ज्या कर्जरोख्यांना तारण दिलेले नसते अशांना असुरक्षित कर्जरोखे असे म्हणतात. आता अशा कर्जरोखे विक्रीला कंपनी कायदा २०१३ ने प्रतिबंध केला आहे.

३) **नोंदविलेले कर्जरोखे :** ज्या कर्जरोखेधारकांची नोंद, नोंदवहीत केलेली असते. त्यांना 'नोंदविलेले कर्जरोखे' असे म्हणतात. नोंदवहीत त्यांचे नाव, पत्ता व धारण केलेल्या कर्जरोख्यांची माहिती दिलेली असते. अशा कर्जरोख्यांचे हस्तांतरण रितसर पद्धतीने केले जाते.

४) **वाहक कर्जरोखे :** ज्या कर्जरोखेधारकांची नावे कर्जरोख्यांवर नमूद केलेली नसतात तसेच कंपनीच्या नोंदवहीमध्येही त्यांची नोंद केलेली नसते. हे कर्जरोखे दुसऱ्याला सुपूर्द करून हस्तांतरित होतात. 'व्याज कूपन'द्वारे या कर्जरोख्यांना व्याज दिले जाते.

५) **परतफेडीचे कर्जरोखे :** या कर्जरोख्यांची परतफेड एका ठरावीक मुदतीनंतर केली जाते, ही मुदतीची तारीख 'कर्जरोखे प्रमाणपत्रावर' नमूद केलेली असते. मुदत संपल्यानंतर कर्जरोखेधारकाला एकूण सर्व रक्कम एकत्रित परत दिली जाते किंवा टप्प्याटप्प्याने रकमेची परतफेड केली जाते. परतफेडीची तरतूद विश्वस्त करारामध्ये नमूद केलेली असते.

६) **न परतफेडीचे कर्जरोखे :** कंपनीच्या जीवनकाळात या प्रकारच्या कर्जरोख्यांची परतफेड केली जात नाही. त्यांची परतफेड कंपनी विसर्जनानंतर अथवा एखाद्या अटीचा भंग केल्यास किंवा एखाद्या आकस्मिक घटनेनंतर केली जाते.

७) **परिवर्तनीय कर्जरोखे :** एका ठरावीक कालावधीनंतर या कर्जरोख्यांचे समहक्क भागांमध्ये परिवर्तन होण्याचे अधिकार धारकास दिलेले असतात. तशी नोंद त्यांच्या कर्जरोखे प्रमाणपत्रावरच केलेली असते. या कर्जरोख्यांचे वाटप जनतेला करण्याआधी साधारण सभेमध्ये विशेष ठराव करणे गरजेचे असते. हे कर्जरोखे धारकांसाठी फायद्याचे असतात कारण या परिवर्तनाच्या हक्कामुळे या कर्जरोखेधारकांना बाजार मूल्यांपेक्षा कमी दराने समहक्क भाग मिळतात.

८) **अपरिवर्तनीय कर्जरोखे :** या कर्जरोख्यांचे परिवर्तन समहक्क भागामध्ये केले जात नाही. या कर्जरोख्यांची परतफेड ठरावीक मुदत संपल्यानंतर केली जाते. या कर्जरोख्यांचा तोटा असा आहे की, यांच्या मूल्यांमध्ये वृद्धी होत नाही.

### २.२.२ ठेवींचा स्वीकार (Acceptance of deposits) :

सार्वजनिक ठेवी हा अल्पमुदतीचे भांडवल उभे करण्याचा महत्त्वाचा पर्याय आहे. कंपनी कमीतकमी ६ महिने व जास्तीतजास्त 36 महिन्यांसाठी सार्वजनिक ठेवींचा स्वीकार करू शकते.

या पद्धतीनुसार कंपन्या जनतेची बचत रक्कम ठेवी म्हणून स्वीकारतात व आपली भांडवल उभारणी करू शकतात. या ठेवींवर कंपनी व्याज देते. कंपनी ठेवीदाराला 'ठेव पावती' (Deposit receipt) देते. ठेवींच्या सर्व अटी या ठेव पावतीत नमूद केलेल्या असतात 'ठेव पावती' ही कंपनीने घेतलेल्या कर्जाची पोचपावती आहे व ही सुरक्षित किंवा असुरक्षित (secured or unsecured) कर्जाऊ रक्कम असू शकते.

**अर्थ :**

कंपनी कायदा २०१३ कलम २ (३१) नुसार, ठेवींच्याद्वारे अथवा कर्जाच्या द्वारे अथवा कोणत्याही इतर स्वरूपात निधींचा स्वीकार करणे, समावेश 'ठेवी' मध्ये होतो पण भारतीय रिझर्व बँकेच्या सल्ल्यानुसार विहित केलेल्या विभागातील निधींचा यात समावेश नाही.

वरील व्याख्येचे विस्तृत विवेचन कंपनी नियम २०१४, नियम २ (१) (क) यात दिले आहे. या नियमानुसार, ठेव म्हणजे ठेवींच्या स्वरूपात किंवा कर्जांच्या स्वरूपात निधींचा स्वीकार करणे. तथापि ठेवीमध्ये खालील गोष्टींचा समावेश नाही.

१) केंद्र सरकार किंवा राज्य सरकारकडून मिळणारी कोणतीही रक्कम.

२) कोणत्याही बँकेकडून कर्ज म्हणून मिळणारी कोणतीही रक्कम.

३) परदेशी सरकार किंवा आंतरराष्ट्रीय बँकेकडून मिळणारी कोणतीही रक्कम.

४) कोणत्याही इतर कंपनीकडून प्राप्त झालेली रक्कम.

५) बंधपत्रे किंवा वाणिज्यपत्रांचे वाटप करून उभी केलेली रक्कम.

६) भाग किंवा कर्जरोख्यांच्या विक्रीने प्राप्त झालेली रक्कम.

७) व्यापारी पतपत्राच्या विक्रीने प्राप्त झालेली रक्कम.

८) विश्वस्तामार्फत मिळालेली रक्कम.

(ठेवी स्वीकारण्याबाबत अटी व शर्तींची सविस्तर चर्चा प्रकरण ५ मध्ये केली आहे.)

### २.२.३ बंधपत्रे :

बंधपत्र ही एक कर्जाऊ प्रतिभूती (debt security) आहे. कर्जाची रक्कम व्याजासह परतफेड करण्याचा हा औपचारिक करार आहे. बंधनपत्रधारक हा संस्थेचा 'धनको' असतो. त्याला निश्चित दराने व्याज मिळते. सर्व बंधपत्रांना मुदतपूर्तीची (maturity) तारीख असते व ती भविष्यात ठरावीक तारखेला रोख रकमेच्या स्वरूपात दिली जाते.

वेबस्टर डिक्शनरी नुसार बंधपत्र म्हणजे व्याजधारक कर्जाचे असे प्रमाणपत्र आहे ज्या द्वारे बंधपत्र देणारा, विशिष्ट मुदतीनंतर ठरावीक रक्कम देण्याचे वचन देतो.

अशाप्रकारे कंपनी कर्ज घेते आणि कर्जाचा पुरावा म्हणून बंधपत्रे जारी करते. व्याजाची रक्कम एका निश्चित अंतराच्या (interval) कालावधीत किंवा मुदत संपल्यानंतर दिली जाते.

**बंधपत्राची वैशिष्ट्ये (Features) :**

**१) वित्त व्यवस्थेचे स्वरूप :** ही दीर्घकालीन निधी पुरविते. बंधपत्रे ५ वर्षांकरिता, १० वर्षांकरिता किंवा २५ वर्षांकरितासुद्धा दिली जातात.

**२) बंधपत्रधारकाचे व्यावसायिक स्थान :** बंधपत्रधारक हे कंपनीचे 'धनको' आहेत. कंपनीचे 'धनको' असल्याने व मालक नसल्यामुळे कंपनीच्या सर्वसाधरण सभेत ते सहभागी होऊ शकत नाहीत. त्यांना मतदानाचा हक्क नसल्यामुळे ते कंपनीच्या व्यवस्थापनात भाग घेऊ शकत नाहीत.

**३) बंधपत्रांवरील परतावा :** बंधपत्रधारकांना निश्चित दराने व्याज दिले जाते. हे व्याज निश्चित अंतराने (regular interval) किंवा मुदतीचा काळ संपल्यानंतर दिले जाते.

**४) परतफेड :** बंधपत्रांची विशिष्ट मुदतीची वेळ असते त्या तारखेला मुख्य रकमेची (principal amount) परतफेड केली जाते.

### २.२.४ अमेरिकन ठेव पावती (American Depository Receipt) व जागतिक ठेव पावती (Global Depository Receipt) :

सार्वजनिक कंपनी भागांची नोंदणी व विक्री निरनिराळ्या भाग बाजारात करत असते. भारतीय कंपन्यांच्या भागांची खरेदी व विक्री भारतीय भाग बाजारात (Indian Stock Exchange) म्हणजे बॉम्बे स्टॉक एक्सचेंज, नॅशनल स्टॉक एक्सचेंज येथे केली जाते.

मुक्त व्यापारी धोरणाचा स्वीकार तसेच जागतिकीकरणामुळे काही भारतीय कंपन्यांचे भाग विदेशी भागबाजारात नोंदणी करून खरेदी व विक्री केले जातात. न्युयॉर्क स्टॉक एक्सचेंज (NYSE) तसेच नॅशनल असोसिएशन ऑफ सेक्युरिटीज डिलर्स ऑटोमेटेड कोटेशन (NASDAQ) अशी काही उदाहरणे आहेत. या भागबाजारांमध्ये भागांची नोंदणी करण्यासाठी भारतीय कंपन्यांना त्या भागबाजारांच्या धोरणांची पूर्तता करावी लागते. विदेशी भागबाजारांचे नियम/धोरणे ही भारतीय भागबाजारांच्या नियमांपेक्षा खूप वेगळी असतात. यासाठी ज्या भारतीय कंपन्या थेट विदेशी भागबाजारांमध्ये भागांची नोंदणी करू शकत नाहीत ते ठेव पावत्यांच्याद्वारे भागांची नोंद करू शकतात.

अमेरिका व युरोप मधील भाग बाजारात अशा ठेव पावत्यांची (ADR व GDR) विक्री व खरेदी डॉलर किंवा युरो या चलनाने होतात.

भारतीय कंपनी 'भागपेढी' (depository) या मध्यस्थाला समभागांची विक्री करते. सीटी बँक किंवा बँक ऑफ न्यूयॉर्क इत्यादी परदेशी बँका भागपेढी म्हणून कार्यरत आहेत. या भागपेढी बँका गुंतवणूकदाराला भागांच्या बदल्यात ADR अथवा GDR देऊ करतात. प्रत्येक ठेव पावतीमध्ये निश्चित संख्येचे भाग नमूद केलेले असतात. या ठेव पावत्या (ADR व GDR) त्यानंतर परदेशातील लोकांना विकल्या जातात. या ठेव पावत्यांची वैशिष्ट्ये अगदी भागांसारखीच असतात. त्यांची नोंदणी भाग बाजारात केली जाते. भागांसारखेच मागणी व पुरवठ्यानुसार यांच्याही बाजारमूल्यात चढउतार होत.

ठेवपावती धारकांच्या वतीने त्यांच्या भागांचे साठे भागपेढ्या स्वतःकडे ठेवतात.

GDR व ADR दोन्हीही ठेवपावत्याच आहेत. या दोन्हींमधला फरक इतकाच आहे की, ADR ची अमेरिकेत विक्री होते तर GDR ची विक्री अमेरिका सोडून इतरत्र केली जाते.

विदेशी गुंतवणूकदार व अनिवासी भारतीय ADR व GDR खरेदी करून त्यांचे पैसे, गुंतवू शकतात. यासाठी स्वतःच्या 'समभाग व्यापार खात्याचा' (Equity Trading Account) उपयोग ते ADR व GDR च्या खरेदीसाठी करू शकतात.

कंपनी स्वदेशी चलनात लाभांश भागपेढ्यांकडे देतात, तर या भागपेढ्या त्यांचे रूपांतर गुंतवणूकदाराच्या चलनात करून त्यांना लाभांश पोहोचवितात.

ज्या भागबाजारांमध्ये GDR ची विक्री केली जाते ते भाग बाजार खालीलप्रमाणे आहेत.

१) लंडन स्टॉक एक्सचेंज

२) लक्झंबर्ग बोर्ग स्टॉक एक्सचेंज

३) NASDAQ दुबई

४) सिंगापूर स्टॉक एक्सचेंज

५) हाँगकाँग स्टॉक एक्सचेंज

**कृती :** ज्या भारतीय कंपन्यांनी जागतिक ठेव पावती (GDR) व अमेरिकन ठेव पावती (ADR) यांचे वाटप केले आहे त्या कंपन्यांची नावे शोधा.

### २.२.५ व्यावसायिक बँका (Commercial Banks) :

अल्प व मध्यम मुदतीच्या व्यावसायिक वित्तीय गरजांच्यासाठी वित्तपुरवठा करणारे अनेक स्रोत आहेत. या सर्वांमध्ये व्यावसायिक बँका हा सगळ्यात प्रबल असणारा स्रोत आहे. व्यावसायिक बँका भारतातील संस्थात्मक वित्तव्यवस्थेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. प्रत्येक ठेवीदाराची व्यक्तिगत गरज लक्षात घेऊन त्यांच्यासाठी विविध ठेव योजना बँका राबवत असतात. अशा ठेव योजनांमधून लोकांची बचत एकत्र केली जाते व ती संस्थात्मक योजनांच्या वित्तीय गरजा भागविण्यासाठी वापरली जाते. संस्थांचे उधारीचे पैसे परत करण्यासाठी असो किंवा मुदतीचे कर्ज असो अशा विविध कारणांसाठी बँका वित्तीय मदत करत असतात.

संस्थात्मक व्यावसायिकांना बँक अशाप्रकारे मदत करते.

१) कंपन्यांना मुदतीचे कर्ज देऊ करते.

२) कंपन्यांचे भाग आणि कर्जरोखे विकत घेते.

३) कंपनीच्या प्रतिभूतीच्या खरेदीची हमी घेते.

अल्पकालीन वित्त पुरविण्यात व्यावसायिक बँका महत्त्वाची भूमिका बजावतात. ते खेळत्या भांडवलाच्या वित्तीय गुंतवणुकीचे प्राथमिक स्रोत बनले आहेत. खेळत्या भांडवलासाठी वित्त पुरवठा करण्याचा प्राथमिक स्रोत म्हणजे बँकेचे कर्ज व व्यापारी कर्ज होय.

बँकांनी पतपुरवठा (disbursement of credit) करण्यासाठी अनेक नावीन्यपूर्ण योजना दिल्या आहेत त्या खालीलप्रमाणे आहेत.

१) **अधिविकर्ष (Overdraft) :** ही सुविधा बँकेत 'चालू खाते' (Current Account) असलेल्या कंपनीला दिली जाते. कर्जदार या खात्यातून जेव्हा आवश्यक असेल तेव्हा गरजेनुसार रक्कम काढू शकतो. बँकेने दिलेल्या एका ठरावीक कर्जाच्या मर्यादेपर्यंत जास्तीची रक्कम खात्यातून काढता येते. या मर्यादेपर्यंत खातेदार कितीही वेळा अशी रक्कम काढू शकतो. खातेदार या रकमेची परतफेड त्याच्या सोयीनुसार करू शकतो. जेवढी वास्तविक रक्कम खातेदार काढतो त्या रकमेवर व्याजाची आकारणी केली जाते.

२) **रोख पत (Cash Credit) :** हा एक महत्त्वाचा व लोकप्रिय असा कर्जाचा प्रकार आहे. ही सुविधा, अधिविकर्षच्याच पद्धतीने चालविली जाते. एका ठरावीक तारणाच्या मार्जिन पर्यंत कर्जदार कर्जाची रक्कम खात्यातून काढू शकतो. रोख पत सुविधा मालमत्ता तारण ठेवून दिली जाते. व्याज मंजूर केलेल्या पूर्ण कर्जावर न घेता जेवढी रक्कम कर्ज म्हणून काढली जाते त्यावर आकारले जाते.


३) **रोकड कर्ज (Cash Loan) :** या प्रकारामध्ये बँक कर्जाची संपूर्ण रक्कम कर्जदाराच्या खात्यामध्ये जमा करते. या संपूर्ण रकमेवरती व्याज आकारले जाते. जर मुद्दलाची रक्कम हप्त्याने परत केली तर जेवढी उर्वरित रक्कम असेल त्यावर व्याज आकारले जाते.

४) **सूट देऊन हुंडी वटविणे :** एका निश्चित तारखेला किंवा त्यानंतर आदेशक (drawer) / (seller), आदेशितीकडून (Drawee) / (buyer) कडून रक्कम (हुंडी) मिळवू शकतो. आदेशक या निश्चित तारखेच्या आधीच बँकेकडून हुंडीवर सूट घेऊन ही रक्कम मिळवू शकतो. याचा अर्थ बँकेला 'हुंडी' विकणे, होय पण बँक या हुंडीच्या दर्शनी मूल्यापेक्षा कमी मूल्य देऊ करते. अशाप्रकारे हुंडी हे एक व्यापारी देयक (trade bill) आहे. बँक हुंडींचा स्वीकार करते व रोख रक्कम उधार देते.

### २.२.६ वित्तीय संस्थांची कर्जे :

१९४८ मध्ये देशाच्या औद्योगिक प्रगतीसाठी, औद्योगिक धोरणांची घोषणा केली गेली. केंद्र व राज्य सरकारांनी उद्योग व्यवसायांना निधी उपलब्ध करून देण्यासाठी काही आर्थिक संस्थांची स्थापना केली. या संस्था मध्यम मुदतीचे तसेच दीर्घ मुदतीचे निधी पुरवत असतात. नवीन कंपनी तसेच इतर कंपन्यांसाठीही अशा प्रकारची आर्थिक मदत उपयुक्त असते.

विविध वित्तीय संस्थांना चार भागात वर्गीकृत केले आहे ते खालीलप्रमाणे.



**विकास प्रणित बँका :**

१) इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया (IDBI)

२) इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (IFCI).

३) इंडस्ट्रियल क्रेडीट अँड इनव्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (ICICI).

४) स्मॉल इंडस्ट्रिज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया (SIDBI).

५) इंडस्ट्रीयल रिकन्स्ट्रक्शन बँक ऑफ इंडिया (IRBI).

**वित्तीय संस्था :**

१) रिस्क कॅपिटल अँड टेक्नॉलॉजी फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड (RCTC).

२) टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट अँड इन्फॉमेशन कंपनी ऑफ इंडिया (TDICI).

३) टुरिझम फायनान्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (TFCI).

**गुंतवणूकप्रणित संस्था :**

१) लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (LIC).

२) युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया (UTI).

३) जनरल इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (GIC).

**राज्यस्तरीय संस्था :**

१) स्टेट फायनान्स कॉर्पोरेशन (SFC)

२) स्टेट इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (SIDC)

वर नमूद केलेल्या वित्तीय संस्था विविध प्रकारे मदत करत असतात. ते असे –

१) मुदतीची कर्जे उपलब्ध करून देतात.

२) कंपनीचे भाग, कर्जरोखे खरेदी करतात.

३) प्रतिभूतींच्या विक्रीच्या प्रक्रियेमध्ये 'भाग विमेकरी' (underwriter) म्हणून काम करतात.

४) कर्जाऊ रकमेसाठी हमीदार म्हणून काम करतात.

**कृती :** विविध वित्तीय संस्थांची कंपनीच्या निधी उभारणीत असलेली भूमिका स्पष्ट करा.

### २.२.७ व्यापारी कर्जे (Trade Credit) :

कोणताही व्यवसाय कर्ज/उधारी शिवाय चालविता येत नाही. 'उधारी' हा व्यवसायाचा आत्मा आहे. 'व्यापारी कर्ज' हा अल्प मुदतीच्या कर्जाचा एक महत्त्वाचा स्रोत आहे. उत्पादक, घाऊक विक्रेते तसेच वस्तूंचा व साहित्याचा पुरवठा उधारीने करणाऱ्यांना 'व्यापारी धनको' असे संबोधले जाते. ते वस्तूंची विक्री इतर व्यवसाय संस्थांना करत असतात. ही देय रक्कम ते भविष्यात स्वीकारतात. अशा प्रकारचे कर्ज/उधारी ही विक्री वाढविण्याच्या उद्देशाने देऊ केली जाते. या शिवाय पूर्वापार चालत आलेल्या पद्धतीनुसार त्यांना अशा प्रकारची सवलत (उधारी) द्यावी लागते.

व्यापारी कर्ज हे रोखीचे कर्ज नाही. ही एक विक्री झाल्यानंतर एका ठरावीक कालावधीनंतर रक्कम देण्याची 'सवलत' आहे. वेगळ्या शब्दात सांगायचे झाल्यास, जेव्हा देय रक्कम देण्याआधीच पुरवठादार (supplier) ग्राहकांना वस्तू वितरित (विक्री) करतो, तेव्हा त्यास 'व्यापारी कर्ज' म्हणतात.

व्यापार उद्योगामध्ये अशा कर्जाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. छोट्या घाऊक विक्रेत्यांना अशा कर्जासाठी पुरवठादारावर (supplier) अवलंबून रहावे लागते. कारण कोणत्याही कर्जाऊ दस्तावेजांवर सही न करता कर्ज घेण्याचा हा सोपा मार्ग आहे. ही वित्त पुरवठ्याची सहज उपलब्ध असणारी व स्वस्त पद्धत आहे.

पुरवठादार (supplier) वस्तूंची विक्री करतो व स्वेच्छेने ३० अथवा अधिक दिवसांची, देयक (b ll) देण्यासाठी मुदत देऊ करतो. जर मुदतीच्या आधीच देयक रक्कम दिली गेली तर तो त्यावर सूट देतो. व्यापारी कर्जाच्या अटी/नियमही लवचीक असतात.

## २.३ फरक

### (१) भाग व कर्जरोखे

| मुद्दे | भाग | कर्जरोखे |
|---|---|---|
| १. अर्थ | भाग हा कंपनीच्या भाग भांडवलाचा एक छोटासा घटक आहे. यालाच मालकीच्या प्रतिभूती असे म्हणतात. | कर्जरोखे हे कर्जाचे प्रमाणपत्र आहे. याला कर्जाऊ प्रतिभूती असे म्हणतात. |
| २. धारकाचे स्थान | भाग भांडवल हे मालकीचे भांडवल आहे. भागधारक हा कंपनीचा 'मालक' आहे. | कर्जरोखे हे कर्जाऊ भांडवल आहे. कर्जरोखेधारक हा कंपनीचा 'धनको' आहे. |
| ३. स्वरूप | हे कायमस्वरूपी भांडवल आहे कंपनीच्या कार्यकाळात हे 'भाग' परत केले जात नाहीत. | हे 'तात्पुरत्या' स्वरूपाचे भांडवल आहे. ठरावीक मुदतीनंतर कर्जरोखे परत केले जातात. |
| ४. मतदानाचे हक्क | भागधारक हे मालक असून ते मतदान करू शकतात व कंपनीच्या व्यवस्थापनात सहभागी होऊ शकतात. | कर्जरोखेधारक हे 'धनको' असल्यामुळे मतदान करू शकत नाहीत. त्यांना व्यवस्थापनेत सहभाग घेता येत नाही. |
| ५. गुंतवणुकीवरील परतावा | भागधारकांना लाभांश दिला जातो. समहक्क भागांना अस्थिर लाभांशाचा दर तर अग्रहक्क भागांना स्थिर दराने लाभांश दिला जातो. | कर्जरोखे धारकांना निश्चित दाराने व्याज दिले जाते. कंपनीने नफा मिळविला नसेल तरीही व्याज द्यावेच लागते. |
| ६. तारण | भाग भांडवल हे असुरक्षित भांडवल आहे. भागधारकांना तारण दिले जात नाही. | कर्जरोखे भांडवल हे कर्जाऊ भांडवल असल्यामुळे कंपनीची मालमत्ता तारण म्हणून दिलेली असते. |
| ७. वाटप करण्याची वेळ | भागांचे वाटप कंपनी स्थापनेच्या नंतर प्रारंभिक टप्प्यामध्ये केले जाते. | कंपनीच्या नंतरच्या टप्प्यांवर जेव्हा कंपनीकडे तारण ठेवण्यासाठी मालमत्ता असते तेव्हा यांचे वाटप करता येते. |
| ८. उपयुक्तता | दीर्घकालीन भांडवलासाठी 'भाग' हा उत्तम पर्याय आहे. | मध्यमकालीन भांडवलासाठी कर्जरोखे हा उत्तम पर्याय आहे. |
| ९. प्रकार | भागांचे दोन प्रकार आहेत–<br>अ) समहक्क भाग<br>ब) अग्रहक्क भाग | कर्जरोख्यांचे प्रकार असे आहेत–<br>१) नोंदविलेले कर्जरोखे<br>२) वाहक कर्जरोखे<br>३) तारण असलेले कर्जरोखे<br>४) तारण नसलेले कर्जरोखे<br>५) परतफेडीचे कर्जरोखे<br>६) न परतफेडीचे कर्जरोखे<br>७) परिवर्तनीय कर्जरोखे<br>८) अपरिवर्तनीय कर्जरोखे |
| १०. कंपनी विसर्जनाचे वेळी स्थान | कंपनी विसर्जनाच्या वेळी भांडवल परतफेडीसाठी भागधारक सर्वात शेवटचे दावेदार असतात. | कर्जरोखेधारक कंपनी विसर्जनाच्या वेळी भांडवल परतफेडीसाठी भागधारकांच्या आधीचे दावेदार असतात. |

(२) **समहक्क भाग व अग्रहक्क भाग**

| मुद्दे | समहक्क भाग | अग्रहक्क भाग |
|---|---|---|
| १. अर्थ | समहक्क भाग म्हणजे असे भाग जे अग्रहक्क भाग नसतात. | अग्रहक्क भागांना काही अग्रक्रम हक्क दिले आहेत. लाभांश आणि कंपनी विसर्जनाच्यावेळी भागभांडवल परतफेडीसाठी यांचा अग्रक्रमाने विचार केला जातो. |
| २. लाभांशाचा दर | लाभांशाचा दर कंपनीच्या नफ्यावर अवलंबून असतो त्यामुळे लाभांशाचा दर अनिश्चित असतो. | अग्रहक्क भागधारकांना दिल्या जाणाऱ्या लाभांशाचा दर निश्चित असतो. |
| ३. मतदानाचा हक्क | समहक्क धारकांना सामान्यतः मतदानाचा हक्क असतो. कंपनीच्या व्यवस्थापनेमध्ये त्यांचा सहभाग असतो. | अग्रहक्क धारकांना मर्यादित स्वरूपाचा मतदानाचा हक्क असतो. त्यांचे हितसंबंध ज्यामध्ये गुंतले आहेत अशाच मद्द्यावर ते मतदान करू शकतात. |
| ४. भांडवल परतफेड | कंपनीच्या हयातीत समहक्क भाग भांडवल परत मिळू शकत नाही. (अपवाद भागांची परत खरेदी) (Buy back) | कंपनी परतफेडीचे अग्रहक्क भागांचे वाटप करू शकते जे कंपनीच्या कार्यकाळात परत केले जातात. |
| ५. भांडवलाचे स्वरूप | समहक्क भाग भांडवलाला 'जोखमीचे भांडवल' असे म्हटले जाते. | अग्रहक्क भाग भांडवल हे 'सुरक्षित भांडवल' आहे. यांना स्थिर दराने परतावा मिळतो. |
| ६. गुंतवणुकदाराचे स्वरूप | जे गुंतवणूकदार जोखीम पेलण्यास तयार असतात ते समहक्क भाग खरेदी करतात. | जे गुंतवणूकदार सजग/सावध असतात, ज्यांना सुरक्षित गुंतवणूक हवी असते ते अग्रहक्क भागांमध्ये गुंतवणूक करतात. |
| ७. दर्शनी मूल्य | समहक्क भागांचे दर्शनी मूल्य साधारणपणे रु. १ किंवा रु. १० असते हे तुलनेने कमी असते. | अग्रहक्क भागांचे दर्शनी मूल्य तुलनेने जास्त असते. उदा. रु. १०० |
| ८. हक्कभाग व बोनसभाग | हक्कभाग व बोनसभाग मिळण्याचा अधिकार समहक्क भागाधारकांना असतो. | अग्रहक्क भाग धारकांना हक्क भाग व बोनस भाग मिळण्याचा अधिकार नसतो. |
| ९. भांडवल वृद्धी | समहक्क भागांचे बाजारमूल्य कंपनीच्या प्रगती बरोबर वाढत जाते. | आग्रहक्क भागांचे बाजारमूल्य स्थिर असते त्यामुळे भांडवल वृद्धीची शक्यता नसते. |
| १०. जोखीम | समहक्क भाग भांडवलात गुंतवणूक करण्यात जोखीम असते कारण लाभांशाचा अस्थिर दर व भांडवल परतफेडीची अनिश्चितता! | अग्रहक्कभागांची गुंतवणूक तुलनेने सुरक्षित असते कारण लाभांशाचा दर स्थिर/निश्चित असतो व भांडवल परतफेडीसाठी अग्रक्रम दिला जातो. |
| ११. प्रकार | समहक्क भागांचे प्रकार –<br>अ) सर्वसाधारण मतदानाचा अधिकार असणारे<br>ब) भेददर्शक मतदानाचा अधिकार असणारे | अग्रहक्क भागांचे प्रकार<br>१) संचयी अग्रहक्क भाग<br>२) असंचयी अग्रहक्क भाग<br>३) लाभभागी अग्रहक्क भाग<br>४) अलाभभागी अग्रहक्क भाग<br>५) परिवर्तनीय अग्रहक्क भाग<br>६) अपरिवर्तनीय अग्रहक्क भाग<br>७) परतफेडीचे अग्रहक्क भाग<br>८) न परत फेडीचे अग्रहक्क भाग |

### (३) मालकीचे भांडवल व कर्जाऊ भांडवल

| मुद्दे | मालकीचे भांडवल | कर्जाऊ भांडवल |
|---|---|---|
| १. अर्थ | मालकीचे भांडवल भागधारकांच्या मदतीने उभे केले जाते. | कर्जाऊ भांडवल 'धनको' मदतीने उभे केले जाते यालाच 'ऋण भांडवल' असे म्हणतात. |
| २. स्रोत | हे भांडवल समहक्क भाग व अग्रहक्क भाग यांचे वाटप करून गोळा केले जाते. | हे भांडवल कर्जरोख, मुदत ठेवी. बँकेचे तसेच वित्तिय संस्थेचे कर्ज इत्यादींच्या द्वारे गोळा केले जाते. |
| ३. गुंतवणुकीवरील परतावा | भागधारकांना त्यांच्या गुंतवणूकीवर उत्पन्न म्हणून लाभांश मिळतो. लाभांशाचा दर समहक्क भागांसाठी निश्चित नसतो त्यात चढउतार होत असतात तर अग्रहक्क भागांसाठी तो निश्चित केलेला असतो. | कर्जधारकाला त्यांच्या गुंतवणुकीवर उत्पन्न म्हणून व्याज मिळते व्याजाचा दर निश्चित असतो. |
| ४. स्थान | भागधारक हे कंपनीचे 'मालक' असतात. | कर्जधारक हे कंपनीचे धनको असतात. |
| ५. मतदानाचा हक्क | समहक्कभागधारक कंपनी सभेमध्ये मतदानाचा हक्क बजावतात. | कर्जधारकांना कंपनी सभेमध्ये मतदानाचा हक्क नसतो. |
| ६. भांडवलाची परतफेड | भागधारकांना कर्जधारकाच्या पुढे प्राधान्य दिले जात नाही. कंपनी विसर्जनाच्यावेळी कर्ज–धारकांची देणी दिल्यानंतर भागधारकांची रक्कम परत केली जाते. | कंपनी विसर्जनाच्या वेळी कर्जधारकांना त्यांची मुद्दल परत घेण्यासाठी भागधारकांच्या पुढे प्राधान्य/अग्रक्रम दिले जाते. |
| ७. संपत्तीवरचा प्रभार | भागधारकांचा कंपनीच्या मालमत्तेवर/ संपत्तीवर कोणताही प्रभार (charge) नसतो. | सुरक्षित कर्जरोख्यांचा कंपनीच्या मालमत्तेवर प्रभार असतो. |

## सारांश

- वित्त/निधींचे विविध स्रोत 'मालकीचे भांडवल' व 'कर्जाऊ भांडवल' म्हणून विभागले जाऊ शकतात.
- भाग हे कंपनीच्या एकूण भांडवलाचा एक छोटासा घटक आहे.
- समहक्क भागांना लाभांश देताना किंवा कंपनी विसर्जनाच्या वेळी भांडवलाची परतफेड करताना प्राधान्य दिले जात नाही.
- अग्रहक्क भागांना निश्चित दराचा लाभांश आणि कंपनी विसर्जनाच्या वेळी भांडवलाची परतफेड करताना प्राधान्य दिले जाते.
- कर्जरोखे प्रमाणपत्र देऊन कर्ज घेतल्याची पोचपावती म्हणजेच कर्जरोखे होय.
- बंधपत्रे म्हणजे कर्जाचा पुरावा म्हणून सरकारी किंवा व्यावसायिक संस्थेने वाटप केलेला दस्तावेज होय.
- संचित मिळकत म्हणजे साठलेल्या नफ्याची व्यवसायात गुंतवणूक केलेली रक्कम.
- ६महिन्यापासून ते ३६ महिन्यांच्या कालावधीसाठी कंपनीने स्वीकारलेले कर्ज म्हणजे सार्वजनिक ठेव.
- अधिविकर्ष, रोखपत, रोकड कर्जे इत्यादींच्या रूपात बँक कर्ज देऊ करते.
- व्यापारी कर्ज हे उत्पादक व पुरवठादार यांच्याकडून ग्राहकास दिलेली उधारीची सवलत होय.
- जागतिक ठेव पावती (GDR) व अमेरिकन ठेव पावती (ADR) या ठेवपावत्यांद्वारे भारतीय कंपन्या आंतरराष्ट्रीय बाजारात समहक्कभाग भांडवल उभे करतात.

## स्वाध्याय

**प्र.क्र. १ अ) खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१) ..................... हा भागभांडवलाचा छोटासा घटक आहे.

अ) कर्जरोखा ब) बंधपत्र क) भाग

२) ठेव पावतीचा फायदा म्हणजे ..................... बाजारात भांडवल उभे करण्याची क्षमता होय.

अ) राष्ट्रीय ब) स्थानिक क) आंतराष्ट्रीय

३) ..................... हे कंपनीच्या मालमत्तेच्या उर्वरित भागाचे दावेदार असतात.

अ) बंधपत्रधारक ब) समहक्क भागधारक क) कर्जरोखेधारक

४) ..................... कंपनीच्या व्यवस्थापनामध्ये सहभाग असतो.

अ) अग्रहक्क भाग धारकांचा ब) ठेवीदारांचा क) समहक्क भागधारकांचा

५) ..................... हे समहक्क भाग धारकास 'बक्षिस' म्हणून विनामूल्य दिले जातात.

अ) अधिलाभांश भाग (बोनस भाग) ब) हक्क भाग क) समहक्क भाग

६) अग्रहक्क भागधारकास ..................... दराने लाभांश मिळण्याचा हक्क असतो.

अ) निश्चित ब) चढउतार होणाऱ्या क) किमान

७) ..................... अग्रहक्क भागांना संचित लाभांश दिला जातो.

अ) परतफेडीच्या ब) संचयी क) परिवर्तनीय

८) ..................... अग्रहक्क भागधारकांना समहक्क भागांमध्ये रूपांतरित होण्याचा अधिकार असतो.

अ) संचयी ब) परिवर्तनीय क) परतफेडीचे

९) कर्जरोखेधारक हे कंपनीचे ..................... असतात.

अ) धनको ब) मालक क) पुरवठादार

१०) कर्जाऊ भांडवलावर ..................... दिले जाते.

अ) व्याज ब) सूट क) लाभांश

११) कर्जरोखेधारकांना निश्चित दराने ..................... मिळते.

अ) व्याज ब) लाभांश क) सूट

१२) एका ठरावीक कालावधीनंतर परिवर्तनीय कर्जरोख्यांचे ..................... मध्ये परिवर्तन होते.

अ) समहक्क भाग ब) ठेवी क) बंधपत्रे

१३) प्रतिधारण नफा ही वित्त पुरवठ्याचा ..................... स्रोत आहे.

अ) अंतर्गत ब) बहिर्गत क) अतिरिक्त

१४) बंधपत्रधारक हा संस्थेचा ..................... असतो.

अ) सचिव ब) मालक क) धनको

१५) कंपनी कमीतकमी ..................... महिन्यांसाठी ठेवींचा स्वीकार करते.

अ) सहा ब) नऊ क) बारा

१६) कंपनी जास्तीत जास्त ............. महिन्याकरिता ठेवींचा स्वीकार करते.

अ) १२ ब) २४ क) ३६

१७) अमेरिकन ठेव पावतीची विक्री .................... मध्ये होते.

अ) लंडन ब) जपान क) यु.एस.ए. (अमेरिके)

**ब) जोड्या जुळवा.**

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | समहक्क भाग भांडवल | १) | करार |
| ब) | कर्जरोखे विश्वस्त | २) | नफ्याचे भांडवलीकरण |
| क) | अग्रहक्क भाग धारक | ३) | धाडसी गुंतवणुकदार |
| ड) | कर्जरोखे प्रमाणपत्र | ४) | जोखमीचे भांडवल |
| इ) | बोनस भाग | ५) | मालकीचे दस्तावेज |
| | | ६) | कर्जाचे भांडवलीकरण |
| | | ७) | सुरक्षित भांडवल |
| | | ८) | कर्जाचे दस्तऐवज |
| | | ९) | विश्वस्त करार |
| | | १०) | सावध गुंतवणूकदार |

**क) खालील प्रत्येक विधानासाठी एक शब्द किंवा शब्दसमूह किंवा संज्ञा लिहा.**

१) हे खऱ्या अर्थाने कंपनीचे मालक असतात.

२) भागांवरील मालकी हक्क दर्शवणारा दस्तऐवज.

३) या भागधारकांना कंपनीच्या अतिरिक्त नफ्यामध्ये सहभागी होता येते.

४) या संबंधित मंडळीमार्फत कंपनी कर्जरोखेधारकांशी व्यवहार करते.

५) हे कंपनीच्या व्यवस्थापनात सहभागी होणारे भागधारक आहेत.

६) हे मूल्य भाग प्रमाणपत्रावर नमूद केलेले असते.

७) हे मूल्य भाग बाजारातील मागणी व पुरवठा यांच्यानुसार ठरविले जाते.

८) अविभाजित नफा व्यवसायात वापरण्याचे धोरण.

९) ठेवीदारांना कंपनीने दिलेली कर्जाची पावती.

१०) डॉलर या चलनाने अमेरिकेत विक्री होणारे दस्तऐवज.

११) अमेरिका सोडून इतरत्र विक्री होणारी ठेवपावती.

१२) किमान ६ महिने व कमाल ३६ महिन्यांकरिता कंपनीने जनतेकडून स्वीकारलेली रक्कम.

१३) विक्री वाढविण्याच्या उद्देशाने पुरवठादारांनी देऊ केलेली उधारी किंवा कर्ज.

१४) ही सुविधा/सवलत बँकेत 'चालू खाते' असलेल्या कंपनीला दिली जाते.

### ड) खालील विधाने बरोबर की चूक ते लिहा.

१) समहक्क भाग भांडवल हे जोखमीचे भांडवल म्हणून ओळखले जाते.

२) समहक्क भागधारकांना निश्चित दराने लाभांश दिला जातो.

३) कंपनीसमोर जेव्हा आर्थिक संकट येते तेव्हा समहक्क भागधारक असे संकट पेलायला तयार असतात.

४) कर्जरोखेधारकांना कंपनीच्या सर्वसाधारण सभेत मतदानाचा हक्क असतो.

५) बंधपत्रधारक हे कंपनीचे मालक असतात.

६) जागतिक ठेव पावती धारकाच्या वतीने भागपेढ्या समभागाचा साठा करून ठेवते.

७) वित्तीय संस्था प्रतिभूतींच्या विक्रीमध्ये 'भाग विमेकरी' म्हणून काम करतात.

८) रोख पत सुविधा मालमत्ता तारण ठेवून दिली जाते.

९) व्यापारी कर्जे ही दीर्घमुदतीच्या वित्तपुरवठ्याचा प्रमुख स्रोत आहे.

### इ) गटात न बसणारा शब्द शोधा.

१) कर्जरोखे, सार्वजनिक ठेवी, संचयी मिळकत (प्रतिधारण नफा).

२) दर्शनी मूल्य, बाजार मूल्य, परतफेडीचे मूल्य.

३) भाग प्रमाणपत्र, कर्जरोखे प्रमाणपत्र, अमेरिकन ठेव पावती (ADR)

४) व्यापारी कर्ज, अधिविकर्ष, रोकड कर्ज.

### फ) खालील विधाने पूर्ण करा.

१) व्यावसायिक संस्थेला आवश्यक असलेल्या निधीला ..................... म्हणतात.

२) परिवर्तनीय अग्रहक्क भागधारकांच्या भागांचे रूपांतर ..................... मध्ये होते.

३) समहक्क भागधारक ज्यांना प्रतिनिधी म्हणून निवडतात त्यांना ..................... असे म्हणतात.

४) ..................... यांना बोनस भाग 'बक्षिस' म्हणून दिले जातात.

५) बंधपत्रधारक कंपनीचे ..................... असतात.

६) अमेरिका सोडून इतरत्र विक्री होणाऱ्या ठेवपावतीला ..................... म्हणतात.

७) ..................... साली पहिल्या औद्योगिक धोरणांची घोषणा झाली.

८) जेव्हा देय रक्कम घेण्याच्या आधी पुरवठादार वस्तू ग्राहकाला विकतो त्याला ..................... म्हणतात.

### ग) कंसातील अचूक पर्याय निवडा.

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | समहक्क भाग | १) | ..................... |
| ब) | ..................... | २) | निश्चित दराचा लाभांश |
| क) | कर्जरोखे | ३) | ..................... |
| ड) | ..................... | ४) | कंपनीचा साठलेला नफा |
| इ) | सार्वजनिक ठेवी | ५) | ..................... |

(चढउतार होणारा लाभांशाचा दर, अग्रहक्क भाग, निश्चित दराचे व्याज, प्रतिधारण नफा, अल्प मुदतीचे कर्ज)

**ह) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) भाग म्हणजे काय ?

२) समभाग म्हणजे काय ?

३) अग्रहक्क भाग म्हणजे काय ?

४) प्रतिधारण नफा म्हणजे काय ?

५) कर्जरोखे म्हणजे काय ?

६) बंधपत्र म्हणजे काय ?

७) अमेरिकन ठेव पावती (ADR) ची विक्री कोठे होते ?

८) जागतिक ठेव पावती (GDR) ची विक्री कोठे केली जाते ?

९) परिवर्तनीय कर्जरोखे म्हणजे काय ?

१०) संचयी अग्रहक्क भाग म्हणजे काय ?

**ई) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१) मालकीचे भांडवल हे तात्पुरते/हंगामी भांडवल आहे.

२) समहक्क भागांना लाभांश निश्चित दराने दिला जातो.

३) अग्रहक्क भागांना लाभांश अस्थिर दराने दिला जातो.

४) प्रतिधारण नफा/संचयी मिळकत वित्तपुरवठ्याचा बहिर्गत स्रोत आहे.

५) कर्जरोखेधारक हा कंपनीचा मालक आहे.

६) बंधपत्रे हे अल्प मुदतीचे निधी पुरविते.

७) अमेरिकेत विक्री होणाऱ्या ठेव पावतीस जागतिक ठेव पावती असे म्हणतात.

**प्र.क्र. २) खालील संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा.**

१) कर्जाऊ भांडवल

२) मालकीचे भांडवल

३) नफ्याची पुनर्गुंतवणूक

४) अधिविकर्ष

५) व्यापारी धनको

**प्र.क्र. ३) खालील घटना व परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा.**

१) डोनाल्ड कंपनीचा ताळेबंद २०१८-१९ असे दर्शवितो की कंपनीकडे समहक्क भाग भांडवल रु. २५,०००/- असून त्यांचा संचयी मिळकत रु. ५०,०००/- इतकी आहे.

अ) आर्थिकदृष्ट्या कंपनी सबल आहे का ?

ब) संचित मिळकतीचे कंपनीच्या भांडवलामध्ये रूपांतर होऊ शकेल का ?

क) 'संचित मिळकत' ही कोणत्या प्रकारच्या वित्तपुरवठ्याचा स्रोत आहे ?

२) मि. सतिश एक सट्टेबाज आहे. कंपनीच्या उत्पादनाची बाजारातील वाढती मागणी व त्यामुळे मिळणारा फायदा घेण्यासाठी सज्ज आहे.

अ) तुमच्या मते, मि. सतीश गुंतवणुकीसाठी कोणत्या प्रकारचे 'भाग' निवडेल ?

ब) त्याला त्यांच्या गुंतवणुकीवर परतावा म्हणून काय मिळेल ?

क) मि. सतिश भागधारक असल्यामुळे त्याला असणारा एक हक्क सांगा.

३) मि. रोहित एक गुंतवणूकदार आहे तो स्वतःचे पैसे प्रतिभूती खरेदीमध्ये गुंतवणार आहे. तो गुंतवणुकीवरील उत्पन्नावर अवलंबून आहे त्यामुळे कोणताही धोका पत्करण्यास तो तयार नाही. निश्चित उत्पन्न व मुद्दलाची सुरक्षितता यात त्याला स्वारस्य आहे.

अ) मि. रोहित ज्या प्रकारची प्रतिभूती निवडेल, त्याचे नाव सांगा.

ब) त्याच्या गुंतवणुकीवर परतावा म्हणून त्याला काय मिळेल?

क) त्याला मिळालेला गुंतवणुकीवरील परतावा निश्चित असेल की चढउतार असणारा असेल?

**प्र.क्र. ४) फरक स्पष्ट करा.**

१) समहक्क भाग आणि अग्रहक्क भाग

२) भाग आणि कर्जरोखे

३) मालकीचे भांडवल व कर्जाऊ भांडवल

**प्र.क्र. ५) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) ठेवी म्हणजे काय?

२) जागतिक ठेव पावती म्हणजे काय?

३) व्यापारी कर्ज म्हणजे काय?

४) बँकेमार्फत कर्ज देण्याच्या कोणत्या योजना आहेत?

५) बंधपत्राची वैशिष्ट्ये नमूद करा.

**प्र.क्र. ६) खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१) समहक्क भागधारक हे कंपनीचे खरे मालक व नियंत्रक असतात.

२) अग्रहक्क भागांना मतदानाचा कोणताही हक्क नाही.

३) कर्जरोखे कंपनीची मालमत्ता तारण देऊन सुरक्षित केले जातात.

४) प्रतिधारण नफा ही वित्त उभारणीची सोपी व स्वस्त पद्धत आहे.

५) सार्वजनिक ठेव हा अल्पमुदतीच्या निधीसाठी उत्तम स्रोत आहे.

६) बंधपत्रधारक कंपनीचा 'धनको' आहे.

७) व्यापारी कर्ज हे रोख कर्ज नाही.

८) वेगवेगळ्या गुंतवणूकदारांचे गुंतवणुकीसाठी वेगवेगळे अग्रक्रम असतात.

९) समहक्क भागभांडवल हे जोखमीचे भांडवल आहे.

**प्र.क्र. ७) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) भाग म्हणजे काय? भागाची वैशिष्ट्ये विशद करा.

२) समहक्क भाग म्हणजे काय? त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३) अग्रहक्क भागाची व्याख्या सांगा. त्यांचे विविध प्रकार लिहा.

४) अग्रहक्क भाग म्हणजे काय? त्याची वैशिष्ट्ये लिहा.

५) कर्जरोखे म्हणजे काय? कर्जरोख्यांच्या विविध प्रकारांची चर्चा करा.

६) कर्जरोख्यांची व्याख्या लिहा व त्यांची वैशिष्टे स्पष्ट करा.

❑❑❑

# ३ भाग विक्री

**३.१ भाग भांडवलाचे वर्गीकरण**

**३.२ भाग विक्री**

**३.३ भाग विक्रीच्या पद्धती**

अ. सार्वजनिक वाटप किंवा सार्वजनिक भाग वाटप
- निश्चित किमतीचे भाग वाटप पद्धत
- बुक बिल्डिंग पद्धत
- प्राथमिक भाग विक्री
- पुढील भाग वाटप

ब. विद्यमान समहक्क भागधारकांना भाग वाटप
- हक्क भाग
- बोनस भाग वाटप/बोनस भाग

क. विद्यमान कर्मचाऱ्यांना भाग वाटप
- कर्मचारी भाग विकल्प योजना (ESOS)
- कर्मचारी भाग खरेदी योजना (ESPS)
- भाग किंमत वृद्धी अधिकार योजना (SARS)
- ‘स्वेट‘ समहक्क भाग (Sweat equity share)

ड. खाजगीरित्या भाग विक्री
- अग्रहक्क पद्धतीने भाग वाटप

**३.४ भागांचे वाटप**

**३.४.१ भाग वाटपाच्या तरतुदी/अटी**

**३.४.२ भाग वाटपाची कार्य पद्धती**

**३.५ भाग प्रमाणपत्र**

**३.६ भागावरील हप्ता मागणी**

**३.७ भाग जप्ती**

**३.८ भाग समर्पण**

**३.९ भाग हस्तांतरण**

**३.१० भाग संक्रमण**

**३.११ फरक**

## प्रस्तावना

पाठ 2 मध्ये आपण कंपनी वित्त उभारणीसाठी वापरत असलेल्या वित्तसाठ्याच्या विविध स्रोतांचा अभ्यास केला. कंपनीची भांडवल संरचना तिच्या मालकीचे भांडवल आणि कर्जाऊ भांडवलाची बनलेली असते. मालकीचे भांडवल हे समहक्क भाग, अग्रहक्क भाग आणि राखीव उत्पन्नाद्वारे बनलेले असते. समहक्क भाग व अग्रहक्क भाग मिळून कंपनीचे भाग भांडवल बनते. भागाने मार्यादित कंपनी भाग वाटप करून भाग भांडवल उभारतात.

या पाठामध्ये आपण कंपनी आपल्या गरजा लक्षात घेऊन विविध प्रकारचे भाग वाटप कसे करतात. याबद्दल तपशीलवार अभ्यास करू. तसेच भागाशी संबंधित विविध संकल्पना देखील शिकू.

## ३.१ भाग भांडवलाचे वर्गीकरण

भाग भांडवल म्हणजे समहक्क भाग आणि अग्रहक्क भाग या द्‌वारे उभारलेले भांडवल होय. साधारण भाग भांडवलामध्ये समहक्क भागाचे प्रमाण अग्रहक्क भागापेक्षा जास्त असते. भाग भांडवलाची रक्कम नवीन भाग वाटपामुळे किंवा भांडवल कमी केल्याने वेळोवेळी बदलत राहते.

भाग भांडवलाचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे–

**अधिकृत किंवा नाममात्र किंवा नोंदवलेले भांडवल**
**१,००,००० समहक्क भाग × ₹ १० प्रत्येकी = ₹ १०,००,०००**

**विक्रीस काढलेले भांडवल**
**(४०,००० समहक्क भाग × ₹ १० प्रत्येकी = ₹ ४,००,०००)**

**विक्रीस न काढलेले भांडवल**
**(६०,००० समहक्क भाग × ₹ १० प्रत्येकी = ₹ ६,००,०००)**

**प्रत्यक्ष विकलेले/खपलेले भांडवल**
**(३०,००० समहक्क भाग × ₹ १० प्रत्येकी = ₹ ३,००,०००)**

**प्रत्यक्ष न विकलेले/न खपलेले भांडवल**
**(१०,००० समहक्क भाग × ₹ १० प्रत्येकी = ₹ १,००,०००)**

**मागणी केलेले भांडवल**
**(३०,००० समहक्क भाग × ₹ ५ प्रत्येकी = ₹ १,५०,०००)**

**मागणी न केलेले भांडवल**
**(३०,००० समहक्क भाग × ₹ ४ प्रत्येकी = ₹ १,२०,०००)**

**राखीव भांडवल**
**(३०,००० समहक्क भाग × ₹ १ प्रत्येकी = ₹ ३०,०००)**

**वसूल झालेले भांडवल**
**(२०,००० समहक्क भाग × ₹ ५ प्रत्येकी = ₹ १,००,०००)**

**वसूल न झालेले भांडवल**
**(१०,००० समहक्क भाग × ₹ ५ प्रत्येकी = ₹ ५०,०००)**

### अ) अधिकृत किंवा नाममात्र किंवा नोंदवलेले भांडवल :

अधिकृत भांडवल हे कंपनीच्या घटना पत्रकामध्ये नमूद केलेले असून कंपनी तितकेच भाग वाटप करून भांडवल उभारू शकते यालाच नोंदवलेले भांडवल असे म्हणतात. हे घटनापत्रकाच्या भांडवल या कलमामध्ये नमूद केलेले असते आणि कंपनी स्थापनेच्या वेळी त्या रकमेवर मुद्रांक शुल्क भरले जाते.

कंपनी वर्तमान आणि भविष्यातील भांडवलाची गरज लक्षात घेऊन अधिकृत भांडवलाची गणना करते. अधिकृत भांडवलास नाममात्र भांडवल म्हणतात कारण साधारणतः कंपनी अधिकृत भांडवल कधीच पूर्ण वाटप करीत नाही.

अधिकृत भांडवलात वाढ करावयाची असल्यास घटना पत्रकात बदल करावा लागतो.

उदा. एम. लिमिटेड कंपनीचे अधिकृत भाग भांडवल रु. १०,००,००० आहे.

त्याची विभागणी १,००,००० समहक्क भागात केली असून भागाची दर्शनी किंमत रु. १० प्रति भाग आहे.

**ब) विक्रीस काढलेले आणि विक्रीस न काढलेले भांडवल :**

विक्रीस न काढलेले भांडवल हे अधिकृत भांडवलाचा भाग असून कंपनी तिच्या भावी गुंतवणुकदारांना वाटप करते म्हणून कंपनी भाग खरेदीसाठी जनतेस आवाहन करते.

आवाहन न केलेल्या उर्वरित अधिकृत भांडवलास विक्रीस न काढलेले भांडवल म्हणतात. कंपनी भविष्यात विक्री न केलेल्या भांडवलातून भाग वाटप करू शकते.

कंपनीचे विक्रीस काढलेले भांडवल हे अधिकृत भांडवलाइतके किंवा त्यापेक्षा कमी असू शकते. उदा. एम. लिमिटेड कंपनी विक्रीस काढलेले भांडवल रुपये ४,००,००० ज्याची विभागणी ४०,००० समहक्क भाग ज्याची दर्शनी किंमत रु. १० प्रत्येकी आणि विक्रीस न काढलेले भांडवल ₹ ६,००,००० ज्याची विभागणी ६०,००० समहक्क भाग ज्याची दर्शनी किंमत रु. १० प्रत्येकी आहे.

**क) प्रत्यक्ष विकलेले / खपलेले आणि प्रत्यक्ष न विकलेले / न खपलेले :**

घेतलेले भांडवल हे विक्रीस काढलेल्या भांडवलाचा हिस्सा आहे किंवा गुंतवणुकदाराने खरेदी केलेले भाग आहे. लोकांकडून विक्रीस काढलेल्या भाग भांडवलाची पूर्ण खरेदी होते किंवा होत नाही म्हणून त्या न घेतलेल्या भाग भांडवलाला न खपलेले भांडवल असे म्हणतात म्हणून खपलेले भांडवल हे विक्रीस काढलेल्या भांडवला इतके किंवा त्यापेक्षा कमी असते.

उदा. एम. लिमिटेड कंपनीचे विक्रीस काढलेले भांडवल रु. ४,००,००० आहे म्हणजेच ४०,००० समहक्क भाग. तेव्हा कंपनीचे खपलेले भांडवल रु. ३,००,००० असू शकते जे ३०,००० समहक्क भागात रु. १० प्रति दर्शनी किंमतीचे असू शकतात म्हणून न खपलेले भांडवल रु. १,००,००० ज्याची विभागणी १०,००० समहक्क भाग रु. १० प्रत्येक भागात केली आहे.

**ड) मागणी केलेल भांडवल, न मागणी केलेले भांडवल आणि राखीव भांडवल :**

भाग वाटपावेळी कंपनी भागाच्या पूर्ण किंमतीची मागणी करीत नाही. कंपनी तिच्या गरजेनुसार सुलभ हप्त्याने मागणी करते. प्रत्येक हप्त्यास भाग हप्ता मागणी असे म्हणतात मागणी केलेले भांडवल हे घेतलेल्या भांडवलाचा हिस्सा आहे. ज्याची कंपनी भागधारकाकडून मागणी करते. भागाची उर्वरित रक्कम ज्याची मागणी केलेली नसते अशा भाग भांडवलाला मागणी न केलेले भांडवल असे म्हणतात.

राखीव भांडवल हे मागणी न केलेल्या भांडवलाचा हिस्सा आहे. कंपनी तिच्या विसर्जनाच्या वेळी वित्तीय गरजा भागविण्यासाठी मागणी न केलेल्या भाग भांडवलाची मागणी करते.

उदा. एम. लिमिटेड कंपनीकडे मागणी केलेले भांडवल रु. १,५०,००० आहे. ज्याची विभागणी ३०,००० समहक्क भाग दर्शनी किंमत रु. १० प्रतिभाग आहे. ज्यामधून रु. ५ प्रतिभाग मागणी केलेले आहे. जर कंपनीने रु. १ प्रतिभाग भांडवल राखीव भांडवल म्हणून म्हणजेच ३०,००० समहक्क भाग रु. १० प्रतिभाग दर्शनी मूल्यांचे ज्यामध्ये रु. ३०,००० राखीव भांडवल असते. न मागणी केलेले भांडवल ₹ १,२०,००० आहे ज्याची विभागणी ३०,००० समहक्क भाग प्रत्येकी किंमत ₹ ४ यामध्ये विभागली आहे ज्याची मागणी भविष्यात केली जाऊ शकते.

**इ) वसूल भांडवल आणि वसूल न झालेले भांडवल :**

कंपनीने मागविलेल्या रकमेपैकी भागधारकांकडून प्रत्यक्ष मिळालेली रक्कम ही वसूल भाग भांडवल होय. काही भागदारक भागावरील रक्कम देत नाहीत म्हणजेच अशी रक्कम वसूल न झालेले भांडवल असते. ज्यावेळी कंपनी मागणी करेल त्यावेळी प्रत्येक भागधारकास रक्कम जमा करावी लागते. असे न केल्यास कंपनीद्वारे भाग जप्त केले जातात.

***भाग जप्ती :*** *मागणी केलेली रक्कम न दिल्यास भागधारकांकडून त्याचे भाग काढून घेणे.*

उदा. एम. लिमिटेड कंपनीने रु. ५ प्रतिभाग मागणी केली जर भागधारकांनी पूर्ण रक्कम अदा केली असेल तर वसूल भांडवल हे ₹ १,५०,००० (३०,००० समहक्क भाग × ₹ ५ प्रतिभाग) होईल आणि जर १०,००० समहक्क भागांवरील

रक्कम अदा केली नसेल तर अशावेळी वसूल भांडवल ₹ १,००,००० (२०,००० समहक्क भाग × ₹ ५ प्रतिभाग) आणि न वसूल झालेले रु. ५०,००० (१०,००० समहक्क भाग × ५ प्रतिभाग)


## ३.२ भाग विक्री

कंपनीला नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा चालू व्यवसाय वाढविण्यासाठी किंवा पूर्वीची देणी देण्यासाठी भांडवलाची गरज असते. कंपनी भाग, कर्जरोखे, बॉन्डस्, इत्यादींची विक्री करून भांडवल उभारते. जर कंपनीस भाग विक्री करून भांडवल उभारवयाचे असेल तर ती पुढील भागांचे वाटप करते.

अ) अग्रहक्क भाग

ब) समहक्क भाग किंवा सामान्य भाग

## ३.३ भाग विक्रीच्या पद्धती




**अ) प्राथमिक भाग विक्री किंवा सार्वजनिक भाग विक्री :** सार्वजनिक विक्री म्हणजे जनतेस भाग खरेदीसाठी आवाहन. सामन्यतः कंपनी भाग विक्रीसाठी या पद्धतींचा वापर करते. कंपनी माहिती पत्रक प्रसिद्ध करून जनतेस भाग खरेदीसाठी आवाहन करते. त्यासाठी कंपनी दोन किंमत पद्धतींचा अवलंब करते.

**अ) निश्चित किमतीस भाग विक्री पद्धती :** या पद्धतीमध्ये कंपनी माहिती पत्रक प्रसिद्ध करते ज्यामध्ये भागांची संख्या आणि किंमत नमूद केलेली असते. दर्शनी किमतीचा काही हिस्सा अर्जासोबत गुंतवणूकदारांकडून मागवतात. जेव्हा विक्रीचा कालावधी पूर्ण होतो तेव्हा कंपनीला तिच्या भागांना असलेली मागणी समजते. कंपनी दर्शनी मूल्यास किंवा वाढावा घेऊन भाग विक्री करू शकते.

**अधिक माहिती :**

**भागाची वाढावा घेऊन विक्री :**

जेव्हा कंपनीच्या भागांची विक्री ही दर्शनी मूल्यापेक्षा जास्त किमतीस केली जाते तेव्हा त्याला वाढावा घेऊन विक्री असे म्हणतात. उदा. जर भागाचे दर्शनी मूल्य रु. १०० असेल आणि भागाची विक्री रु. १५०/- यास केली असता रु. ५०/- ही वाढावा किंमत कंपनीच्या प्रतिभूती वाढावा खात्यात जमा करावी लागते. वाढावा हा नफा समजला जात नाही आणि ही रक्कम लाभांश नफा म्हणून वाटता येत नाही.

कंपनी कायदा वाढावा घेऊन भाग विक्रीसाठी कोणतेही निर्बंध लावत नाही. तथापि प्रतिभूती वाढावा खात्यातील रक्कम वापरण्यासाठी खालील अटी नमूद करतो.

i) ही रक्कम पूर्णदत्त बोनस भाग देण्यासाठी वापरता येते.

ii) कंपनीच्या प्राथमिक खर्चासाठी वर्ग करता येते.

iii) भाग किंवा कर्जरोखे विक्री साठीचा खर्च, दलाली सूट, इत्यादी भागविण्यासाठी.

iv) अग्रहक्क भाग किंवा कर्जरोखे यांच्या परतफेडीवरील वाढावा देण्यासाठी.

**ब) बुक बिल्डींग पद्धती :** या पद्धतीमध्ये भाग वाटप करणारी कंपनी भागाची संख्या आणि विक्री किंमत लिलाव पद्धतीने करण्याचे निश्चित करते. म्हणजेच कंपनी गुंतवणूकदारांना किंमत श्रेणी कळवते व गुंतवणूकदार त्या श्रेणीमधील किमतीस बोली लावतो. श्रेणीमधील किमान किमतीस फ्लोअर किंमत (Floor Price) असे म्हणतात आणि श्रेणीतील कमाल किमतीस कॅप किंमत (Cap Price) असे म्हणतात आणि जेव्हा भागाची किंमत निश्चित होईल. त्यास कट ऑफ प्राईस किंवा विक्री किंमत असे म्हणतात. गुंतवणूकदार कितीही भागासाठी बोली लावू शकतात. बोली ही पाच दिवसांसाठी खुली असते. बोली व आवेदन अर्ज रक्कम हे व्यापारी बँकेकडे पाठवले जाते. कंपनी बोलीची प्रक्रिया संपल्यानंतर कमाल किमती नुसार कट ऑफ प्राईस किंवा विक्री किंमत निश्चित करते.

***व्यापारी बँकर :** ही अशी संस्था आहे जी भाग विक्री करणाऱ्या कंपनीच्या भागाच्या खरेदी विक्रीसाठी व्यवस्थापन किंवा सल्लागार म्हणून कार्य करते.*

**भागांची कसर देऊन विक्री :**

भागाची कसर देऊन भाग विक्री करताना कंपनी कायदा निर्बंध लादतो तथापि काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये भागाची कसर देऊन विक्री करू शकते. जेव्हा भागाची विक्री धनकोंना केली जाते किंवा जेव्हा कर्जाचे भागामध्ये रूपांतर केले जाते जेव्हा मध्यवर्ती बँकेच्या पुनर्बांधणीसाठी बँकिंग नियमन कायदा १९४९ नुसार पुनर्रचना योजनेनुसार कर्जाच्या रकमेचे भागात रूपांतर केले जाते.

कंपनी सार्वजनिक भाग विक्री पुढील दोन पद्धतींच्या आधारे करू शकते.

**सार्वजनिक भाग विक्रीच्या पद्धती**

**प्राथमिक भाग/ सार्वजनिक विक्री** | **नंतरची सार्वजनिक भाग विक्री**

१) **प्राथमिक भाग विक्री (Initial Public Offer - IPO) :** या पद्धतीमध्ये कंपनी जनतेस प्रथमतः भाग खरेदी करण्यासाठी आवाहन करते. नवीन कंपनी किंवा चालू कंपनी जेव्हा भांडवलाची गरज असेल तेव्हा जनतेकडून भाग विक्री करून भांडवल उभारते. सुरुवातीला प्रथमच कंपनी जनतेला भाग विक्रीसाठी आवाहन करते त्यास प्राथमिक भाग विक्री म्हणतात.

आय. पी. ओ. च्या आधी कंपनीचे भाग नोंदवलेले नसतात. पण आय. पी. ओ. नंतर ती सूचीबद्ध कंपनी असते आणि तिच्या भागाची खरेदी विक्री खुल्या बाजारात होते.

कंपनी प्राथमिक भाग विक्रीसाठी निश्चित किमतीस भाग विक्री पद्धत किंवा बुक बिल्डिंग पद्धतीचा वापर करते.

२) **नंतरची सार्वजनिक भाग विक्री (Further Public Offer or Follow on Public Offer - FPO) :** प्राथमिक भाग विक्री नंतर जेव्हा कंपनी भाग विक्री करते त्यास नंतरची/दुय्यम भाग विक्री असे म्हणतात. सूचीबद्ध कंपनीच्या प्राथमिक भाग विक्री नंतरच्या विक्रीला नंतरची सार्वजनिक भाग विक्री असे म्हणतात.

**ब) विद्यमान समहक्क भागधारकांना भाग विक्री :** कंपनी भांडवल उभारणीसाठी विद्यमान समहक्क भागधारकांना पुढील प्रकारे भाग देऊ करते.

**विद्यमान समहक्क भागधारकांना भाग विक्री/देणे.**

**हक्क भाग** **बोनस भाग**

१) **हक्क भाग :** जेव्हा कंपनीस अधिक भांडवलाची आवश्यकता असते तेव्हा कंपनी तिच्या समहक्क भागधारकांना त्यांनी खरेदी केलेल्या भागाच्या प्रमाणात भाग विक्री करू शकते. अशा भाग विक्रीस 'हक्क भाग विक्री' असे म्हणतात. नवीन भाग विक्रीमध्ये विद्यमान भागधारकांना भाग खरेदीचा अग्रहक्क (pre-emptive rights) असतो.

> ***प्रीएमटीव्ह राईट्स :*** *म्हणजे भाग खरेदीचा अग्रहक्क.*

प्रथम प्राधान्य/विकल्प खाजगीरित्या भाग विक्रीमध्ये कंपनी हक्क भाग वाटप करू शकते.

> ***खाजगी भाग विक्री :*** *म्हणजे विशिष्ट लोकांच्या गटाला प्रतिभूतीचे वाटप.*

**तरतुदी :** हक्क भाग विक्रीसाठी पुढील तरतुदींची पूर्तता करावी लागते.

अ) हक्क भाग विक्री किमत ही बाजार मूल्यापेक्षा कमी असते.

ब) कंपनी लेटर ऑफ ऑफर हा दस्तावेज विद्यमान भागधारकांना पाठवते.

क) लेटर ऑफ ऑफर मध्ये समाविष्ट बाबी –

i) देऊ केलेल्या भागाची संख्या.

ii) भाग विक्रीचा कालावधी – हा कालावधी १५ दिवसांपेक्षा कमी असू नये व ३० दिवसांपेक्षा जास्त असू नये.

iii) हक्क त्याग करणे म्हणजे भागधारक हे त्याचे हक्क भाग दुसऱ्याच्या नावे करू शकतात.

ड) लेटर ऑफ ऑफर हे रजिस्टर पोष्ट, स्पीड पोष्ट, कुरिअर किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवू शकतात.

ई) जर विद्यमान भागधारकांनी विहित मुदतीत प्रतिसाद दिला नाही तर भागधारक भाग खरेदीसाठी इच्छुक नाही असे गृहित धरले जाते आणि ते न खरेदी केलेले भाग कंपनी नवीन गुंतवणूकदारांना विकू शकते.

फ) कंपनीने काढलेल्या हक्क भाग विक्रीसाठी किमान अभिदान ९०% असेल.

२) **बोनस भाग :** बोनस भाग पूर्णदत्त असतात. बोनस भाग हे विद्यमान भागधारकांना मोफत त्याच्या धारण केलेल्या भागाच्या प्रमाणात वाटप करतात. साधारणपणे आर्थिकदृष्ट्या मजबूत कंपनी तिच्या नफ्यातून किंवा राखीव निधीतून बोनस भाग वाटप करते म्हणून याला 'नफ्याचे किंवा राखीव निधीचे भांडवलीकरण' म्हणतात.

**तरतुदी :** बोनस भाग वाटपासंबंधीच्या तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत–

अ) कंपनी बोनस भाग वाटप फक्त खालील गोष्टींमधून करू शकते.

i) मुक्त राखीव निधी

ii) प्रतिभूती वाढावा खाते किंवा

iii) भांडवल परतफेड राखीव निधी खाते.

***प्रतिभूती वाढावा खाते :*** *वाढावा घेऊन विक्री केलेल्या भागाची वाढावा रक्कम या खात्यामध्ये जमा केली जाते.*

***भांडवल परतफेड राखीव निधी खाते :*** *कंपनी नफ्याचा काही हिस्सा विशिष्ट उद्देशासाठी या खात्यात जमा करते उदा. बोनस भाग वाटप.*

ब) कंपनी संपत्तीच्या (Assets) पुनर्मूल्यांकनासाठी राखीव ठेवलेल्या निधीतून बोनस भाग वाटप करू शकत नाही.

***संपत्तीचे पुनर्मूल्यांकन*** *– म्हणजे संपत्तीची सद्य किंमत समजण्यासाठी केलेले मूल्यांकन.*

क) लाभांश वाटपाच्या बदल्यात बोनस भाग वाटप करता येत नाही.

ड) संचालक मंडळाने एकदा जाहीर केलेले बोनस भाग वाटप रद्द होऊ शकत नाही.

ई) बोनस भाग हे पूर्णदत्त भाग असतात.

फ) भागधारक बोनस भागाचा त्याग करू शकत नाही.

ग) बोनस भाग वाटपावेळी किमान अभिदानाची आवश्यकता नसते.

**क) विद्यमान कर्मचाऱ्यांना भाग वाटप :** विद्यमान कर्मचाऱ्यांना पुढील प्रकारे भाग वाटप करून कंपनी भांडवल उभारते.

१) ई.एस.ओ.एस. २) ई.एस.पी.एस. ३) एस.ए.आर.एस ४) 'स्वेट' सामान्य भाग

**१) कर्मचारी भाग विकल्प योजना (ESOS) :** या योजनेअंतर्गत कंपनी तिची मुख्य कंपनी (Holding) किंवा दुय्यम कंपनी (Subsidiary) याचे कायम कर्मचारी, संचालक आणि अधिकारी यांना कंपनीचे समहक्क भाग भविष्यातील तारखेस पूर्व निश्चित दराने घेण्याचे अधिकार असतात. ही योजना कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित करते आणि ज्यामध्ये ते काम करतात त्या कंपनीचे मालक असल्याची भावना निर्माण करते. कंपनीलाही चांगले कर्मचारी कायम करता येतात.

**तरतुदी :** कर्मचारी भाग विकल्प योजनेच्या तरतुदी पुढीलप्रमाणे –

अ) कंपनी तिच्या कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष/थेट किंवा कर्मचारी कल्याण संस्थेद्वारे भाग वाटप करते.

ब) वाटप केलेल्या भागाचे मूल्य बाजार मूल्यापेक्षा कमी असते.

क) कर्मचाऱ्यांसाठी प्रत्यायोजन कालावधी एक वर्षाचा असतो.

**प्रत्यायोजन (Vesting) कालावधी :** असा कालावधी ज्यामध्ये कर्मचारी भाग विकल्प दिल्यापासून भाग खरेदीसाठी अर्ज करू शकतो.

ड) सामान्यतः कंपनी तिचा किमान धारण कालावधी निश्चित करते म्हणजेच ज्यामध्ये कर्मचारी भाग विक्री करू शकत नाही. जो विकल्प दिल्यापासून ते धारण करण्यामध्ये किमान धारण कालावधी एक वर्षाचा असतो.

इ) जोपर्यंत कर्मचारी भाग खरेदी करीत नाही तो पर्यंत लाभांश आणि मतदानाच्या अधिकाराचा लाभ घेऊ शकत नाही.

फ) या प्रकारचे भाग वाटप करण्यापूर्वी कंपनीला विशेष ठरावाद्वारे भाग धारकाच्या सभेत मंजुरी घ्यावी लागते. कर्मचारी या योजने अंतर्गत खरेदी केलेले भाग हस्तांतर करू शकत नाहीत किंवा गहाण ठेवू शकत नाही किंवा तारण ठेवू शकत नाही.

ग) कंपनीला कर्मचारी भाग विकल्प योजनेचे व्यवस्थापन करण्यासाठी 'भरपाई समितीची स्थापना' करावी लागते.

ह) कंपनीला सेबी (भाग आधारित कर्मचारी फायदे) नियम २०१४ च्या तरतुदीचे पालन करावे लागते.

२) **कर्मचारी भाग खरेदी योजना (ESPS) :** या योजनेअंतर्गत कंपनी तिच्या कर्मचाऱ्यांना पुढील तारखेला खरेदी करू शकतील अशा सवलतीच्या दरात समहक्क भाग देते. कंपनी कर्मचाऱ्यांच्या पगारातून भागाच्या देयकांसाठी काही रक्कम वजा करते.

**तरतुदी :** कंपनीने पुढील तरतुदी पूर्ण केल्या पाहिजे–

अ) कर्मचाऱ्यांच्या त्यांच्या श्रेणी नुसार वेगवेगळ्या संख्येने भागांची विक्री करता येते.

ब) ई.एस.पी.एस. द्वारे वाटप केलेले भाग ताबडतोब सूचीबद्ध केले पाहिजे.

क) जर ई.एस.पी.एस. सार्वजनिक भाग विक्रीचा हिस्सा नसेल तर धारण कालावधी भाग वाटपापासून किमान एक वर्षाचा असतो.

ड) कंपनीने सेबी (भाग आधारित कर्मचारी फायदे) नियम 2014 च्या तरतुदी पूर्ण केल्या पाहिजे.

इ) कर्मचारी भाग खरेदी योजनेद्वारे भाग वाटप करण्यापूर्वी कंपनीला भागधारकांच्या सभेत विशेष ठरावाद्वारे मंजुरी घ्यावी लागते.

३) **भाग किंमत वृद्धी अधिकार योजना (Stock Appreciation Rights Scheme (SARS) :** या योजनेअंतर्गत – कर्मचाऱ्यांना एक विशिष्ट भाग संस्थेची भविष्यकाळातील वाढीव किंमत मिळण्याचा हक्क दिला जातो. भाग किंमत वृद्धी अधिकाराचे युनिट्स कंपनीकडून कर्मचाऱ्यांना वाटप केले जातात. भविष्यातील एका विशिष्ट तारखेला भाग किमतीतील वृद्धीची रक्कम रोख स्वरूपात किंवा समहक्क भागाच्या रूपात दिली जाते.

भाग किंमत वृद्धी अधिकार योजना (SARS) ही बोनसच्या बदल्यात दिली जाणारी पद्धत आहे. ही पद्धत चांगले कार्य करणाऱ्या व भागांची बाजार किंमत वाढणाऱ्या कंपन्यांकडून वापरली जाते.

या योजनेनुसार कर्मचाऱ्याने भाग खरेदी करण्यासाठी पैसे द्यावे लागत नाही. कंपनीकडून कर्मचाऱ्यांना किमान एक वर्षाचा प्रत्यायोजन कालावधी (Vesting period) दिला जातो. या योजनेत किमान धारण कालावधी नसतो. भागधारकांच्या सभेत विशेष ठराव संमत करून या योजनेला संमती दिली जाते.

४) **'स्वेट' सामान्य भाग (Sweat Equity Shares) :** कंपनी तिच्या कर्मचारी व संचालकांना पैशाऐवजी मोबदला म्हणून किंवा सवलतीच्या दरात भाग वाटप करते. कंपनीचे कर्मचारी व संचालकाच्या मौल्यवान योगदानामुळे वाढलेला नफा लक्षात घेऊन त्यांना हे भाग दिले जातात.

समहक्क भागांप्रमाणेच 'स्वेट' भागांना अधिकार असतात. या भागांचे किमान धारण कालावधी तीन वर्षांचा असतो. म्हणजेच या कालावधीत ते हस्तांतर करू शकत नाहीत. या प्रकारचे भाग वाटप करण्यासाठी कंपनीला भाग धारकांच्या सभेत विशेष ठराव मंजूर करून मान्यता घ्यावी लागते.

ड) **खाजगीरित्या विक्री :** जेव्हा कंपनी व्यक्तींच्या विशिष्ट समूहाला (दोनशे पर्यंत) प्रतिभूती घेण्यासाठी आवाहन करते त्यालाच खाजगीरित्या वाटप असे म्हणतात.

***प्रतिभूती :*** *म्हणजे भाग, कर्जरोखे, बॉन्ड्स, इत्यादी.*

वेगळ्या शब्दात सांगायचे असेल तर कंपनी सामान्य जनता सोडून ठरावीक ओळख असणाऱ्या व्यक्तींना प्रतिभूती घेण्यासाठी आवाहन करते.

- कंपनीचे संचालक मंडळ विशिष्ट समूहामध्ये समाविष्ट करण्यासाठी व्यक्तीची निवड करते. ते म्युच्युअल फंड, संस्थात्मक गुंतवणूकदार, इत्यादी असू शकतात.
- कंपनीला खाजगीरित्या वाटपाचेवेळी सोबत (offer letter) अर्ज पाठवते.
- हे भाग अंशतः दत्त (partly paid) किंवा पूर्ण दत्त (fully paid) असू शकतात आणि याची रक्कम धनादेशाद्वारे किंवा डी. डी. द्वारे दिली जाते. रोखीने खरेदी करता येत नाही.

- खाजगी वाटपामध्ये अर्जदारास भाग त्याग करण्याचा हक्क नसतो. या प्रकारचे भाग वाटप करण्यासाठी कंपनीला भाग धारकाच्या सभेत विशेष ठराव मंजूर करून घ्यावा लागतो.
- कंपनी खाजगीरित्या वाटप पुढील दोन प्रकारे करू शकते :

**हक्क भाग** **अग्रहक्क पद्धतीने वाटप**

१) **हक्कभाग :** (आपण विद्यमान समहक्क भागधारकांना भाग वाटप या शीर्षका अतंर्गत हक्क भागाची माहिती घेतली आहे.

२) **अग्रहक्क पद्धतीने वाटप :** जेव्हा विशिष्ट व्यक्तीच्या समूहाला प्राधान्याने (Preferential basis) कंपनी विशिष्ट प्रतिभूतींचे वाटप करते. म्हणजेच समहक्क भाग किंवा प्रतिभूती ज्या भविष्यामध्ये समहक्क भागामध्ये रूपांतरित करू शकतात. अशा वाटपाला अग्रहक्क पद्धतीने वाटप असे म्हणतात.

सर्वसामान्यपणे कंपनी आपल्या प्रवर्तकांना, विद्यमान भागधारकांना, कर्मचाऱ्यांना, साहसी भांडवल गुंतवणूकदार (Venture capitalists) इत्यादींना अग्रहक्क पद्धतीने प्रतिभूतींचे वाटप करते.

अग्रहक्क पद्धतीने वाटप केलेले भाग हे पूर्ण फेड असतात व त्याची रक्कम रोख द्यावी लागते. या भागांना मतदानाचे हक्क असतात. अग्रहक्क पद्धतीने प्रतिभूती वाटपासाठी भागधारकांच्या सभेत विशेष ठरावाने मंजुरी घेतली जाते. अग्रहक्क पद्धतीने प्रतिभूती वाटपाने वेळेची बचत होते. तसेच कागदपत्रांचे प्रमाण कमी होते.

**साहसी भांडवलदार (Venture capitalists) :** अशा संस्था की जे भविष्यात अतिवृद्धीची क्षमता असणाऱ्या कंपन्यांना भांडवल पुरवितात. साहसी भांडवलदार संस्था सर्वसाधारणपणे कंपन्यांचे समहक्क भाग खरेदी करतात.

**अधिक माहितीसाठी :**

| खाजगीरित्या वाटप | अग्रहक्क पद्धतीने वाटप |
|---|---|
| १) कमाल २०० निवडक व्यक्ती समूहांना प्रतिभूतीचे वाटप केले जाते. | १) समहक्क भाग किंवा समहक्क भागात परिवर्तनीय होणाऱ्या प्रतिभूतींचे निवडक व्यक्ती समूहांना अग्रहक्क पद्धतीने वाटप केले जाते. |
| २) खाजगीरित्या वाटप केले जाणारे भाग हे पूर्ण पेड किंवा अंशत: पेड असतात. | २) अग्रहक्क पद्धतीने वाटप केले जाणारे भाग हे पूर्णत: पेड असतात. |
| ३) खाजगीरित्या वाटप देकार पत्र (Private placement offer letter) पाठवून भाग वाटप केले जाते. | ३) असे कोणतेच पत्र पाठविले जात नाही. |

- **भागाची /प्रतिभूतीची पुनर्खरेदी :**

भागाची/प्रतिभूतीची पुनर्खरेदी म्हणजे कंपनी तिचे भाग किंवा विशिष्ट प्रतिभूती भाग बाजारातून बाजार किमतीपेक्षा जास्त किमतीला खरेदी करते.

**कंपनी भागाची/प्रतिभूतीची पुनखरेदी पुढील माध्यमांकडून करू शकते.**

- **विद्यमान भाग धारकांकडून त्याने धारण केलेल्या भागांच्या प्रमाणात**
- **खुल्या बाजारातून**
- **विद्यमान कर्मचारी ज्यांना कंपनीने इ.एस.ओ.एस. किंवा 'स्वेट' भाग वाटप केले आहे.**

कंपनी पुढील खात्यामध्ये पुरेशी शिल्लक असल्यानंतरच भागाची किंवा प्रतिभूतीची पुनखरेदी करू शकते.

अ) मुक्त राखीव निधी ब) प्रतिभूती वाढावा खाते किंवा क) इतर भाग वाटपातून जमा झालेला निधी.

कंपनी वेगवेगळ्या कारणासाठी तिच्या भागांची पुनखरेदी करते. जसे शिलकीची रक्कम भागधारकांना परत करण्यासाठी कंपनीचे दुसऱ्याच्या ताब्यात जाण्यापासून रक्षण करणे इत्यादी.

## ३.४ भागांचे वाटप :

### अर्थ :

जेव्हा कंपनी तिच्याकडे आलेल्या अर्जावरून अर्जदारास भागाचे वाटप करते याला भाग वाटप असे म्हणतात.

सर्वोच्च न्यायालयाने भाग वाटपाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. 'व्यक्तीस कंपनीच्या विनियोग न केलेल्या भांडवलापैकी ठरावीक संख्येने भागांचा विनियोग (वाटप).'

वरील व्याख्येनुसार भाग वाटप म्हणजे संचालक मंडळ वाटप न केलेल्या भाग भांडवलातून अर्ज केलेल्या व्यक्तींना भाग वाटप करते त्यास भाग वाटप म्हणतात.

कंपनी माहितीपत्रक अर्जाचे वाटप करते. अर्जदार अर्ज आणि अर्जाचे शुल्क कंपनीच्या बँकरकडे जमा करतो. संचालक मंडळ अर्जाची स्वीकृती करून संचालक मंडळाच्या सभेत ठराव संमत करून मंजुरी देते. यालाच भाग वाटप असे म्हणतात. कंपनीच्या संचालक मंडळाला भाग वाटपाचा अधिकार आहे.

कंपनी कायदा २०१३ नुसार पुढील कंपन्यांना भाग (प्रतिभूती) डिमटेरियलाइझ स्वरूपात द्यावे लागतात.

i) दहा कोटी पेक्षा जास्त भाग सार्वजनिक भाग विक्री करणारी कंपनी.

ii) १० सप्टेंबर २०१८ पासून नवीन भाग विक्री करणारी सूचीबद्ध नसलेली कंपनी.

iii) विहित केलेली इतर कोणत्याही प्रकारची किंवा प्रकारच्या कं विहित केलेली इतर कोणत्याही प्रकारची कंपनी.

इतर प्रकारची कंपनी कोणत्याही पद्धतीने भाग वितरित करू शकते. कोणत्याही वेळी कंपनीस आपल्या भागाचे रूपांतर अभौतिक/इलेक्ट्रॉनिक (डिमटेरियलाइझ) स्वरूपात करण्याचे स्वातंत्र्य असते. अभौतिक स्वरूपात (डिमटेरियलाइझ) भाग देणाऱ्या कंपनीस डिपॉझिटरी कायदा १९९६ च्या तरतुदींचे पालन करावे लागते.

### ३.४.१ भाग वाटपाच्या तरतुदी किंवा अटी

प्रत्येक कंपनी जी भाग वाटप करते तिला कंपनी कायदा २०१३ च्या भाग वाटपासंदर्भाच्या तरतुदींची पूर्तता करावी लागते.

सार्वजनिक कंपनीस कंपनी (माहितीपत्रक आणि प्रतिभूती वाटप) नियम २०१४ आणि सेबी (भांडवल विक्री आणि प्रकटीकरण आवश्यकता) अधिनियम २०१८ चे पालन करावे लागते.

**भाग वाटपासाठी पुढील गोष्टींची पूर्तता करावी लागते**

- **अ) नियामक तरतुदी**
- **ब) सर्वसाधारण तत्त्वे**

**अ) नियामक तरतुदी :** कंपनी कायदा २०१३ शी अधिन राहून पुढील नियमाचे कंपनीस पालन करावे लागते.

**कायदेशीर तरतुदी :** कंपनी कायदा २०१३ मध्ये पुढील तरतुदी आहेत.

१) **माहितीपत्रकांची नोंदणी :** माहितीपत्रक प्रसिद्ध करण्यापूर्वी नोंदणी अधिकाऱ्यांकडे दाखल करावे लागते. माहितीपत्रकावर सर्व प्रस्तावित संचालकाच्या सह्या असाव्यात. (नवीन कंपनीसाठी) किंवा संचालक किंवा त्यांच्या अधिकृत वकिलांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

२) **अर्ज शुल्क :** कंपनी कायद्यानुसार अर्जदाराला अर्जासोबत भागाच्या दर्शनी मूल्याच्या किमान ५% रक्कम किंवा सेबीने निश्चित केलेली रक्कम भरावी लागते. सेबीने सार्वजनिक कंपनीसाठी अर्ज शुल्काची रक्कम भागाच्या दर्शनी किंमतीच्या किमान २५% निश्चित केली आहे. कंपनीने निश्चित केलेल्या बँकेत अर्ज शुल्क जमा केले जाते.

३) **किमान अभिदान उभारणी :** किमान अभिदान उभारणी म्हणजे विक्रीस काढलेल्या भागाची आवश्यक असलेली किमान विक्री होणे. सदर किमान अभिदान रक्कम माहितीपत्रकात नमूद केलेली असते. माहितीपत्रक वाटपापासून तीस दिवसांच्या आत ही रक्कम जमा केली पाहिजे.

सेबीनुसार किमान अभिदान रक्कम विक्रीस काढलेल्या भांडवलाच्या ९०% असावी.

(अ) किमान अभिदान उभारणी न झाल्यास त्यास भागांना कमी मागणी (Under Subscription) म्हणजे कंपनीने विक्रीस काढलेल्या भागासाठी कमी अर्ज येणे असे म्हणतात.

(ब) जर किमान अभिदान उभारणी झाली नाही तर भाग विक्री बंद झाल्यापासून १५ दिवसाच्या आत अर्ज शुल्क परत करावे लागते. हे टाळण्यासाठी कंपनी भाग विमेदारांसोबत करार करते.

***भाग विमा करार :*** *कंपनीला किमान भांडवल उभारणी शक्य होण्यासाठी भाग विमेदार सोबत दलाली देऊन किमान भांडवल उभारणीची हमी घेते.*

४) **भाग विक्री बंद होणे (Subscription list) :** सेबीनुसार भाग विक्री यादी कामकाजाचे कमीतकमी ३ दिवस आणि जास्तीतजास्त १० दिवस खुली ठेवावी लागते. अर्जदार यादी खुली असलेल्या कालावधीतच अर्ज करू शकतो.

५) **वाटपाचा आधार :** भाग वाटप हे कंपनीने विविध प्रकारच्या गुंतवणूकदारांसाठी निश्चित केलेल्या आधाराप्रमाणे झाले पाहिजे. कंपनीने निश्चित केलेल्या किमान अर्ज आकारानुसार भाग वाटप केले जाते.

६) **भागांना जास्त मागणी :** ज्या वेळी कंपनीने विक्रीस काढलेल्या भागापेक्षा जास्त भाग अर्ज खरेदीसाठी येतात या भागांना जास्त मागणी असे म्हणतात.

माहितीपत्रक किंवा ऑफर लेटरमध्ये नमूद केलेल्या भागांपेक्षा जास्त भाग विक्रीस सेबी संमती देत नाही. तथापि, निव्वळ विक्रीच्या जास्तीत जास्त दहा टक्के वाटप करण्यास परवानगी दिली जाऊ शकते.

७) **भाग बाजारात व्यवहार करण्यासाठी परवानगी :** प्रत्येक कंपनीला भागाची सार्वजनिक विक्री करण्यापूर्वी एक किंवा एका पेक्षा जास्त मान्यताप्राप्त भाग बाजाराची परवानगी घ्यावी लागते. माहितीपत्रकात भाग बाजाराचे नाव नमूद केले पाहिजे आणि नोंदणीसाठी अर्ज केला आहे याची वस्तुस्थिती नमूद केली पाहिजे जर भाग बाजाराने परवानगी नाकारली तर कंपनी भाग वाटप करू शकत नाही.

***सूचीबद्ध/नोंदणी :*** *भाग बाजारात व्यवहार होणाऱ्या प्रतिभूती यादीमध्ये कंपनीच्या नावाचा समावेश करणे.*

८) **भाग विक्रीसाठी व्यवस्थापकाची व इतर विविध मध्यस्थांची नियुक्ती :** सार्वजनिक विक्रीचे वेळी एक किंवा जास्त व्यापारी बँकरची व्यवस्थापक म्हणून नेमणूक केली जाते. विक्री नोंदणी अधिकारी, पैसे गोळा करणारे बँकर्स, विमेदार, दलाल, स्वप्रमाणित सिंडीकेट बँक जाहिरात मध्यस्थ इत्यादींची सुद्धा नेमणूक केली जाते.

***विक्री नोंदणी अधिकारी :*** *अशी संस्था जी कंपनीच्या वतीने भागधारक व कर्जरोखेधारक यांची नोंद ठेवते.*

***स्वप्रमाणित सिंडीकेट बँक :*** *सेबीने प्रमाणित केलेल्या अशा बँका ज्या ASBA सवलती गुंतवणूकदारांना पुरवितात.*

**ब) सर्वसाधारण तत्त्वे :** कंपनी कायदा २०१३ च्या तरतुदींबरोबरच खालील नियमांचे पालन केले पाहिजे.

१) **योग्य अधिकार :** संचालक मंडळ किंवा संचालक मंडळाने नियुक्त केलेल्या भाग वाटप समितीस भाग वाटपाचे अधिकार असतात.

२) **भाग वाटप** : हे फक्त भाग मागणी अर्जाच्या बदल्यात असावे. कंपनी भागांचे वाटप अर्जदाराच्या लेखी अर्जानुसार करू शकते.

३) **वाजवी कालावधी :** भाग वाटप अर्ज शुल्क स्वीकृतीनंतर ६० दिवसांच्या आत करावे. भाग वाटप माहितीपत्रक वाटप केल्यापासून पाचव्या दिवसापासून करता येते.

४) **निश्चित आणि विना अट भाग वाटप :** भाग वाटप हे माहितीपत्रक आणि अर्ज यात नमूद केलेल्या अटींनुसार झाले पाहिजे. वाटपाच्या वेळी नियमामध्ये कोणताही बदल होता कामा नये किंवा नवीन अंतर्भूत केले जाऊ नयेत.

५) **संप्रेषण :** कंपनी भागवाटप पत्र किंवा वाटप सल्ल्याद्वारे अर्जदारांना भाग वाटप झाल्याचे कळवावे लागते. या पत्रामध्ये वाटप केलेल्या भागांची संख्या देय भाग वाटप रक्कम इत्यादींची माहिती दिलेली असते.

६) **विसंगती/उल्लंघन नको :** भाग वाटप करताना इतर कोणत्याही कायद्याचे उल्लंघन करू नये. कंपनी कोणत्याही विद्यमान कायद्याचे उल्लंघन करून किंवा कायद्याशी विसंगतपणे भागाचे वाटप करू शकत नाही. उदा. अल्पवयीन अर्जदारास भाग वाटप करू शकत नाही.

जर कंपनीने वरील अटींची आणि तरतुदींची पूर्तता केल्यास नियमित भाग वाटप म्हणतात परंतु कोणत्याही एखाद्या तरतुदीचे पालन न केल्यास त्यास अनियमित भाग वाटप म्हणतात. असे भाग वाटप कायदेशीररित्या अवैध नसते.

### ३.४.२ भाग वाटपाची कार्यपद्धती :

भाग वाटप म्हणजे लेखी भाग अर्ज शुल्कासह केलेल्या अर्जदारांना भागाचे वाटप करणे होय.

**भाग वाटपाची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे :**

(१) **वाटप समितीची नेमणूक :** भाग विक्री बंद झाल्यानंतर चिटणीस संचालक मंडळास भाग वाटपाची तयारी करण्याबाबत माहिती देतो. जेव्हा भाग विक्री इतकीच मागणी असेल किंवा जेव्हा कमी मागणीची स्थिती असेल तेव्हा संचालक मंडळ भाग वाटप करते. पण जेव्हा जास्त मागणीची स्थिती असेल तेव्हा मंडळ वाटप समितीची नेमणूक करते. वाटप समिती वाटप कशाप्रकारे करावे याची निश्चिती करून मंडळाला अहवाल सादर करते.

(२) **वाटपाच्या प्रमाण निश्चितीसाठी संचालक मंडळाची सभा बोलवणे :** संचालक मंडळ हे वाटप समितीने सुचवलेल्या सूत्रानुसार भाग वाटपाला मंजुरी देते. जेव्हा वाटप समिती भाग वाटपाचे सूत्र निश्चित करते तेव्हा सेबीचा प्रतिनिधी उपस्थित असतो. जर भाग सूचीबद्ध असतील तर वाटप सूत्रास भाग बाजाराच्या अधिकाऱ्यांनी मंजुरी दिली पाहिजे.

जेव्हा वाटपास मंजुरी मिळते तेव्हा भाग अर्ज आणि वाटप यादी तयार केली जाते. या यादीमध्ये वाटपदाराचे नाव नमूद केलेले असते म्हणजेच अर्जदार ज्याला भागाचे वाटप केले जाणार आहे. या यादीवर अध्यक्ष व चिटणीस यांची स्वाक्षरी असावी लागते.

(३) **भाग वाटपासाठी संचालक मंडळाचा ठराव :** भाग वाटपासाठी संचालक मंडळाच्या सभेत ठराव संमत केला जातो. ठरावाद्वारे चिटणीसास भाग वाटप पत्र किंवा दिलगिरी पत्र पाठविण्यास अधिकृत केले जाते.

चिटणीस सर्व भाग वाटपदारांना म्हणजेच अर्जदार ज्याचे नाव भाग अर्ज आणि भाग वाटप यादीमध्ये असते यानां भागवाटप पत्र पाठवतो. ज्याचे नाव भाग वाटप यादीमध्ये नाही त्यांना दिलगिरी पत्र पाठवतो आणि या पत्रा सोबत भाग अर्ज शुल्क परत करतो.

इलेक्ट्रॉनिक/डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात भाग वाटप करताना 'भाग वाटप पत्र पाठविले जात नाही. NSDL किंवा CDSL या डिपॉझिटरींना भाग वाटपाची माहिती कंपनीकडून कळविली जाते. यामध्ये अर्जदाराचा तपशील, भाग वाटप संख्या इ. बाबी असतात.

**(४) भाग वाटप शुल्क स्वीकारणे :** भाग वाटप शुल्क हे भाग वाटप पत्रामध्ये नमूद केलेले असते. ठरावीक कालावधी मध्ये हे शुल्क कंपनीने निश्चित केलेल्या बँकेमध्ये जमा करावयाचे असते.

जानेवारी २०१६ पासून सर्व सार्वजनिक भाग विक्री व हक्क भाग विक्रीसाठी ASBA बंधनकारक आहे.

> **ASBA** : Application Sppor ted by Block d Amon अशी व्यवस्था ज्यामध्ये अर्जदार त्याच्या बँकेला अर्ज करून भाग अर्ज शुल्क बँक खात्यात अडकवून ठेवण्यास सांगतो. भाग वाटप झाल्यास अर्ज शुल्क अथवा पूर्ण विक्री किंमत कंपनीच्या बँकेत हस्तांतरित केली जाते.

**(५) त्याग पत्रासंबंधित व्यवस्था (Arrangement relating to Letter of Renunciation) :** असा अर्जदार ज्यास भाग वाटप केले आहे तो त्या भागांचे दुसऱ्या व्यक्तीच्या नावे त्याग करू शकतो. त्याग करण्यासाठी अर्जदारास कंपनीच्या विहित नमुन्यातील त्याग अर्जासोबत मूळ भाग वाटप पत्र सादर करावे लागते. संचालक मंडळाच्या मान्यतेनंतर चिटणीस नवीन वाटपदाराचे नाव भाग अर्ज व वाटप यादीत समाविष्ट करतो.

> ***Renounce** : त्याग करणे – देऊन टाकणे, सोडून देणे.*

**(६) वाटप पत्र विभाजित करण्याबाबतची व्यवस्था :** काही वेळा अर्जदार ज्याला भाग वाटप झाले आहे तो वाटप पत्रे विभाजित करण्यासाठी विनंती करू शकतो. विभाजित करणे म्हणजे भाग एक किंवा जास्त व्यक्तींच्या नावाने करणे. संचालक मंडळाची विभाजनासाठी मंजुरी घेतल्यानंतर चिटणीस विभाजन वाटप यादीमध्ये माहिती नोंदवतो आणि विभाजन पत्रे वाटप करतो.

**(७) भाग वाटप विवरण पत्र दाखल करणे :** चिटणीसास कंपनी नोंदणी अधिकाऱ्यांकडे भाग वाटप झाल्यापासून ३० दिवसांच्या आत भाग वाटप विवरणपत्र दाखल करावे लागते. भाग वाटप विवरणपत्रात भाग वाटपदाराचे तपशील जसे की – नाव, पत्ता, भाग वाटपांची संख्या, भागाची दिलेली आणि देय रक्कम, इत्यादी माहिती नमूद केलेली असते.

**(८) सभासदांची नोंद वही तयार करणे आणि भाग प्रमाणपत्राचे वाटप करणे :** ज्या अर्जदाराने भाग वाटप शुल्क जमा केले आहे त्याचे नाव चिटणीस सभासद नोंदवहीमध्ये नोंदवितो.

चिटणीस भाग वाटपापासून दोन महिन्याच्या आत भाग प्रमाणपत्र तयार करून त्याचे वाटप करतो.

## ३.५ भाग प्रमाणपत्र :

हे एक कंपनीने वाटप केलेले दस्तावेज आहे जे धारक कंपनीच्या विशिष्ट संख्येच्या समभागाचे मालक आहेत. भाग प्रमाणपत्र हे भागासाठीच्या मालकी हक्काचा अंतिम पुरावा आहे.

जर सभासदत्वांबाबत काही वाद उद्‌भवल्यास सभासदांच्या नोंद वहीतील नोंदी पेक्षा भाग प्रमाणपत्र पुरावा म्हणून ग्राह्य धरले जाईल. कंपनीच्या संचालक मंडळाने अधिकृत केलेल्या दोन संचालक आणि कंपनी चिटणीस किंवा इतर अधिकृत व्यक्ती यांच्या स्वाक्षरी आणि कंपनीच्या शिक्यानिशी भाग प्रमाणपत्राचे वाटप केले जाते. कंपनी भाग प्रमाणपत्र सर्व भाग वाटपदारांना, भाग हस्तांतर स्वीकृत्यांना प्रदान करते तसेच हे अंशतः किंवा पूर्णदत्त भागांसाठी दिले जाते.

### भाग प्रमाणपत्रातील समाविष्ट बाबी :

भाग प्रमाणपत्र कंपनी (भाग भांडवल आणि कर्जरोखे) नियम २०१४ नुसार नमूद केलेल्या फॉर्म एस एच १ मध्ये असावे.

भाग प्रमाणपत्रात पुढील बाबींचा समावेश असतो.

i) कंपनीचे नाव, सी.आय.एन., नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता.

ii) सभासद नोंद क्रमांक

iii) भाग प्रमाणपत्र क्रमांक

iv) सभासदाचे नाव

v) भागाचे स्वरूप, भागांची संख्या, भागांचे व्यवच्छेदक क्रमांक

vi) भागावर भरलेले शुल्क

vii) कंपनीचा शिक्का आणि दोन संचालक आणि कंपनी चिटणिसाची स्वाक्षरी.

**भाग प्रमाणपत्र वाटपाचा कालावधी**

| कालावधी | कोणास दिले जाते? |
|---|---|
| i) कंपनीच्या स्थापनेच्या तारखेपासून दोन महिन्याच्या आत | i) घटना पत्रकावर सह्या करणाऱ्या सभासदांना. |
| ii) भाग वाटपाच्या तारखेपासून दोन महिन्याच्या आत | ii) भाग वाटप केले असल्यास भाग वाटपदारांना |
| iii) हस्तांतराच्या अर्जाच्या प्राप्तीपासून १ महिन्याच्या आत किंवा भाग संक्रमणाची सूचना मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत. | iii) हस्तांतरण झाल्यास हस्तांतर स्वीकृत्यास आणि भागाचे संक्रमण झाल्यास कायदेशीर वारसास |

सूचीबद्ध कंपन्यासाठी हस्तांतरण पावती मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत भाग प्रमाणपत्र द्यावे.

**भाग प्रमाणपत्राची नक्कल/दुसरी प्रत :** कंपनी भाग प्रमाणपत्राची दुसरी/नक्कल प्रत देऊ शकते, जर

१) मूळ भाग प्रमाणपत्र खराब झाले असेल किंवा फाटले असेल आणि कंपनीस परत केले असल्यास.

२) मूळ भाग प्रमाणपत्र हरवले आहे किंवा नष्ट झाले आहे हे धारकाने सिद्ध केले.

भाग प्रमाणपत्र हरवल्याने जाहीर करण्यासाठी कंपनी वर्तमानपत्रात नोटीस देते आणि शोधकर्त्याला ते असल्यास कंपनीला परत करण्यास सांगते. कंपनीला ठरावीक कालावधीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्यास कंपनी भाग प्रमाणपत्राची दुसरी प्रत देऊ शकते.

नक्कल भाग प्रमाणपत्र अर्जाच्या तारखेपासून तीन महिन्याच्या आत दिले जाते. कंपनी फक्त नोंदणीकृत भागधारकांना नक्कल भाग प्रमाणपत्र देते. हे नक्कल भाग प्रमाणपत्र आहे हे ठळकपणे नमूद करावे लागते. फसवणुकीच्या उद्देशाने कंपनीने नक्कल भाग प्रमाणपत्र दिल्यास कंपनीला मोठा दंड भरावा लागतो.

## ३.६ भागावरील हप्ते मागणी :

कंपनी भाग विक्रीच्या वेळी स्पष्ट करते की भागाची विक्री किंमत कंपनीने मागणी केल्यानंतर हप्त्याने द्यावी लागेल. जेव्हा जेव्हा कंपनी भागधारकांना भागावर न भरलेल्या शिल्लक रकमेचा काही भाग किंवा पूर्ण रक्कम देण्याची मागणी करते तेव्हा त्यास भागावरील हप्ते मागणी असे म्हणतात.

अशा प्रकारे अर्ज शुल्क आणि भाग वाटप शुल्क या व्यतिरिक्त जर कंपनी भागावरील उर्वरित रकमेची मागणी करत असेल तर त्यास भागावरील हप्ता मागणी म्हणतात. अंशतः देय भागावर न भरलेली रक्कम ही भागधारकाची देण्याची जबाबदारी असते. जर भागधारक हप्ता भरण्यास असमर्थ ठरला तर कंपनी भाग जप्त करू शकते.

कंपनीच्या हितासाठी फक्त संचालक मंडळाला भाग हप्ता मागणी करता येते. कंपनीने भागधारकांना मागणी पत्र पाठवून मागणी रक्कम कंपनीच्या बँकर्सला जमा करावी यासाठी किमान १४ दिवसांची नोटीस देते. भागाच्या दर्शनी मूल्याच्या 25% पेक्षा जास्त रकमेची हप्ता मागणी करता येत नाही. हप्ता मागणी देयकासाठी निश्चित केलेल्या तारखेपासून पुढील हप्ता मागणीमधील अंतर एका महिन्यापेक्षा कमी नसावे. भाग हप्ता मागणी करण्याचे नियम व कार्यपद्धती नियमावलीमध्ये दिलेले असतात.

## ३.७ भाग जप्ती :

एखादा भागधारक विशिष्ट कालावधीत भागवरील मागणी हप्ता देण्यास असमर्थ असेल तर नियमावलीत तरतूद असल्यास संचालक मंडळ असे भाग जप्त करू शकते.

सभासदाचा मालकी हक्क काढून घेतला जातो. यास भाग जप्ती असे म्हणतात. फक्त अंशतः देय भागच जप्त केले जातात. संचालक मंडळ फक्त कंपनीच्या हितासाठी भाग जप्त करू शकते. कंपनीस संबधित सभासदाला जप्तीची सूचना पाठवावी लागते. सूचना दिलेल्या तारखेपासून किमान १४ दिवसाची मुदत व्याजासह देय रक्कम देण्यासाठी दिली जाते.

हे भाग कंपनीचे असल्याने अशा जप्त केलेल्या भागांची पुनर्विक्री केली जाऊ शकते. जप्त केलेल्या भागाचे पुनर्वाटप हे साधरण वाटपासारखे नसते. पुनर्वाटपानंतर जर कंपनीकडे देय असलेल्या रकमेपेक्षा अधिक रक्कम जमा झाली तर अशी जास्तीची रक्कम भागधारकांना परत केली जाते. संचालक मंडळ भागधारकाच्या विनंतीनुसार ठरावीक कारणामुळे भाग जप्ती रद्द करू शकते. सदर विनंती भागांच्या पुनर्वाटपापूर्वी केलेली असावी.

### भाग जप्तीचा परिणाम :

i) **सभासदत्व संपुष्टात येणे :** भाग जप्त केल्यानंतर सभासदाचे सभासदत्व संपुष्टात येते आणि सभासदत्वाचे सर्व हक्क संपुष्टात येतात. सभासदाचे नाव सभासद नोंद वहीतून कमी केले जाते.

ii) **सभासदाची जबाबदारी :** भाग जप्तीनंतरही सभासद न दिलेल्या रकमेसाठी जबाबदार असतो. कंपनीने जप्त केलेल्या भागांचे पुनर्वाटप केल्यास सभासदांची जबाबदारी संपुष्टात येते.

iii) **कंपनीचे विसर्जन :** भाग जप्ती पासून एक वर्षाच्या आत कंपनीचे विसर्जन झाल्यास ज्या सभासदाचे भाग जप्त केले होते तो भाग हप्ता मागणी भरण्यास माजी सभासद म्हणून जबाबदार असतो.

## ३.८ भागाचे समर्पण :

भाग समर्पण म्हणजे स्वेच्छेने भाग रद्द करण्यासाठी कंपनीकडे जमा करणे. जेव्हा भाग जप्त करण्याव्यतिरिक्त कोणताही पर्याय उपलब्ध राहत नाही त्यावेळी भागाचे समर्पण केले जाते. फक्त अंशतः देय भागाचेच समर्पण केले जाते.

समर्पण केलेल्या भागांची पुनर्विक्री भाग जप्तीसारखीच केली जाते. कंपनीच्या नियमावलीमध्ये भाग समर्पणाची तरतूद असावी लागते.

भाग समर्पणाचा परिणाम म्हणजे भांडवलात घट होणे म्हणून कंपनी भाग समर्पण स्वीकारण्याचे टाळते.

## ३.९ भागांचे हस्तांतरण :

भागांचे हस्तांतरण म्हणजे स्वेच्छेने भागधारकाकडून दुसऱ्या व्यक्तीला भागांचे हस्तांतरण होय. सभासद पैशासाठी किंवा भेट म्हणून भागांचे हस्तांतरण करू शकतो. प्रत्येक भागधारकास भाग हस्तांतरणाचा हक्क आहे.

सार्वजनिक कंपनींच्या भागांचे मुक्तपणे हस्तांतरण करता येते. परंतु यासाठी नियमावलीमध्ये तरतूद असावी लागते. खाजगी कंपनीच्या भागांच्या मुक्त हस्तांतरणावर निर्बंध असतात.

भागधारक हस्तांतरणासाठी अर्ज करून भागांचे हस्तांतरण करू शकतो. त्यासोबत भाग प्रमाणपत्र, हस्तांतरण शुल्क जमा करतो. जो भागधारक भागाचे हस्तांतरण करतो त्यास हस्तांतरक (Transferor) असे म्हणतात. आणि ज्याला भागाचे हस्तांतरण करावयाचे त्यास हस्तांतरिती (Transferee) असे म्हणतात.

सभासद त्याच्याकडे असलेल्या भागांचे अंशत: किंवा पूर्ण हस्तांतरण करू शकतो. सभासद नोंद वहीमध्ये नोंदणी झाल्यानंतरच हस्तांतरण पूर्ण झाले असे म्हणता येते. डिपॉझिटरी पद्धती अंतर्गत भागांचे हस्तांतरण देय रक्कम मिळाल्यानंतर संगणकीय पद्धती आपोआप केली जाते. भाग दाखल हस्तांतरणसाठी प्रत्यक्ष स्वरूपात मुद्रांक शुल्क भरावे लागते परंतु डिमॅट स्वरूपात कोणतेही मुद्रांक शुल्क भरावे लागत नाही.

**मुद्रांक शुल्क :** भारतीय मुद्रांक कायदा १८९९ नुसार, हस्तांतर करार झाल्यास शुल्क असावे लागते. मुद्रांक शुल्क हस्तांतर अमलात आल्याच्या दिवशी असलेल्या भागाच्या बाजार मूल्याच्या ०.२५% असते.

**भाग हस्तांतरण नाकारणे :**

भाग हस्तांतरण नाकारण्याचा अधिकार संचालक मंडळाला आहे. हस्तांतरणाचा अर्ज मिळाल्यापासून 30 दिवसाच्या आत संचालक मंडळ हस्तांतरण नाकारण्याची सूचना कारणासह भागधारकांना पाठवते.

संचालक मंडळ खालील कारणांसाठी हस्तांतरण नाकारू शकते–

i) भागधारकांकडून हस्तांतरणासंबंधी नियमावलतील तरतुदीचे पालन न झाल्यास.

ii) हस्तांतरण अर्ज कायद्यात दिलेल्या नियमाप्रमाणे नसल्यास.

iii) हस्तांतरण अर्जासोबत भाग प्रमाणापत्र नसल्यास.

iv) ज्या भागांचे हस्तांतरण होणार आहे अशा भागांवर धारणाधिकार (Lien on shares) असल्यास.

भागधारक भाग हस्तांतरण नाकारल्याची सूचना मिळाल्यापासून ३० दिवसाच्या आत नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनलमध्ये अपील करू शकतात. जर भागधारकास सूचना मिळाली नसेल तर सार्वजनिक कंपनी असल्यास ९० दिवसात आणि खाजगी कंपनी असल्यास ६० दिवसात अपील करू शकतो.

**कोरे हस्तांतरण (Blank Transfer) :** जेव्हा भागधारक हस्तांतरण अर्जावर सही करून हस्तांतरितीच्या नावाशिवाय तो हस्तांतरीला भाग प्रमाणपत्रासोबत हस्तांतरण करतो त्यास कोरे हस्तांतरण असे म्हणतात.

कोरे हस्तांतरण भागांची खरेदी विक्री सोपी करते. कोरे हस्तांतरण अर्ज कोणतीही पुढील धारक कितीही वेळा पुढे विक्री करू शकतो. कोरे हस्तांतरण अर्ज धारण करणाऱ्यांना या संदर्भातील मुद्रांक शुल्क द्यावे लागत नाही. कोरे हस्तांतरणदारास सर्व अधिकार भागधारकाप्रमाणेच असतात.

**बनावट हस्तातरण (Forged Transfar) :** बनावट हस्तांतरण म्हणजे जेव्हा हस्तांतरण कर्त्याची स्वाक्षरी ही बनावट असते. तेव्हा कंपनी असे हस्तांतरणाची नोंदणी करू शकत नाही.

## ३.१० भागाचे संक्रमण :

भागाचे संक्रमण म्हणजे कायद्याच्या तरतुदीनुसार भागाचे हस्तांतरण होते म्हणजेच सभासदांच्या भागांचे अन्य व्यक्तीस सभासदाच्या मृत्यू, दिवाळखोरी किंवा मानसिक संतुलन बिघडल्याने या कारणांसाठी हस्तांतरण होणे.

भाग संक्रमण ही अनिवार्य कृती आहे. कायदेशीर वारस ही व्यक्ती भाग संक्रमणात पुढाकार घेते. कायदेशीर वारस किंवा कायदेशीर प्रतिनिधीने या भागांसाठी काही मोबदला देण्याची आवश्यकता नाही. भाग संक्रमणानंतरही मूळ भागधारकाची जबाबदारी/देयता तशीच सुरू राहते. भाग हस्तांतर अर्जाची व मुद्रांक शुल्काची यावेळी गरज नसते.

भाग संक्रमणामध्ये हस्तांतर कोणाकडे होते हे दर्शविणारा तक्ता :

| घटना/प्रसंग | ज्यांना हस्तांतरित केले |
|---|---|
| १) सदस्याचा मृत्यू | सदस्याच्या कायदेशीर वारसाकडे |
| २) मानसिक संतुलन बिघडलेली व्यक्ती | सदस्याचे पालक |
| ३) दिवाळखोर | कोर्टाने नियुक्त केलेला अधिकृत प्राप्तकर्ता |

*कृती :*

*www.sebi.gov.in* या संकेतस्थळाला भेट द्या व कंपनीने सेबी (SEBI) कडे दाखल केलेले सार्वजनिक भाग विक्रीच्या दस्तावेजांचे निरीक्षण करा.

## ३.११ फरक स्पष्ट करा.

१. प्राथमिक सार्वजनिक विक्री आणि नंतरची सार्वजनिक विक्री

| मुद्दे | प्राथमिक सार्वजनिक विक्री | नंतरची सार्वजनिक विक्री |
|---|---|---|
| १. अर्थ | प्राथमिक सार्वजनिक विक्री म्हणजे असूचीबद्ध सार्वजनिक कंपनीने प्रथमच जनतेला प्रतिभूती देऊ करणे. | नंतरची सार्वजनिक विक्री म्हणजे सूचीबद्ध सार्वजनिक कंपनीने भांडवल उभारणीसाठी जनतेला प्रतिभूती देऊ करणे. |
| २. जारीकर्ता कंपनीचा प्रकार | असूचीबद्ध कंपनीकडून अशा प्रकारच्या भागांची विक्री केली जाते. | सूचीबद्ध कंपनीकडून अशा प्रकारच्या भागांची विक्री केली जाते. |
| ३. कधी जारी केले जातात. | जेव्हा एखाद्या विद्यमान कंपनीला जनतेकडून प्रथमच भांडवल उभारणी करायची इच्छा असते तेव्हा या प्रकारे भागांची विक्री केली जाते. | जेव्हा एखाद्या सूचीबद्ध कंपनीला जनतेकडून जादा भांडवलाची उभारणी करावयाची आवश्यकता असते तेव्हा या प्रकारे भागांची विक्री केली जाते. |
| ४. जारी करण्याचा क्रम | प्राथमिक सार्वजनिक विक्री ही नंतरच्या सार्वजनिक विक्रीच्या आधी केली जाते. समभागांच्या प्रथमत: केल्या जाणाऱ्या विक्रीस प्राथमिक सार्वजनिक विक्री असे म्हणतात. | नंतरची सार्वजनिक विक्री ही नेहमी प्राथमिक सार्वजनिक विक्रीच्या नंतरच केली जाते. नंतरची सार्वजनिक विक्री ही समभागांची दुसऱ्यांदा किंवा त्यानंतरची होणारी समभागांची सार्वजनिक विक्री होय. |
| ५. सूचीबद्ध | प्राथमिक सार्वजनिक विक्रीच्या आधी प्रत्येक कंपनीला स्वत:ला सूचीबद्ध करून घ्यावे लागते. | नंतरची सार्वजनिक विक्री करणारी कंपनी ही अगोदरच सूचीबद्ध केलेली असते. |
| ६. जोखीम | ही गुंतवणूकदारासाठी जास्त जोखमीची असते कारण कंपनीच्या कामगिरीचा अंदाज गुंतवणूकदार करू शकत नाही. | यामध्ये गुंतवणूकदाराची जोखीम कमी असते कारण कंपनीच्या मागील कामगिरीवरून तिच्या पुढील कामगिरीचे अंदाज बांधता येऊ शकतात. |

२. निश्चित किमतीस भाग विक्री पद्धती व बुक बिल्डिंग पद्धती

| मुद्दे | निश्चित किमतीस भाग विक्री पद्धती | बुक बिल्डिंग पद्धती |
|---|---|---|
| १. अर्थ | या पद्धतीमध्ये भागांची विक्रीची किंमत माहितीपत्रकात नमूद केलेली असते व गुंतवणूकदारास याच किमतीस भाग खरेदी करावे लागतात. | या पद्धतीमध्ये भागांची किंमत लिलाव पद्धतीने निश्चित केली जाते. गुंतवणूकदारांना किंमत श्रेणी दिली जाते व त्या श्रेणीमधील किमतीस बोली लावण्यास सांगितले जाते. अशाप्रकारे कंपनी भागांची किंमत निश्चित करून त्या किमतीस भाग विक्री करते. |
| २. भागांचे मूल्य | भागांची किंमत निश्चिती अगोदरच करून माहिती पत्रकात ती किंमत दिली जाते. | भागांचे मूल्य अगोदर माहिती नसते. कंपनी ज्या किमान व कमाल मूल्यांना समभाग विक्री करू इच्छिते ते मूल्य दिलेले असते. |
| ३. माहितीपत्रक | कंपनीला माहितीपत्रकाचे वाटप करावे लागते. यामध्ये समभागांना देऊ केलेल्या किमतीचे तपशील व भागांची एकूण संख्या दिलेली असते. | कंपनी अपुरी माहितीपत्रकाचे (Red Herring) वाटप करते यामध्ये किमतीच्या श्रेणी नमूद केलेल्या असतात. |

| मुद्दे | निश्चित किमतीस भागविक्री पद्धती | बुक बिल्डिंग पद्धती |
|---|---|---|
| ४. मागणीचा निर्धार | भागविक्री बंद कालावधी नंतरच कंपनीस भागांच्या सार्वजनिक मागणीचा अंदाज येऊ शकतो. | कंपनीस भागांच्या सार्वजनिक मागणीचा अंदाज रोजच घेता येतो. भाग विक्रीच्या बंद कालावधी अगोदरच किंमत श्रेणीची नोंद पुस्तकात केली जाते. |
| ५. भाग मागणी अर्ज शुल्क | भाग मागणी शुल्क किंवा भागांची पूर्ण रक्कम, गुंतवणूकदारास भाग मागणीचा अर्ज सादर करताना भरावे लागतात. | भाग मागणी शुल्क हे बोली लावण्याच्या वेळी द्यावे लागते. भागांचे मूल्य निश्चित झाल्यानंतर रक्कम गोळा केली जाते. |
| ६. कधी वापरले जाते? | हे कोणत्याही भाग वाटपासाठी वापरले जाते. म्हणजे सार्वजनिक विक्री, हक्कभाग विक्री, कर्मचारी भाग विकल्प योजना इत्यादीसाठी हे वापरण्यात येते. | हे सहसा सार्वजनिक भाग विक्रीसाठी वापरले जाते म्हणजे प्राथमिक सार्वजनिक विक्री, नंतरची सार्वजनिक विक्री इत्यादीसाठीच वापरले जाते. |

३. हक्कभाग व बोनसभाग

| मुद्दे | हक्कभाग | बोनसभाग |
|---|---|---|
| १. अर्थ | हक्कभाग विक्रीमध्ये विद्यमान भागधारकांना भाग वाटप केले जाते. कंपनी आपल्या भाग-धारकांना भाग खरेदी करण्यासाठी प्राथमिकता देते. | बोनसभाग विद्यमान भागधारकांना विनामूल्य दिले जाते. |
| २. देय रक्कम | कंपनी भागधारकांना हक्कभागाची रक्कम द्यावी लागते. कंपनी हे भाग खरेदी करण्याचा अधिकार देऊ करते. | भागधारकांना बोनसभाग विनामूल्य दिले जातात. |
| ३. अंशत: किंवा पूर्णदत्त भाग | भागधारकाला भागांसाठी भाग मागणी शुल्क, भाग वाटप शुल्क, कॉल मनी इत्यादी पूर्ण रकमेचा भरणा करावा लागतो. | बोनसभाग हे पूर्णदत्त भाग आहेत म्हणून भागधारकास कोणत्याही रकमेचा भरणा कंपनीकडे करावा लागत नाही. |
| ४. किमान भागभांडवल उभारणी | कंपनीला किमान भागभांडवलची रक्कम उभारावीच लागते. जर कंपनीला किमान भागभांडवलाची रक्कम मिळवता आली नाही तर अर्जासोबत मिळालेली सर्व रक्कम अर्जदारास परत करावी लागते. | कंपनीकडून बोनसभाग विनामूल्य दिले जात असल्याने कोणतीही किमान भागभांडवल उभारणीची रक्कम गोळा करावी लागत नाही. |
| ५. हक्क त्याग करणे | भागधारक हे त्याचे हक्कभाग दुसऱ्याच्या नावे करू शकतात. | भागधारक त्यांचे बोनसभाग दुसऱ्याच्या नावे करू शकत नाहीत. |
| ६. वाटप करण्याचा हेतू | जेव्हा एखादी कंपनी नवीन निधी उभा करू इच्छिते व ती विद्यमान भागधारकांना त्यांच्या भागधारणेत वाढ करण्याची संधी देते. यालाच हक्कभाग वाटप असे म्हणतात. | जेव्हा एखादी कंपनी साठलेला नफा किंवा राखीव निधी विद्यमान समहक्क भागधारकांना बक्षीस म्हणून देऊ करते त्याला बोनसभाग असे म्हणतात. |

४. भागांचे हस्तांतरण व भागांचे संक्रमण

| मुद्दे | भागांचे हस्तांतरण | भागांचे संक्रमण |
|---|---|---|
| १. अर्थ | भागांचे हस्तांतरण म्हणजे स्वेच्छेने किंवा हेतुपूर्वक खरेदीदाराशी करार करून भागांची मालकी एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे जाणे. | भागांचे संक्रमण म्हणजे कायद्याच्या तरतुदीनुसार भागधारकाच्या मालकीचे भाग त्याच्या कायदेशीर प्रतिनिधीकडे हस्तांतरित होणे. भागधारकाच्या मृत्यूमुळे, दिवाळखोरी किंवा मानसिक असंतुलनामुळे हे संक्रमण केले जाते. |
| २. केव्हा केले जाते? | भागधारकाला जर समभाग विकायचे असतील किंवा ते भेट म्हणून द्यावयाचे असतील तर भाग हस्तांतरण होते. | जेव्हा भागधारकाचा मृत्यू होतो किंवा भागधारक दिवाळखोर होतो किंवा त्याचे मानसिक संतुलन बिघडते तेव्हा भागांचे संक्रमण होते. |
| ३. कृतीचे स्वरूप | ही भागधारकाने स्वेच्छेन केलेली कृती आहे. | ही सक्तीची कृती आहे. ही कायद्याच्या कृतीनुसार केली जाते. |
| ४. सहभागी पक्ष | समभागांच्या हस्तांतरणामध्ये दोन पक्षांचा सहभाग असतो. एक सदस्य ज्याला हस्तांतरक म्हटले जाते तो व दुसरा हस्तांतरितीस म्हणजे खरेदीदार असतो. | यामध्ये एकाच पक्षाचा समावेश असतो तो म्हणजे मृत्यू झालेल्या सदस्याने नामनिर्देशित केलेली व्यक्ती होय. |
| ५. हस्तांतरणाचे दस्तऐवज | हस्तांतरण दस्तऐवजाची हस्तांतरणासाठी गरज असते. हा हस्तांतरिती व हस्तांतरक यांच्या दरम्यानचा करार आहे. | यासाठी कोणत्याही हस्तांतरणाच्या दस्तऐवजाची गरज नसते. |
| ६. पुढाकार | हस्तांतरणाच्या प्रक्रियेमध्ये हस्तांतरक पुढाकार घेतो. | भाग संक्रमणाची प्रक्रिया ही कायदेशीर वारसदार किंवा कायदेशीर प्रतिनिधीकडून केली जाते. |
| ७. मोबदला | समभागांचे हस्तांतरण भागधारक, पैशाचा मोबदला मिळावा म्हणून करतो म्हणजेच खरेदीदाराला समभागांसाठी रक्कम अदा करावी लागते. याला अपवाद म्हणजे जेव्हा भागांना 'भेट' म्हणून दिले जाते. | यामध्ये मोबदल्याचा प्रश्न येत नाही. कायदेशीर वारस किंवा कायदेशीर प्रतिनिधींना समभागांसाठी रक्कम अदा करण्याची गरज नसते. |
| ८. उत्तरदायित्व | हस्तांतरकाची जबाबदारी भागांचे हस्तांतरण झाले की संपते. | समभागांचे संक्रमण झाले तरी मूळचे उत्तरदायित्व तसेच चालू राहते. |
| ९. मुद्रांक शुल्क | मुद्रांक शुल्क भागांच्या बाजार मूल्यांवर आधारित असते. | भाग संक्रमणात कोणतेही मुद्रांक शुल्क भरावे लागत नाही. |

## सारांश

- भागभांडवल म्हणजे समहक्क भाग व अग्रहक्क भाग या भागांनी बनविलेले भांडवल होय.
- भागभांडवल अशाप्रकारे वर्गीकृत केले आहे.

   i) अधिकृत/नाममात्र/नोंदणीकृत भागभांडवल म्हणजे कंपनी जास्तीत जास्त संकलित करू शकते, असे कंपनीच्या घटनापत्रकाने अधिकृत केलेले भांडवल.

   ii) विक्रीस काढलेले व विक्रीस न काढलेले भागभांडवल 'विक्रीस काढलेले' भागभांडवल म्हणजे जे भावी गुंतवणूकदारांना खरेदीसाठी कंपनीने आवाहन केलेले भागभांडवल होय. आवाहन न केलेल्या उर्वरित अधिकृत भांडवलास 'विक्रीस न काढलेले' भांडवल म्हणतात.

   iii) खपलेले व न खपलेले भांडवल (प्रत्यक्ष विकलेले/प्रत्यक्ष न विकलेली) खपलेले भांडवल हे गुंतवणूकदाराने खरेदी केलेल्या भागभांडवलाचा हिस्सा आहे. व न खपलेले भांडवल हे गुंतवणूकदाराने खरेदी न केलेल्या भागभांडवलाचा हिस्सा आहे.

   iv) मागणी केलेले व न मागणी केलेले : मागणी केलेले भांडवल म्हणजे जे कंपनीने भाग हप्ता म्हणून भागधारकाकडून मागणी केलेले भागभांडवल व भागांची उर्वरित रक्कम ज्याची मागणी केलेली नसते. अशा भाग भांडवलास मागणी न केलेले भांडवल असे म्हणतात.

   v) राखीव भांडवल : कंपनी तिच्या विसर्जनाच्या वेळी ज्या भाग भांडवलाची मागणी करते ते भागभांडवल होय.

   vi) वसूल भागभांडवल व वसूल न झालेले भागभांडवल : वसूल भांडवल म्हणजे भागधारकाकडून प्रत्यक्ष मिळालेली रक्कम व भागधारक भागावरील रक्कम देत नाही अशी रक्कम म्हणजे वसूल न झालेले भांडवल होय.

- भाग विक्रीच्या पद्धती :
   - सार्वजनिक विक्री : म्हणजे माहितीपत्रक प्रसिद्ध करून जनतेस भाग खरेदीसाठी आवाहन करणे.
   - निश्चित किमतीस भाग विक्री पद्धत : कंपनीने माहितीपत्रकात नमूद केलेली भागांची किंमत.
   - बुक बिल्डिंग पद्धती : भागांची किंमत लिलाव पद्धतीने निश्चित केली जाते. अपुरे माहितीपत्रक जारी केले जाते.
   - प्राथमिक भाग विक्री : नवीन किंमत किंवा चालू कंपनी जनतेस प्रथमत: भाग खरेदी करण्यासाठी आवाहन करते.
   - नंतरची भाग सार्वजनिक विक्री : कंपनीच्या प्राथमिक भागविकी नंतरच्या विक्रीला नंतरची/दुय्यम भाग विक्री म्हणतात.
   - हक्कभाग : जेव्हा कंपनी अधिक भांडवल उभारणीसाठी तिच्या समहक्क भागधारकांना भाग खरेदीचा अग्रहक्क देते.
   - बोनसभाग : विद्यमान भागधारकांना मोफत वाटप केलेले पूर्णदत्त भाग होय.
   - कर्मचारी भाग विकल्प योजना : या योजने अंतर्गत कंपनी तिच्या कायम असणाऱ्या कर्मचाऱ्यांना, संचालकांना कंपनीचे समहक्क भाग भविष्यातील तारखेस बाजार मूल्यापेक्षा कमी दराने खरेदी करण्याचे अधिकार देते.
   - कर्मचारी भाग खरेदी योजना : कंपनी तिच्या कर्मचाऱ्यांना सवलतीच्या दरात समहक्क भाग देते व त्यांच्या पगारातून भागांच्या देयकासाठी काही रक्कम वजा करते.
   - भाग किंमत वृद्धी अधिकार योजना : या योजनेनुसार भविष्यातील तारखेस, कंपनीच्या विशिष्ट संख्या असलेल्या भागांच्या किमतीत वृद्धी मिळविण्याचा हक्क कर्मचाऱ्यांना देण्यात आला आहे.
   - 'स्वेट' सामान्य भाग : कंपनी तिच्या कर्मचारी व संचालकांना पैशाऐवजी मोबदला म्हणून सवलतीच्या दरात भागवाटप करते.
   - खासगीरित्या वाटप : कंपनी व्यक्तीच्या विशिष्ट समूहाला (दोनशे पर्यंत) प्रतिभूती घेण्यासाठी आवाहन करते.
   - प्राधान्याने भाग वाटप : कंपनी अग्रक्रमाच्या आधारे निवडलेल्या व्यक्तींच्या समूहाला समहक्क भाग वा समहक्क भागांमध्ये परिवर्तन होणाऱ्या प्रतिभूती खरेदीचे आवाहन करते.

- भागांचे वाटप : ज्या अर्जदारांनी भागविक्री अर्ज व त्याचे शुल्क जमा केले आहे अशांना भागवाटप करणे.
- भाग प्रमाणपत्र : कंपनीने वाटप केलेला दस्तऐवज हे कंपनी समभागाच्या मालकीचे प्रमाणपत्र आहे.
- भागावरील हप्ते मागणी : कंपनी भाग अर्जाचे शुल्क व वाटप शुल्काव्यतिरिक्त भागावर न भरलेल्या शिल्लक रकमेची मागणी भागधारकांकडे करते.
- भाग जप्ती : भागधारक भागावरील मागणी हप्ता न भरल्यास कंपनी या भागधारकाचे भाग जप्त करते. यानुसार त्याचे सभासदत्व रद्द होते.
- भागाचे समर्पण : जेव्हा भागहप्ता भरण्यास भागधारक असमर्थ असतो तेव्हा स्वेच्छेने भाग रद्द करण्यासाठी कंपनीकडे जमा करतो.
- भागांचे हस्तांतरण : सभासद पैशासाठी किंवा भेट म्हणून स्वेच्छेने दुसऱ्या व्यक्तीस भागांचे हस्तांतरण करतो.
- भागांचे संक्रमण : सभासदाचा मृत्यू, दिवाळखोरी किंवा मानसिक संतुलन बिघडल्याने भागांचे हस्तांतरण होणे.

## स्वाध्याय

**प्र.क्र. १ अ) खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१) .................... म्हणजे समहक्क व अग्रहक्क भागांच्या विक्रीतून उभारलेले भांडवल होय.
अ) भाग भांडवल　　ब) कर्जाऊ भांडवल　　क) राखीव निधी

२) .................... भांडवल म्हणजे कंपनी भागांची विक्री करून उभारू शकणारे जास्तीत जास्त भांडवल होय.
अ) विक्रीस काढलेले　　ब) अधिकृत　　क) वसूल/भरणा झालेले

३) .................... म्हणजे जनतेला केलेली भागांची विक्री होय.
अ) हक्क भाग　　ब) खाजगीरित्या विक्री　　क) सार्वजनिक भाग विक्री

४) लिलावात बोललेल्या किमतीवर आधारित असलेली भाग विक्री किंमत म्हणजे .................... पद्धत होय.
अ) बुक बिल्डींग　　ब) स्थिर किंमत विक्री　　क) बोनस भाग विक्री

५) कंपनी पहिल्या वेळेस जनतेला .................... करून भागांची विक्री करते.
अ) पुढील सार्वजनिक विक्री　　ब) प्राथमिक भाग विक्री　　क) सार्वजनिक विक्री

६) विद्यमान समहक्क भागधारकांना .................... दिले जातात.
अ) आय.पी.ओ. (IPO)　　ब) इ.एस.ओ.एस. (ESOS)　　क) हक्कभाग

७) .................... बोनस भाग विनामूल्य दिले जातात.
अ) विद्यमान समहक्क भागधारकांना　　ब) विद्यमान कर्मचाऱ्यांना　　क) संचालकांना

८) कंपनीच्या कायम कर्मचाऱ्यांना, संचालकांना आणि अधिकाऱ्यांना .................... दिले जातात.
अ) बोनस भाग　　ब) हक्क भाग　　क) इ.एस.ओ.एस

९) .................... द्वारा कंपनी तिच्या प्रतिभूतींची विक्री २०० पर्यंत व्यक्तींच्या समूहाला करते.
अ) खाजगीरित्या भाग विक्री　　ब) आय.पी.ओ.　　क) सार्वजनिक विक्री

१०) भाग वाटपाचा अधिकार .................... असतो.
अ) संचालकाला　　ब) संचालक मंडळाला　　क) कंपनीच्या चिटणिसाला

११) कंपनीकडून भागांचे वाटप केलेल्या भाग अर्जदारांना .................... पत्र पाठविले जाते.
अ) दिलगिरी　　ब) नूतनीकरण　　क) भाग वाटप

१२) ………………… हा भागांच्या मालकीचा पुरावा आहे.

अ) भाग प्रमाणपत्र    ब) सभासद रजिस्टर    क) भाग वाटप पत्र

१३) दोन भाग हप्ता मागणीतील अंतर ………………… पेक्षा कमी असू नये.

अ) १४ दिवसां    ब) १ महिन्या    क) २१ दिवसां

१४) भाग हप्ता मागणी रक्कम न आल्यास कंपनी भाग ………………… करू शकते.

अ) जप्त    ब) समर्पण    क) वाटप

१५) एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे स्वेच्छेने भाग जाणे/देणे म्हणजे भाग ………………… होय.

अ) हस्तांतर    ब) संक्रमण    क) समर्पण

१६) कायद्यातील तरतुदीनुसारच्या कृतीमुळे भाग ………………… होते.

अ) जप्ती    ब) वाटप    क) वारस नोंद/संक्रमण

**ब-१) जोड्या जुळवा.**

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | सभासदाचा मृत्यू | १) | भागांची जप्ती |
| ब) | सभासदाने स्वेच्छेने कंपनीला भाग परत करणे. | २) | बुक बिल्डींग पद्धत |
| क) | माहितीपत्रकात नमूद केलेली भागांची किंमत | ३) | विद्यमान कर्मचाऱ्यांना देणे |
| ड) | इ.एस.पी.एस. | ४) | भागांचे समर्पण |
| इ) | दिलगिरी पत्र | ५) | भागांचे संक्रमण |
| | | ६) | भाग वाटप न करणे |
| | | ७) | विद्यमान समहक्क भागधारकांना देणे |
| | | ८) | भागांचे हस्तांतर |
| | | ९) | स्थिर किंमत भाग विक्री पद्धत |
| | | १०) | भागांचे वाटप |

**ब-२) जोड्या जुळवा.**

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | विक्रीस काढलेले भांडवल | १) | भाग हप्ता मागणी रक्कम न येणे |
| ब) | एफ.पी.ओ. | २) | आय.पी.ओ. नंतर कोणतीही विक्री |
| क) | बोनस भाग | ३) | विद्यमान कर्मचाऱ्यांना देणे |
| ड) | भाग वाटपानंतर दोन महिन्यात देणे | ४) | जनतेला भाग विक्रीसाठी काढणे. |
| इ) | भागांची जप्ती | ५) | भाग प्रमाणपत्र |
| | | ६) | प्रथम भाग विक्री |
| | | ७) | विद्यमान समहक्क भागधारकांना विनामूल्य भाग विक्री |
| | | ८) | कंपनी उभारू शकणारे जास्तीत जास्त भांडवल |
| | | ९) | भाग वाटप पत्र |
| | | १०) | कायद्यातील तरतुदीनुसार कृती |

**क) खालील प्रत्येक विधानासाठी एक शब्द किंवा शब्दसमूह किंवा संज्ञा लिहा.**

१) समहक्क आणि अग्रहक्क भागांची विक्री करून उभारलेले/जमा केलेले भांडवल.

२) विक्रीस काढलेल्या भांडवलापैकी गुंतवणूकदारांनी घेतलेला/खपलेला भांडवलाचा भाग.

३) फक्त कंपनी बंद करण्याच्या वेळी गोळा केले जाणारे भांडवल.

४) बुक बिल्डिंग पद्धतीतील सर्वाधिक बोली किंमत.

५) कंपनीने पहिल्या वेळेस जनतेला केलेली भागांची विक्री.

६) आय.पी.ओ. नंतर केलेली भागांची विक्री.

७) नवीन भाग विक्रीच्या वेळी कंपनीने विद्यमान समहक्क भागधारकांना भाग खरेदीसाठी पूर्व प्रभावाने प्रथम दिलेला हक्क.

८) याला नफ्याचे भांडवलीकरण देखील म्हटले जाते.

९) भाग अर्जदारांना भागांचा विनियोग करणे.

१०) भागांना जास्त मागणी आल्यास भाग वाटपाबाबतचा विचार करण्यासाठी नियुक्ती केली जाणारी समिती.

११) माहितीपत्रक प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसात भाग मागणी अर्जदारांकडून गोळा केली जाणारी किमान रक्कम.

१२) कंपनीच्या भागांच्या मालकी हक्काचा प्रथम दर्शनी पुरावा दर्शविणारा दस्तऐवज.

१३) भाग धारकाने भागांवरील हप्त्याची देय रक्कम न भरल्यास कंपनीकडून केली जाणारी दंडात्मक कारवाई.

१४) भागांचे हस्तांतर हस्तांतरकाकडून ज्या व्यक्तीकडे केले जाते ती व्यक्ती.

१५) कायद्यातील तरतुदीनुसार केले जाणारे भागांचे हस्तांतर.

**ड) खालील विधाने बरोबर की चूक ते लिहा.**

१) फक्त पूर्ण रक्कम भरलेल्या भागांची जप्ती होऊ शकते.

२) भागांचे हस्तांतर करणाऱ्या सभासदास हस्तांतरक म्हणतात.

३) अंशतः किंवा पूर्ण रक्कम भरलेल्या भागासाठी भाग प्रमाणपत्र दिले जाते.

४) भाग अर्ज शुल्क मिळाल्यानंतर एक महिन्यात भागांचे वाटप केलेच पाहिजे.

५) स्वेट समहक्क भाग हे कंपनीच्या संचालकांना किंवा कर्मचाऱ्यांना दिले जातात.

६) समहक्क भागधारकांना बोनस भाग हे मूळ किमतीपेक्षा कसर देऊन दिले जातात.

७) फ्लोअर किंमत ही (Floor Price) बुक बिल्डींग पद्धतीतील कमाल बोली किंमत असते.

८) भागधारकाकडून भागावरील रक्कम न भरली गेल्यास त्यास भागावरील देय हप्ते मागणी म्हणतात.

९) जनतेला विक्री न केलेल्या भांडवलास खपलेले भांडवल म्हणतात.

१०) कंपनीच्या घटनापत्रकातील भांडवल कलमामध्ये अधिकृत भांडवलाचा उल्लेख असतो.

**इ) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) अधिकृत भांडवल, समहक्क भाग भांडवल, विक्रीस काढलेले भांडवल, भरणा झालेले भांडवल.

२) इ.एस.ओ.एस, इ.एसपीएस, हक्क भाग, स्वेट समहक्क भाग

३) फ्लोअर प्राइस, कॅप प्राईस, कट ऑफ प्राईस, दर्शनी किंमत

४) बोनस भाग, हक्क भाग, इएसओएस

५) भाग वाटप, भाग जप्ती, भाग समर्पण

### फ) खालील विधाने पूर्ण करा.

१) समहक्क भाग आणि ………………… भाग मिळून बनलेल्या भांडवलास भाग भांडवल म्हणतात.

२) राखीव भांडवल हा ………………… चा भाग आहे.

३) सभासदाचा मृत्यू, दिवाळखोरी किंवा सभासदाचे मानसिक संतुलन बिघडणे इत्यादींमुळे होणाऱ्या भाग हस्तांतरास ………………… म्हणतात.

४) भाग हस्तांतरामध्ये हस्तांतरक आणि ………………… हे दोन पक्ष गुंतलेले असतात.

५) भागावरील हप्ता मागणीची रक्कम देण्याच्या असमर्थतेमुळे जेव्हा भागधारक स्वेच्छेने आपले भाग कंपनीला परत करता तेव्हा त्यास ………………… म्हणतात.

६) कंपनी फक्त ………………… भागांची जप्ती करू शकते.

७) मूळ भाग प्रमाणपत्र फाटले किंवा खराब झाले असल्यास कंपनी भागधारकास ………………… देऊ शकते.

८) भागांचे हस्तांतर हस्तांतरीच्या नावाने करताना कंपनीला नवीन भाग प्रमाणपत्र ………… कालावधीत द्यावे लागते.

९) भाग अर्जदाराला भाग वाटप केल्याचे पत्राने कळविले जाते त्यास ………………… म्हणतात.

१०) मागणी केलेल्या भागांच्या संख्येपेक्षा जास्त भाग मागणी अर्ज आल्यास त्यास ………………… म्हणतात.

११) बुक बिल्डिंग पद्धतीत गुंतवणूकदारांकडून ज्या अंतिम किमतीला भागांची मागणी केली जाते त्यास …………… म्हणतात.

१२) विद्यमान समहक्क भागधारकांना विनामूल्य भाग दिले जातात त्यास ……………… म्हणतात.

### ग) कंसातील अचूक पर्याय निवडा.

| | गट ‘अ’ | | गट ‘ब’ |
|---|---|---|---|
| अ) | भागांची सार्वजनिक विक्री | १) | ………………………………………… |
| ब) | ………………………………………… | २) | प्राथमिक भाग विक्री |
| क) | हक्क भाग | ३) | ………………………………………… |
| ड) | ………………………………………… | ४) | ई.एस.ओ.एस. |
| इ) | कायद्यानुसार कृती | ५) | ………………………………………… |

(प्रथम भाग विक्री, जनतेला भाग देणे, विद्यमान समहक्क भागधारकांना भाग देणे, विद्यमान कर्मचाऱ्यांना भाग देणे, भागांचे संक्रमण)

### ह) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) भागांचे संक्रमण केव्हा केले जाते?

२) भाग हस्तांतरातील दोन पक्षांची नावे सांगा.

३) भाग वाटपानंतर कंपनीने भाग प्रमाणपत्र किती कालावधीत दिले पाहिजे?

४) भाग वाटपानंतर भाग वाटप विवरणपत्र किती कालावधीत नोंदणी अधिकाऱ्याकडे सादर केले पाहिजे?

५) कंपनी भागांची जप्ती केव्हा करू शकते?

६) भाग प्रमाणपत्र म्हणजे काय?

७) कंपनी कायद्यानुसार कंपनीने किमान किती अर्ज शुल्क गोळा/जमा केले पाहिजे?

८) सार्वजनिकरित्या भाग विक्री करण्याअगोदर माहितीपत्रकाची प्रत कोणाकडे दाखल करावी लागते?

९) खाजगीरित्या विक्री म्हणजे काय?

१०) कंपनीकडून कोणाला 'स्वेट' समहक्क भाग दिले जातात?

११) कंपनी बोनस भाग कोणाला देऊ शकते?

१२) आय.पी.ओ. नंतरच्या विक्रीस काय म्हणतात?

१३) बोली प्रक्रियेद्वारे भागाची किमत निश्चित केली जाते त्या पद्धतीचे नाव सांगा.

१४) सार्वजनिक भाग विक्री म्हणजे काय?

१५) कंपनीच्या घटनापत्रकातील भांडवल कलमामध्ये नमूद केलेल्या भांडवलास काय म्हणतात?

**ई) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१) विक्रीस काढलेले भांडवल हे जास्तीत जास्त भांडवल आहे की जे कंपनी भागांची विक्री करून उभारू शकते.

२) भाग विक्रीच्या निश्चित किंमत पद्धतीत बोली किंमत प्रक्रियेद्वारे भागांची किंमत निश्चित केली जाते.

३) एफ.पी.ओ. म्हणजे जनतेला पहिल्यांदा भागांची सार्वजनिक विक्री करणे.

४) फक्त पूर्ण रक्कम दिलेल्या भागांची जप्ती केली जाऊ शकते.

५) बोनस भाग हे विद्यमान कर्मचाऱ्यांना दिले जातात.

६) कंपनी भागधारकांबरोबर भाग विक्री हमी करार करते.

७) जेव्हा भाग अर्जदारांना भागांचे वाटप केले जात नाही तेव्हा त्यांना भाग वाटप पत्र पाठविले जाते.

८) भाग प्रमाणपत्राची दुसरी प्रत अर्ज केल्याच्या तारखेपासून एक महिन्यात दिली पाहिजे.

९) भागावरील हप्त्याची रक्कम भागाच्या किमतीच्या ५% पेक्षा जास्त असता कामा नये.

**ज) योग्य क्रम लावा.**

१) अ) भागांची जप्ती
ब) भागावरील हप्ते मागणी
क) भागांचे वाटप

२) अ) भाग प्रमाणपत्र
ब) भाग वाटपपत्र
क) भाग मागणी अर्ज

३) अ) भाग वाटप विवरण पत्र
ब) भाग मागणी अर्ज
क) किमान अभिदान/भांडवल रक्कम

**प्र.क्र. २) खालील संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा.**

१) भागांचे संक्रमण
२) बोनस भाग
३) भागांचे वाटप
४) कर्मचारी भाग विकल्प योजना (ESOS)
५) भागांचे समर्पण
६) स्वेट समहक्क भाग
७) भाग प्रमाणपत्र
८) अधिकृत भांडवल
९) भागांची जप्ती
१०) वसूल भांडवल
११) भागांवरील हप्ते मागणी
१२) खपलेले भांडवल
१३) किमान अभिदान
१४) भागांचे हस्तांतर
१५) प्राथमिक समभाग विक्री (IPO)
१६) कोरे हस्तांतर
१७) पुढील भाग विक्री (FPO)
१८) बनावट हस्तांतर
१९) हक्क भाग
२०) खाजगीरित्या भाग विक्री

**प्र.क्र. ३) खालील घटना व परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा.**

१) इवा कंपनी लिमिटेडची भांडवलाची रचना १,००,००० समहक्क भागांनी बनलेली आहे. प्रत्येक भागाची दर्शनी किंमत १० रुपये आहे. कपंनीने जनतेसाठी ४०,००० समहक्क भाग विक्रीस काढले असून त्यातील जनतेकडून ३०,००० समहक्क भागांची मागणी आली (खपलेले) आहे.

पुढील गोष्टी रुपयामध्ये सांगा.

अ) अधिकृत भांडवल

ब) खपलेले भांडवल

क) विक्रीस काढलेले भांडवल

२) टी.आर.आय. कंपनी लि. ही नव्याने स्थापन झालेली सार्वजनिक कंपनी आहे. ती भागांची विक्री करून भांडवलाची उभारणी करणार आहे. त्यासाठी कंपनीचे संचालक विविध पर्यायांचा विचार करीत आहेत.
खालील गोष्टींबाबत संचालकांना सल्ला द्या.

अ) कंपनीने कोणत्या प्रकारे भाग विक्री करावी? – आय.पी.ओ किंवा एफ.पी.ओ.

ब) भांडवल उभारणीसाठी कंपनी बोनस भागाचे वाटप करू शकते?

क) कंपनी भाग विक्री हमीदारांशी करार करू शकते?

३) सिल्वर कंपनीने अलिकडेच एफ.पी.ओ. द्वारा जनतेला भागांची विक्री केली आहे. मागणी केलेल्या भागांपेक्षा जास्त भागांसाठी मागणी आली आहे. संचालक मंडळ भाग वाटप प्रक्रिया सुरू करू इच्छित आहे.
कृपया संचालक मंडळाला सल्ला द्या.

अ) कंपनीने भाग वाटप समिती नियुक्त करावी का?

ब) ज्या भाग अर्जदारांना भागांचे वाटप झाले/केले आहे त्यांना कंपनीने कसे कळवावे?

क) किती कालावधीत कंपनीने भाग प्रमाणपत्र द्यावे?

४) रेड ट्युब्स लि. कंपनीने आपल्या भागधारकाकडून प्रत्येकी रु. १०० दर्शनी किंमत असलेल्या व धारण केलेल्या प्रत्येक भागावरील न दिलेली रु. २० ची मागणी केली आहे.

कंपनीने भागधारकांना पैसे कंपनीच्या बँकेत विशिष्ट मुदतीत भरण्याविषयी पत्राद्‌वारे कळविले आहे.

अ) भागधारक त्यांनी धारण केलेल्या प्रत्येक भागांवर रु. २० देण्यास जबाबदार आहेत का?

ब) कंपनीने तिच्या भागधारकांना ज्या पत्राद्‌वारे प्रतिभाग रु. २० भरण्यासाठी कळविले आहे त्या पत्रास काय म्हणतात?

क) भागधारक सदर रक्कम विशिष्ट मुदतीत भरण्यास असमर्थ ठरल्यास त्याचा परिणाम काय होईल?

५) रेड ट्युब्स कंपनीचे 'X' यांनी १०० भाग घेतले आहेत व 'Y' यांनी ५०० भाग घेतले आहेत कंपनीने आपल्या भागधारकांना भागावरील न दिलेली व शिल्लक राहिलेली रक्कम प्रतिभाग रु. २० भरण्याचे कळविले आहे. कंपनीने मागणी केलेली भागांवरील रक्कम X देतो. Y मात्र वाईट आर्थिक स्थितीमुळे भागावरील बाकी रक्कम देण्यास असमर्थ ठरतो.

अ) कंपनी 'Y' च्या भागांची जप्ती करू शकते का?

ब) कंपनी 'X' च्या भागांची जप्ती करू शकते का?

क) X त्याच्या भागांचे हस्तांतर करू शकतो का?

## प्र.क्र. ४) फरक स्पष्ट करा.

१) प्राथमिक भाग विक्री (IPO) आणि पुढील भाग विक्री (FPO)

२) स्थिर किमतीने भाग विक्री आणि बोली किमतीने भाग विक्री (Book Building)

३) हक्क भाग आणि बोनस भाग

४) भागांचे हस्तांतर आणि भागांचे संक्रमण

## प्र.क्र. ५) थोडक्यात उत्तरे लिहा.

१) बोली किमतीने भाग विक्री (Book Building) पद्‌धत म्हणजे काय?

२) हक्क भाग विक्रीच्या कायदेशीर तरतुदी सांगा.

३) बोनस भागांसंबंधित तरतुदी सांगा.

४) भाग वाटपाबाबतची सर्वसाधारण तत्त्वे/नियम सांगा.

५) भाग प्रमाणपत्रातील तपशील स्पष्ट करा.

६) भागजप्तीचे परिणाम काय होतात?

७) संचालक मंडळ भाग हस्तांतरास केव्हा नकार देऊ शकते.

८) कर्मचारी भाग विकल्प योजना स्पष्ट करा.

९) भागांवरील हप्ते मागणी म्हणजे काय?

१०) भागांचे हस्तांतर म्हणजे काय?

## प्र.क्र. ६) खालील विधाने सकारण स्पष्ट करा.

१) हक्क भाग विक्री करताना कंपनीला कंपनी कायद्यातील तरतुदींचे पालन करावे लागते.

२) बोनस भागाचे वाटप करताना कंपनीला बोनस भाग वाटपाच्या तरतुदींची पूर्तता करावी लागते.

३) कर्मचारी भाग विकल्प योजना ही कंपनीकडून कायम कर्मचारी, संचालक आणि अधिकाऱ्यांना दिली जाते/लागू केली जाते.

४) भागांचे वाटप करताना कंपनीला सर्वसाधारण तत्वाचे किंवा नियमांचे पालन करावे लागते.

५) कंपनी भाग प्रमाणपत्राची 'दुसरी/नक्कल प्रत' देऊ शकते.

६) भाग जप्तीचा अधिकार संचालक मंडळाला असतो.

७) सार्वजनिक कंपनीचा भागधारक भागांचे हस्तांतर करू शकतो.

८) संचालक मंडळ भागांच्या हस्तांतरास नकार देऊ शकते.

**प्र.क्र. ७) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) भाग भांडवलांचे वर्गीकरण स्पष्ट करा.

२) कंपनीच्या सार्वजनिक भाग विक्रीच्या दोन पद्धती स्पष्ट करा.

३) विद्यमान समहक्क भागधारकांना कंपनीकडून दिल्या जाणाऱ्या विविध भागांचे प्रकार स्पष्ट करा.

४) भाग वाटपाच्या कायदेशीर/वैधानिक/नियामक तरतुदी स्पष्ट करा.

५) भाग वाटप कार्यपद्धती थोडक्यात स्पष्ट करा.

❑❑❑

# ४ कर्जरोखे विक्री


**४.१ कर्जरोखे विक्रीसंबंधी नियम**

४.१.१ कंपनी कायदा २०१३ नुसार कर्जरोखे विक्रीबाबतच्या तरतुदी

४.१.२ कंपनी (भाग भांडवल आणि कर्जरोखे) नियम २०१४ नुसार कर्जरोखे विक्रीच्या तरतुदी

४.१.३ सेबीनुसार कर्जरोखे विक्रीबाबत आवश्यक बाबी

**४.२ कर्जरोखे विक्रीची कार्यपद्धती**

**४.३ कर्जरोखे विश्वस्त**


## प्रस्तावना

दीर्घ मुदतीचे कर्जाऊ भांडवल जमा करण्यासाठी कंपन्या कर्जरोख्यांची विक्री करून भांडवलाची उभारणी करतात. खालील परिस्थितीत कंपन्या आम जनतेला कर्जरोख्यांची विक्री करून भांडवलाची उभारणी करू शकतात.

१) कंपनी किंवा तिचे प्रवर्तक किंवा संचालक यांना सेबीने प्रतिभूती बाजारात प्रवेश करण्यास प्रतिबंध केलेला नाही.

२) सहा महिन्यांपेक्षा जास्त काळासाठी कोणत्याही कर्जाऊ प्रतिभूतीची परतफेड (मुद्दल किंवा व्याज) करण्यास कंपनीचे प्रवर्तक, संचालक हे दोषी नसल्याचे घोषित केलेले असल्यास. या प्रकरणामध्ये आपण कर्जरोखे विक्री संदर्भातील कायदेशीर विविध नियम, तरतुदींचा आणि कर्जरोखे विक्रीच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणार आहोत.

## ४.१ कर्जरोखे विक्रीसंबंधी नियम :

कंपनीला कर्जरोख्यांची विक्री करताना कंपनी कायदा २०१३ मधील तरतुदींचे कंपनी नियम २०१४ (भाग भांडवल आणि कर्जरोखे), रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वाचे व सेबींच्या विविध नियमांचे पालन करावे लागते.

कंपनीला कर्जरोख्यांच्या प्रकारानुसार खालील तरतुदींची पूर्तता करावी लागते.

| | कायदा, नियम, मार्गदर्शन | तरतुदी |
|---|---|---|
| १. | कंपनी कायदा २०१३, कलम ७१ | → कर्जरोखे विक्रीच्या अटी |
| २. | कंपनी (भाग भांडवल आणि कर्जरोखे) नियम २०१४, नियम २०१८, | → सुरक्षित कर्जरोखे विक्रीच्या तरतुदी |
| ३. | 'सेबी' (कर्ज प्रतिभूतींची विक्री व सूची) नियम २००८ | → जे कर्जरोखे परिवर्तनीय नाहीत. ज्यांचे समहक्क भागांमध्ये पूर्ण परिवर्तन किंवा अशत: परिवर्तन केले जाऊ शकत नाही, अशा कर्जरोख्यांची विक्री व सूचीबद्ध करण्याच्या तरतुदींचा समावेश. जनतेची मागणी, खाजगी प्लेसमेंट आणि कर्जरोखे सूचीबद्ध केलेले असतील तर या तरतुदी लागू होतात. समहक्क भागांची जनतेला विक्री करताना कंपनीला या तरतुदींचे पालन करावे लागते. |
| ४. | 'सेबी' (भांडवल विक्री आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियम २००९ | → ज्या सूचीबद्ध किंवा असूचीबद्ध कर्जरोख्यांचे समहक्क भागांमध्ये पूर्णत: किंवा अंशत: परिवर्तन होते. अशा कर्जरोख्यांच्या विक्रीबाबतच्या तरतुदी. या तरतुदीं नुसार कंपनीला समहक्क भागांना लागू होणाऱ्या नियमांचे पालन करावे लागते. |

| | कायदा, नियम, मार्गदर्शन | तरतुदी |
|---|---|---|
| ५. | 'सेबी' (सूचीबद्ध कंपन्यांच्या जबाबदाऱ्या आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियम २०१५ | → अपरिवर्तनीय कर्जरोख्यांची विक्री करणाऱ्या घोषित केलेल्या सूचीबद्ध कंपन्या, नित्य कर्जाची साधने, IDRS इ. बाबतच्या पूर्तता. सूचीबद्धतेच्या कंपनीला पूर्ण कराव्या लागणाऱ्या अटी. |
| ६. | भारतीय रिझर्व्ह बँकेची मार्गदर्शक तत्त्वे | → नॉन इक्विटी साधनांची विक्री करून भांडवल उभारणी करणाऱ्या बँकांसाठी. |

कंपनी सुरक्षित व असुरक्षित कर्जरोख्यांची विक्री करू शकते तसेच समहक्क भागांमध्ये पूर्णत: किंवा अंशत: रूपांतरित केल्या जाणाऱ्या कर्जरोख्यांची विक्री करू शकते. सर्व कर्जरोख्यांची परतफेड कंपनीला करावीच लागते. कंपनी आपल्या भागधारकांना, जनतेला तसेच खाजगीरित्या कर्जरोख्यांची विक्री करू शकते. कंपनी कर्जरोख्यांची भाग बाजारांमध्ये नोंदणी करू शकते. कर्जरोखे विक्रीचा अधिकार कंपनीच्या संचालक मंडळाला असतो असे असले तरी संचालक मंडळाला कंपनीच्या नियमावलीत घालून दिलेल्या मर्यादेपर्यंतच कर्ज उभारणीच्या अधिकाराचा वापर करता येतो.

जर कर्ज उभारणीच्या मर्यादेपेक्षा जास्त कर्ज उभारणी करावयाची असल्यास भागधारकांच्या सर्वसाधारण सभेत तसा विशेष ठराव मंजूर करून त्यास संमती घ्यावी लागते.

**कर्जरोखे विक्रीच्या तरतुदी**

| कंपनी कायदा २०१३ नुसार | कंपनीचे (भाग भांडवल आणि कर्जरोखे) नियम २०१४ | 'सेबी'चे नियम |
|---|---|---|
| १. मतदानाचे अधिकार नाही.<br>२. कर्जरोख्यांचे प्रकार<br>३. व्याज देणे व कर्जरोख्यांची परतफेड करणे.<br>४. कर्जरोखे प्रमाणपत्र<br>५. कर्जरोखे परतफेड राखीव निधी निर्माण करणे.<br>६. कर्जरोखे विश्वस्त नियुक्ती<br>७. कर्जरोखे विश्वस्तांसाठी NCLT (नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्यूनल) शी संपर्क<br>८. निर्बंध लादणे.<br>९. कंपनी कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन केल्यास शिक्षा. | १. सुरक्षित कर्जरोख्यांचा कालावधी<br>२. स्थिर मालमत्तेवर बोजा निर्माण करणे.<br>३. कर्जरोखे विश्वस्तांची नियुक्ती.<br>४. कर्जरोखे परतफेड राखीव निधी निर्माण करणे. | १. किमान अभिदान<br>२. मागणीपेक्षा जास्त मागणी आल्यास धारण करणे.<br>३. हमी देणे. (Underwriting)<br>४. पतश्रेणी/मानांकन |

## ४.१.१ कंपनी कायदा २०१३ नुसार कर्जरोखे विक्रीच्या तरतुदी

कर्जरोख्यांची विक्री करताना कंपनीला कंपनी कायद्यातील खालील काही तरतुदींचे पालन करावे लागते.

१) **मतदानाचा अधिकार नाही :** मतदानाच्या अधिकारासह कंपनी कर्जरोख्यांची विक्री करू शकत नाही. कर्जरोखेधारक हे कंपनीचे धनको असतात. काही परिणाम करणाऱ्या गोष्टी वगळता त्यांना मतदानाचे कोणतेही अधिकार नसतात.

२) **कर्जरोख्यांचे प्रकार :** कंपनी सुरक्षित व असुरक्षित कर्जरोख्यांची पूर्णत: किंवा अंशत: रूपांतरिय कर्जरोख्यांची किंवा अरूपांतरिय कर्जरोख्यांची विक्री करू शकते. रूपांतरिय कर्जरोख्यांची विक्री करताना कंपनीला भागधारकांच्या सर्वसाधारण सभेत विशेष ठराव मंजूर करून घ्यावा लागतो. सर्व कर्जरोख्यांची परतफेड ही करावीच लागते.

३) **व्याज देणे व परतफेड :** कंपनीला कर्जरोख्यांची विक्री करतानाच्या अटींनुसार कर्जरोख्यांवरील व्याज व कर्जरोख्यांची परतफेड करावी लागते.

४) **कर्जरोखे प्रमाणपत्र :** कर्जरोख्यांचे वाटप केल्यापासून ६ महिन्यात कंपनीला कर्जरोखे प्रमाणपत्राचे वाटप कर्जरोखेधारकांना करावे लागते.

५) **कर्जरोखे परतफेड राखीव निधी निर्माण करणे :** लाभांशाची रक्कम देण्यासाठी उपलब्ध असलेल्या नफ्यातून कंपनीला कर्जरोखे परतफेड राखीव निधी निर्माण करावा लागतो. निर्माण केलेल्या राखीव निधीचा उपयोग फक्त कर्जरोख्यांची परतफेड करण्यासाठीच करावा लागतो. कंपनी (भागभांडवल व कर्जरोखे) सुधारणा कायदा २०१९ नुसार कंपनी व्यवहार मंत्रालयाने (MCA) गृह वित्त पुरवठा कंपन्या, बिगर बँकिंग वित्त पुरवठा कंपन्या आणि सूचीबद्ध कंपन्या यांनी कर्जरोखे परतफेड निधी तयार करण्याची आवश्यकता नाही.

६) **कर्जरोखे विश्वस्ताची नियुक्ती :** कंपनी माहितीपत्रक प्रसिद्ध करणे किंवा ५०० पेक्षा जास्त लोकांना (जनता किंवा सभासद) निमंत्रित करते अशावेळी कंपनीला एक किंवा अधिक विश्वस्तांची नियुक्ती करावी लागते. कर्जरोखे विश्वस्त कर्जरोखेधारकांच्या हिताचे रक्षण करतात. कर्जरोखे विश्वस्त नियुक्तीच्या वेळी त्यांच्याबरोबर करार करावा लागतो. त्यास विश्वस्त करार म्हणतात.

***कर्जरोखे विश्वस्त :*** *कर्जरोखे धारकांच्या हिताचे रक्षण करणारी संस्था.*

७) **कर्जरोखे विश्वस्तांचा एनसीएलटीशी संपर्क :** कर्जरोखे विश्वस्तांना कर्जरोखेधारकांच्या तक्रारीचे निवारण करावे लागते. जर कंपनी कर्जरोख्यांची मूळ रक्कम व व्याज कर्जरोखेधारकास देण्यास दोषी आढळल्यास कर्जरोखे विश्वस्त नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्यूनलकडे संपर्क साधू शकतात व कर्जरोखेधारकांच्या तक्रारीचे निवारण करू शकतात. एन. सी.एल.टी कंपनीस मूळ रक्कम किंवा व्याज देण्याचे आदेश देऊ शकते.

८) **निर्बंध लादणे :** जेव्हा कंपनीची मालमत्ता कर्जरोख्यांची मूळ रक्कम देण्यास पुरेशी नाही किंवा नसेल असे कर्जरोखे विश्वस्तास वाटते त्यावेळी ते एन.सी.एल.टी शी संपर्क साधतात. कर्जरोखेधारकाच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी एनसीएलटी कंपनीला कर्जरोखेधारकांची देणी देण्यासाठी आदेश काढू शकते.

९) **कंपनी कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन केल्यास शिक्षा :** कंपनी कायद्यातील तरतुदींचे पालन करण्यास जेव्हा कंपनी अपयशी ठरते तेव्हा कंपनी आणि तिचे अधिकारी दंड किंवा तुरुंगवास किंवा कंपनी कायद्यात नमूद केलेल्या दोन्ही शिक्षेस पात्र ठरतात.

### ४.१.२ कंपनी नियम २०१४ (भाग भांडवल आणि कर्जरोखे) नियम १८ नुसार तरतुदी.

जेव्हा कंपनी सुरक्षित कर्जरोख्यांची विक्री करणार असेल. अशावेळी कंपनीला खालील अटी/नियमांचे पालन करावे लागते.

१) **सुरक्षित कर्जरोख्यांचा कालावधी :** सर्व सुरक्षित कर्जरोख्यांची परतफेड कर्जरोख्यांची विक्री केल्याच्या तारखेपासून १० वर्षात केली पाहिजे. पायाभूत सुविधा प्रकल्पामध्ये गुंतलेल्या कंपन्या किंवा कंपनी व्यवहार मंत्रालय, केंद्रसरकार किंवा रिझर्व्ह बँकेने परवानगी दिलेल्या फक्त काही कंपन्याच कर्जरोख्यांची विक्री ३० वर्षांपर्यंतच्या कालावधीसाठी करू शकतात.

२) **मालमत्तेवर बोजा स्थापन/निर्माण करणे :** कंपनीला तिच्या मालमत्तेवर किंवा तिच्या दुय्यम किंवा धारक कंपनीच्या मालमत्तेवर बोजा निर्माण करता येतो. कर्जरोखे विक्रीचे संपूर्ण मूल्य व व्याज देण्यासाठी बोजा निर्माण केल्या जाणाऱ्या मालमत्तेचे मूल्य योग्य असले पाहिजे.

केंद्र सरकार किंवा राज्य सरकारने हमी दिलेल्या सरकारी कंपनीने सुरक्षित कर्जरोख्यांची विक्री केल्यास तिला आपल्या मालमत्तेवर बोजा निर्माण करण्याची आवश्यकता नाही.

**३) कर्जरोखे विश्वस्ताची नेमणूक :** माहितीपत्रक किंवा मागणीपत्र देण्यापूर्वी/प्रसिद्ध करण्यापूर्वी कंपनीला कर्जरोखे विश्वस्ताची नेमणूक करावी लागते. माहितीपत्रक किंवा मागणीपत्र प्रसिद्ध करण्यापूर्वी किंवा कर्जरोखे वाटपापासून ६० दिवसात कंपनीला कर्जरोखे विश्वस्त करार करावा लागतो. या करारात कंपनी आणि विश्वस्त यांना मान्य असलेल्या नियम व अटींचा समावेश असतो आणि कर्जरोखे विश्वस्ताची भूमिका स्पष्ट केलेली असते.

**४) कर्जरोखे परतफेड निधी निर्माण करणे :** कंपनीकडे उपलब्ध असलेल्या नफ्यातून कर्जरोख्यांची परतफेड करण्यासाठी कंपनीला कर्जरोखे परतफेड निधी निर्माण करावा लागतो.

देय असलेल्या कर्जरोख्यांच्या मूल्याच्या कमीत कमी २५% रक्कम कंपनीला कर्जरोखे परतफेड निधी खात्यामध्ये राखून ठेवावी लागते. पुढील वर्षी ३१ मार्चला ज्या गुंतवणूकदारांची/कर्जरोखेधारकांची परतफेड करावयाची असते त्यासाठी कंपनीने प्रत्येक वर्षी ३० एप्रिलला कमीत कमी १५% रक्कम गुंतवणूक/ठेवी स्वरूपात ठेवावी. अशी रक्कम फक्त कर्जरोखे परतफेडीसाठी वापरली जाते.

### ४.१.३ 'सेबी'चे नियम

**१) किमान अभिदान :** सेबी (कर्ज प्रतिभूतीची विक्री व नोंद) नियम २००८ नियम १२ नुसार कंपनीने किमान अभिदान रक्कम जमविली पाहिजे. सेबीनुसार सार्वजनिकरित्या कर्जरोख्यांची विक्री करताना ७५% म्हणजे १० कोटी ही किमान वर्गणी असली पाहिजे. किमान वर्गणी/भांडवल मिळू शकले नाही तर कर्जरोखे विक्री बंद केल्यापासूनच्या तारखेपासून १२ दिवसात संपूर्ण जमा केलेली रक्कम परत केली पाहिजे.

**२) जास्त मागणी राखून ठेवणे :** कर्जरोख्यांना जास्त मागणी आल्यास कंपनी कर्जरोख्यांच्या मूळ विक्रीच्या जास्तीतजास्त १००% किंवा महितीपत्रक/मागणीपत्रकात नमूद रकमेइतकी जास्त मागणी रक्कम राखून ठेवू शकते.

**३) हमीदार :** जनतेला कर्जरोखे विक्री करण्यासाठी कंपनी हमीदारांशी करार करू शकते. मागणीपत्र किंवा माहितीपत्रकामध्ये हमीदारांच्या नियुक्तीचा उल्लेख करावा लागतो.

**४) पतश्रेणी :** 'सेबी' (भांडवल विक्री आणि डिस्कोजर रिक्वायरमेंट नियम २०१८) नुसार कर्जरोख्यांची विक्री करताना कंपनीला पतश्रेणी प्रमाणपत्र मिळवावे लागते. सेबीनुसार कंपनी जनतेला कर्जरोख्यांची किंवा हक्क परिवर्तनाय कर्जरोख्यांची विक्री करत असेल तर कंपनीला एक किंवा अधिक पतश्रेणी संस्थांकडून पतश्रेणी प्रमाणपत्र मिळवावे लागते. मागणीपत्र किंवा माहितीपत्रकात त्याचा उल्लेख करावा लागतो.

i) *पतश्रेणी : पतश्रेणी संस्थेकडून पतजोखीम पातळी दर्शवून कर्ज प्रतिभूतींची दिली जाणारी पतश्रेणी.*

ii) *पतश्रेणी संस्था : क्रिसिल (CRISIL), केअर (CARE) यांसारख्या पतश्रेणी संस्था विक्री करणाऱ्या कंपन्यांची पत ठरवतात.*

**अधिक माहिती :**

कर्जरोख्यांचा समावेश करून दिर्घ मुदतीच्या कर्ज/पत साधनांचे CRISIL चे श्रेणी प्रमाण –

| श्रेणी | अर्थ | श्रेणी | अर्थ |
|---|---|---|---|
| CRISIL A A A | सर्वोच्च सुरक्षा | CRISIL B | उच्च धोका |
| CRISIL A A | उच्च सुरक्षा | CRISIL C | खूप जास्त धोका |
| CRISIL A | पुरेशी सुरक्षा | CRISIL E | दोष |
| CRISIL B B B | मध्यम सुरक्षा | | |

## ४.२ कर्जरोखे विक्रीची कार्यपद्धती

१. संचालक मंडळाच्या सभेत ठराव मंजूर करणे.
↓
२. विशेष सर्वसाधारण सभा भरविणे.
↓
३. कंपनी नोंदणी अधिकाऱ्याकडे नोंदणी
↓
४. पतश्रेणी प्रमाणपत्र मिळविणे.
↓
५. हमीदार करार करणे.
↓
६. माहितीपत्रक/मागणीपत्र/लेटर ऑफ ऑफर देणे/प्रसिद्ध करणे.
↓
७. स्वतंत्र बँक खाते उघडणे.
↓
८. अर्ज रक्कम स्वीकारणे.
↓
९. संचालक मंडळ सभा भरविणे.
↓
१०.कर्जरोखे प्रमाणपत्र देणे.
↓
११.कर्जरोखे नोंदवहीत नोंदी करणे.

कर्जरोख्यांची विक्री करताना कंपनीला खालील कार्यपद्धतीचा अवलंब करावा लागतो.

### १) संचालक मंडळाच्या सभेत ठराव मंजूर करणे.

संचालक मंडळाच्या सभेत कंपनीला खालील ठराव मंजूर करावे लागतात.

i) विक्री केल्या जाणाऱ्या कर्जरोख्यांचे प्रकार, रक्कम, विक्रीचे नियम व अटी

ii) माहितीपत्रक किंवा मागणीपत्रास/लेटर ऑफ ऑफरला मान्यता

iii) कर्जरोखे विश्वस्ताच्या नियुक्तीस मान्यता आणि त्यांची लेखी संमती मिळविणे.

iv) कंपनीच्या मालमत्तेवर बोजा निर्माण करण्यासाठी संचालक मंडळास अधिकार देणे.

v) संचालक मंडळाची कर्ज घेण्याची क्षमता वाढवावयाची गरज असेल तर विशेष सर्वसाधारण सभा बोलाविणे.

vi) अर्जदाराकडून अर्ज शुल्क स्वीकारण्याकरिता स्वतंत्र बँक खाते उघडण्यासाठी संचालक मंडळास अधिकार देणे.

### २) विशेष सर्वसाधारण सभा भरविणे (EGM)

संचालक मंडळाच्या कर्ज घेण्याच्या क्षमतेत/अधिकारात वाढ करावयाची असेल तर भागधारकांची विशेष सर्वसाधारण सभा भरवावी लागते व या सभेत विशेष ठराव मंजूर करून त्यास मान्यता घ्यावी लागते.

### ३) कंपनी नोंदणी अधिकाऱ्याकडे नोंदणी

संचालक मंडळाच्या सभेनंतर ३० दिवसात चिटणिसाला कंपनी नोंदणी अधिकाऱ्याकडे विशेष ठराव, माहितीपत्रकाची प्रत, मागणीपत्र इ. ची नोंदणी करावी लागते.

### ४) पतश्रेणी प्रमाणपत्र मिळविणे

कंपनीला एक किंवा अधिक पतश्रेणी संस्थांकडून आपल्या कर्जरोख्यांसाठी पतश्रेणी प्रमाणपत्र मिळवावे लागते. श्रेणीचा उल्लेख माहितीपत्रक किंवा मागणीपत्रात करावा लागतो.

### ५) हमीदारांशी करार

कर्जरोख्यांच्या विक्रीच्या हमीबाबत कंपनीला कर्जरोखे विक्री हमीदारांबरोबर करार करावा लागतो.

### ६) माहितीपत्रक किंवा मागणीपत्र प्रसिद्ध करणे/देणे.

जनतेला कर्जरोखे खरेदी करण्याचे आवाहन करावयाचे असल्यास कंपनीला माहितीपत्रक प्रसिद्ध करावे लागते. खाजगीरित्या भांडवल उभारणी करताना मागणीपत्रे आणि हक्क विक्रीसाठी कंपनीला ऑफर लेटर प्रसिद्ध करावे लागते/द्यावे लागते.

### ७) स्वतंत्र बँकेत खाते उघडणे.

अर्जदारांकडून अर्ज शुल्क स्वीकारण्यासाठी कंपनीला शेड्यूल्ड बँकेत स्वतंत्र खाते उघडावे लागते.

### ८) अर्ज शुल्क स्वीकारणे.

माहितीपत्रक किंवा मागणीपत्रात उल्लेख केलेल्या कालावधीत अर्जदाराला अर्ज शुल्कासह अर्ज कंपनीने नेमून दिलेल्या बँकेत सादर करावा लागतो.

### ९) संचालक मंडळाची सभा भरविणे.

कर्जरोखे विक्रीची मुदत संपल्यानंतर कर्जरोखे वाटपाबाबत विचारविनिमय करण्यासाठी व त्यास मान्यता देण्यासाठी कंपनीला संचालक मंडळाची सभा बोलवावी लागते. कंपनीच्या मालमत्तेवर बोजा निर्माण करण्यासाठीची मान्यताही या सभेत दिली जाते.

### १०) कर्जरोखे प्रमाणपत्राचे वाटप

अर्ज आणि अर्ज शुल्क मिळाल्यापासून ६० दिवसाच्या आत कंपनीला कर्जरोखे वाटपाची कार्यपद्धती पूर्ण करावी लागते. कंपनीला कर्जरोखे वाटपानंतर ६ महिन्याच्या आत कर्जरोखे प्रमाणपत्र द्यावे लागते.

### ११) कर्जरोखे नोंदवहीमध्ये नोंदी करणे.

संचालक मंडळाने कर्जरोखे वाटपास मान्यता दिल्यानंतर चिटणिसाला ७ दिवसात कर्जरोखे नोंदवहीमध्ये नोंदी कराव्या लागतात. जर कर्जराख्यांची विक्री डिमॅट पद्धतीने केली असेल तर त्याची नोंदवहीमध्ये नोंद करावी लागत नाही.

## ४.३ कर्जरोखे विश्वस्त

माहितीपत्रक प्रसिद्ध करणाऱ्या किंवा ५०० पेक्षा जास्त लोकांना कर्जरोखे खरेदीचे आवाहन करणाऱ्या कंपनीला एक किंवा अधिक कर्जरोखे विश्वस्ताची नेमणूक करावी लागते. सुरक्षित कर्जरोख्याची विक्री करण्याऱ्या कंपनीला सुद्धा कर्जरोखे विश्वस्ताची नियुक्ती करावी लागते. कर्जरोखे विश्वस्त कर्जरोखे धारकाच्या हिताचे संरक्षण करतात. कंपनी आपल्या कंपनीच्या किंवा धारक कंपनीच्या मालमत्तेवर बोजा निर्माण करते. बोजा हा कर्जरोखे विश्वस्ताच्या वतीने निर्माण केला जातो. बोजा निर्माण केलेल्या मालमत्तेवर विश्वस्त परिरक्षक म्हणून भूमिका पार पाडतात.

माहितीपत्रक किंवा मागणीपत्र प्रसिद्ध करण्यापूर्वी किंवा कर्जरोख्याचे वाटप झाल्यानंतर ६० दिवसात कर्जरोखे विश्वस्ताची नियुक्ती केली जाते.

कर्जरोखे विश्वस्त म्हणून काम करताना विश्वस्तांना लेखी संमती द्यावी लागते. माहितीपत्रकात किंवा मागणीपत्रात कर्जरोखे विश्वस्तांच्या नावाचा उल्लेख करावा लागतो.

### कर्जरोखे विश्वस्त करार

कंपनीला एक किंवा अधिक कर्जरोखे विश्वस्तांशी करार करावा लागतो. कर्जरोखे विश्वस्त करारामध्ये कराराच्या नियम व अटी लेखी स्वरूपात असतात. कर्जरोखे विश्वस्त करार हा कंपनीच्या मालमत्तेचे विश्वस्ताकडे दिले जाणारे कायदेशीर साधन/दस्तावेज आहे. या करारान्वये कर्जरोखेधारकाचे हक्क आणि कर्जरोखे विश्वस्ताची कर्तव्ये आणि अधिकार स्पष्ट केले जातात.

कर्जरोखे विक्रीची मुदत संपल्यानंतर ३ महिन्यात कंपनीत हा करार करावा लागतो. सभासद व कर्जरोखेधारक या कराराची तपासणी करू शकतात आणि निश्चित स्वरूपाचे शुल्क भरून त्याची एक प्रत मिळवू शकतात.

**कृती :**

१) IDBI Trusteeship service च्या कर्जरोखे विश्वस्त सेवांबद्दल शोध घ्या.

२) कर्जरोखे विश्वस्त सेवा देणाऱ्या भारतातील दोन संस्था शोधा.

## सारांश

- दीर्घ मुदतीच्या परतफेडीसाठी कंपनी कर्जरोख्यांची विक्री करणे पसंत करते किंवा प्राधान्य देते.
- कंपनी सुरक्षित, असुरक्षित कर्जरोखे अपरिवर्तनीय किंवा परिवर्तनीय कर्जरोखे, पूर्णत: किंवा अंशत: परिवर्तनीय कर्जरोखे किंवा परतफेडीच्या कर्जरोख्यांची विक्री करू शकते. कर्जरोखे भाग बाजारात सूचीबद्ध करता येतात.
- कंपनी आपल्या कर्जरोख्यांची विक्री सभासदांना, जनतेला किंवा खाजगीरित्या करू शकते.
- कंपन्यांना कंपनी कायदा २०१३ मधील तरतुदींचे (कंपनीचे भाग भांडवल व कर्जरोखे) नियम २०१४ आणि 'सेबी'च्या अटींचे पालन करावे लागते.
- कर्जरोखेधारकांच्या हिताचे संरक्षण करण्याकरिता कंपनीला कर्जरोखे विश्वस्ताची नेमणूक करावी लागते. कर्जरोखे विश्वस्त करारामध्ये कंपनी आणि कर्जरोखे विश्वस्तांना मान्य झालेल्या अटी व नियमांचा समावेश असतो. कर्जरोखे विक्री बंद झालेल्या तारखेपासून ३ महिन्यात करारावर स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे.

## स्वाध्याय

**प्र.क्र. १ अ) खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१) कंपनी मतदानाच्या हक्कासह ...................... ची विक्री करू शकत नाही.

अ) समहक्क भाग  ब) कर्जरोखे  क) प्रतिभूती

२) कंपनी ...................... परिवर्तनीय कर्जरोख्यांची विक्री करू शकते.

अ) फक्त अंशत:  ब) फक्त पूर्णत:  क) अंशत: व पूर्ण

३) कर्जरोख्यांच्या परतफेडीसाठी ...................... खात्यातून निधी वापरला जातो.

अ) भांडवल  ब) कर्जरोखे परतफेड राखीव निधी  क) नफा किंवा तोटा

४) कर्जरोखेधारकांच्या हिताचे रक्षण ...................... करतात.

अ) कर्जरोखे विश्वस्त  ब) कर्जरोखे धारक  क) परतफेड राखीव निधी

५) सुरक्षित कर्जरोख्यांची परतफेड त्यांची विक्री केल्याच्या तारखेपासून ...................... केली पाहिजे.

अ) १० दिवसात  ब) १० वर्षात  क) १५ वर्षात

६) कंपनीला ...................... कर्जरोख्यांची विक्री करताना आपल्या मालमत्तेवर बोजा निर्माण करावा लागतो.

अ) सुरक्षित  ब) असुरक्षित  क) परतफेडीच्या

७) कर्जरोख्यांचे वाटप झाल्यापासून कर्जरोखे प्रमाणपत्र ...................... दिले पाहिजे.

अ) ३ महिन्यांत  ब) ६ महिन्यांत  क) ६० दिवसांत

८) कर्जरोखे वाटपाच्या तपशीलाची नोंद ...................... मध्ये केली पाहिजे.

अ) कर्जरोखे नोंदवही  ब) सभासद नोंदवही  क) धनको नोंदवही

९) कंपनीला ५०० पेक्षा जास्त व्यक्तींना आपले कर्जरोखे खरेदी करण्याचे माहितीपत्रकाद्वारे आवाहन करताना ...................... ची नियुक्ती करावी लागते.

अ) कंपनी नोंदणी अधिकारी ब) कर्जरोखेधारक क) कर्जरोखे विश्वस्त

१०) कंपनी व कंपनी कर्जरोखे विश्वस्त यांच्यामध्ये होणाऱ्या करारास ...................... म्हणतात.

अ) कर्जरोखे विश्वस्त करार ब) मागणीपत्र क) माहितीपत्रक

११) कर्जरोखे वाटपाची कार्यपद्धती कर्जरोखे अर्ज मिळाल्यापासून ...................... पूर्ण केली पाहिजे.

अ) ६ महिन्यांत ब) ३ महिन्यांत क) ६० दिवसांत

## ब) जोड्या जुळवा.

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | कर्जरोखे विश्वस्त | १) | कर्जरोखे विक्रीचा अधिकार |
| ब) | कर्जरोखेधारक | २) | भागधारकाचे हितरक्षण |
| क) | मालमत्तेवर बोजा | ३) | सुरक्षित कर्जरोखे |
| ड) | संचालक मंडळ | ४) | एन सी एल टी |
| इ) | कर्जरोखे प्रमाणपत्र | ५) | मतदानाचा अधिकार नाही |
| | | ६) | असुरक्षित कर्जरोखे |
| | | ७) | कर्जरोखेधारकाच्या हिताचे रक्षण |
| | | ८) | मतदान अधिकार |
| | | ९) | भागाच्या मालकी हक्काचा पुरावा |
| | | १०) | कर्जरोखे वाटपापासून ६ महिन्यांच्या आत दिले जाते. |

## क) खालील प्रत्येक विधानासाठी एक शब्द, शब्द समूह किंवा संज्ञा लिहा.

१) परिवर्तनीय कर्जरोख्याच्या विक्रीसाठी आवश्यक असणारा ठरावाचा प्रकार.

२) कर्जरोख्याची परतफेड करण्यासाठी निर्माण करण्यात येणारे खाते.

३) कर्जरोखेधारकाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी कंपनीने नियुक्त केलेली संस्था.

४) सुरक्षित कर्जरोख्याची परतफेड करण्याचा कालावधी.

५) कर्जरोख्यांचा असा प्रकार ज्यासाठी कंपनी आपली मालमत्ता तारण देते.

६) असा दस्तावेज ज्यामध्ये कंपनी आणि कर्जरोखे विश्वस्त यांनी मान्य केलेल्या अटी व शर्ती लिहिलेल्या असतात.

७) अर्ज मिळालेल्या तारखेपासून कर्जरोखे वाटपाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी लागणारा कालावधी

८) कर्जरोखे प्रमाणपत्राचे वाटप कंपनीने या कालावधीमध्ये केले पाहिजे.

९) कर्जरोखेधारकांच्या तक्रारींचे निवारण करणारी संस्था.

१०) कर्जरोखे वाटपाचा अधिकार यांच्याकडे असतो.

### ड) खालील विधाने बरोबर की चूक ते लिहा.

१) कर्जरोखेधारकांना मतदानाचा अधिकार नाही.

२) अपरिवर्तनीय कर्जरोख्याची विक्री कंपनी करू शकत नाही.

३) परिवर्तनीय कर्जरोख्याच्या विक्रीसाठी विशेष ठरावाची आवश्यकता असते.

४) कर्जरोखेधारकांना व्याज दिले जाते.

५) कर्जरोखेधारकांना तक्रारींचे निवारण करण्यासाठी कर्जरोखे विश्वस्त एनसीएलटीकडे जाऊ शकत नाहीत.

६) सुरक्षित कर्जरोख्याची परतफेड ही कर्जरोखे वाटप केल्यापासून २० वर्षांच्या आत केली पाहिजे.

७) सुरक्षित कर्जरोखे वितरित करताना कंपनीला मालमत्तेवर बोजा निर्माण करावा लागतो.

८) भागधारकाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी कर्जरोखे विश्वस्ताची नेमणूक केली जाते.

९) कर्जरोख्याचे वाटप केल्यानंतर ६ महिन्यांच्या आत कर्जरोखे प्रमाणपत्र दिले जाते.

१०) कर्जरोख्याचे वाटप केल्यानंतर कर्जरोखेधारकांची नावे सभासद नोंदवहीत नोंदविली जातात.

### इ) गटात न बसणारा शब्द शोधा.

१) कर्जरोखेधारक, व्याज, लाभांश

२) कर्जरोखे विश्वस्त, कोर्ट, एनसीएलटी

३) सुरक्षित कर्जरोखे, परिवर्तनीय कर्जरोखे, न परतफेडीचे कर्जरोखे

४) कर्जरोखे विश्वस्त, विश्वस्त करार, भागधारक

### फ) खालील विधाने पूर्ण करा.

१) कर्जरोखे विश्वस्तास कंपनीच्या मालमत्तेबाबत हवाला देणाऱ्या कायदेशीर दस्तावेजास ...................म्हणतात.

२) कर्जरोखेधारकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी कंपनी ................... ची नियुक्ती करते.

३) कर्जरोखे अर्ज पावती व शुल्क मिळाल्यापासून कर्जरोखे वाटपाची कार्यपद्धती ................... मध्ये पूर्ण केली जाते.

४) कंपनीच्या मालमत्तेवर बोजा निर्माण करण्याचा अधिकार असणाऱ्यास ................... म्हणतात.

५) सुरक्षित कर्जरोख्यांची परतफेड ................... कालावधीत केली जाते.

६) कंपनीचे पुढील उत्तरदायित्व वाढविणे थांबविण्यासाठी कर्जरोखे विश्वस्त ................... शी संपर्क करू शकतात.

७) कंपनीला माहितपत्रक प्रसिद्ध करून किंवा ५०० पेक्षा जास्त व्यक्तींना आपले कर्जरोखे खरेदीचे आवाहन करण्यासाठी ................... ची नियुक्ती करावी लागते.

८) कर्जरोखे गुंतवणुकीवरील परताव्यास ................... म्हणतात.

९) रु. १०० कोटी कर्जरोख्यांची सार्वजनिकरित्या विक्री करताना किमान अभिदान ................... इतके असले पाहिजे.

१०) 'सेबी' च्या नियमानुसार सार्वजनिक विक्री किंवा परिवर्तनीय कर्जरोख्यांची हक्क विक्री करण्यासाठी कंपनीला ................... मिळवावे लागते.

## ग) कंसातील अचूक पर्याय निवडा.

| | गट 'अ' | | गट 'ब' |
|---|---|---|---|
| अ) | कर्जरोखे विश्वस्त | १) | ................................................... |
| ब) | ............................................ | २) | मालमत्तेवर बोजा निर्माण करणे. |
| क) | कर्जरोखे नोंदवही | ३) | ................................................... |
| ड) | ............................................ | ४) | कर्जरोखे प्रमाणपत्र |
| इ) | मतदान अधिकार नाही. | ५) | ................................................... |

(कर्जरोखे वाटपापासून ६ महिन्यांच्या आत, कर्जरोखेधारकाचे नाव, सुरक्षित कर्जरोखे, विश्वस्त करार, कर्जरोखेधारक)

## ह) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) कर्जरोखेधारक म्हणजे कोण?

२) गुंतवणुकीवरील परतफेड म्हणून कर्जरोखेधारकांना काय मिळते?

३) कर्जरोखेधारकाचे हित जपण्यासाठी कंपनी कोणाची नेमणूक करते?

४) किती कालावधीत सुरक्षित कर्जरोख्याची परतफेड केली जाते?

५) कर्जरोखे विश्वस्त आणि कंपनी यांच्यातील करारास काय म्हणतात?

६) कंपनीच्या मालमत्तेवर बोजा आकारण्याचा अधिकार कोणास आहे?

७) कोणत्या सभेमध्ये संचालक मंडळास कर्ज घेण्याच्या क्षमतेत वाढ करण्याविषयीचा ठराव मंजूर करावा लागतो?

८) कर्जरोखे प्रमाणपत्र किती मुदतीत दिले पाहिजे?

९) १०० कोटी रुपयाचे कर्जरोखे वाटप करावयाचे असल्यास कंपनीस किमान किती अभिदान गोळा करावे लागते?

१०) कंपनीने पत मानांकन संस्थेची नेमणूक केव्हा करावी?

## ई) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.

१) सभासद नोंदवहीत कर्जरोखेधारकांचा सर्व तपशील नोंदविला जातो.

२) सुरक्षित कर्जरोख्याची परतफेड वाटपापासून १५ वर्षाच्या आत केली पाहिजे.

३) कंपनी आपली मालमत्ता तारण देऊन परतफेड न केल्या जाणाऱ्या कर्जरोख्यांचे वाटप करते.

४) कर्जरोख्यावरील परतावा हा लाभांशाच्या स्वरूपात असतो.

५) कर्जरोखे विश्वस्त हे भागधारकाच्या तक्रारीचे निवारण करतात.

६) कर्जरोखे प्रमाणपत्र हे कर्जरोख्याचे वाटप केल्यापासून ३ महिन्यात दिले पाहिजे.

७) कर्जरोखे वाटपाची प्रक्रिया अर्ज मिळाल्यापासून ९० दिवसाच्या आत पूर्ण झाली पाहिजे.

८) कर्जरोख्यांचे पत मानांकन करण्यासाठी कंपनी भाग विमेकऱ्याची नियुक्ती करते.

**ज) योग्य क्रम लावा.**

१) अ) पत मानांकन मिळवणे.

ब) कर्जरोखे नोंदवहीत नोंद करणे.

क) रोख रकमेसह अर्ज प्राप्त

२) अ) कर्जरोखे प्रमाणपत्राचे वाटप

ब) माहितीपत्रकाचे वाटप

क) बँकेत खाते उघडणे.

३) अ) संचालक मंडळाची सभा बोलाविणे.

ब) कर्जरोखे प्रमाणपत्र वाटप

क) रोख रकमेसह अर्ज प्राप्त

**प्र.क्र. २) खालील संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा.**

१) कर्जरोखे प्रमाणपत्र

२) कर्जरोखे विश्वस्त

३) मालमत्तेवर बोजा

४) कर्जरोखे विश्वस्त करार

**प्र.क्र. ३) खालील घटना/परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा.**

१) 'रोज' कंपनी (Rose Ltd. Co.) मर्यादित भांडवल गोळा करण्यासाठी जनतेस कर्जरोखे वाटपाचा (विक्रीचा) प्रस्ताव ठेवते. सदर प्रस्तावावर चर्चा करून संचालक मंडळाने दहा वर्षांच्या मुदतीचे सुरक्षित, अपरिवर्तनीय परतफेडीच्या कर्जरोख्यांची विक्री (वाटप) करण्याचे ठरविले आहे. कृपया खालील बाबतीत संचालक मंडळास सल्ला द्या.

अ) कंपनीने कर्जरोखे विश्वस्ताची नेमणूक करावी का ?

ब) कंपनीने आपल्या मालमत्तेवर बोजा निर्माण केला पाहिजे का ?

क) कर्जरोख्याची मुदत दहा वर्षांपेक्षा कमी ठेवता येईल का ?

२) Violet Ltd. कंपनीचा कर्जरोख्यांची विक्री करून १० करोड भांडवल उभारणी करण्याचा विचार/नियोजन आहे. संचालक मंडळाला त्याबाबतीत काही अडचणी/शंका आहेत. कृपया सल्ला द्या.

अ) कंपनी असुरक्षित कर्जरोख्यांची विक्री करू शकते का ?

ब) कंपनी न परतफेडीच्या कर्जरोख्यांची विक्री करू शकते का ?

क) कंपनीने आपल्या सभासदांना कर्जरोखे देऊ केले असतील तर अशा कर्जरोख्यांवर सर्वसाधारण मतदानाचे हक्क मिळतील का ?

३) टी. डी. एस. वित्त संस्था १० कोटी रु. किमतीचे सुरक्षित अपरिवर्तनीय कर्जरोख्याची विक्री करण्याची योजना तयार करत आहे. परंतु नियमावलीनुसार संचालक मंडळास फक्त रु. ५ कोटी पर्यंतच कर्जाऊ निधी जमा करण्याचा अधिकार आहे. ते असाही विचार करतात की कर्जरोख्याची विक्री खाजगीरित्या अथवा सार्वजनिकरित्या करावी का ? कृपया त्यांना खालील गोष्टींसाठी सल्ला द्या.

अ) कर्जरोखे वाटपाचा जास्तीतजास्त कालावधी किती असू शकेल.

ब) असा कर्ज उभारणीचा अधिकार संचालक मंडळाच्या अधिकार कक्षेत आहे का ?

क) कर्जरोखे प्रमाणपत्र किती दिवसात दिले पाहिजे.

**प्र.क्र. ४) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) कर्जरोखे विक्री करण्यासाठी कंपनी कायदा २०१३ मधील कोणत्याही चार तरतुदी सांगा.

२) कर्जरोखे विश्वस्त करार म्हणजे काय?

३) कर्जरोखे विश्वस्त कोण असतात?

**प्र.क्र. ५) खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१) कंपनीला सुरक्षित कर्जरोख्यांची विक्री करताना आपल्या/तिच्या मालमत्तेवर बोजा निर्माण करावा लागतो.

२) कर्जरोख्यांची विक्री करताना कंपनीला कर्जरोखे विश्वस्तांची नेमणूक करावी लागते.

३) कंपनी फक्त विशिष्ट प्रकारच्या कर्जरोख्यांची विक्री करू शकते.

**प्र.क्र. ६) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) कर्जरोखे विक्रीच्या कंपनी कायदा २०१३ मधील तरतुदी थोडक्यात स्पष्ट करा.

२) कर्जरोखे विक्रीची कार्यपद्धती स्पष्ट करा.

❑❑❑

# ५ ठेवी


५.१ ठेवींची स्वीकृती
५.२ ठेवी स्वीकारण्याच्या अटी आणि शर्ती
५.३ जनतेकडून ठेवी स्वीकारण्याची कार्यपद्धती
५.४ सभासदांकडून ठेवी स्वीकारण्याची कार्यपद्धती


## प्रस्तावना

कंपनी आम जनतेकडून किंवा तिच्या सभासदांकडून ठेव स्वरूपात रक्कम स्वीकारते त्यावेळी तिच्या भांडवलात वाढ होण्यास मदत होते. भांडवल उभारणीचा हा अत्यंत स्वस्त मार्ग आहे. ठेवींच्या माध्यमातून भांडवलाची उभारणी केल्यामुळे भांडवलावर नियंत्रण ठेवण्याची गरज भासत नाही कारण ठेवी या अल्पमुदतीसाठी स्वीकारल्या जातात.

तथापि ठेव रक्कम परत करताना एखाद्या दोषी कंपनीच्या बाबतीत ठेव स्वीकारणे हा जोखमीचा पर्याय असू शकतो.

'ठेवी'चा अर्थ आणि व्याख्या ही प्रकरण २ मध्ये सविस्तर दिलेली आहे. या प्रकरणामध्ये आपण कोणत्या कंपन्या ठेवी स्वीकारून भांडवलाची उभारणी करू शकतात आणि त्याच्या अटी, शर्ती सभासद आणि जनतेकडून ठेवी स्वीकारण्याच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणार आहोत.

## ५.१ ठेवींची स्वीकृती :

खालील कंपन्या वगळता ठेवी स्वीकारणाऱ्या इतर कंपन्या –

i) बँकिंग कंपनी


ii) ज्या कंपन्यांचा बँकिंग व्यवसाय नाही (NBFC)

iii) गृहकर्ज पुरवठा कंपनी (गृह कर्ज वित्तीय संस्था) (HFC)

iv) सरकारद्वारे निश्चित केलेली इतर कोणतीही कंपनी (वरील वगळता इतर कंपन्या) यांना अ) कंपनी कायदा २०१३ ला कलम ७३ ते ७६ मध्ये आणि ब) कंपनी (ठेवी स्वीकृती नियम) २०१४ (क) ठेवी स्वीकारण्याबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने निर्देशित केलेल्या अधिकृत सूचना यातील तरतुदींची पूर्तता करून ठेवी स्वीकारता येतात.

खालील तक्त्यात कोणत्या कंपन्या सभासदांकडून व जनतेकडून ठेवी स्वीकारू शकतात ते दर्शविण्यात आले आहे

**ठेवींची स्वीकृती**




- **खाजगी कंपनी :** खाजगी कंपनी ही सभासद, संचालक किंवा त्यांचे नातेवाईक यांच्याकडून ठेवी स्वीकारू शकते.
- **सार्वजनिक कंपनी :** (पात्र कंपनी सोडून) सार्वजनिक कंपनी ही (पात्र सार्वजनिक कंपनी शिवाय) सभासद किंवा संचालकाकडून ठेवी स्वीकारू शकते.
- **पात्र सार्वजनिक कंपनी :** पात्र सार्वजनिक कंपनी म्हणजे अशी कंपनी की,

अ) जिची निव्वळ मालमत्ता ही ₹ १०० कोटी पेक्षा कमी नाही किंवा

ब) जिची वार्षिक उलाढाल ही ₹ ५०० कोटी पेक्षा कमी नाही आणि सभासदाच्या सभेत ठेवी स्वीकारण्याबाबत विशेष ठराव संमत करून त्यास मान्यता देण्यात आलेली आहे अशी सार्वजनिक कंपनी.

*i) निव्वळ किंमत – वसूल भांडवल + मुक्त राखीव निधी + प्रतिभूती – न वाटलेला तोटा, अनपेक्षित खर्च, न वजा केलेला किरकोळ खर्च.*

*ii) उलाढाल – विशिष्ट काळात विक्रीद्वारे प्राप्त झालेले उत्पन्न.*

## ५.२ ठेवींची स्वीकृतीच्या नूतनीकरणाच्या अटी व शर्ती :

### १. ठेवींची रक्कम :

**अ) खाजगी कंपनी :** खाजगी कंपनी आपल्या सभासदाकडून किंवा संचालकाकडून अथवा त्यांच्या नातेवाईकाकडून वसूल भाग भांडवल आणि मुक्त राखीव निधीच्या १००% ठेव रूपाने रक्कम जमा करू शकते.

तथापि कंपनी कायदा नमूद केल्यानुसार काही खाजगी कंपन्याना वसूल भाग भांडवल व मुक्त राखीव निधीच्या १००% पेक्षा जास्त ठेव स्वीकारता येते.

**ब) सार्वजनिक कंपनी :** (पात्र कंपनी सोडून) जेव्हा ठेव रक्कम वसूल भांडवल व मुक्त राखीव निधीच्या २५% ची मर्यादा पूर्वीच पार केलेली असेल तर अशा वेळी कंपनीस सभासदाकडून ठेवी स्वीकारता येणार नाहीत.

**क) पात्र सार्वजनिक कंपनी :**

**पात्र सार्वजनिक कंपनी :**

**सभासद**

जर कंपनीने ठेव मर्यादा वसूल भांडवल व मुक्त राखीव निधी यांची सरासरी १०% ओलांडली असेल तर सभासदाकडून नव्याने ठेवी स्वीकारता येणार नाहीत.

**सर्वसामान्य जनता**

कंपनीने ठेव मर्यादा वसूल भांडवल व राखीव निधी यांची सरासरी २५% इतकी ओलांडली असेल तर जनतेकडून नव्याने ठेवी स्वीकारता येणार नाहीत.

**ड)** सरकारी कंपनी वसूल भाग भांडवल आणि मुक्त राखीव निधीच्या ३५% पेक्षा जास्त रकमेचा ठेवी म्हणून स्वीकार करू शकत नाही.

**२. कालावधी (ठेवीचा कालावधी) :** कोणतीही कंपनी सहा (६) महिन्यापेक्षा कमी किंवा ३६ महिन्यापेक्षा जास्त मुदतीच्या ठेवी स्वीकारू शकत नाही किंवा ठेवीचे नूतनीकरण करू शकत नाही.

परंतु विशिष्ट परिस्थितीत कंपनी तिच्या अल्पकालीन गरजा पूर्ण करण्यासाठी सहा महिन्यांपेक्षा कमी कालावधीच्या ठेवी स्वीकारू शकते. परंतु अशा ठेवीची परत फेड ही ठेवी स्वीकारल्यापासून तीन (३) महिन्याच्या आत करता येणार नाही.

अशा ठेवीची रक्कम ही वसूल भाग भांडवल आणि मुक्त राखीव निधीच्या १०% पेक्षा जास्त असणार नाही.

विशिष्ट परिस्थितीत ठेवीदाराच्या विनंतीनुसार ठेव परत केली जाते. कंपनी ठेव स्वीकारताना अटी कायम ठेवत ठेवीचे नूतनीकरण करू शकते यास नवीन ठेवी स्वीकारणे असे समजले जाते.

**३. मागता क्षणी न परत करावयाच्या ठेवी :** मागता क्षणी परत करावयाच्या ठेवींचा स्वीकार किंवा नूतनीकरण कंपनी करू शकत नाही.

**४. सुरक्षित किंवा असुरक्षित ठेवी :** ठेव स्वीकारत असताना परिपत्रकात किंवा जाहिरातीत दिलेल्या माहितीनुसार ठेव सुरक्षित किंवा असुरक्षित आहे हे स्पष्ट नमूद केलेले असावे.

सुरक्षित ठेवीसाठी कंपनी आपल्या मूर्त (tangible) मालमत्तेवर बोजा निर्मित करते. ही ठेव स्वीकारल्यापासून ३० दिवसाच्या आत निर्माण केला जातो. सदर मालमत्ता ठेवीदाराकडे तारण दिलेली असते.

५. **ठेवीसाठी अर्ज :** कंपनी ठेव स्वीकृतीचा छापील अर्ज ठेवीदारास पुरविते. हा अर्ज संभाव्य ठेवीदारास विहित नमुन्यात भरून द्यावा लागतो. या अर्जामध्ये ठेवीसाठी आणलेली रक्कम दुसऱ्या व्यक्तीकडून कर्जाऊ घेतलेली नाही असे निवेदन देणे आवश्यक आहे.

६. **संयुक्त नावे :** संयुक्त नावाने ठेवी ठेवण्याची इच्छा जर ठेवीदाराची असेल तर कंपनी ठेवीची रक्कम संयुक्त नावाने स्वीकारू शकते परंतु ही ठेव तीन व्यक्तींपेक्षा जास्त नावाने एकत्रितरित्या स्वीकारता येणार नाही.

७. **वारस :** कायद्यानुसार ठेवीदारास त्याचा वारस नियुक्तीचा अधिकार आहे. त्याच्या मृत्यूच्या पश्चात ठेवीची रक्कम त्याच्या वारसदारास मिळते.

८. **परिपत्रक/जाहिरात :** जेव्हा कंपनी सभासदाकडून ठेवी गोळा करत असते. त्यावेळी परिपत्रकाद्वारे त्यांना कळविण्यात येते. परंतु ज्यावेळी आम जनतेकडून ठेवी स्वीकारल्या जाणार असतील अशा वेळी कंपनी जाहिरात प्रसिद्ध करते.

**अ)** परिपत्रक/जाहिरातीत खालील तपशील/माहिती असते.

i) कंपनीच्या आर्थिक स्थितीचे विवरणपत्र

ii) नव्याने स्वीकारण्यात येणाऱ्या ठेवींतील सुरक्षित आणि असुरक्षित ठेवीचे प्रमाण

iii) पतमानांकन संस्थेचे पत मानांकन (पात्र कंपनीसाठी)

iv) ठेव योजना तपशील

v) ठेव विश्वस्ताची नावे

vi) स्वीकारण्यात आलेल्या मागील ठेवींपैकी देय रक्कम

**ब)** नोंदणी अधिकाऱ्याकडे परिपत्रकाची अथवा जाहिरातीची नोंद करणे : वरील तपशीलासह परिपत्रक अथवा जाहिरात तयार केल्यानंतर त्याची एक प्रत नोंदणी अधिकाऱ्याकडे सादर करण्यात येते. यावर सर्व संचालकाच्या स्वाक्षऱ्या असतात.

**क) परिपत्रक व जाहिरात प्रसिद्ध करणे :** नोंदणी अधिकाऱ्याकडे परिपत्रकाची अथवा जाहिरातीची नोंद केल्यानंतर कंपनी फक्त ३० दिवसानंतर जाहिरात प्रसिद्ध करत असते. जर कंपनी सभासदाकडून ठेवी स्वीकारणार असेल तर त्यांना रजिस्टर्ड पत्राद्वारे स्पीड पोस्ट अथवा ई-मेल द्वारे परिपत्रक पाठविले जाते. आम जनतेला ठेवी ठेवण्याबाबत आवाहन करावयाचे असल्यास जाहिरात प्रसिद्ध करावी लागते. जाहिरात प्रसिद्ध करत असताना देशातील प्रमुख (जास्त खप असणारे) इंग्रजी वृत्तपत्रातून प्रसिद्ध करावी तसेच कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय ज्या राज्यात आहे. त्या राज्यातील प्रमुख प्रादेशिक भाषेतून जाहिरात प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे.

**ड) जाहिरातीची मुदत (वैधता) :** परिपत्रक अथवा जाहिरातीची वैधताही वार्षिक सर्वसाधारण सभा झाल्यानंतर किंवा आर्थिक वर्षाच्या समाप्तीनंतर सहा (६) महिन्यांसाठी ग्राह्य धरण्यात येते. परंतु या दोन्ही तारखांपैकी जी तारीख अगोदर असेल ती तारीख विचारात घ्यावी.

९. **ठेव विश्वस्ताची (नियुक्ती) :** जेव्हा पात्र कंपनी आणि सार्वजनिक कंपन्या ठेवी स्वीकारत असतात अशा ठेवींना सुरक्षितता मिळावी यासाठी कंपनी एक किंवा अनेक ठेव विश्वस्ताची नेमणूक करते. ठेव रक्कम परत करण्यास कंपनी असमर्थ ठरल्यास ठेवीदाराच्या ठेवीची रक्कम परत करण्यासाठी ठेव विश्वस्त मदत करतात म्हणजेच ठेवीदाराच्या हिताचे रक्षण करतात.

परिपत्रक किंवा जाहिरात प्रसिद्ध करण्यापूर्वी सात (७) दिवस अगोदर ठेव विश्वस्ताबरोबर विश्वस्त करार करावा लागतो. ठेव विश्वस्त हा स्वत: किंवा एकूण ठेवीदाराच्या एक दशांश ठेवीदारानी मागणी केल्यास अथवा ठेवीची परतफेड करण्यास कंपनी असमर्थ ठरल्यास ठेव विश्वस्तास ठेवीदाराची सभा बोलाविण्याचा/भरविण्याचा अधिकार असतो.

१०. **मालमत्तेवर बोजा/तारण/निर्माण करणे :** ज्या वेळी कंपनी आम जनतेकडून सुरक्षित ठेवी स्वीकारते. अशा वेळी कंपनीने ठेव स्वीकारलेल्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत सुरक्षित ठेव स्वीकारून ठेवलेल्या रकमेपेक्षा कमी नसलेल्या रकमेसाठी तिच्या मूर्त मालमत्तेवर बोजा निर्माण करते. सुरक्षिततेची किमान रक्कम ही ठेव विमाद्‌वारे समाविष्ट नसलेल्या रकमेइतकी आखली पाहिजे. मालमत्तेवर बोजा हा ठेव विश्वस्ताच्या नावाने निर्माण केला जातो.

११. **ठेव विमा :** ठेवी बाबतची जाहिरात प्रसिद्ध करण्यापूर्वी ३० दिवस अगोदर विम्याची आवश्यकता भासल्यास कंपनी ठेवीचा विमा घेऊ शकते. जर ठेवीची रक्कम अधिक व्याज यांची एकत्रित बेरीज रु. २०,००० पर्यंत असेल तर त्या रकमेच्या बेरजेएवढा विमा उतरविता येतो.

१२. **पतपात्रतेचा दाखला मिळविणे :** ठेवी स्वीकारण्यापूर्वी प्रत्येक कंपनीला पत पात्रतेचा दाखला मिळविणे आवश्यक आहे. ठेवीचे परिपत्रक किंवा ठेवीची जाहिरात प्रसिद्ध करत असताना त्यात त्याचा स्पष्ट उल्लेख करावा. कंपनीची निव्वळ संपत्ती, आर्थिक स्थिती, ठेव रक्कम वेळेत परत करण्याची क्षमता इ. नुसार कंपनीला पत मानांकन दिले जाते. कंपनीला पत पात्रता दाखला दरवर्षी ठेवी स्वीकारण्यापूर्वी घेणे बंधनकारक आहे.

१३. **ठेव परतफेड राखीव निधी खाते उघडणे :** ठेव रक्कम स्वीकारणाऱ्या प्रत्येक कंपनीस ठेवीची रक्कम परत करण्यासाठी सुचित बँकेत स्वतंत्र ठेवत परत फेड राखीव निधी खाते उघडावे लागते. या खात्यात त्या आर्थिक वर्षात परतफेड करावयाच्या एकूण ठेवींच्या **१५%** रक्कम दरवर्षी **३० एप्रिल** किंवा त्यापूर्वी वर्ग करणे बंधनकारक आहे. खात्यातील रकमेचा विनियोग केवळ ठेवीची परतफेड करण्यासाठीच केला जातो.

***सूचित बँक :*** *सूचित बँक म्हणजे आर. बी. आय. ॲक्ट १९३४ च्या परिशिष्ट दोन मध्ये ज्या बँकांचा समावेश करण्यात येतो. अशा बँकांना सूचित बँका असे म्हणतात. या बँका रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया निश्चित केलेल्या कसोट्यांची पूर्तता करतात व त्यांना रिझर्व्ह बँकेच्या काही सुविधा मिळतात. सूचित बँकांची उदा. एस. बी. आय, बँक ऑफ इंडिया, देना बँक इ.*

**टीप :** मुद्दा क्र. ८ (अ ) आणि (ब), १० आणि १३ हे खाजगी कंपनीस लागू होत नाहीत कारण ही कंपनी पूर्ण वसूल भाग भांडवल आणि मुक्त राखीव निधीच्या १००% पेक्षा जास्त ठेव सभासदाकडून स्वीकारू शकत नाही.

१४. **ठेव पावती :** ठेवीदाराकडून ठेवीची रक्कम प्राप्त झाल्यापासून किंवा धनादेशाचे शोधन झाल्यापासून **२१ दिवसाच्या** आत ठेव पावती ठेवीदारास दिली पाहिजे. या पावतीत ठेवीदाराचे नाव, पत्ता, ठेवीची रक्कम, व्याजदर, ठेवीचा परतफेड दिनांक इ. तपशील नोंदविण्यात येतो. या पावतीवर संचालक मंडळाने ज्या अधिकाऱ्यास स्वाक्षरी करण्याचा अधिकार दिलेला आहे. त्याची स्वाक्षरी व कंपनीचा शिक्का उमटविण्यात येतो.

१५. **ठेवीची नोंद वही :** कंपनीने स्वीकारलेल्या ठेवीसाठी किंवा नूतनीकरण करण्यात आलेल्या ठेवीसाठी स्वतंत्र ठेव नोंदवही नोंदणीकृत कार्यालयामध्ये ठेवणे बंधनकारक आहे. या नोंद वहीत ठेवी स्वीकारल्यापासून **सात** दिवसांच्या आत ठेवीदाराच्या नोंदी केल्या पाहिजेत.

१६. **ठेव विवरणपत्र :** ठेव स्वीकारणाऱ्या प्रत्येक कंपनीला प्रत्येक वर्षी विहित नमुन्यात ३० जून अखेर ठेव विवरणपत्र नोंदणी अधिकाऱ्याकडे सादर करावे लागते. या विवरणपत्रात ३१ मार्च अखेरच्या ठेवीच्या सर्व नोंदी करण्यात येतात.

१७. **व्याज :** ठेवीची परतफेड ही ठेव मुदत संपण्याअगोदर केले जात असेल तर अशा वेळी RBI ने निश्चित केलेल्या व्याज दरापेक्षा **१%** व्याजदर कमी करण्यात येते.

त्याच प्रमाणे ठेवीची मुदत संपलेली आहे व ठेवीदाराने ठेवीच्या रकमेची मागणी कंपनीकडे केली आहे. परंतु कंपनीची परतफेड केली नसेल तर अशा थकीत ठेवीवर कंपनीस दंडासह १८% दराने ठेव परतफेड करण्याच्या तारखेपर्यंत व्याज द्यावे लागते.

१८. **अटी व शर्तींमध्ये बदल करण्याचा अधिकार :** कंपनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या ठेवी स्वीकारण्याच्या किंवा परतफेडीच्या अटी आणि शर्तींमध्ये कोणताही बदल करू शकत नाही. ठेव विश्वस्त करार आणि ठेव विमा करारानुसार ठेव स्वीकारण्याबाबतचे परिपत्रक किंवा जाहिरात प्रसिद्ध केल्यानंतरच कंपनीकडून ठेवीचा स्वीकार करण्यात येतो.

१९. **आर्थिक विवरणाबाबत खुलासा करणे :** जर कंपनीस ठेवी या संचालकाकडून प्राप्त झाल्या असतील तर त्या बाबतचा खुलासा/(माहिती) आर्थिक विवरण पत्रात करावा लागतो.

जर कंपनी खाजगी असेल आणि तिच्या संचालकांनी नातेवाईकांकडून ठेव स्वीकारलेली असेल तरीही त्याची माहिती विवरणपत्रात स्पष्ट करणे बंधनकारक आहे.

२०. **शिक्षा/कारवाई :** कंपनीच्या अधिकाऱ्याने कंपनी कायद्यातील तरतुदींचे ठेवी स्वीकारण्याबाबत उल्लंघन केल्यास आणि तो दोषी आढळल्यास शिक्षेस पात्र ठरतो. महाराष्ट्र सरकारने गुंतवणूकदाराच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी ठेवीदार संरक्षण कायदा १९९९ हा संमत केला. या कायद्याचे कंपनीने उल्लंघन केल्यास ती शिक्षेस पात्र ठरू शकते.

**अधिक माहितीसाठी :** कर्ज आणि ठेवी यातील फरक

**कर्ज :** मागताक्षणी किंवा लवकरात लवकर परत करण्याच्या अटीवर कंपनीने कर्जाऊ घेतलेली रक्कम होय.

**ठेवी :** ठरावीक मुदतीनंतर परतफेडीच्या अटीवर स्वीकारलेली रक्कम होय.

## ५.३ जनतेकडून ठेवी स्वीकारण्याची कार्यपद्धती :

पात्र असलेल्या सार्वजनिक कंपन्याच आम जनतेकडून ठेवी स्वीकारू शकतात.

आम जनतेकडून ठेवी स्वीकारताना खालील कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात येतो.

१. **संचालक मंडळाची सभा भरविणे :** आम जनतेकडून ठेवी स्वीकारल्याबाबतचा ठराव संमत करण्यासाठी संचालक मंडळाची सभा बोलाविली जाते. या सभेत ठेव स्वीकृतीचा ठराव मंजूर करण्यात येतो, यात ठेवीची रक्कम, अटी व शर्ती यांचा समावेश केला जातो. याच सभेत ठेवी स्वीकारण्यास भागधारकाची मंजुरी घेण्यासाठी सर्वसाधारण सभेची तारीख आणि वेळ निश्चित करण्यात येते.

२. **सर्वसाधारण सभा भरविणे :** आम जनतेकडून ठेवी स्वीकारण्यास मान्यता देण्यासाठी कंपनीला भागधारकाची सर्वसाधारण सभा भरवावी लागते. या सभेत ठेव स्वीकारण्याबाबतचा विशेष ठराव संमत करून त्याची एक प्रत कंपनी नोंदणी अधिकाऱ्याकडे पाठविण्यात येते आणि गरज भासल्यास रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे विशेष ठरावाची प्रत पाठवावी लागते.

३. **संचालक मंडळाची सभा :** ठेवीबाबत प्रसिद्ध केल्या जाणाऱ्या जाहिरातीतील मजकुरास मान्यता देण्यासाठी संचालक मंडळाची सभा भरविली जाते. या सभेत कंपनी कायद्यानुसार जाहिरातीत आवश्यक असलेली माहिती समाविष्ट केल्याबाबतची खात्री केली जाते आणि त्यानंतर जाहिरातीतील मजकुरास बहुमताने मान्यता देऊन त्यावर संचालकाच्या स्वाक्षऱ्या घेतल्या जातात.

४. **बँकर्सची नियुक्ती :** ठेवीदाराचे अर्ज आणि ठेव रक्कम स्वीकारण्यासाठी कंपनीचे बँकर्स म्हणून बँकेची नियुक्ती करण्यात येते.

५. **पत मानांकन (पत पात्रता) दाखला घेणे :** ठेवी अर्ज आणि रक्कम स्वीकारण्यासाठी बँकर्सची नेमणूक केल्यानंतर कंपनी मान्यताप्राप्त पत मानांकन संस्थेकडून पत पात्रता दाखला मिळवावा लागतो. दाखला मिळाल्यानंतर पत मानांकनाचा उल्लेख ठेवीच्या जाहिरातीमध्ये करणे आवश्यक आहे.

६. **ठेव विश्वस्ताची नियुक्ती/नेमणूक :** ठेवीच्या परतफेडीसाठी ठेवीदारामध्ये विश्वसनीयता निर्माण व्हावी यासाठी कंपनीकडून एक किंवा अनेक ठेव विश्वस्ताची नियुक्ती करते. कंपनी आणि विश्वस्त यांच्यामध्ये करार करण्यात येतो त्या करारामध्ये ठेवीची स्वीकृती व परत करण्याबाबतच्या अटी व नियम यांचा उल्लेख करण्यात येतो.

जाहिरात प्रसिद्ध करण्यापूर्वी ७ दिवस अगोदर कंपनी आणि ठेव विश्वस्ताच्या करारावर स्वाक्षऱ्या होणे आवश्यक आहे.

७. **ठेवीचा विमा घेणे/उतरविणे :** ठेवीचा विमा उतरविणे आवश्यक असल्याने कंपनीला विमा कंपनीबरोबर करार करावा लागतो. हा करार ठेवीची जाहिरात प्रसिद्ध करण्यापूर्वी कमीत कमी ३० दिवस अगोदर करावा लागतो. या करारावर कंपनी आणि विमा कंपनी अधिकाऱ्याच्या स्वाक्षऱ्या आवश्यक आहेत.

८. **जाहिरात नोंदणी :** जाहिरात प्रसिद्ध करण्यापूर्वी त्याची एक प्रत नोंदणी अधिकाऱ्याकडे नोंदविणे (दाखल करणे) आवश्यक आहे. नोंदणी अधिकाऱ्याकडे प्रत दाखल झाल्यानंतर ३० दिवसांनी कंपनीला जाहिरात प्रसिद्ध करावी लागते.

९. **जाहिरात प्रसिद्ध करणे :** कंपनी नोंदणी अधिकाऱ्याकडे जाहिरातीची नोंदणी केल्यानंतर ३० दिवसानंतर जनतेसाठी ठेवीची जाहिरात प्रसिद्ध करावी लागते. सदर जाहिरात ही देशातील प्रमुख इंग्रजी वृत्तपत्रातून आणि कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय असलेल्या राज्यातील प्रमुख प्रादेशिक वृत्तपत्रातून प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

१०. **कंपनी संकेत स्थळावर नोंद :** वृत्तपत्रातून जाहिरात प्रसिद्ध केल्यानंतर या जाहिरातीची नोंदणी कंपनीच्या संकेत स्थळावर करावी लागते.

११. **ठेव अर्ज व रक्कम जमा करणे :** कंपनी बँकेला ठेवीदाराचे अर्ज आणि ठेव रक्कम जमा करण्याची सूचना देते.

१२. **ठेव पावती देणे :** ठेवीची रक्कम प्राप्त झाल्यापासून किंवा धनादेशाचे शोधन झाल्यापासून २१ दिवसाच्या आत ठेवीदारास ठेव पावती देणे बंधनकारक आहे.

१३. **मालमत्तेवर बोजा निर्माण करणे :** जर कंपनीने सुरक्षित ठेवी स्वीकारल्या असतील तर ठेव स्वीकारल्यापासून ३० दिवसाच्या आत कंपनीला आपल्या स्थिर मालमत्तेवर बोजा निर्माण करावा लागतो.

१४. **ठेव रजिस्टरमध्ये नोंदी करणे :** ठेव पावती दिल्यानंतर सात (७) दिवसाच्या आत चिटणीसाने ठेवीच्या सर्व नोंदी स्वतंत्र ठेव रजिस्टरमध्ये केल्या पाहिजेत आणि सदर नोंदीची तपासणी ही कंपनीच्या अधिकृत अधिकाऱ्याने केली पाहिजे.

१५. **ठेवीचे विवरणपत्रक :** कंपनीने ३१ मार्च अखेरच्या ठेवीचे विवरणपत्र तयार करून दरवर्षी ३० जून पूर्वी नोंदणी अधिकाऱ्याकडे सादर केले पाहिजे.

## ५.४ सभासदांकडून ठेवी स्वीकारण्याची कार्यपद्धती :

जर कंपनी सभासदाकडून ठेवी जमा करणार असेल तर खालील पद्धतीचा अवलंब करावा लागतो.

१. **संचालक मंडळाची सभा :** सभासदाकडून ठेवी स्वीकारण्याबाबतचा ठराव संमत करण्यासाठी कंपनी चिटणीस संचालक मंडळाची सभा भरवितो. या सभेत ठेव स्वीकृतीचा ठराव मंजूर करण्यात येतो. यात ठेवीची रक्कम, मुदत ठेवीचे वाटप व परतफेड व समावेश करण्यात येतो.

तसेच भागधारकांच्या मंजुरीसाठी वार्षिक सर्वसाधारण सभेची तारीख आणि वेळ निश्चित करण्यात येते.

२. **वार्षिक सर्वसाधारण सभा भरविणे :** सभासदांकडून स्वीकारल्या जाणाऱ्या ठेवीस मान्यता घेण्यासाठी कंपनीच्या भागधारकाची वार्षिक सर्वसाधारण सभा भरवावी लागते. या सभेत विशेष ठराव संमत करून त्याची एक प्रत नोंदणी अधिकाऱ्याकडे सादर करावी लागते.

३. **संचालक मंडळाची सभा :** सभासदाकडून ठेवी स्वीकारण्याबाबत मान्यता दिल्यानंतर संचालक मंडळाची सभा भरविण्यात येते. या सभेत सभासदाकडून ठेवी स्वीकारण्याबाबतचे परिपत्रक तयार करून त्यास प्रसिद्धी देण्यासाठी त्या परिपत्रकावर संचालकाच्या सह्या घेण्यात येतात.

४. **बँकर्सची नियुक्ती :** ठेवीदारांचे अर्ज आणि ठेवीची रक्कम गोळा करण्यासाठी कंपनीकडून बँकेची नियुक्ती करण्यात येते.

५. **पत मानांकन दाखला मिळविणे :** सभासदाकडून ठेवीचा स्वीकार करताना कंपनीला पत मानांकन संस्थेकडून पत पात्रतेचा दाखला मिळवावा लागतो आणि त्याचा उल्लेख परिपत्रकामध्ये करावा लागतो.

६. **ठेव विश्वस्ताची नियुक्ती :** सभासदाकडून ठेवी स्वीकारण्यापूर्वी कंपनीला ठेव विश्वस्ताची नियुक्ती करावी लागते. परिपत्रक प्रसिद्ध करण्यापूर्वी सात (७) दिवस अगोदर ठेव विश्वस्त व कंपनी यांच्यात करार होऊन त्यावर स्वाक्षऱ्या होणे आवश्यक आहे.

७. **ठेव विमा घेणे :** ठेव परिपत्रक प्रसिद्ध करण्यापूर्वी ३० दिवस अगोदर कंपनीला ठेवीच्या सुरक्षिततेसाठी ठेव विमा उतरवावा लागतो.

८. **परिपत्रकाची नोंदणी अधिकाऱ्याकडे नोंद :** ठेवी बाबतचे परिपत्रक प्रसिद्ध करण्यापूर्वी ३० दिवस अगोदर सदर परिपत्रकाची नोंद नोंदणी अधिकाऱ्याकडे करणे आवश्यक आहे.

९. **सभासदांना परिपत्रक पाठविणे :** ठेवीबाबतच्या परिपत्रकाची नोंद नोंदणी अधिकाऱ्याकडे केल्याच्या तारखेपासून ३० दिवसानंतर कंपनीला आपल्या सभासदांना ठेवी स्वीकारण्याबाबतचे परिपत्रक पाठवावे लागते. ते परिपत्रक रजिस्टर्ड पोस्ट, स्पीड पोस्ट किंवा ई-मेल द्वारे पाठवता येते. त्याशिवाय परिपत्रक वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध करता येते.

१०. **कंपनीच्या संकेत स्थळावर परिपत्रकाची नोंद :** पात्र सार्वजनिक कंपन्याना परिपत्रकाची नोंद कंपनीच्या संकेत स्थळावर करावी लागते. खाजगी कंपन्या व इतर कंपन्यांसाठी ही नोंदणी ऐच्छिक आहे.

११. **ठेव अर्ज व रक्कम जमा/गोळा करणे :** ठेव अर्ज आणि ठेवीची रक्कम जमा करण्याविषयीची सूचना कंपनी बँकेस देते त्यानुसार बँक ठेवीचे अर्ज आणि ठेव रक्कम ठेवीदारांकडून जमा करते आणि त्याचा सर्व तपशील कंपनीकडे पाठविण्याची व्यवस्था करते.

१२. **ठेव पावती देणे :** ठेवीदाराकडून ठेव रक्कम प्राप्त झाल्यापासून किंवा धनादेशाचे शोधन झाल्यापासून २१ दिवसाच्या आत ठेवीची पावती ठेवीदारास दिली पाहिजे.

१३. **मालमत्तेवर बोजा निर्माण करणे :** ज्या वेळी कंपनी सुरक्षित ठेवी स्वीकारते अशा वेळी कंपनीने ठेव स्वीकारलेल्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत आपल्या स्थिर मालमत्तेवर बोजा निर्माण केला पाहिजे.

१४. **ठेवीदाराची नोंदवहीत नोंद करणे :** ठेव पावती दिल्यापासून सात दिवसांच्या आत चिटणीसाने ठेव रजिस्टरमध्ये त्याची नोंद करून त्यावर अधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी घेतली पाहिजे.

१५. **ठेव विवरणपत्र :** कंपनीने प्रत्येक वर्षी विहित नमुन्यात ३० जून अखेर ठेव विवरणपत्र नोंदणी अधिकाऱ्याकडे दाखल करावे आणि या विवरणपत्रात ३१ मार्च अखेरच्या ठेवींच्या नोंदी कराव्यात.

**कृती :**

१) भारतातील विविध पत मानांकन संस्थांचा शोध घ्या.

२) पत मानांकन संस्थेकडून पतपात्रता दाखला मिळालेल्या कोणत्याही पाच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कंपन्यांचा शोध घ्या.

## सारांश

- कंपनीच्या अल्प मुदतीच्या भांडवलाची गरज भागविण्यासाठी ठेवीद्वारे भांडवलाची उभारणी करणे हा स्वस्त आणि योग्य पर्याय आहे.
- खाजगी कंपन्या, सार्वजनिक कंपन्या आणि पात्र सार्वजनिक कंपन्या या आपल्या सभासदाकडून ठेवी स्वीकारू शकतात.
- पात्र सार्वजनिक कंपनी आणि सरकारी कंपन्या या आम जनतेकडून ठेवी स्वीकारू शकतात.
- कंपनीने ठेवी स्वीकारताना खालील बाबींचा विचार केला पाहिजे.

  अ) कंपनी कायदा २०१३ कलम ७३ ते ७६

  ब) कंपनी (ठेव स्वीकृती) नियम २०१४

  क) ठेव स्वीकृतीबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची मार्गदर्शक तत्वे विचारात घ्यावीत.
- सर्व ठेव स्वीकारणाऱ्या कंपन्यांनी ठेवीची स्वीकृती आणि नूतनीकरण करताना सर्व नियम व अटींचे पालन केले पाहिजे.

➢ **ठेव रक्कम**

| कंपनीचा प्रकार | कोणाकडून स्वीकारते | % वसूल भागभांडवल आणि मुक्त राखीव निधी |
|---|---|---|
| i. खाजगी कंपनी | सभासद आणि संचालक | १००% पर्यंत |
| ii. सार्वजनिक कंपनी (पात्र कंपनी शिवाय) | सभासद | २५% पर्यंत |
| iii. पात्र सार्वजनिक कंपनी | सभासद<br>सर्वसामान्य जनता | १०% पर्यंत<br>२५% पर्यंत |
| iv. सरकारी कंपनी | सर्वसामान्य जनता | ३५% पर्यंत |

➢ **ठेवीचा कालावधी**

- कमीत कमी ६ महिने, जास्तीत जास्त ३६ महिने
- मुदतपूर्व परतफेड – कमीत कमी ३ महिन्यानंतर
- पूर्वीच्या अटी व नियमानुसार कंपनी ठेवीचे नूतनीकरण देखील करू शकते.

➢ मागताक्षणी परत करावयाच्या ठेवी कंपनी स्वीकारू शकत नाही.

➢ कंपनी सुरक्षित किंवा असुरक्षित ठेवी स्वीकारू शकते. सुरक्षित ठेवीसाठी कंपनी आपल्या स्थिर मालमत्तेवर बोजा निर्माण करते.

➢ ठेवी स्वीकारण्याबाबतचा अर्ज कंपनीने विहित नमुन्यात गुंतवणूदारास पुरविला पाहिजे.

➢ कंपनी संयुक्त नावाने ठेवी स्वीकारू शकते परंतु ३ पेक्षा अधिक नावे असू नयेत.

➢ ठेवीदारास आपला वारस केव्हाही नेमता येतो.

➢ परिपत्रक – सभासदांना आवाहन करणे.

जाहिरात – आम जनतेला आवाहन करणे.

i) तपशील – सर्व माहिती

ii) नोंद – कंपनी नोंदणी अधिकाऱ्याकडे

iii) वाटप – नोंदणी अधिकाऱ्याकडे नोंद केल्यापासून ३० दिवसानंतर

iv) वैधता – आर्थिक वर्ष संपल्यानंतर किंवा वार्षिक सर्वसाधारण सभेची तारीख यांपैकी जी तारीख अगोदर असेल ती तारीख.

➢ ठेव विश्वस्त – ठेवीच्या सुरक्षिततेसाठी कंपनी एक किंवा त्या पेक्षा ठेव विश्वस्ताची नेमणूक करू शकते. परिपत्रक किंवा जाहिरात प्रसिद्ध करण्यापूर्वी किमान ७ दिवस अगोदर विश्वस्त करारावर स्वाक्षरी होणे आवश्यक आहे.

➢ कंपनीने आम जनतेकडून सुरक्षित ठेव स्वीकारली असेल तर ठेव स्वीकारलेल्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत आपल्या स्थिर मालमत्तेवर बोजा (तारण) निर्माण करावा लागतो.

➢ ठेव विमा हा ठेवीचे परिपत्रक किंवा जाहिरात प्रसिद्ध करण्यापूर्वी किमान ३० दिवस अगोदर घेणे आवश्यक आहे.

ठेव + व्याज रु. २०,००० पर्यंत – पूर्ण विमा

प्रत्येक ठेवीदाराची ठेव रक्कम रु. २०,००० पेक्षा जास्त असल्यास प्रत्येक ठेवीदारास रु. २०,००० विमा.

➢ पत मानांकन संस्थेकडून पत पात्रतेचा दाखला मिळविणे आणि परिपत्रकात व जाहिरातीत त्याचा उल्लेख करणे.

➢ ठेव परतफेड निधी खाते उघडणे – प्रत्येक वर्षी किंवा ३० एप्रिलपूर्वी कंपनीने एकूण ठेवीच्या १५% रक्कम परतफेड निधी म्हणून सूचित बँकेत जमा केली पाहिजे.

- ठेव पावती देणे – ठेवीची रक्कम मिळाल्यापासून २१ दिवसाच्या आत ठेव पावती देण्यात यावी.
- रजिस्टरमध्ये नोंद – ठेवीची पावती दिल्यापासून ७ दिवसाच्या आत ठेव रजिस्टरमध्ये संपूर्ण तपशीलासह नोंद करावी लागते.
- कंपनीने विहित नमुन्यात दरवर्षी ३० जून अखेर ठेव विवरण पत्र नोंदणी अधिकाऱ्याकडे ३१ मार्च अखेरच्या सर्व नोंदीसह सादर करावे.
- ठेवीवरील व्याज (i) मुदतपूर्व ठेव परत फेड – १% व्याज कमी (ii) मुदत संपलेल्या व मागणी केलेल्या परंतु परतफेड न केलेल्या ठेवी दंडासहित व्याजाचा दर १८% द.सा.द.शे.
- ठेवीच्या बाबतच्या अटी व नियमामध्ये कंपनी कोणताही बदल करू शकत नाही.
- ठेवींची रक्कम जर संचालकांकडून किंवा त्याच्या नातेवाईकांकडून प्राप्त झाल्या असतील तर विवरणपत्रात त्याचा खुलासा करावा.
- ठेवीबाबत दोषी आढळल्यास संबंधित अधिकारी शिक्षेस पात्र ठरतो.

• जनतेकडून किंवा सभासदांकडून ठेवी स्वीकारताना कंपनीला विहित कार्यपद्धती अवलंबावी लागते.

## स्वाध्याय

**प्र.क्र. १ अ) खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१) ठेव हा .................... चा प्रकार आहे.

अ) मालकीचे भांडवल   ब) अल्प मुदतीचे कर्ज   क) दिर्घ मुदतीचे कर्ज

२) पात्र सार्वजनिक कंपनी आणि सरकारी कंपनी .................... कडून ठेवी स्वीकारू (जमा) शकतात.

अ) त्यांचे कर्मचारी   ब) जनता   क) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI)

३) खाजगी कंपनी आपल्या सभासदांकडून किंवा संचालकाकडून पूर्ण वसूल भाग भांडवल व मुक्त राखीव निधीच्या .................... % पेक्षा जास्त ठेवी स्वीकारू शकत नाही.

अ) १००   ब) ३५   क) २५

४) .................... कंपनीस आम जनतेकडून पूर्ण वसूल भाग भांडवल आणि मुक्त राखीव निधीच्या ३५% पर्यंत ठेवी स्वीकारता येतात.

अ) सरकारी   ब) खाजगी   क) पात्र सार्वजनिक

५) ठेवी या कमीत कमी ६ (सहा) महिने आणि जास्तीत जास्त .................... महिन्यांसाठी स्वीकारता येतात.

अ) ३६   ब) ३   क) ३०

६) कंपनी आपल्या सभासदांना ठेव योजनेत सहभागी होण्यासाठी .................... द्वारे आवाहन करते.

अ) जाहिरात   ब) परिपत्रक   क) वर्तमानपत्र

७) कंपनी नोंदणी अधिकाऱ्याकडे परिपत्रक किंवा जाहिरातीची नोंदणी केल्यानंतर .................... दिवसाच्या आत परिपत्रक किंवा जाहिरात प्रसिद्ध करावी लागते.

अ) ३०   ब) २१   क) ७

८) ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी कंपनीला .................... ची नियुक्ती करावी लागते.

अ) कर्जरोखे विश्वस्त   ब) ठेव विश्वस्त   क) पत मानांकन संस्था

९) .................. स्वीकारत असताना कंपनीला आपल्या मालमत्तेवर बोजा निर्माण करावा लागतो.

अ) असुरक्षित ठेवी　　ब) असुरक्षित कर्जरोखे　　क) सुरक्षित ठेवी

१०) ठेव स्वीकारल्यापासून ठेव पावती .................. दिवसाच्या आत ठेवीदाराला दिली जाते.

अ) ७　　ब) ३०　　क) २१

११) मुदती पूर्व ठेव रक्कम परत करावयाची असल्यास कंपनी .................. % व्याज कपात (वजा) करते.

अ) १　　ब) १८　　क) २०

१२) ठेव विवरणपत्र प्रत्येक वर्षी .................. पूर्वी दाखल करणे आवश्यक आहे.

अ) ३० जून　　ब) ३१ मार्च　　क) ३० एप्रिल

**ब) जोड्या जुळवा.**

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | खाजगी कंपनी | १) | वसूल भागभांडवल आणि मुक्त राखीव निधीच्या १०% |
| ब) | ठेव विश्वस्त करार | २) | जाहिरात प्रसिद्ध करण्यापूर्वी ७ दिवस अगोदर सही केली जाते. |
| क) | सुरक्षित ठेवी | ३) | जास्तीत जास्त ३० महिने |
| ड) | ठेवीचा कालावधी | ४) | मूर्त मालमत्तेवर तारण |
| इ) | ठेव विवरणपत्र | ५) | पूर्ण वसूल भाग भांडवल आणि मुक्त राखीव निधीच्या १००% |
| | | ६) | दरवर्षी ३१ मार्च किंवा त्या अगोदर दाखल करणे. |
| | | ७) | जाहिरात प्रसिद्ध करण्यापूर्वी २१ दिवस अगोदर सही केली जाते. |
| | | ८) | जास्तीत जास्त ३६ महिने |
| | | ९) | अमूर्त मालमत्तेवर बोजा |
| | | १०) | प्रत्येक वर्षी ३० जून किंवा त्या अगोदर दाखल करणे. |

**क) खालील प्रत्येक विधानासाठी एक शब्द किंवा शब्द समूह किंवा संज्ञा लिहा.**

१) भागधारकांकडून, संचालकांकडून किंवा त्यांच्या नातेवाईकांकडून वसूल भाग भांडवल आणि मुक्त राखीव निधीच्या १००% पेक्षा जास्त ठेवी न स्वीकारू शकणारी कंपनी.

२) वसूल भाग भांडवल आणि मुक्त राखीव निधीच्या ३५% पर्यंत ठेवी स्वीकारू शकणारी कंपनी.

३) ठेवीचा कमीत कमी कालावधी.

४) ठेवीचा जास्तीत जास्त कालावधी.

५) कंपनीच्या मूर्त मालमत्तेवर बोजा निर्माण करण्याचा कालावधी.

६) सभासदांना ठेवी ठेवण्याबाबत करण्यात आलेले आवाहन.

७) कंपनी आणि ठेव विश्वस्त यांचे मधील करार.

८) फक्त ठेवीची परतफेड करण्यासाठी उघडण्यात आलेले खाते.

९) ठेव पावती देण्याचा अपेक्षित कालावधी.

१०) ठेवींच्या आणि नूतनीकरणाच्या नोंदी करण्यासाठी उपयोगात आणले जाणारे पुस्तक.

**ड) खालील विधाने बरोबर की चूक ते लिहा.**

१) ठेव विवरण पत्र दरवर्षी ३१ मार्च पूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

२) पात्र सार्वजनिक कंपनी सभासदाकडून ठेवी स्वीकारू शकते.

३) सरकारी कंपनी सभासदाकडून ठेवी स्वीकारू शकते.

४) खाजगी कंपनी आम जनतेकडून ठेवी स्वीकारू शकते.

५) ठेवी या जास्तीत जास्त ३६ महिन्यासाठी स्वीकारल्या जातात.

६) पात्र कंपनी आम जनतेकडून वसूल भाग भांडवल आणि मुक्त राखीव निधीच्या ३५% पर्यंत ठेवी स्वीकारू शकत नाही.

७) सुरक्षित ठेवीसाठी कंपनी आपल्या मूर्त मालमत्तेवर बोजा निर्माण करते.

८) ठेवींचा स्वीकार केल्यानंतर २१ दिवसाच्या आत ठेव पावती दिली पाहिजे.

९) ठेवीदाराच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी कंपनी पत मानांकन संस्थेची नियुक्ती करते.

१०) ठेव विश्वस्त करार हा कंपनी आणि ठेव विश्वस्त यांच्यात केला जातो.

**इ) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) खाजगी कंपनी, पात्र सार्वजनिक कंपनी, सरकारी कंपनी

२) ठेव विश्वस्त, ठेव विश्वस्त करार, विशेष ठराव

३) ठेव विश्वस्ताची नियुक्ती, कंपनी नोंदणी अधिकाऱ्याची नियुक्ती, पत नामांकन संस्थेची नियुक्ती

**फ) खालील विधाने पूर्ण करा.**

१) ठेव हा ............. मुदत कर्ज प्रकार आहे.

२) पात्र सार्वजनिक कंपनी आणि सरकारी कंपनी ............. कडून ठेवी स्वीकारू शकतात.

३) पात्र कंपनीची निव्वळ मालमत्ता ............. पेक्षा कमी असू नये.

४) सरकारी कंपनी आम जनतेकडून वसूल भाग भांडवल व राखीव निधीच्या ............. % पेक्षा जास्त ठेवी स्वीकारू शकत नाही.

५) कमीत कमी सहा महिने आणि जास्तीत जास्त ............. कालावधीसाठी ठेवी स्वीकारल्या जातात.

६) ............. नुसार परतफेड ठेवी कंपनी स्वीकारू किंवा नूतनीकरण करू शकत नाही.

७) कंपनी ठेवीची मुदतपूर्व परतफेड ............. कालावधीपूर्वी करू शकत नाही.

८) आम जनतेकडून ठेवी स्वीकारण्यासाठी कंपनी ............. प्रसिद्ध करते.

९) कंपनीच्या ठेवीच्या पतपात्रतेबद्दल दाखला देणाऱ्या संस्थेस ............. म्हणतात.

१०) ज्या खात्याचा उपयोग फक्त ठेवीची परतफेड करण्यासाठी केला जातो त्यास ............. खाते असे म्हणतात.

**ग) कंसातील अचूक पर्याय निवडा.**

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | सरकारी कंपनी | १) | .................................................. |
| ब) | .................................................. | २) | सभासदाकडून ठेवी |
| क) | ३६ महिने | ३) | .................................................. |
| ड) | .................................................. | ४) | मूर्त मालमत्तेवर बोजा निर्माण करणे. |
| इ) | ठेव विवरण पत्र | ५) | .................................................. |

(३० जून किंवा त्या आधी दाखल करणे, खाजगी कंपनी, सुरक्षित ठेवी, आम जनतेकडून ठेवी, ठेवीचा जास्तीत जास्त कालावधी)

**ह) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कोणत्या कंपन्या आम जनतेकडून ठेवी स्वीकारू शकतात?

२) सरकारी कंपनी जास्तीत जास्त किती ठेवी स्वीकारू शकते?

३) ठेवीचा जास्तीत जास्त कालावधी किती असतो?

४) ठेव विश्वस्त म्हणजे कोण?

५) ठेव विश्वस्त करार म्हणजे काय?

६) कंपनी आपल्या मूर्त मालमत्तेवर बोजा केव्हा निर्माण करते?

७) ठेवी स्वीकारल्यानंतर किती दिवसात (कालावधीत) ठेव पावती कंपनीने दिली पाहिजे?

८) कंपनीस ठेव विवरण पत्र किती मुदतीत दाखल करावे लागते?

९) ठेव परतफेड निधी खाते म्हणजे काय?

१०) ठेव नोंदवही म्हणजे काय?

**ई) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१) सरकारी कंपनी <u>सभासदाकडून</u> ठेवीचा स्वीकार करू शकते.

२) सभासदाकडून ठेवी स्वीकारण्यासाठी कंपनीला <u>जाहिरात</u> प्रसिद्ध करावी लागते.

३) ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी कंपनी <u>पत मानांकन संस्थेची</u> नेमणूक करते.

४) ठेवीची रक्कम मिळाल्यापासून <u>सात</u> दिवसाच्या आत ठेव पावती दिली जाते.

५) <u>ठेव रजिस्टर</u> दरवर्षी ३० जून रोजी किंवा त्यापूर्वी कंपनी नोंदणी अधिकाऱ्याकडे सादर करावे.

६) जेव्हा कंपनी <u>असुरक्षित</u> कर्जरोख्याची विक्री करते त्यावेळी स्थिर मालमत्तेवर बोजा निर्माण करते.

७) ठेवीचा कमीत कमी कालावधी <u>३६</u> महिने आहे.

**ज) योग्य क्रम लावा.**

१) अ) ठेव विश्वस्ताची नेमणूक
ब) सर्वसाधारण सभा भरविणे
क) मालमत्तेवर बोजा आकारणे

२) अ) ठेव विवरण पत्र दाखल करणे
ब) ठेव पावती देणे
क) जाहिरात प्रसिद्ध करणे

३) अ) पत मानांकन दाखला मिळविणे
ब) ठेव रजिस्टरमध्ये नोंद करणे
क) ठेव पावती देणे

**प्र.क्र. २) खालील संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा.**

१) पात्र सार्वजनिक कंपनी

२) ठेवीचा कालावधी/कालखंड

३) सुरक्षित ठेवी

४) ठेव विश्वस्त

५) मूर्त मालमत्तेवर बोजा (तारण)

६) ठेव विमा

७) ठेव परतफेड निधी खाते

८) पत मानांकन (पत पावती)

९) ठेव पावती

१०) ठेव विवरण पत्र

**प्र.क्र. ३) खालील घटना व परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा.**

१) 'ॲपल कंपनी लिमिटेडची' सार्वजनिक ठेवीद्वारे भांडवल उभारणीची योजना असून तिची निव्वळ मालमत्ता ही रु. दहा (१०) कोटी आहे.

अ) कंपनीला आम जनतेकडून ठेवी स्वीकारता येतील का ?

ब) कंपनी ४ वर्ष मुदतीच्या ठेवी स्वीकारू शकते का ?

क) ठेवीची पावती ठेवीदारास किती दिवसात दिली जाते ?

२) 'अ व ब कंपनी लिमिटेड' ही सार्वजनिक ठेवी स्वीकारण्याच्या संदर्भात कंपनी कायदा २०१३ नुसार पात्र सार्वजनिक कंपनी आहे.

अ) कंपनी संयुक्त नावाने ठेवी स्वीकारू शकते का ?

ब) कंपनीला सभासदाकडून ठेव स्वीकारता येईल का ?

क) कंपनी सुरक्षित ठेवीची विक्री करू शकते का ?

३) 'ॲपल कंपनी लिमिटेड' ही पात्र सार्वजनिक कंपनी असून तिच्या सुरक्षित ठेवी गोळा करून भांडवलात वाढ करण्याचा हेतू आहे. कृपया संचालक मंडळास खालील सल्ला द्या.

अ) ठेव स्वीकृतीसाठी कंपनीला सभासदाची मंजुरी घेणे आवश्यक आहे काय ?

ब) कंपनीस कर्जरोखे विश्वस्ताची नियुक्ती करणे आवश्यक आहे का ?

क) कोणत्या कालावधीत कंपनीने आपल्या मालमत्तेवर बोजा/शुल्क आकारले पाहिजे ?

४) 'सन प्रा. लिमिटेड' कंपनीत ठेवी स्वीकारून भांडवलात वाढ करावयाची आहे.

अ) कंपनीस आम जनतेकडून ठेवी स्वीकारता येतील का ?

ब) ठेवी स्वीकारण्यासाठी कंपनीने कोणते दस्तावेज द्यावेत.

क) ठेवी जास्तीत जास्त किती कालावधीसाठी स्वीकारल्या जाऊ शकतात ?

**प्र.क्र. ४) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) विविध कंपनीकडून स्वीकारल्या जाणाऱ्या ठेव रकमेची मर्यादा विशद करा.

२) परिपत्रक किंवा जाहिरातीतील तपशील लिहा.

३) ठेव विश्वस्त नियुक्ती बाबतची तरतूद लिहा.

४) ठेवीची स्वीकृती आणि ठेवीचे नूतनीकरण या बाबतच्या कोणत्याही चार अटी व शर्ती लिहा.

**प्र.क्र. ५) खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१) सर्व कंपन्या आम जनतेकडून ठेवी स्वीकारू शकत नाहीत.

२) कंपनीला ठेवी स्वीकारण्याबाबत मर्यादा आहेत.

३) कंपनीला ठेवीबाबत परिपत्रक किंवा जाहिरात प्रसिद्ध करताना कायदेशीर तरतुदींची पूर्तता करावी लागते.

४) सुरक्षित ठेवी स्वीकारताना कंपनी ठेव विश्वस्तांची नेमणूक करते.

५) सुरक्षित ठेवी स्वीकारताना कंपनीला आपल्या स्थिर मालमत्तेवर बोजा निर्माण करावा लागतो.

६) कंपनीस ठेव परत फेड निधी खाते उघडणे आवश्यक आहे.

**प्र.क्र. ६) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) जास्तीत जास्त ठेवी स्वीकारू शकणाऱ्या कंपन्यांचे विविध प्रकार स्पष्ट करा.

२) ठेवी निमंत्रित करण्यासाठी प्रसिद्ध कराव्या लागणाऱ्या परिपत्रक किंवा जाहिरातीसंबंधी तरतुदी स्पष्ट करा.

❑❑❑

# ६ सभासदांशी पत्रव्यवहार


६.१ सभासदांशी पत्रव्यवहार करताना चिटणिसाने घ्यावयाची काळजी

६.२ सभासदांशी पत्रव्यवहाराचे प्रसंग

६.३ नमुना पत्रे


**प्रस्तावना :**

भागधारक हे कंपनीचे मालक असतात जे कंपनीत भांडवल गुंतवतात.

कंपनीचा मुख्य अधिकारी म्हणून चिटणिसाला सभासदांबरोबर वेगवेगळ्या प्रसंगी पत्रव्यवहार करावा लागतो. चिटणीस हा भागधारक आणि संचालक मंडळ यांच्यात महत्त्वाचा दुवा म्हणून काम करतो.

चिटणिसाला व्यवस्थापनाने (संचालक मंडळ) घेतलेले निर्णय आणि इतर महत्त्वाची माहिती पत्रव्यवहाराद्वारे सभासदांना कळवावी लागते.

सभासदांशी पत्रव्यवहार करताना चिटणिसाने विशेष दक्षता व काळजी घेणे आवश्यक आहे.

## ६.१ सभासदांशी पत्रव्यवहार करताना चिटणिसाने घ्यावयाची काळजी :

कंपनीच्या चिटणिसाला सभासदांशी विविध प्रसंगी पत्रव्यवहार करावा लागतो. पत्रव्यवहार करताना चिटणिसाने सभासदाविषयी आदर राखला पाहिजे. तसेच पत्रामध्ये दिली जाणारी माहिती अचूक व सत्य असली पाहिजे.

अशाप्रकारे सभासदांबरोबर पत्रव्यवहार करणे हे चिटणिसाचे आव्हानात्मक कार्य आहे. त्यासाठी त्याच्याकडे कौशल्य, ज्ञान व तंत्र असणे आवश्यक आहे.

सभासदांशी पत्रव्यवहार करताना चिटणिसाला खालील मुद्दे विचारात घ्यावे लागतात.

१) **अचूक माहिती :** सभासदांशी पत्रव्यवहार करत असताना त्यांना दिली जाणारी माहिती ही सत्य, अद्ययावत आणि वस्तुस्थितीस अनुसरून असली पाहिजे. वस्तुस्थितीची आकडेवारी देत असताना चिटणिसाने विशेष दक्षता घेतली पाहिजे.

२) **ओघवती भाषा :** पत्राची भाषा साधी, सोपी आणि आकर्षक असली पाहिजे. पत्रात तांत्रिक शब्द व लांबलचक वाक्यांचा वापर टाळावा. पत्र वाचताक्षणीच पत्रातील आशय वाचकास समजेल अशी पत्राची भाषा असली पाहिजे. थोडक्यात पत्र समजण्यास सोपे असले पाहिजे.

३) **त्वरित उत्तर :** सभासदांकडून आलेल्या पत्रांना चिटणिसाने त्वरीत, विना विलंब उत्तरे दिली पाहिजेत. सभासदांनी विचारलेल्या कोणत्याही प्रश्नांची उत्तरे त्वरित दिली पाहिजेत. तसेच तक्रार पत्राची योग्य ती दखल त्वरित घेतली पाहिजे.

४) **गोपनीयता :** चिटणीस हा कंपनीच्या गोपनीय माहितीचा विश्वास म्हणून ओळखला जातो. त्यामुळे कंपनीची कोणतीही महत्त्वाची गोपनीय माहिती उघड करणे टाळले पाहिजे. बऱ्याच वेळेस कंपनीची अंतर्गत माहिती जाणून घेण्याची उत्सुकता सभासदांमध्ये असते. तेव्हा याबाबत माहिती असली तरी देखील जास्तीत जास्त गोपनीयता पाळली पाहिजे आणि अशा चौकशांना अधिक हुशारीने उत्तर देणे टाळले पाहिजे.

५) **नम्रता/सौजन्य :** नम्रतापूर्वक पत्र लेखनामुळे सहानुभूती, आदर आणि आपुलकीचे दर्शन होते. सौजन्यता म्हणजे पत्रात अयोग्य भाषा टाळून सभ्य भाषेचा वापर करावा. पत्र लिहिताना पत्राचा कल हा नम्रतेचा, विनयशील आणि मित्रत्वाचा ठेवला पाहिजे आणि सभासदांच्या तक्रार पत्रांना दिली जाणारी उत्तरे देखील नम्र भाषेत असावीत.

६) **कायदेशीर बाबी :** सभासदांबरोबर पत्रव्यवहार करताना चिटणिसाने कंपनी कायदा २०१३ मधील तरतुदींचे आणि इतर कायद्याचे पालन केले पाहिजे. पत्र लेखन करताना काही बाबतीत चिटणिसाला गरज भासल्यास त्याने कायदे सल्लागाराचे मत किंवा सल्ला घेतला पाहिजे.

थोडक्यात पत्रातील मजकूर सत्य, बिनचूक व स्पष्ट असला पाहिजे.

७) **काळजीपूर्वक पत्र लेखन :** सभासदांशी पत्रव्यवहार करताना काही वेळा चिटणिसाला नकारात्मक पत्रे पाठवावी लागतात. प्रामुख्याने अशी पत्रे अत्यंत काळजीपूर्वक लिहिली पाहिजेत. जेणे करून संबंधित सभासद दुखावला जाणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. सभासदाला पत्रावरून ही गोष्ट पटली पाहिजे की कंपनी हितासाठी व्यवस्थापनाला नकारात्मक भूमिका घ्यावी लागत आहे.

८) **कंपनीची प्रतिमा :** सभासदांबरोबर पत्रव्यवहार करत असताना कंपनीचा नावलौकिक वाढविण्यास मदत करतो. हे त्याने लक्षात ठेवले पाहिजे. तसेच स्पष्ट परंतु सौजन्यपूर्ण लेखनाने सभासदाच्या सर्व अडचणी, प्रश्न तसेच शंका नम्रतापूर्वक दूर केल्या पाहिजेत.

## ६.२ सभासदांबरोबर केल्या जाणाऱ्या पत्रव्यवहाराचे प्रसंग :

चिटणिसाला सभासदांबरोबर खालील प्रसंगी पत्रव्यवहार करावा लागतो. थोडक्यात पत्रातील मजकूर सत्य, बिनचूक व स्पष्ट असला पाहिजे.

- भाग वाटप पत्र
- भाग दाखला (प्रमाणपत्र) वाटप पत्र
- हक्कभाग विक्रीच्या विकल्पाची कारवाई करणारे पत्र
- लाभांश विनंती पत्र
- भाग हस्तांतरात नकार देणारे पत्र
- सर्वसाधारण सभेची सूचना व कार्यक्रम पत्रिका
- सभासदाच्या तक्रारीस उत्तर देणारे पत्र
- दिलगिरी पत्र
- बोनस भाग वाटप पत्र
- लाभांश वाटप पत्र
- भाग हस्तांतरात मंजुरी देणारे पत्र
- भाग संक्रमणासंबधीचे कायदेशीर प्रतिनिधीस पत्र
- भाग दाखला गहाळ झाल्याची सूचना देणारे पत्र

कंपनीच्या चिटणिसाला सभासदांबरोबर कराव्या लागणाऱ्या पत्रव्यवहाराच्या प्रसंगातील काही प्रसंग खालील प्रमाणे –

१) भाग दाखला/प्रमाणपत्र वाटप पत्र

२) लाभांश वाटप पत्र

अ) लाभांश अधिपत्राद्वारे

ब) इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सर्व्हिसेस (E.C.S.) मार्फत

३) बोनस भाग वाटप पत्र

४) लाभांशाचा दर कमी असल्याची तक्रार करणाऱ्या भाग धारकाच्या तक्रारीस उत्तर देणारे पत्र.

## ६.३ नमुना पत्रे :

१) **भाग प्रमाणपत्र वाटपपत्र :** भाग प्रमाणपत्र हा कंपनीची मुद्रा आणि शिक्क्यानिशी दिलेला भागाचा मालकी हक्काचा नोंदणीकृत पुरावा असतो. भाग प्रमाणपत्रावर कंपनीच्या कमीतकमी दोन (२) संचालकाच्या आणि कंपनीच्या चिटणिसाची स्वाक्षरी असते. प्रत्येक कंपनीला भागाचे वाटप केल्यापासून दोन (२) महिन्याच्या आत भाग प्रमाणपत्रांचे वाटप करणे बंधनकारक आहे.

भाग प्रमाणपत्र वाटपास तयार झाल्यानंतर कंपनी भाग अर्जदाराच्या विनंतीनुसार त्याला भाग प्रमाणपत्र पाठविते. भाग प्रमाणपत्र वाटपासंबंधीच्या या पत्रात पान क्र., भाग प्रमाणपत्र क्रमांक, भाग क्रमांक धारण केलल्या भागाची संख्या इत्यादींचा समावेश असतो.

सेबीच्या परिपत्रकानुसार भाग प्रमाणपत्र हे भाग त्याने नोंदविलेल्या पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने पाठविले पाहिजे.

## कंफर्ट मोटर्स लि.

नोंदणीकृत कार्यालय : ए/३०, अरोरा टॉवर्स, एम. जी. रोड, कॅम्प,
पुणे – ४११०१२

CIN : U2 11 MH 2 PLC4

फोन : ०२०-८००३२८४४
फॅक्स : ०२०-५००६३०१५
संदर्भ क्र. सी/एम.आर.-एस.सी/३०/१९-२०

वेबसाईट : www.comfortmotorsltd.com
ई-मेल : comfort3@ gm ail.com
दिनांक : १२ नोव्हेंबर, २०१९

श्री. जयंत मोदी
अभिमान अपार्टमेंट, ३०, एल.बी रोड
पुणे – ४०००0१
(रजिस्टर पोस्टाने)

**विषय – भाग प्रमाणपत्राचे वाटप**

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, आपण केलेल्या भाग मागणी विनंती अर्ज क्रमांक ५० नुसार आपणास समहक्क भागांचे वाटप करण्यात आलेले आहे. सदर भागाचे भाग प्रमाणपत्र आपणास भागाचे वाटप केल्यापासून पंधरा दिवसात सभासद नोंद वहीत नोंदविलेल्या पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्याची व्यवस्था केली आहे.

**भाग प्रमाणपत्र वाटपाचा तपशील खालील प्रमाणे**

| १ | २ | ३ | | ४ |
|---|---|---|---|---|
| पृष्ठ क्रमांक | भाग प्रमाणपत्र क्र. | भागाचे अनुक्रमांक | | भागांची एकूण संख्या |
| | | पासून | पर्यंत | |
| १००६ | ९६३० | ३०१ | ४०० | १०० |

या पुढे आपणास प्रत्येक वेळी उत्तम सेवा पुरविल्या जातील.

कळावे,

आपला विश्वासू ,
कंफर्ट मोटर्स लि. करिता

स्वाक्षरी
श्री. आनंद स्वामी

२) **लाभांश वाटप :** जेव्हा कंपनी नफ्यातील काही हिस्सा आपल्या भागधारकांना त्यांच्या गुंतवणुकीवरील परतावा म्हणून देते त्यास लाभांश असे म्हणतात.

लाभांश हा भाग अधिपत्राद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे (ECS,N EFT,e tc.) दिला जातो.

संचालक मंडळाला शिफारशी नुसार भागधारकांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत लाभांशाची मान्यता देण्यात येते व याच सभेत घोषणा करण्यात येते. लाभांशाची घोषणा केल्यापासून ३० दिवसांच्या आत सभासदांना लाभांशाचे वाटप झाले

पाहिजे. संचालक मंडळाच्या सूचनेनुसार चिटणीस संबंधित भाग धारकांना लाभांश वाटपाचे पत्र पाठवितो. सदर पत्रात लाभांश वाटपाविषयीची संपूर्ण माहिती देण्यात येते. यात खालील तपशील असतो. धारण केलेल्या भागांची संख्या, भाग अधिपत्र क्रमांक एकूण लाभांश रक्कम, वजा टी.डी.एस.(लागू असल्यास), निव्वळ लांभाश देय रक्कम इत्यादी उल्लेख करण्यात येतो.

आयकर कायदा १९६१ नुसार, कोणतीही कंपनी एखादी रक्कम अदा करत असल्यास तिला सदर रक्कम ठरावीक मर्यादेपेक्षा जास्त असल्यास त्यातून आयकर वजावट करावी लागते. याला स्रोतातून कर वजावट (Tax Deducted at source - TDS) असे म्हणतात. ज्याचा दर विभागाकडून निश्चित केला जातो.

कंपनी लाभांशाचे वाटप लांभाश अधिपत्राद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे करते.

ECS- Electroin c Clearin gS eriv ce

NEFT- Natioa l Electroin c Fd Tras fer

## अ) लाभांश अधिपत्राद्वारे लाभांश वाटप

**अनमोल स्ट्रील इंडस्ट्रीज लि.**

नोंदणीकृत कार्यालय : ३० अनमोल निवास, जे.एम.रोड, नरीमन पॉंईट,
मुंबई ४०००२०

CIN: L0 MH 0 PLC 10

फोन : ०२२-९७६७५८७७
फॅक्स : ०२२-३००१०३३१
संदर्भ क्रमांक अ/एम.आर.-डी/ ७/१९-२०

वेबसाईट : www.Anmol Industries Limited.com
ई-मेल : am ol@ gm ail.com
दिनांक : ७ मे, २०१९

श्रीमती ज्योती सुरती
१२, लक्ष्मी निवास,
आम्रपाली मार्ग
बांद्रा
मुंबई ४०००५०

**विषय – समहक्क भागावरील लाभांश वाटपाबाबत,**
(रु. १० दर्शनी मूल्य असलेले समहक्क भाग)

महोदया,

संचालक मंडळाने मला दिलेल्या सूचनेप्रमाणे मी आपणास कळवू इच्छितो की दिनांक २० एप्रिल, २०१९ रोजी झालेल्या ३१ व्या वार्षिक सर्व साधारण सभेमध्ये रु. २.५० प्रमाणे रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या समहक्क भागावर अंतिम (वार्षिक) लाभांश जाहीर केला आहे. त्यास सर्व सभासदांनी सर्वानुमते मान्यता दिली आहे.

कंपनीने कंपनी कायदा २०१३ मधील कलम १२३ नुसार लाभांश घोषणे संदर्भातील सर्व कायदेशीर तरतुदींचे पालन करून लाभांश घोषित केला आहे.

आपणास वाटप करण्यात येणाऱ्या लाभांशाचा तपशील खालील प्रमाणे–

| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नोंदवही पान क्र. | धारण केलेल्या भागांची संख्या | अनुक्रमांक | | लाभांश अधिपत्र क्र. | ढोबळ लाभांश | आयकर कपात (टी.डी.एस.) | निव्वळ देय लाभांश |
| | | पासून | पर्यंत | | | | |
| ए – ३० | १०० | ३०१ | ४०० | बी–९९३१ | रु. २५० | निरंक | २५० |

लाभांश अधिपत्र सोबत जोडले आहे.

कळावे.

आपला विश्वासू ,

सोबत – लाभांश अधिपत्र

अनमोल स्टील इंडस्ट्रीज करिता

सही

कंपनी चिटणीस

**ब) इलेक्ट्रॉनिक पद्धतीने लाभांश वाटप**

**गुरुसाई ॲटो लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय : तुलसी कॉम्प्लेक्स लोधी रोड, कॅम्प,

पुणे – ४११००१

CIN : L40 MH 9 PLC4

फोन : ०२२–२४०३२८४४

फॅक्स : ०२२–२४३५६१०१

संदर्भ क्रमांक : एस/एम.आर/डी/१२/१९–२०

Web ite : www.g s ailimited.com

E-mail : sai@ g ail.com

दि. ३ जून, २०१९

श्री. जयंत मोदी

१५, सागर अपार्टमेंट,

वन विहार रोड,

पुणे ४११०३०

**विषय – अंतरिम लाभांशाचे एनइएफटी (ECS) द्‌वारे वाटप.**

महोदय,

संचालक मंडळाने दिलेल्या सूचनेप्रमाणे आपणास कळवू इच्छितो की दि. २८ मे २०१९ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत रु. १०/– दर्शनी मूल्य असलेल्या पूर्ण वसूल समहक्क भागांवर रु. १/– प्रमाणे (१०%) अंतरिम लाभांश वाटप करण्याविषयीचा ठराव संमत करण्यात आला.

आपण दिलेल्या सूचनेनुसार समक्ष किंवा डिपॉझिटरी पार्टीसिपंट द्‌वारा कंपनीने देय असलेल्या अंतरिम लाभांशाची रक्कम आपल्या बँक खात्यावर एन.इ.एफ.टी. द्‌वारे पाठविली आहे.

देय असलेल्या लाभांशाचा तपशील खालीलप्रमाणे –

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| **समहक्क भागांची संख्या (३१ मे, २०१९ पर्यंत)** | **प्रत्येक भागावरील लाभांश (रुपये)** | **लाभांश रक्कम (रु.)** | **डी.पी.आय.डी. आणि ग्राहक आय.डी. क्रमांक** | **पाठविल्याची तारीख** | **बँक खाते क्रमांक** |
| ५०० | ११ | ५५०० | १२०३३ २०००७४ ७९००५ | ६ जून २०१९ | बँक ऑफ बडोदा ५६५६००० २२१०५ |

कृपया आपण बँक खात्यावर अंतरिम लाभांशाची रक्कम जमा झालेली आहे किंवा नाही याची खात्याचा तपशील घेऊन खात्री करावी.

आयकर अधिनियम १९६१ नुसार लाभांशावर करावची कपात करण्यात आलेली नाही, परंतु लाभांश वितरण करायची रक्कम मात्र कंपनीने दिलेली आहे.

कळावे.

आपला विश्वासू ,
गुरुसाई ॲटो लिमिटेड करिता

सही
(श्री. जितेश एम. गांधी)
*कंपनी चिटणीस*

३) **बोनस भाग वाटप पत्र :** बोनस भाग – कंपनी आपल्या समहक्क भागधारकांना संचित नफ्यातून किंवा राखीव निधीतून भेट स्वरूपात काही भाग देतात त्यास बोनस भाग असे म्हणतात. बोनस भाग विनामूल्य दिले जातात. बोनस भाग हे पूर्ण वसूल झालेल्या भागासाठी दिले जातात. बोनस भाग वाटप केल्याची माहिती ही समहक्क भाग धारकांना पत्राद्वारे कळविली जाते. यात पुढील बाबींचा उल्लेख केला जातो. धारण केलेल्या भागांची संख्या, वाटप केलेल्या बोनस भागाची संख्या, डी. पी. व ग्राहक आय. डी. क्रमांक, जमा तारीख इत्यादी. (सर्व बोनस भाग भागधारकाच्या डिमॅट खात्यात जमा केले जातात. किंवा त्यांना भाग प्रमाणपत्राचे वाटप करण्यात येते.

***नोंदणी तारीख :*** *बोनस भाग मिळण्यासाठी जे भागधारक पात्र आहेत हे ठरविण्यासाठी कंपनीने निश्चित केलेली तारीख म्हणजे नोंदणी तारीख होय. सभासद नोंदवही प्रमाणे कंपनी भागधारकांची नावे बोनस भाग वाटपासाठी विचारात घेते. बोनस भाग व लाभांश मिळण्यासाठी पात्र असणाऱ्या नोंदणीकृत सभासदासाठी एक विशिष्ट तारीख निश्चित केली जाते. अशाच सभासदांना बोनस भागाचे वाटप केले जाते.*

**यश इंडस्ट्रीज लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय : १०२, नवीन एम.आय.डी.सी., उषा टॉवर, शाहु चौक,
मुंबई – ४०००३१

CIN : L04 MH 02 PLC07

फोन : ०२२–२३२५२३२३
फॅक्स : ०२२–२३६००४४५

Website : www.yashindustrieslimited.com
E-mail : y sh@ gm ail.com


संदर्भ क्रमांकः वाय/एम.आर–बी/५/१९–२०

दि. १६ ऑक्टोबर, २०१९

श्रीमती. युक्ता श्रॉफ
७१५, नारायण पेठ, लक्ष्मी रोड,
पुणे ४११०३८

**विषय – बोनस भाग वाटपाबाबत.**

महोदया,

संचालक मंडळाच्या सूचनेनुसार आपणास कळवू इच्छितो की दिनांक १४ ऑक्टोबर २०१९ रोजी भरविण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये संचालक मंडळाच्या १:१ या प्रमाणात बोनस भाग वाटपाच्या शिफारशीस सर्व भागधारकांनी एकमताने मान्यता दिलेली आहे. म्हणजेच सभासदांनी धारण केलेल्या पूर्ण वसूल झालेल्या एका समहक्क भागासाठी, एक बोनस भाग वाटप करण्यात आला आहे धारण केलेल्या समहक्क भागाची नोंदणी तारीख १३ ऑक्टोबर २०१९ ही निश्चित केली आहे.

आपणास वाटप करण्यात आलेल्या बोनस भाग वाटपाचा तपशील खालीलप्रमाणे –

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| नोंदणी दिनांकाप्रमाणे नोंदविलेले समहक्क भाग | वाटप करण्यात आलेले बोनस भाग | डी.पी.आय.डी क्रमांक | सभासद आय.डी. क्रमांक | डी मॅट खात्यावर जमा केलेली तारीख |
| | | डी मॅट खात्यात जमा होण्यासाठी – बोनस भाग | | |
| २५ | २५ | IN ३००१०० | १०११६०६१ | ३१–१०–२०१९ |

कंपनीने बोनस भाग वाटपासाठी आवश्यक असलेल्या सर्व कायदेशीर तरतुदींचे पालन केले आहे. कंपनीच्या समहक्क भागाच्या बरोबरीनेच या भागांना दर्जा देण्यात आलेला आहे.

कळावे,

आपला विश्वासू ,
यश इंडस्ट्रीज लिमिटेड करीता

सही
(श्री. एस.आर.नाईक)
कंपनी चिटणीस

४) **लाभांश दराचे संदर्भातील तक्रारीस उत्तर :** प्रत्येक वर्षी जास्तीतजास्त दराने लाभांश मिळावा अशी अपेक्षा समहक्क भाग धारकाची असते परंतु अनेक वेळा काही कारणास्तव त्यांच्या अपक्षेप्रमाणे लाभांश देणे शक्य नसते. अशा वेळी भाग धारकांकडून कमी दराने लाभांश दिल्या बाबतची तक्रार पत्रे येतात. अशा तक्रार पत्रांना चिटणिसाला समाधानकारक उत्तरे द्यावी लागतात. ही उत्तरे देताना कमी दराने लाभांश दिल्याबाबतची कारणे पत्रात नमूद करावी लागतात.

**श्री. सिमेंट इंडस्ट्रीज लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय : ३१, तुलसी टॉवर, बांद्रा (पूर्व)

मुंबई – ४०००५०

CIN : L0 MH 0 PLC0

फोन : ०२२-२४२४५०२५

फॅक्स : ०२२-४५४५६०३५

संदर्भ क्रमांक : एस/एम.आर/डी/२५/१९-२०

Website : www.shreecementindustriesltd.com

E-mail : sh ee@ gm ail.com

दि. २० एप्रिल २०१९

श्री. किशोर मालपाणी
१५/२१, लोटस अपार्टमेंट,
बोरीवली (प.), मुंबई ४००१०३

**विषय – लाभांशाचा दर कमी असल्याबाबतच्या तक्रारीबाबत.**

महोदय,

आपले दिनांक १५ एप्रिल, २०१९ चे पत्र मिळाले. या पत्रात आपण लाभांशाचा दर कमी असल्याबाबतची तक्रार केल्याचे निदर्शनास आले. चालू वर्षी लाभांशाचा दर कमी असल्याची कारणे खालील प्रमाणे –

१) मागील वर्षी पूरजन्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे कंपनीची माहिम येथील शाखा पूर्ण कार्यक्षमतेने चालवता आली नाही.

२) टाळता न येणाऱ्या या नैसर्गिक आपत्तीमुळे कंपनीस आर्थिक संकटास सामोरे जावे लागले. त्यामुळे कंपनीला मोठे आर्थिक नुकसान झाले.

३) वरील परिस्थितीमुळे संचालक मंडळाच्या बैठकीत रु. बारा कोटी पन्नास लाख एवढी रक्कम राखीव निधी मध्ये वर्ग करण्यात आली. ही रक्कम मागील वर्षाच्या तुलनेत पन्नास टक्के (५०%) पेक्षा जास्त आहे.

वरील खुलाश्यावरून आपले समाधान होईल असे वाटते. लवकरच कंपनी या आर्थिक संकटातून बाहेर पडेल आणि अल्पावधीत कंपनी जास्तीतजास्त लाभांश दर जाहीर करेल.

कळावे,

आपला विश्वासू ,
श्री सिमेंट इंडस्ट्रीज करिता

सही
(श्री. सुहास बजाज)
कंपनी चिटणीस

## सारांश

- कोणत्याही कंपनीला व्यवसायासाठी मोठ्या भांडवलाची आवश्यकता असते. असे भांडवल कंपनी भागाची विक्री करून जमा करते. प्रामुख्याने असंख्य व्यक्ती भागाची खरेदी करून भांडवलाचा पुरवठा कंपनीला करतात. त्यांना भागधारक असे म्हणतात. खऱ्या अर्थाने ते कंपनीचे मालक असतात.
- कंपनीचे दैनंदिन कामकाज (व्यवस्थापन) संचालक मंडळामार्फत पार पाडले जाते परंतु महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी मात्र वार्षिक साधारण सभेत सभासदाची मंजुरी घेणे आवश्यक असते.
- व्यवसायिक पत्रव्यवहार करत असताना चिटणिसाने पुढील मुद्दे विचारात घ्यावेत. अचूक माहिती देणे, सोप्या भाषेत पत्रव्यवहार करणे, सभासदांच्या प्रश्नांना त्वरित उत्तरे देणे. व्यावसायिक गोपनीयता बाळगणे इत्यादी गोष्टी व्यावसायिक पत्रव्यवहार करताना चिटणिसाने विचारात घेणे आवश्यक आहेत.
- कंपनी चिटणिसाला सभासदाबरोबर विविध प्रसंगी पत्रव्यवहार करावा लागतो.

## स्वाध्याय

**प्र.क्र. १ अ) खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१) संचालक हे ........... असतात.
अ) कंपनीचे पगारी नोकर
ब) भागधारकांचे प्रतिनिधी
क) कंपनीचे धनको

२) लाभांशाचे वाटप लाभांश घोषित झाल्याच्या तारखेपासून ....... दिवसाच्या आत सभासदांना झाले पाहिजे.
अ) ३०   ब) ४०   क) २०

३) नोंदणीकृत भाग धारकांना .......... अधिपत्राद्वारे लाभांश मिळतो.
अ) भाग   ब) कर्जरोखा   क) लाभांश

४) भाग धारकांना मोफत भाग वाटप केलेल्या भागांना ........ भाग म्हणतात.
अ) अग्रहक्क   ब) समहक्क   क) बोनस

५) भाग वाटपानंतर ........ महिन्याच्या आत कंपनीने भाग प्रमाणपत्रे पूर्ण करून वाटपासाठी तयार ठेवली पाहिजेत.
अ) ३   ब) ५   क) २

६) सभासदांबरोबर केला जाणारा पत्रव्यवहार हा ......... असावा.
अ) वेळखाऊ   ब) लहान मार्गी   क) त्वरित व नेमका

७) लाभांशाची शिफारस ...... करतात.
अ) संचालक मंडळ   ब) भागधारक   क) ठेवीदार

८) लाभांशाचे वाटप कंपनी ........ मधून करते.
अ) भांडवल   ब) इमारत निधी   क) नफा

९) कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये जाहीर करण्यात आलेला लाभांश नोंदणीकृत भागधारकांना ....... द्वारे दिला जातो.
अ) लाभांश अधिपत्र   ब) व्याज अधिपत्र   क) भाग अधिपत्र

**ब) जोड्या जुळवा.**

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | लाभांश अधिपत्र | १) | व्याज वाटपासाठीचे कागदपत्र (Instrument) |
| ब) | भागावरील परतावा | २) | इमारत निधीचे भांडवलीकरण |
| क) | बोनस भाग | ३) | इलेक्ट्रॉनिक क्लिअरींग सर्व्हिस |
| ड) | ई.सी.एस. | ४) | राखीव निधीचे भांडवलीकरण |
| इ) | एन.ई.एफ.टी. | ५) | नॅशनल इलेट्रॉनिक फंड ट्रान्सफर |
| | | ६) | लाभांश |
| | | ७) | इलेक्ट्रॉनिक को-ऑपरेटिव्ह सोसायटी |
| | | ८) | नॅशनल इलेक्ट्रॉनिक फिक्स्ड ट्रान्सफर |
| | | ९) | लाभांश वाटपासाठीची कागदपत्र |
| | | १०) | व्याज |

**क) खालील प्रत्येक विधानासाठी एक शब्द किंवा शब्दसमूह किंवा संज्ञा लिहा.**

१) विद्यमान समहक्क भाग धारकांना विनामूल्य दिले जाणारे भाग.

२) लाभांश वाटपाचे साधन.

३) ज्यांना बोनस भागाचे वाटप केले जाते असे भागधारक.

४) लाभांश दराची शिफारस करण्याचा अधिकार असलेल्या व्यक्ती.

५) कंपनीच्या वतीने सभासदांशी पत्रव्यवहार करणारी अधिकारी व्यक्ती.

६) कंपनीने बँकेला ठरावीक रक्कम सभासदाला लाभांश म्हणून वाटप करण्यासाठी दिलेला धनादेश.

**ड) खालील विधाने बरोबर की चूक ते लिहा.**

१) बोनस भागाचे वाटप विद्यमान समहक्क भागधारकांना केले जाते.

२) इमारत निधीचा वापर बोनस भागाच्या वाटपासाठी केला जातो.

३) बोनस भाग म्हणजे राखीव निधीचे भांडवलीकरण.

४) नोंदणीकृत भागधारकांना लाभांशाचे वाटप लाभांश कुपनद्वारे केले जाते.

५) लाभांश हा नफ्यातील हिस्सा असून तो कर्जरोखे धारकांना वाटप केला जातो.

६) प्रत्येक कंपनीने भागाचे वाटप केल्यानंतर भाग प्रमाणपत्र अर्जदारास तीन महिन्याच्या आत वितरित केले पाहिजे.

७) तक्रारीच्या पत्रास त्वरित उत्तर देणे आवश्यक नाही.

**इ) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) गोपनीयता, लाभांश, व्याज

२) बोनसपत्र, लाभांशपत्र, संचालक मंडळ

३) लाभांश अधिपत्र, व्याज अधिपत्र, डीमॅट

४) चिटणीस, संचालक मंडळ, लाभांश, सोपी भाषा

**फ) खालील विधाने पूर्ण करा.**

१) लाभांशाची शिफारस ........ कडून केली जाते.

२) कंपनी राखीव निधीचे भांडवलीकरण करून ......... भागाचे वाटप करते.

३) लाभांश घोषित केल्यापासून त्याचे वाटप ......... दिवसाच्या आत केले पाहिजे.

४) वार्षिक सर्वसाधारण सभेत लाभांश वाटपास मंजुरी ......... कडून दिली जाते.

५) व्यवस्थापनाकडून घेण्यात आलेले निर्णय ........ हा सभासदांना पत्रव्यवहाराद्वारे कळवितो.

**ग) कंसातील अचूक पर्याय निवडा.**

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | भागावरील परतावा | १) | ...................................................... |
| ब) | राखीव निधीचे भांडवलीकरण | २) | ...................................................... |
| क) | पत्रव्यवहार | ३) | ...................................................... |
| ड) | ............................................... | ४) | इलेक्ट्रॉनिक पद्धतीने वाटप |

(लेखी संदेश वाहन, बोनस भाग, लाभांश, इसीएस)

**ह) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) लाभांश अधिपत्र म्हणजे काय ?

२) राखीव निधीचे भांडवलीकरण म्हणजे काय ?

३) लाभांश म्हणजे काय ?

४) लाभांशाच्या दराची शिफारस कोणाकडून केली जाते ?

५) बोनस भागाचा लाभ कोणत्या भागधारकांना मिळतो ?

६) इलेक्ट्रॉनिक पद्धतीने लाभांश देणे म्हणजे काय ?

**ई) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१) लाभांशाची शिफारस भागधारकाकडून केली जाते.

२) जी व्यक्ती कंपनीचे भाग खरेदी करते तिला ठेवीदार असे म्हणतात.

३) बोनस भाग अग्रहक्क भागधारकांना मोफत भेट म्हणून दिले जातात.

४) लाभांशाची घोषणा झाल्यापासून 21 दिवसाच्या आत लाभांशाचे वाटप केलेच पाहिजे.

५) भागाचे वाटप झाल्यापासून तीन महिन्याच्या आत भाग प्रमाणाचे वाटप केले पाहिजे.

**ज) योग्य क्रम लावा.**

१) अ) भागाचे वाटप
ब) भागासाठी अर्ज
क) भाग प्रमाणपत्र

२) अ) सभासद
ब) अर्जदार
क) बोनस भाग

**प्र.क्र. २) खालील संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा.**

१) राखीव निधीचे भांडवलीकरण २) बोनस भाग ३) लाभांश अधिपत्र

**प्र.क्र. ३) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) कोणकोणत्या प्रसंगी चिटणिसाला सभासदांशी पत्रव्यवहार करावा लागतो ?

२) चिटणीसाला भागधारकाशी कोणकोणत्या प्रसंगी पत्रव्यवहार करावा लागतो ?

**प्र.क्र. ४) खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१) कंपनी चिटणिसाला भागधारकांशी पत्रव्यवहार करत असताना कोणती विशेष काळजी घ्यावी लागते ?

२) विशिष्ट परिस्थितीमध्ये चिटणिसाला भागधारकांशी पत्रव्यवहार करावा लागतो ?

**प्र.क्र. ५) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) बोनस भागाचे वाटप केल्याचे कळविणारे पत्र भागधारकास लिहा.

2) भाग प्रमाणपत्र वाटपास तयार असल्याचे कळविणारे पत्र भागधारकास लिहा.

3) लाभांशाचे वाटप लाभांश अधिपत्राद्वारे केल्याचे कळविणारे पत्र भागधारकास लिहा.

4) इलेक्ट्रॉनिक पद्धती (इसीएस) द्वारे अंतरिम लाभांशाचे वाटप केल्याचे पत्र भागधारकास लिहा.

5) लाभाशांचा दर कमी असल्याबद्दल तक्रार करणाऱ्या भागधारकाच्या पत्रास उत्तर लिहा.

❑❑❑

# ७ कर्जरोखेधारकांशी पत्रव्यवहार

- ७.१ कर्जधारकांशी पत्रव्यवहार करताना चिटणिसाने घ्यावयाची काळजी.
- ७.२ कंपनीच्या चिटणिसाला कर्जरोखेधारकांशी कराव्या लागणाऱ्या पत्रव्यवहाराचे प्रसंग.
- ७.३ नमुना पत्रे

## प्रस्तावना

कंपनी भागाची व कर्जरोख्याची विक्री करून भांडवलाची उभारणी करते. भाग भांडवल हे कंपनीचे स्वतःच्या मालकीचे भांडवल असते तर कर्जरोख्याद्वारे जमा केलेले भांडवल हे कर्जाऊ भांडवल असते.

कर्जरोखे हा कंपनीने कर्ज घेतल्याची कबुली देणारा दस्तावेज आहे. कर्जरोख्याद्वारे जमा केलेले भांडवल हे कर्जाऊ भांडवल असते. कर्जरोखेधारक हे कंपनीचे सावकार/धनको असतात. कर्जरोखेधारकांच्या दृष्टीने कर्जरोख्यातील गुंतवणूक ही समहक्क भागातील गुंतवणुकीपेक्षा अधिक सुरक्षित आहे कारण त्यावर ठरावीक दराने व्याज दिले जाते. कर्जरोख्यांची विक्री ठरावीक काळासाठी करण्यात येते.

चिटणिसाला व्यवस्थापनाने घेतलेले निर्णय व इतर माहिती पत्रव्यवहाराद्वारे कर्जरोखेधारकांना कळवावी लागते. पत्रव्यवहार करत असताना विशेष दक्षता व काळजी घ्यावी लागते.

कर्जरोख्याचे वाटप केल्याच्या तारखेनंतर कर्जरोखे प्रमाणपत्र ६ महिन्याच्या आत कर्जरोखेधारकाला वाटप केले जाते.

कर्जरोखे विश्वस्ताची नियुक्ती केली नसल्यास कंपनी जास्तीतजास्त पाचशे लोकांनाच कर्जरोख्यांची विक्री करू शकते.

## ७.१ कर्जरोखेधारकांशी पत्रव्यवहार करताना चिटणिसाने घ्यावयाची दक्षता :

कर्जरोखेधारकांबरोबर पत्रव्यवहार करत असताना चिटणिसाला खालील दक्षता घ्याव्या लागतात.

१) **नम्रता :** कर्जरोखेधारकांशी पत्रव्यवहार करताना चिटणिसाने त्यांचा आदर होईल अशारितीने पत्रव्यवहारामध्ये नम्र भाषेचा वापर करावा.

२) **तत्परता :** कर्जरोखेधारकांनी विचारलेल्या प्रश्नांना व तक्रारींना चिटणिसाने कोणताही विलंब न लावता योग्य प्रतिसाद देऊन त्वरित उत्तरे द्यावीत.

३) **कायदेशीर तरतुदी :** कर्जरोखेधारकांशी पत्रव्यवहार करत असताना चिटणिसाने कंपनी कायदा २०१३ मधील कायदेशीर तरतुदींचे व इतर संबंधित नियमांचे पालन केले पाहिजे. चिटणिसाने कर्जरोखेधारकांशी कायदेशीर बाबींविषयी पत्रव्यवहार करताना विशेष दक्षता व काळजी घेतली पाहिजे.

४) **पारदर्शकता :** कर्जरोखेधारकांबरोबर पत्रव्यवहार करताना चिटणिसाने जास्तीतजास्त पारदर्शकता राखली पाहिजे. त्यासाठी कंपनीची सत्य व अचूक माहिती, कंपनीची पत श्रेणी, कंपनीच्या आर्थिक स्थितीची सत्य व वास्तव स्थिती इत्यादी उल्लेख पत्रव्यवहारात करावा.

५) **संक्षिप्तता :** कर्जरोखेधारकांशी पत्रव्यवहार करत असताना पत्र हे संक्षिप्त व मुद्देसूद असावे. पत्रात अनावश्यक माहिती टाळली पाहिजे. याविषयी दक्षता घ्यावी.

**६) अचूक माहिती :** चिटणिसाने पत्रामध्ये अचूक व अद्ययावत माहिती दिली पाहिजे. माहितीत वास्तवता व सत्यता असावी. त्यामुळे कर्जरोखे धारकाची दिशाभूल होणार नाही.

**७) गोपनीयता :** कर्जरोखेधारकांशी पत्रव्यवहार करत असताना चिटणिसाने गोपनीयता राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. संचालक मंडळाने घेतलेले महत्त्वाचे निर्णय गोपनीय ठेवले पाहिजेत. त्याचबरोबर कंपनीशी संबंधित इतर महत्त्वाची माहिती उघड करू नये.

**८) कंपनीचा नावलौकिक :** कर्जरोखेधारकाशी पत्रव्यवहार करत असताना चिटणिसाने कंपनीच्या प्रतिमेस (नावलौकिकास) कोणतीही बाधा येणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

## ७.२ कर्जरोखेधारकाशी पत्रव्यवहारांचे प्रसंग :

चिटणिसाला कर्जरोखेधारकांशी कराव्या लागणाऱ्या पत्रव्यवहाराच्या प्रसंगांमधील काही प्रसंग खालीलप्रमाणे :

१) कर्जरोख्यांच्या वाटपाबाबत अर्जदाराला कळविणे. (कर्जरोखे वाटपपत्र)

२) कर्जरोख्यांचे व्याज देण्याबाबत :

अ) व्याज अधिपत्राद्वारे

ब) इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे

३) कर्जरोख्यांचे समहक्क भागात रूपांतर करणेबाबत पत्र.

४) कर्जरोखे परतफेड पत्र

## ७.३ नमुना पत्रे :

### १) कर्जरोखे वाटप पत्र :

कर्जरोख्यांच्या मागणीसाठी प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर जे अर्ज वैध ठरलेले आहेत अशा अर्जदारांना कर्जरोखे वाटप केल्याबाबतचे जे पत्र कंपनीकडून पाठविले जाते त्या पत्रास कर्जरोखे वाटप पत्र म्हणतात. कर्जरोखे धारकांनी हे पत्र जपून ठेवावे कारण या पत्राच्या बदल्यात कर्जरोखे प्रमाणपत्र दिले जाते. मागणी केलेले कर्जरोखे, वाटप केलेले कर्जरोखे, अनुक्रमांक, मिळालेली रक्कम, व्याज दर, परतफेड दिनांक इत्यादी तपशील समाविष्ट केला जातो.

**दिशा इंडस्ट्रीज लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय : ४५/अ महाराजा कॉम्प्लेक्स, पंचवटी कारंजा रोड,

नाशिक ४२२ ००३.

(CIN : L[illegible]M H[illegible]P LC[illegible])

फोन : ४२२-०९६४५२६२ | वेबसाईट : www.dishalimited.com

फॅक्स : ४२२-६९८७६५०० | ई-मेल : disha@gmail.com

संदर्भ क्र. : डी/डीएच/१८/१९-२० | दि. २० मे २०१९

श्री. विजय मित्तल

२३० द्वारका, कारंजा रोड

नाशिक ४२२ ०३६.

**विषय : कर्जरोख्याचे वाटपाबाबत.**

महोदय,

आपल्या दिनांक ३० एप्रिल २०१९ चा अर्ज क्र. DI 8013 ला अनुसरून संचालक मंडळाने मला आपणास कळविण्यास सांगितले आहे की आपणास प्रत्येकी १०० रुपयाचे १०% व्याज दराने १०० अपरिवर्तनीय कर्जरोखे देण्यात आलेले आहेत. सदर कर्जरोख्याचा कालावधी ५ वर्षांचा आहे.

सदर कर्जरोखे आपणास संचालक मंडळाच्या दिनांक १६ मे २०१९ रोजी झालेल्या सभेतील ठरावानुसार आणि कर्जरोखे विश्वस्त करारातील आणि कंपनीच्या नियमावलीतील तरतुदींनुसार देण्यात आले आहेत.

कर्जरोखे वाटपाचा तपशील खालीलप्रमाणे

| १ | २ | ३ | ४ | | ५ |
|---|---|---|---|---|---|
| पृष्ठ क्रमांक | मागणी केलेले कर्जरोखे | वाटप केलेले कर्जरोखे | अनुक्रमांक | | मिळालेली रक्कम |
| | | | पासून | पर्यंत | |
| डी ९० | १०० | १०० | ३०१ | ४०० | रु. १०,००० |

कर्जरोखे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

कळावे.

आपला विश्वासू ,

दिशा इंडस्ट्रीज लिमिटेड करिता

सही

(श्री. अविनाश नातू)

कंपनी चिटणीस

सोबत : कर्जरोखे प्रमाणपत्र

## २) कर्जरोख्यावरील व्याज :

कर्जरोखा हे कंपनीचे कर्जाऊ भांडवल आहे. कर्जरोख्यांमध्ये केलेल्या गुंतवणुकीवर कर्जरोखेधारकास व्याजाच्या स्वरूपात उत्पन्न मिळते. कर्जरोख्यांवरील व्याज कंपनीस द्यावे लागते ते नफ्यावर अवलंबून नसते. देय असलेले व्याज कंपनी व्याज अधिकपत्राद्वारे देण्याची व्यवस्था करते. 'व्याज अधिपत्र' हे व्याज पत्रासोबत जोडण्यात येते. या पत्रात कर्जरोख्यांच्या संख्या, अनुक्रमांक (पासून-पर्यंत) ढोबळ रक्कम, टी.डी.एस आणि निव्वळ देय व्याज इत्यादी व्याज देण्यासंबंधी संचालक मंडळ ठराव संमत करते.

कंपनी व्याज अधिपत्राद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे व्याज देते.

### अ) अधिपत्राद्वारे व्याज देणे.

**रोलटा इंडिया लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय : रोलटा टॉवर, बी विंग, रोलटा टेक्नॉलॉजी पार्क,
एमआयडीसी अंधेरी (प), मुंबई ४०० ०९३

(CIN : L7[illegible]M H [illegible]P LC [illegible])

फोनः ०२२-२६२०५५५५ — वेबसाईट : www.roltalimited.com
फॅक्स : ०२२-१०२०६४३१ — ई-मेल : rolta[illegible]@ [illegible]m ail.com
संदर्भ क्र.: आर/डीएच/०७/१९-२० — दि. १० जून २०१९

श्रीमती दिया सलुजा
आदिती अपार्टमेंट, एम.जी.रोड,
मीरा रोड, (पू.), मुंबई - ४०१ १०७

**विषय : कर्जरोख्यावर व्याज देण्याबाबत.**

महोदया,

संचालक मंडळाच्या सूचनेनुसार आपणास कळविण्यात येत आहे की, दिनांक ५ जून २०१९ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत आपण खरेदी केलेल्या १००, १०% व्याजाच्या अपरिवर्तनीय प्रत्येकी १०० रु. प्रत्येकी मूल्य असलेल्या कर्जरोख्यांवर व्याज देण्यासंबंधी ठराव संमत करण्यात आला.

त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पान क्रमांक | कर्जरोख्यांची संख्या | कर्जरोख्यांचे क्रमांक | | व्याजाची ढोबळ रक्कम | कर कपात (टी. डी. एस.) व्याज रक्कमेवर | निव्वळ व्याज रु. | व्याज अधिपत्र क्रमांक |
| | | पासून | पर्यंत | | | | |
| सी २४० | १०० | ६०१ | ७०० | रु. १,००० | - | १००० | I.W. ९६४६ |

सोबत वरील रकमेचे व्याज अधिपत्र जोडले आहे.

कळावे.

आपला विश्वासू ,
रोलटा इंडस्ट्रीज करिता

सही
(श्रीमती सिमरन उणेचा)
कंपनी चिटणीस

सोबत : व्याज अधिपत्र

## ब) इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे व्याज देणे (ECS,N EFT, इत्यादी द्वारे)

**बालाजी स्टील लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय : सर्वे नं. ७८ प्लॉट नं. ४८, बालाजी टॉवर,

माल रोड, पुणे ४११ ०३८

(CIN : L54M H 9P LC 9)

फोन: ०२०-२०१०६५५२ — वेबसाईट : www.balajisteelltd.com

फॅक्स: ०२०-३०२०५४११ — ई-मेल : balaji@gmail.com

संदर्भ क्र.: बी/डीएच/३०/१९-२० — दि. १२ मार्च २०१९

श्रीमती अमृता दीक्षित

३०/२०, डावी भुसारी कॉलनी,

कोथरुड डेपो,

पुणे ४११ ०३८

**विषय : कर्जरोख्यावरील व्याज इलेक्ट्रॉनिक पद्धती (ECS Or NEFT) द्वारे देणेबाबत.**

महोदया,

संचालक मंडळाच्या सूचनेनुसार आपणास कळविण्यात येत आहे की दि. १० मार्च २०१९ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत आपण खरेदी केलेल्या प्रत्येकी रु. १०० किंमत असलेल्या परतफेडीच्या कर्जरोख्यांवर व्याज १०% दराने ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षासाठी देण्याबाबतचा ठराव संमत करण्यात आला.

कंपनीने कर्जरोख्यांवरील व्याज देण्यासंबंधी सर्व तरतुदींचे पालन सदर व्याज इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे (ECS/NEFT) अदा करण्यात येईल त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|---|
| रजिस्टर क्रमांक | कर्जरोख्यांची संख्या | अनुक्रमांक | | एकूण व्याज | टी. डी. एस. १०% | निव्वळ व्याज |
| | | पासून | पर्यंत | | | |
| C - ४४० | १०० | ६०१ | ७०० | रु. १,००० | – | १००० |

आपण कंपनीकडे दिलेल्या बँक खात्याच्या तपशीलानुसार देय असलेल्या व्याजाची रक्कम इलेक्ट्रॉनिक पद्धतीने वर्ग करण्यात येईल.

कळावे.

आपला विश्वासू ,

बालाजी स्टील लिमिटेड करिता

सही

(श्री. निखिल दीक्षित)

कंपनी चिटणीस

## ३) कर्जरोख्याचे परिवर्तन :

ज्या कर्जरोख्याचे विशिष्ट कालावधीनंतर समहक्क भागांमध्ये परिवर्तन करण्यात येते. अशा कर्जरोख्यांना परिवर्तनीय कर्जरोखे असे म्हणतात. कर्जरोखेधारकांकडून कर्जरोख्याच्या परिवर्तनबाबतचे पत्र मिळाल्यानंतर संबंधित कर्जरोखेधारकाला कर्जरोख्याचे परिवर्तन समहक्क भागात केल्याबाबतचे पत्राद्वारे कंपनी चिटणीस कळवितो. या पत्रात नवीन भाग प्रमाणपत्र लवकरच देण्यात येईल किंवा पत्रासोबतच पाठविण्यात आले आहे असे कळविले जाते.

कर्जरोख्याचे समहक्क भागात परिवर्तन करण्यासाठी भागधारंकाच्या सभेत विशेष ठराव संमत करून त्यास मान्यता दिली जाते. मान्यता मिळाल्यानंतर कर्जरोखे धारकास परिवर्तनाचे पत्र पाठविले जाते.

**कृष्णा इलेक्ट्रॉनिक लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय : १०, कृष्णा सदन, शिवाजी चौक,
सोलापूर - ४१३ ००१
(CIN : L58M H 8P LC9)

फोन : ०२४-९७४६३४०२ वेबसाईट : www.k ish electroni csLtd.com
फॅक्स : ०२४-९६४२९२०१ ई-मेल : k ish @ gm ail.com
संदर्भ क्रमांक : के/डीएच/३१/१९-२० दि. ५ जून २०१९

श्री. महेश मालपाणी
२०, बालाजी कॉप्लेक्स
लक्ष्मी रोड,
सोलापूर - ४१३ ०१८

**विषय : कर्जरोख्याचे समहक्क भागात परिवर्तन.**

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, कर्जरोखे विक्रीच्या वेळी ठरलेल्या अटीप्रमाणे, १०% दराचे १,००,००० परिवर्तनीय कर्जरोखे परिवर्तनास पात्र आहेत.

दिनांक २५ मे २०१९ रोजी झालेल्या भाग धारकांच्या विशेष सर्वसाधारण सभेत संमत केलेल्या विशेष ठरावाद्वारे कर्जरोख्यांचे समहक्क भागात परिवर्तन करण्यास मान्यता देण्यात आली. परिवर्तनाचा दर २:१ असा आहे. आपण सादर केलेल्या विकल्प पत्रानुसार आपण धारण केलेल्या १०० कर्जरोख्यांसाठी आपणास ५० समहक्क भाग देण्यात आले आहेत. आपण धारण केलेल्या समहक्क भागाचा तपशील खालीलप्रमाणे :

| १ | २ | ३ | ४ | | ५ |
|---|---|---|---|---|---|
| रजिस्टर पृष्ठ क्रमांक | कर्जरोख्याची संख्या | समहक्क भाग वाटपांची संख्या | अनुक्रमांक नंबर | | भाग दाखला क्रमांक |
| | | | पासून | पर्यंत | |
| ४६५ | १०० | ५० | ५०१ | ५५० | २२१९ |

कंपनीच्या सही शिक्क्यानिशी दिला जाणारा भाग दाखला सोबत जोडला आहे.
दि. २५ मे २०१९ पासून कर्जरोखे दाखला अविधीग्राह्य असेल.
कळावे.

आपला विश्वासू,
कृष्णा इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड करिता

सही
(श्री. नितीन सराफ)
कंपनी चिटणीस

सोबत : भाग दाखला

## ४) कर्जरोख्याची परतफेड :

कर्जरोख्याची परतफेडीची मुदत संपत असल्यास कंपनी चिटणीस कर्जरोखे धारकास कर्जरोख्याच्या परतफेडीचे पत्र पाठवून कळवितो.

कर्जरोख्याच्या परतफेडीसाठी कंपनीला कर्जरोखे परतफेड राखीव निधी (DRRF) निर्माण करावा लागतो. या राखीव निधीमधून कर्जरोख्याची परतफेड केली जाते.

या पत्रासोबत कर्जरोखे धारकास विहित नमुन्यातील परतफेडीचा अर्ज पाठविण्यात येतो. सदर अर्ज भरून या अर्जासोबत कर्जरोखे प्रमाणपत्र कंपनीकडे परतफेडीसाठी पाठविण्याची विनंती करण्यात येते.

अर्ज प्राप्त झाल्यानंतर चिटणीस अर्जातील माहिती व कर्जरोख्यातील तपशील बरोबर असल्याची खात्री करतो आणि त्यानंतर कर्जरोखे परतफेडीचे पत्र पाठवितो.

**स्वस्तिक मार्बल लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय : ३०/क, आचल टॉवर्स, स्वस्तिक भवन, कॅम्प,

पुणे ४११ ००१

(CIN : L[illegible]M H[illegible]P LC [illegible] [illegible]

फोन : ०२०-२३४६७०११

फॅक्स : ०२०-२३४६६०२२

संदर्भ क्र. : एस/डीएच/१३/१९-२०

वेबसाईट : www.swastikmarbleLtd.com

ई-मेल : swastik30@gmail.com

दिनांक : १० ऑक्टोबर २०१९

श्रीमती अस्मिता मालपाणी
अमृता अपार्टमेंट,
२५ नारायण पेठ,
पुणे - ४११ ०३०

**विषय: कर्जरोख्याच्या परतफेडीबाबत.**

महोदया,

आपणास कळविण्यात येते की मे, २०१४ मध्ये वाटप केलेले १०% दराचे १,००,००० अपरिवर्तनीय कर्जरोखे १२ नोव्हेंबर २०१९ रोजी परतफेडीस पात्र ठरत आहेत. दि. ८ ऑक्टोबर २०१९ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत ठराव क्र. ३४६२ नुसार नमूद केलेले कर्जरोखे कंपनीच्या परतफेड राखीव निधीचा उपयोग करून परतफेड करण्यात येतील.

कर्जरोखे परतफेडीचा अर्ज पत्रासोबत पाठवित आहोत सदर अर्ज भरून त्या सोबत कर्जरोखे प्रमाणपत्र कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात ३ नोव्हेंबर २०१९ पर्यंत जमा करण्याची व्यवस्था करावी.

वरील औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर कर्जरोख्याची रक्कम आपल्या बँक खात्यावर वर्ग करण्यात येईल.

कृपया आपल्या बँक खात्याचा तपशील कंपनी कार्यालयाकडे पाठवावा ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू ,
स्वस्तिक मार्बल लिमिटेड करिता

सही
(श्रीमती उषा सुरती)
कंपनी चिटणीस

सोबत : कर्जरोखे परतफेड अर्ज

## सारांश

- कर्जरोख्याची विक्री करून जमा केलेले भांडवल हे कंपनीचे कर्जाऊ भांडवल आहे. कर्जरोखेधारक हे कंपनीचे धनको असतात. त्यांनी केलेल्या गुंतवणुकीवर व्याजाच्या स्वरूपात मोबदला त्यांना मिळतो. कंपनीच्या विसर्जन प्रसंगी भाग धारकाच्या अगोदर त्यांना भांडवलाची परतफेड केली जाते त्यामुळे भांडवल बुडण्याचा धोका अत्यंत कमी असतो.
- कर्जरोखे धारकाकडे कंपनीची मालमत्ता तारण ठेवलेली असल्यामुळे ते सुरक्षित असतात.
- कंपनी चिटणिसास कर्जरोखे धारकांशी कर्जरोख्यांचे वाटप, कर्जरोख्यांवरील व्याज देणेबाबत, कर्जरोख्याचे समहक्क भागात परिवर्तन आणि कर्जरोख्याची परतफेड इत्यादी प्रसंगी पत्रव्यवहार करावा लागतो, त्यांच्याबरोबर पत्रव्यवहार करत असताना सभ्यता, तत्परता, कायदेशीर तरतुदी, पारदर्शकता, संक्षिप्तता इत्यादी मुद्दे विचारात घ्यावे लागतात.

## स्वाध्याय

**प्र.क्र. १ अ) खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१) कर्जरोख्याद्वारे जमा केलेले भांडवल हे कंपनीचे ................ भांडवल असते.
अ) कर्जाऊ ब) मालकीचे क) कायम

२) कर्जरोखे धारक हे कंपनीचे .................. असतात.
अ) मालक ब) धनको क) ऋणको

३) कंपनीस कर्जाऊ भांडवलाचा पुरवठा .................. करतात.
अ) समहक्क भागधारक ब) कर्जरोखे धारक क) अग्रहक्क भागधारक

४) नोंदवलेल्या कर्जरोख्यांवरील व्याज .................... द्वारे दिले जाते.
अ) व्याज कूपन ब) व्याज अधिपत्र क) परतावा आदेश

५) .................... हे कंपनीचे धनको असतात.
अ) भागधारक ब) कर्जरोखेधारक क) संचालक

६) वाहक कर्जरोखधारकांना व्याज .................... द्वारे दिले जाते.
अ) व्याज अधिपत्र ब) परतावा आदेश क) व्याज कूपन

७) कर्जरोख्यावरील परतावा .................. स्वरूपात स्थिर दराने दिला जातो.
अ) लाभांश ब) कर्ज क) व्याज

८) .................... हा असा दस्तावेज आहे की ज्या द्वारे कंपनी सही शिक्क्यानिशी कर्ज घेतल्याची कबुली देते.
अ) कर्जरोखा ब) भाग क) राखीव निधी

९) ज्या कर्जरोख्याची परतफेड ठरावीक मुदतीनंतर केली जाते. अशा कर्जारोख्यांना ................ कर्जरोखे म्हणतात.
अ) परिवर्तनीय ब) नोंदवलेले क) परतफेडीचे

१०) कर्जरोख्यावर दिल्या जाणाऱ्या व्याजाचा दर .................. असतो.
अ) अनिश्चित ब) बदलता क) स्थिर

११) कर्जरोखेधारकांना कंपनीकडून .................. प्रमाणपत्र दिले जाते.
अ) भाग ब) बंधपत्र क) कर्जरोखा

१२) व्याज अधिपत्र हे कंपनीच्या .................. ना पाठविले जाते.
अ) भागधारक ब) कर्जरोखेधारक क) मालक

## ब) जोड्या जुळवा.

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | कर्जरोखेधारक | १) | कर्जाऊ भांडवल |
| ब) | कर्जरोख्यावरील व्याज | २) | व्याज कूपन |
| क) | परिवर्तनीय कर्जरोखे | ३) | कर्जाचा पुरावा |
| ड) | कर्जरोखे प्रमाणपत्र | ४) | सुरक्षित गुंतवणूक |
| इ) | कर्जरोख्यात गुंतवणूक | ५) | व्याज अधिपत्र |
| फ) | परतफेडीचे कर्जरोखे | ६) | कर्जरोख्यात परिवर्तन |
| ग) | कर्जरोखे | ७) | जोखमीची गुंतवणूक |
| | | ८) | भागाचा पुरावा |
| | | ९) | धनको |
| | | १०) | समहक्क भागामध्ये परिवर्तन |
| | | ११) | ठरावीक मुदतीनंतर परतफेड |
| | | १२) | कंपनी विसर्जन समयी परतफेड |
| | | १३) | मालक |
| | | १४) | मालकीचे भांडवल |

## क) खालील प्रत्येक विधानासाठी एक शब्द, शब्द समूह किंवा संज्ञा लिहा.

१) कर्जरोख्यातील गुंतवणुकीवर मिळणारा परतावा.
२) कर्जरोखे धारण केल्याचा पुरावा.
३) कर्जरोखेधारकाचा दर्जा.
४) समहक्क भागात रूपांतर होणारे कर्जरोखे.
५) कंपनीचे कर्जरोखे खरेदी करणारी व्यक्ती.
६) असा दस्तावेज ज्या द्वारे कंपनी सही शिक्क्यानिशी कर्ज घेतल्याची कबुली देते.
७) ज्या कर्जरोख्यांची नोंद कर्जरोखे नोंद पुस्तकात केली आहे असे कर्जरोखे.

## ड) खालील विधाने बरोबर की चूक ते लिहा.

१) कर्जरोखेधारकांना नियमित लाभांश मिळतो.
२) कर्जरोख्याद्वारे जमा केलेले भांडवल हे कंपनीचे कर्जाऊ भांडवल आहे.
३) परिवर्तनीय कर्जरोख्याचे समहक्क भागात रूपांतर होऊ शकते.
४) कर्जरोख्यावरील व्याज हे नफ्याच्या प्रमाणावर अवलंबून असत नाही.
५) कर्जरोखेधारकांना कंपनीच्या सभासदत्वाचे सर्व अधिकार असतात.
६) लाभांश अधिपत्राचा उपयोग कर्जरोखधारकांना व्याज देण्यासाठी केला जातो.
७) सर्व प्रकारचे कर्जरोखे समहक्क भागांमध्ये परिवर्तन होण्यास पात्र असतात.

८) कर्जरोख्याची परतफेड कंपनी कधीच करत नाही.

९) कर्जरोखेधारक हे कंपनीचे मालक असतात.

१०) कर्जरोखे नेहमीच पूर्ण वसूल झालेले असतात.

**इ) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) डिपॉझिटरी, व्याज, लाभांश

२) व्याज अधिपत्र, लाभांश अधिपत्र, डीमॅट

३) कर्जरोखेधारक, भागधारक, डिमटेरिअलायझेशन

४) कर्जरोखेधारक, भागधारक, सेबी (SEBI)

**फ) खालील वाक्ये पूर्ण करा.**

१) कर्जरोखेधारक हे कंपनीचे ………………… असतात.

२) कंपनी ………………… प्रमाणपत्राचे वाटप कर्जरोखेधारकास करते.

३) कर्जरोखेधारकांना ………………… स्वरूपात निश्चित दराने परतावा मिळतो.

४) नोंदवलेल्या कर्जरोख्यांवरील व्याज ………………… द्वारे दिले जाते.

५) ………………… ला कर्जरोखेधारकांशी महत्त्वाच्या प्रसंगी पत्रव्यवहार करावा लागतो.

६) कर्जरोखे खरेदी करणाऱ्या व्यक्तीस ………………… असे म्हणतात.

७) कर्जरोख्यांवरील व्याज हे ………………… वर अवलंबून असत नाही.

८) ………………… हक्क असलेले कर्जरोखे कंपनी विक्री करू शकत नाही.

९) कर्जरोखे प्रमाणपत्र हे कर्जरोखे वाटप केल्यापासून ………………… महिन्याच्या आत दिले पाहिजे.

१०) ………………… ची नियुक्ती केली नसेल तर कंपनी ५०० पेक्षा जास्त लोकांना कर्जरोख्याची विक्री करू शकत नाही.

११) ………………… ना कर्जरोखे विक्री करण्याचा अधिकार असतो.

**ग) कंसातील अचूक पर्याय निवडा.**

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | कर्जरोख्यावरील परतावा | १) | ……………………………… |
| ब) | कर्जरोखे प्रमाणपत्र | २) | ……………………………… |
| क) | ……………………………… | ३) | कर्जरोखेधारक |
| ड) | ……………………………… | ४) | कर्जरोखे |
| इ) | ……………………………… | ५) | कर्जरोखे वाटपाचा अधिकार |

(कर्जाऊ भांडवल, संचालक मंडळ, धनको, ६ महिन्यांच्या आत, व्याज)

**ह) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कर्जरोखेधारक कोणाला म्हणतात?

२) कर्जरोखे धारकाला कशाच्या स्वरूपात मोबदला मिळतो?

३) कर्जरोखा म्हणजे काय?

४) परिवर्तनीय कर्जरोखे म्हणजे काय?

५) कर्जरोखे वाटप करण्याचा निर्णय कोण घेते?

६) कर्जरोख्याची परतफेड करताना कोणता फॉर्म सोबत जोडला जातो?

७) कर्जरोख्याचे वाटप केल्यानंतर कोणते प्रमाणपत्र दिले जाते?

**ई) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१) कर्जरोख्याची खरेदी करणाऱ्या व्यक्तीस भागधारक असे म्हणतात.

२) कर्जरोखेधारकांना नियमितपणे निश्चित दराने लाभांश दिला जातो.

३) भाग प्रमाणपत्र हे कर्जरोख्याचे वाटप केल्यानंतर दिलेच पाहिजे.

४) कर्जरोखे परतफेड निधी हा कंपनी भागांच्या परतफेडीसाठी निर्माण करते.

५) कर्जरोखे परतफेड पत्रासोबत डीमॅट विनंती अर्ज पाठविला जातो.

६) कर्जरोख्याचे वाटप केल्यानंतर कर्जरोखे प्रमाणपत्र ८ महिन्याच्या आत कर्जरोखेधारकास पाठविले जाते.

**ज) योग्य क्रम लावा.**

१) अ) संचालक मंडळ ठराव

ब) कर्जरोख्याचे वाटप

क) संचालक मंडळाची सभा

२) अ) व्याज अधिपत्र

ब) कर्जरोख्यांचे वाटप

क) संचालक मंडळाची सभा

**प्र.क्र. २) खालील संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा.**

१) कर्जरोखे
२) कर्जरोखेधारक
३) कर्जरोख्यावरील व्याज
४) कर्जरोख्याची परतफेड
५) कर्जरोख्याचे परिवर्तन
६) व्याज अधिपत्र
७) संक्षिप्तता
८) अचूकता
९) सौजन्यता
१०) कर्जरोखे प्रमाणपत्र

**प्र.क्र. ३) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) चिटणिसाला कर्जरोखेधारकाशी कोणकोणत्या प्रसंगी पत्रव्यवहार करावा लागतो?

२) कर्जरोखेधारकाशी पत्रव्यवहार करताना चिटणिसाने कोणते मुद्दे लक्षात घ्यावेत?

**प्र.क्र. ४) खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१) कंपनी चिटणिसाला कर्जरोखेधारकांशी पत्रव्यवहार करताना विशेष काळजी घ्यावी लागते.

२) विशिष्ट परिस्थितीमध्ये चिटणिसाला कर्जरोखेधारकांबरोबर पत्रव्यवहार करावा लागतो.

**प्र.क्र. ५) खालील प्रश्न सोडवा.**

१) कर्जरोख्याचे वाटप केल्याबाबतचे पत्र लिहा.

२) कर्जरोखेधारकास व्याज अधिपत्राद्वारे व्याज दिल्याचे कळविणारे पत्र लिहा.

३) कर्जरोख्यांच्या परतफेडीची माहिती कर्जरोखेधारकास देणारे पत्र तयार लिहा.

४) कर्जरोखेधारकास कर्जरोख्याचे समहक्क भागात परिवर्तनात केल्याचे माहिती देणारे पत्र लिहा.

५) इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे कर्जरोख्यावरील व्याज दिल्या बाबतचे पत्र कर्जरोखेधारकास लिहा.

❑❑❑

# ८ ठेवीदारांशी पत्रव्यवहार

१.१ ठेवीदारांशी पत्रव्यवहार करताना चिटणिसाला घ्यावी लागणारी दक्षता.

१.२ ठेवीदारांशी पत्रव्यवहार करण्याचे विविध प्रसंग.

१.३ नमुना पत्रे.

## प्रस्तावना

ठेवी हा कंपनीसाठी अल्प मुदतीचा वित्तीय स्रोत आहे आणि याचा उपयोग कंपनीच्या अल्प मुदतीच्या खेळत्या भांडवलाची गरज पूर्ण करण्यासाठी होतो. कंपनी किमान ६ महिने आणि कमाल ३६ महिन्यांपेक्षा जास्त मुदतीच्या ठेवी स्वीकारू शकत नाही. कंपनी ठेवीवर नियमित व्याज देण्यासाठी आणि मुद्दल रक्कम मुदत संपताच परतफेड करण्यासाठी जबाबदार असते. ठेवीदार हे कंपनीचे असुरक्षित धनको असतात.

कंपनीच्या चिटणिसाला ठेवीदारांशी ठेव स्वीकारल्याबद्दल, ठेवीवरील व्याज देण्याबाबत, ठेवीचे नूतनीकरण व परतफेड करणे इत्यादी प्रसंगी पत्रव्यवहार करावा लागतो. चिटणिसाला हा पत्रव्यवहार कंपनीच्या संचालक मंडळाच्या सूचनेनुसार करावा लागतो. ठेवीदारांशी पत्रव्यवहार करताना चिटणिसाने विशेष काळजी आणि दक्षता घेतली पाहिजे.

## ८.१ ठेवीदारांशी पत्रव्यवहार करताना चिटणिसाला घ्यावी लागणारी दक्षता :

चिटणिसाला ठेवीदारांशी पत्रव्यवहार करताना खालील बाबी (दक्षता) विचारात घ्याव्या लागतात.

१) **कायदेशीर तरतुदी :** चिटणिसाने ठेवी मागविणे, स्वीकार करणे नूतनीकरण करणे आणि परतफेड करणे या संबंधित असलेल्या कायदेशीर तरतुदींचे पालन कंपनीने यथायोग्य केले असल्याची खात्री केली पाहिजे.

२) **सौजन्य :** ठेवीदारांशी पत्रव्यवहार करत असताना चिटणिसाने असभ्य आणि अयोग्य शब्दांचा वापर होणार नाही याची काळजी घ्यावी म्हणजेच पत्रव्यवहार नम्रतापूर्वक केला पाहिजे.

३) **तत्परता :** ठेवीदारांशी पत्रव्यवहार करत असताना त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना आणि तक्रारींना विनाविलंब उत्तर पाठविणे गरजेचे असते.

४) **अचूकता :** ठेवीदारांशी कराव्या लागणाऱ्या पत्रव्यवहारात अचूकता असावी. तसेच वस्तुस्थितीची अचूक माहिती पत्रात असावी.

५) **नावलौकिक :** ठेवीदारांच्या मनामध्ये कंपनीची प्रतिमा कायम राहील अशा प्रकारचा पत्रव्यवहार त्यांचेबरोबर राहील याची दक्षता चिटणिसाने घेतली पाहिजे. त्यामुळे कंपनीचा नावलौकिक वाढण्यास मदत होईल.

६) **तुम्ही दृष्टिकोन :** ठेवीदारांशी पत्रव्यवहार करत असताना त्यांच्या गरजा, अपेक्षा, इत्यादी बाबी विचारात घेऊन चिटणिसाने ठेवीदारांशी पत्रव्यवहार केला पाहिजे.

७) **संक्षिप्तता :** ठेवीदारांशी पत्रव्यवहार हा अत्यंत मोजक्या शब्दात असावा. आवश्यक असलेली माहिती ही थोडक्यात परंतु मुद्‌देसूदपणे मांडावी. अनावश्यक व अप्रस्तुत माहिती टाळली जावी.

८) **गोपनीयता :** चिटणिसाने ठेवीदारांबरोबर पत्रव्यवहार करत असताना गोपनीयतेचे पालन करावे.

## ८.२ ठेवीदारांशी पत्रव्यवहाराचे प्रसंग :

चिटणीस संचालक मंडळाने ठेवीबाबत घेतलेले विविध निर्णय ठेवीदारांना कळवितो.

चिटणिसाला ठेवीदारांशी विविध प्रसंगी पत्रव्यवहार करावा लागतो. काही प्रसंग पुढीलप्रमाणे –

१) कंपनीमध्ये ठेव ठेवल्याबद्‌दलचे आभार मानणारे पत्र.

२) ठेवीवरील व्याज देण्याबाबतचे पत्र. अ) व्याज अधिपत्राद्‌वारे

ब) इलेक्ट्रॉनिक पद्‌धतीद्‌वारे

३) ठेवीच्या नूतनीकरणाबाबतचे पत्र

४) ठेवीच्या परतफेडीबाबतचे पत्र

## ८.३ नमुना पत्रे :

१) **ठेवीदारास ठेव ठेवल्याबद्दल आभाराचे पत्र :** ठेवीदारांकडून ठेव रक्कम प्राप्त झाल्यानंतर कंपनीच्या चिटणिसाने ठेवीदाराला त्याने ठेव ठेवल्याबद्दल आभार व्यक्त करणारे पत्र पाठविले पाहिजे. या पत्रात ठेवीची रक्कम, तारीख, ठेवीचा कालावधी, इत्यादी तपशीलाचा उल्लेख असावा.

या पत्रासोबत ठेवीदारांना ठेव पावती पाठविली जाते जी ठेव ठेवल्याबद्दलचा पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येते. ही पावती ठेव स्वीकारल्यानंतर २१ दिवसांच्या आत पाठवावी लागते.

**गुरू इंडस्ट्रीज लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय : ४५ गुरू टॉवर्स जे. एम. रोड,
पुणे ४११ ०२१
CIN : L[illegible]M H [illegible]P LC[illegible]

फोन : ०२०-१२११००७२
फॅक्स : ०२०-३००४००७७
संदर्भ क्र. : जी/डीईपी/०९/१९-२०

Web ite : www.g lu imited.com
E-mail : g [illegible] gm ail.com
दिनांक : १० एप्रिल २०१९

श्री. शारंगधर नाईक
७८/६८ गुरू अपार्टमेंट, शनिवार पेठ,
पुणे - ४११ ०११

**विषय : ठेवीदारास ठेव ठेवल्याबद्दल आभाराचे पत्र.**

महोदय,

आपला दिनांक ५ एप्रिल २०१९ रोजीचा ठेव गुंतवणूक रु. १,००,०००/- (अक्षरी रु. एक लाख फक्त) बाबतचा अर्ज मिळाला. जाहिरातीतील अटी व नियमास अनुसरून सदर ठेवी २ वर्षे कालावधीसाठी आपणाकडून प्राप्त झाली आहे.

आपण कंपनीवर विश्वास दाखवून ठेव ठेवल्याबद्दल आपले आभारी आहोत.

ठेवीचा तपशील खालीलप्रमाणे-

| १ | २ | ३ | ४ | ५ | |
|---|---|---|---|---|---|
| मुदत ठेव पावती क्रमांक | ठेव रक्कम | ठेवीचा कालावधी (वर्ष) | व्याज दर % | बँकेचा तपशील | |
| | | | | बँकेचे नाव | खाते क्रमांक |
| ६७८ | ₹ १,००,०००/- | २ वर्षे | १२.५% | सिटी बँक | २२२०४० |

कंपनीमध्ये ठेव ठेवल्याबद्दल संचालक मंडळाने कृतज्ञता व्यक्त केली आहे.

आम्ही आपणास सदैव उत्तम सेवा देण्याची खात्री देतो.

कळावे.

आपला विश्वासू ,
गुरू इंडस्ट्रीज लिमिटेड करिता

सही
(श्री. नितीन मोदी)
कंपनी चिटणीस

सोबत : ठेव पावती क्र. ६७८

२) **ठेवीवरील व्याज दिल्याबाबतचे पत्र :** ठेव ही कर्जाऊ भांडवल आहे. ठेवीदाराला त्याने ठेवीच्या स्वरूपात केलेल्या गुंतवणुकीवर व्याजाच्या स्वरूपात मोबदला मिळतो. जेव्हा ठेवीदाराला त्याच्या ठेवीवरील व्याज देय असते त्यावेळी कंपनी ठेवीवरील व्याज देण्याचे पत्र पाठवते. या पत्रात ठेव रक्कम, व्याजाचा दर, व्याजची एकूण रक्कम वजा टी.डी. एस. आणि निव्वळ देय रकमेचा उल्लेख केला जातो.

कंपनी व्याज हे व्याज अधिपत्र किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे देते.

**अ) व्याज अधिपत्राद्वारे व्याज देणे :**

**किशोर टेक्सटाईल लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय : १०४ ब, बॉम्बे हाऊस, एस. व्ही. रोड, बोरिवली (पू.),
मुंबई ४०० १०३

CIN : L6M H 2P LC4

फोन : ०२२-६०३०४६३६
फॅक्स : ०२२-४०२०२३२३
संदर्भ क्र. : के/डीईपी/३४/१९-२०

Website : www.kishortesxtilelimited.com
E-mail : k sbr tex @ gn ail.com
दिनांक : २८ जुलै २०१९

श्रीमती लता दीक्षित
सी ७०२, मधुबन अपार्टमेंट, शिवाजी नगर,
कॅम्प, पुणे - ४११ ००१

**विषय : मुदत ठेवीवरील व्याज देण्याबाबत.**

महोदया,

संचालक मंडळाच्या सूचनेनुसार मी आपणास कळवू इच्छितो की, आपणास देय असलेल्या व्याज दराप्रमाणे (१०%) आपल्या मुदत ठेवींवरील व्याज देण्याबाबतचा ठराव संचालक मंडळाच्या सभेत मंजूर करण्यात आलेला आहे. या पत्रासोबत दिनांक २५ जुलै २०१९ चे ॲक्सीस बँकेच्या बोरीवली शाखेच्या नावे रु. २५०० चे ३३४५ क्रमांकाचे व्याज अधिपत्र जोडले आहे.

ठेवीवरील व्याज देण्याबाबतच्या सर्व कायदेशीर तरतुदींची पूर्तता कंपनीने केली आहे.

मुदत ठेव व त्यावरील देय असलेल्या व्याजाचा तपशील खालीलप्रमाणे -

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| व्याज अधिपत्र क्रमांक | मुदत ठेव पावती क्रमांक | ठेव रक्कम (रुपये) | व्याजाचा दर (%) | व्याजाची ढोबळ रक्कम | टी.डी.एस. @ १०% | निव्वळ व्याज देय रक्कम |
| ३३४५ | २०३२ | ₹ २५,००० | १०% | ₹ २,५०० | - | ₹ २,५००/- |

व्याज अधिपत्र सोबत जोडले आहे.

कृपया व्याज अधिपत्र वेगळे करण्यात यावे.

कळावे.

आपला विश्वासू,
किशोर टेक्सटाईल लिमिटेड करिता

सही
(श्री. निखिल दीक्षित)
कंपनी चिटणीस

सोबत : व्याज अधिपत्र

**ब) इलेक्ट्रॉनिक पद्‌धतीद्‌वारे व्याज देण्याबाबत (ECS,N EFT)**

**नॉव्हेल सुईंग मशिन्स लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय : सर्वे नं. ७८, प्लॉट नं. ४८, नॉव्हेल सदन, डी. पी. रोड, बावधन,
पुणे ४११ ०३८

CIN : L[illegible]M H [illegible]P LC[illegible]

फोन : ०२२-६०६०३०२१
फॅक्स : ०२२-९६८६४६३६
संदर्भ क्र. : एन/डीईपी/१०/१९-२०

Web ite : www.[illegible] lsewi[illegible] td.com
E-mail : [illegible] lsewi[illegible]@ [illegible] ail.com
दिनांक : ५ एप्रिल २०१९

श्रीमती क्षितिजा बिहाणी
नारायण पेठ, १२५, लक्ष्मी रोड,
पुणे - ४११ ०३०

**विषय : मुदत ठेवीवरील व्याज इलेक्ट्रॉनिक पद्‌धतीद्‌वारे (ECS/NEFT) देण्याबाबत.**

महोदया,

मला दिलेल्या संचालक मंडळाच्या सूचनेनुसार मी आपणास कळवू इच्छितो की, दि. १२ मार्च २०१९ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षांसाठी ठेवीवर १०% दराने व्याज देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

कंपनीने ठेवीवरील व्याज देण्याबाबतच्या व सर्व कायदेशीर तरतुदींची पूर्तता केली आहे.

देय असलेल्या व्याजाचा तपशील खालीलप्रमाणे -

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| मुदत ठेव पावती क्रमांक | ठेव रक्कम (रुपये) | व्याजाचा दर % | व्याजाची एकूण रक्कम ढोबळ (रुपये) | टी.डी.एस. @ १०% | व्याजाची देय निव्वळ रक्कम (रुपये) |
| २०३२ | ₹ २५,००० | १०% | ₹ २,५०० | - | ₹ २,५००/- |

देय असलेल्या व्याजाची रक्कम आपण दिलेल्या बँक खात्याच्या तपशीलाप्रमाणे इलेक्ट्रिक पद्‌धती (ECS, NEFT) द्‌वारे जमा करण्यात येईल.

कळावे.

आपली विश्वासू ,
नॉव्हेल सुईंग मशिन्स लिमिटेड करिता

सही
(श्रीमती सरिता सिंग)
कंपनी चिटणीस

## ३) ठेवीचे नूतनीकरण :

ठेवीचे नूतनीकरण म्हणजे ठेवीदाराला त्याच्या ठेवीची रक्कम ठेवीची मुदत संपल्यानंतर परत न करता, त्या रकमेचे नवीन ठेवीत पुढील काही कालावधीसाठी रूपांतर करणे होय.

ठेवीचा अतिरिक्त कालावधी हा मूळ कालावधी इतकाच किंवा त्यापेक्षा वेगळा/भिन्न असू शकतो.

कंपनी ठेवीच्या नूतनीकरणासाठी ठेवीदारांना ठेवीची मुदत संपण्यापूर्वी एक महिना अगोदर नूतनीकरणाचा छापील अर्ज पाठविते. ठेवीदाराने नूतनीकरणाचा अर्ज कंपनीकडे पूर्ण तपशीलासह भरून दिल्यानंतर कंपनी ठेवीचे नूतनीकरण करून ठेवींच्या नूतनीकरणाचे पत्र ठेवीदारास पाठविते.

या पत्रासोबत नूतनीकरणाची ठेव पावती पाठविली जाते.

**डायमंड इंटरनॅशनल लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय : २४, डायमंड हाऊस, नरिमन पॉईंट,

मुंबई ४०० ०२१

CIN : L3M H 2P LC4

फोन : ०२२-५०२०२११३
फॅक्स : ०२२-२०३०४११२
संदर्भ क्र. : डी/डीईपी/६१/१९-२०

Webs ite : www.dimodl imited.com
E-mail : dimod5@ gm ail.com
दिनांक : २२ मार्च २०१९

श्रीमती आशी सिंग
२६ गुलमोहर अपार्टमेंट,
अंधेरी (प.), मुंबई - ४०० ०५८

**विषय : मुदत ठेवीच्या नूतनीकरणाबाबत.**

महोदया,

आपला ठेवीच्या नूतनीकरणाबाबतचा अर्ज आणि रु. १,००,००० रक्कम असलेली मूळ ठेव पावती क्र. ४६२५ दोन वर्ष मुदतसाठी नूतनीकरणासाठी या अर्जासोबत मिळाली. सदर नूतनीकरण अर्ज संचालक मंडळाच्या संमतीसाठी सादर करण्यात आला.

दिनांक १७ मार्च २०१९ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत २ वर्ष कालावधीसाठी ठेवीच्या नूतनीकरणासाठी मंजुरी देण्यात आली आहे.

या पत्रासोबत ठेव पावती क्र. ५९२५ जोडली आहे.

कळावे.

आपली विश्वासू ,
डायमंड इंटरनॅशनल लिमिटेड करिता

सही
(श्रीमती काव्या अंबानी)
कंपनी चिटणीस

सोबत : मुदत ठेव पावती क्र. ५९२५

## ४) ठेवीची परतफेड :

ठेवीची मुदत संपण्यापूर्वी ठेवीची रक्कम व्याजासह ठेवीदारांना परत करणे कंपनीला बंधनकारक आहे. ठेवीची रक्कम परत न केल्यास कंपनी कायद्यात दंडात्मक शिक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे. ठेवीच्या परतफेडीच्या वेळी ठेवीदाराला ठेव परतफेडीचे पत्र पाठविले जाते. या पत्रात ठेवीदारास ठेव पावती कंपनीकडे पाठविण्याची विनंती केली जाते.

ठेव परतफेड पत्रात ठेवीचा कालखंड, ठेव पावती क्र. ठेव रक्कम व्याजाचा दर, मुदत संपल्यानंतर द्यावयाची रक्कम, टीडीएस (कर कपात). निव्वळ देय रक्कम इत्यादी माहिती या पत्रात असते.

**धारा ऑईल लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय : ६४ धारा भवन, पिंपरी रोड,
पुणे ४११ ०१८

CIN : L3M H9P LC6

फोन : ०२०-६५२५४०२३
फॅक्स : ०२०-४९३९६४२३
संदर्भ क्र. : डी/डीईपी/१६/१९-२०

Website : dharaoillimited.com
E-mail : dhara6@gmail.com
दिनांक : १३ नोव्हेंबर, २०१९

श्री. रविंद्र खन्ना
सी १५, स्वामी अपार्टमेंट, नारायण पेठ,
पुणे - ४११ ०३०

**विषय : ठेव रक्कम परत करण्याबाबत.**

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, १ डिसेंबर २०१७ रोजी आपणाकडून प्राप्त झालेली ठेव रक्कम रु. १,००,००० (अक्षरी रु. एक लाख) ठेव पावती क्र. ५९२५ या ठेवीची मुदत ३० नोव्हेंबर २०१९ पर्यंत आहे.

ठेव परतफेडीसाठी आपणाकडून मूळ ठेव पावती क्र. ५९२५ प्राप्त झाली. १२ नोव्हेंबर २०१९ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत ठेवीच्या परतफेडीचा ठराव मंजूर करण्यात आला.

ठेव परतफेडीचा तपशील खालीलप्रमाणे-

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ठेवीचा कालावधी | मुदत ठेव पावती क्र. | ठेव रक्कम (₹) | व्याजाचा दर (१०%) | मुदत समाप्ती अवधी रक्कम रु. | टी.डी. एस. (१०%) | निव्वळ रक्कम (₹) | मुदत समाप्ती दिनांक |
| २ वर्षे | ५९२५ | १,००,००० | २०,००० | १,२०,००० | २,००० | १,१८,००० | ३० नोव्हें. २०१९ |

३० नोव्हेंबर २०१९ रोजी बँक ऑफ महाराष्ट्र शिवाजी नगर, पुणे ४११ ००५ या शाखेवर काढलेला ४२६०२५ क्रमांकाला रु. १,१८,०००/- (अक्षरी रु. एक लाख अठरा हजार) चा रेखांकित धनादेश सोबत जोडला आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
धारा ऑईल लिमिटेड करिता

सही
(श्री. अशोक भट्टड)
कंपनी चिटणीस

सोबत : रेखांकित धनादेश क्र. ४२६०२५

## सारांश

- कंपनीमध्ये ठेवीदारांची भूमिका ही धनको म्हणून असते. ते कंपनीला अल्पमुदतीचा वित्त पुरवठा करतात. ठेवीच्या स्वरूपात केलेल्या गुंतवणुकीवर ठेवीदारांना व्याजाच्या स्वरूपात मोबदला मिळतो.
- ठेवीदारांना कंपनीच्या सभांना हजर राहण्याचा व सभेत मतदान करण्याचा तसेच व्यवस्थापनात सहभागी होण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. कंपनीची कोणतीही मालमत्ता तारण न घेता ते कंपनीस अल्प मुदतीचा वित्त पुरवठा करतात.
- कंपनीच्या चिटणिसाला ठेवीदारांशी, ठेव ठेवल्याबाबत आभार मानणे, ठेवीवर व्याज देणे, ठेवीचे नूतनीकरण करणे आणि ठेवीची मुदत संपताच ठेवीवर परतफेड करणे इत्यादी प्रसंगी पत्रव्यवहार करावा लागतो. ठेवीदारांशी पत्रव्यवहार करताना चिटणिसाला कायदेशीर तरतुदी, नम्रता, तत्परता, नावलौकिक, अचूकता, गोपनीयता, इत्यादी मुद्दे विचारात घ्यावे लागतात.
- ठेवीची मुदत संपताच ठेवीदारास ठेवीचे नूतनीकरण करता येते. ठेवीची परतफेड कंपनी परतफेडीच्या अटी व नियमानुसार करते.

## स्वाध्याय

**प्र.क्र. १ अ) खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१) ठेवीदार कंपनीचे .................... असतात.
अ) सभासद  ब) धनको  क) ऋणको

२) ठेवीदार कंपनीला .................... भांडवल पुरवितात.
अ) अल्प मुदतीचे  ब) दीर्घ मुदतीचे  क) मध्यम मुदतीचे

३) कंपनीला जास्तीत जास्त .......... महिने मुदतीच्या ठेवी स्वीकारता येतात.
अ) २४  ब) ३६  क) ४५

४) कंपनी कमीतकमी ......... महिने मुदतीपेक्षा कमी कालावधीच्या ठेवी स्वीकारू शकत नाही.
अ) ६  ब) ३  क) ५

५) ठेवी हे कंपनीचे .................... प्रकारचे कर्ज आहे.
अ) स्थिर  ब) अल्प मुदत  क) दीर्घ मुदत

६) सार्वजनिक ठेवी या .................... भांडवलाची गरज पूर्ण करण्यासाठी स्वीकारल्या जातात.
अ) स्थिर  ब) खेळत्या  क) मालकीच्या

७) .................... ला जनतेकडून ठेवी मागविण्याचा अधिकार आहे.
अ) भागधारक  ब) अंकेक्षक  क) संचालक मंडळ

८) ठेवीवरील व्याज दर .................... असतो.
अ) स्थिर  ब) बदलता  क) माफक

९) ठेवीच्या गुंतवणुकीवर पैशाच्या स्वरूपात दिल्या जाणाऱ्या परताव्यास .................... म्हणतात.
अ) लाभांश  ब) व्याज  क) सूट

**ब) जोड्या जुळवा.**

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | ठेवीदार | १) | स्थिर |
| ब) | ठेवीवरील व्याज दर | २) | मालकी हक्काचा पुरावा |
| क) | ठेव पावती | ३) | ऋणको |
| | | ४) | धनको |
| | | ५) | ठेवीचा पुरावा |
| | | ६) | बदलता |

**क) खालील प्रत्येक विधानासाठी एक शब्द किंवा शब्दसमूह किंवा संज्ञा लिहा.**

१) ठेवीवरील दिला जाणारा परतावा.

२) ठेवीवरील व्याज देण्यासाठी वापरला जाणारा दस्तावेज.

३) मुदत ठेव स्वीकारल्याबद्दल कंपनीने दिलेली पावती.

४) ठेवीची मुदत संपल्यानंतर ठेवी परत करणे.

५) ठेवीचा जास्तीतजास्त कालावधी.

**ड) खालील विधाने बरोबर की चूक ते लिहा.**

१) ठेव ही कंपनीसाठी अल्पमुदतीचा वित्तीय स्रोत आहे.

२) ठेवीदार हे कंपनीचे धनको असतात.

३) कायदेशिररित्या जाहिरातीशिवाय कंपनी जनतेकडून ठेवी स्वीकारू शकते.

४) ठेवीदारांना लाभांश मिळण्याचा अधिकार असतो.

५) खाजगी कंपनी आम जनतेकडून ठेवी स्वीकारू शकत नाही.

६) ठेवीदारांना मतदानाचे हक्क दिले जातात.

**इ) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) लाभांश, ठेवीदार, ठेव पावती

२) विश्वस्त करार, ठेवीदार, ठेव पावती

**फ) खालील विधाने पूर्ण करा.**

१) ठेवीदार हे कंपनीचे .................... असतात.

२) ठेवीदारांनी काळजीपूर्वक व दक्षतापूर्वक पत्रव्यवहार .................... याला करावा लागतो.

३) ठेवी हा कंपनी भांडवल उभारणीचा .................... मुदतीचा स्रोत आहे.

४) कंपनीला किमान .................... महिने मुदतीपर्यंतच्या ठेवी स्विकारता येतात.

५) निश्चित दराने .................... मिळण्याचा अधिकार ठेवीदारांना असतो.

**ग) कंसातील अचूक पर्याय निवडा.**

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | ठेवीदार | १) | ................................................ |
| ब) | ठेवीवरील परतावा | २) | ................................................ |
| क) | ......................................... | ३) | ठेवीची जास्तीत जास्त मुदत |
| ड) | ठेवीची कमीत कमी मुदत | ४) | ................................................ |

(व्याज, कंपनीचा धनको, ३६ महिने, ६ महिने)

**ह) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) ठेवीदार कोणास म्हणतात?

२) ठेवीवरील परतावा म्हणून काय दिले जाते?

३) व्याज अधिपत्र म्हणजे काय?

४) ठेवीचे नूतनीकरण म्हणजे काय?

५) ठेव नूतनीकरण पत्रासोबत कोणता दस्तावेज जोडला जातो?

६) कंपनी ठेवीची परतफेड केव्हा करते?

७) ठेवीचा कमीतकमी आणि जास्तीतजास्त कालखंड किती असतो?

**ई) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१) ठेवीदार हे कंपनीचे <u>मालक</u> असतात.

२) ठेवी हा वित्त पुरवठ्याचा <u>अंतर्गत</u> मार्ग आहे.

३) ठेवी <u>दीर्घ</u> मुदतीसाठीचा भांडवलाचा मार्ग आहे.

४) ठेवीदारांना <u>लाभांश</u> मिळण्याचा हक्क आहे.

**ज) योग्य क्रम लावा.**

१) अ) ठेवीचे नूतनीकरण
ब) ठेवीची स्वीकृती
क) ठेव पावती

२) अ) देय व्याज
ब) ठेव पावती
क) ठेवीची स्वीकृती

**प्र.क्र. २) खालील संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा.**

१) ठेवीदार
२) ठेव
३) ठेवीवरील व्याज
४) ठेव पावती
५) ठेवीचे नूतनीकरण
६) ठेवीची परतफेड

**प्र.क्र. ३) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) ठेवीदारांशी पत्रव्यवहार करताना चिटणिसाला कोणत्या दक्षता घ्यावा लागतात.

२) चिटणिसाला ठेवीदाराशी कोणकोणत्या प्रसंगी पत्रव्यवहार करावा लागतो.

**प्र.क्र. ४) खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१) कंपनी चिटणिसाने ठेवीदाराशी पत्रव्यवहार करताना घ्यावयाची काळजी.

२) ठेवीदाराशी पत्रव्यवहार करावयाचे प्रसंग.

**प्र.क्र. ५) खालील प्रश्न सोडवा.**

१) ठेवीदारास ठेव ठेवल्याबद्दल आभाराचे पत्र लिहा.

२) ठेवीदारास व्याज अधिपत्राद्वारे ठेवीवरील व्याज दिल्याविषयीचे पत्र लिहा.

३) ठेवीदारास ठेवीचे नूतनीकरण केल्याबाबतचे पत्र लिहा.

४) ठेवीदारास ठेव परतफेडीबाबत पत्र लिहा.

५) इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे ठेवीवरील व्याज दिल्याबाबतचे पत्र ठेवीदारास लिहा.

❑❑❑

# ९ भागपेढी पद्धती

९.१ **भागपेढी पद्धती – अर्थ**
९.२ **भागपेढी पद्धतीचे महत्त्व**
९.३ **भागपेढी पद्धतीचे फायदे**
९.४ **भागपेढी पद्धतीचे घटक**
९.५ **भागपेढी संबंधित संकल्पना/संज्ञा**
९.६ **भागपेढी पद्धतीची कार्यपद्धती**
९.६.१ डिमॅट प्रक्रिया
९.६.२ आयपीओ संदर्भात
९.६.३ हस्तांतरण बाबतीत
अ) ऑफ मार्केट ब) मार्केट
९.७ **भारतातील भागपेढी –** अ) एनएसडीएल ब) सीडीएसएल
९.८ **फरक**

## प्रस्तावना

प्रतिभूती दोन प्रकारे धारण केल्या जाऊ शकतात.

अ) भौतिक ब) इलेक्ट्रॉनिक/डिमटेरियलाईज

*प्रतिभूती म्हणजे भाग, कर्जरोखे, बंधपत्रे, म्युच्युअल फंडांचे युनिट्स, सरकारी रोखे इत्यादी.*

(अ) **भौतिक स्वरूपातील प्रतिभूती :** याचा अर्थ प्रतिभूती कागदी प्रमाणपत्राच्या स्वरूपात धारण केल्या जातात. भौतिक स्वरूपात प्रतिभूती धारण करण्यातील अडचणी पुढीलप्रमाणे :

१) **जोखीम :** कागदी स्वरूपातील दाखले गहाळ होऊ शकतात, खराब होऊ शकतात, फाटू शकतात, चोरी होऊ शकतात, हाताळताना चुकीच्या ठिकाणी जाऊ शकतात, इत्यादी.

२) **दुय्यम प्रतिसाठी प्रयत्न :** नक्कल दाखल्याच्या प्रती मिळविण्यासाठी वेळ प्रयत्न व पैसा खर्च होतो.

३) **प्रतिभूती वाटपामध्ये विलंब :** नवीन प्रतिभूतीचे वाटप करावयाचे असल्यास त्या वाटपास अधिक विलंब लागतो.

४) **प्रतिभूतीचे हस्तांतरण आणि संक्रमण करण्यास विलंब :** प्रतिभूतीचे हस्तांतरण आणि संक्रमण करताना भौतिक दाखल्याची प्रत्यक्ष हाताळणी करण्यामुळे विलंब होतो.

५) **अयोग्य वितरणाचा धोका (Bad Delivery) :** प्रतिभूतींच्या खरेदी विक्रीच्या वेळी ते फाटलेले असू शकते, बनावटी असू शकते किंवा चुकीचे प्रमाणपत्रही असू शकते इत्यादी.

भारताच्या वेगवान उदयोन्मुख अर्थव्यवस्थेत भाग बाजाराची महत्त्वाची भूमिका असून ती जुन्या संकल्पनांवर आधारित असू शकत नाही आणि म्हणून १९९६ मध्ये डिपॉझिटरी पद्धती आणली. ज्यामध्ये प्रतिभूती इलेक्ट्रॉनिक स्वरूपात धारण केल्या जातात.

(ब) **इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रतिभूती :** कागद विरहित किंवा इलेक्ट्रॉनिक किंवा डिमटेरियलाईज स्वरूपात प्रतिभूती धारण करण्याची ही भागपेढी (Depository) पद्धती आहे.

डिपॉझिटरी पद्धती विषयी या पाठामध्ये स्पष्टीकरण करण्यात आले आहे.

## ९.१ भागपेढी पद्धती – अर्थ

प्रतिभूती ठेवण्याचे मध्यवर्ती ठिकाण अशी केली आहे. डिपॉझिटरी ही अशी संस्था आहे जी प्रतिभूतीची मालकी सभासदाच्या वतीने इलेक्ट्रॉनिक पद्धतीने हस्तांतरित करते ही अशी संस्था आहे जी गुंतवणुकदाराच्या विनंतीनुसार प्रतिभूती इलेक्ट्रॉनिक पद्धतीत ठेवते आणि प्रतिभूतीच्या व्यवहारासंबंधी सेवा पुरवते.

प्रथम डिपॉझिटरीची स्थापना १९४७ मध्ये जर्मनी येथे झाली. भारतात डिपॉझिटरी कायदा १९९६ मध्ये संमत करण्यात आला. भारतीय अर्थव्यवस्थेच्या उदारीकरणाच्या धोरणामुळे व १९९१ पासूनच्या आर्थिक क्षेत्रातील सुधारणांमुळे भारतीय भांडवल बाजार बराच वाढला आहे. आधुनिक आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धात्मक प्रणालींमध्ये सुधारणा करून अर्थव्यवस्था बळकट करण्याची गरज होती. भारतात प्रतिस्पर्धी बहु डिपॉझिटरी पद्धतीचा स्वीकार केला आहे.

भारतातील दोन डिपॉझिटरी – एनएसडीएल व सीडीएसएल

- डिपॉझिटरी पद्धती व बँकिंग पद्धती चांगल्या प्रकारे समजण्यास मदत होईल.

| डिपॉझिटरी पद्धती | बँकिंग पद्धती |
|---|---|
| १. या पद्धतीत प्रतिभूती सुरक्षित ठेवल्या जातात. | १. हे रक्कम/पैसे सुरक्षित ठेवते. |
| २. त्या विशिष्ट ओळख क्रमांक असलेल्या डिमॅट खात्यामध्ये ठेवल्या जातात. | २. खातेदाराची खाती असलेल्या खात्यात ज्यास विशिष्ट क्रमांक आहे, त्यामध्ये रक्कम/पैसा असतो. |
| ३. वाटप व हस्तांतरणादरम्यान प्रतिभूतीची कोणतीही भौतिक हाताळणी होत नाही. | ३. पैशाची कोणतीही भौतिक हाताळणी होत नाही. |
| ४. खात्यामधील प्रतिभूतीचे हस्तांतरण नोंदी करून केले जाते. | ४. खात्यांमधील रकमेचे अन्यत्र हस्तांतरण हे नोंदी करून केले जाते. |

भागपेढी पद्धतीमध्ये डिपॉझिटरी ही इलेक्ट्रॉनिक स्वरूपात भाग सुरक्षित ठेवणारी परिरक्षक (Custodian) असते आणि भागपेढीचा प्रतिनिधी (Depository participant) ही गुंतवणूकदार आणि भागपेढीमधील मध्यस्थ/दुवा म्हणून कार्य करते.

## ९.२ भागपेढी पद्धतीचे महत्त्व

भांडवल बाजाराच्या यशस्वी कार्यामध्ये डिपॉझिटरी ही महत्त्वाची भूमिका बजावते. ते खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.

१) कागदी स्वरूपातील प्रतिभूती पद्धतीमध्ये असणाऱ्या जटील आणि जास्त संख्येने कागदपत्रे हाताळण्याची समस्या दूर करते.

२) अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कागदविरहित व्यापाराची संधी देते.

३) प्रमाणपत्र साठवणे/सांभाळणे आणि हाताळणे यातून सुटका होते.

४) भौतिक स्वरूपातील प्रतिभूती प्रमाणपत्र सांभाळणे व हाताळणे यावरील खर्च व श्रम यामध्ये बचत होते.

## ९.३ भागपेढी पद्धतीचे लाभ/फायदे

### अ) गुंतवणूकदाराच्या दृष्टीने :

**१) जोखमीचे निर्मूलन :** भौतिक प्रमाणपत्रासंबंधीच्या सर्व जोखमीचे निर्मूलन होते जसे, विलंब, गहाळ होणे, चोरीस जाणे, खराब हाताळणी, इत्यादी.

**२) सुरक्षितता :** भांडवल बाजारातील प्रतिभूती हाताळणी करण्याचा हा सर्वांत सुरक्षित मार्ग आहे. संपूर्ण पद्धती डिपॉझिटरी कायद्याअंतर्गत कार्य करते आणि सेबीद्वारे परीक्षण केले जाते. उदा. गुंतवणूकदार त्याचे खाते फ्रीज (Freeze) मोडमध्ये ठेवण्याची सूचना डिपॉझिटरी पार्टिसिपंटला देऊन अनपेक्षित जमा प्रतिभूतींच्या नावे टाळू शकतो.

**३) सोपे भाग हस्तांतरण :**

(अ) हस्तांतरण अर्ज भरणे व सादर करणे आवश्यक नसते.

(ब) तसेच भौतिक स्वरूपात भाग हस्तांतरणावर असलेले मुद्रांक शुल्क लागू नाही.

(क) प्रतिभूतीच्या हस्तांतरणाच्या प्रक्रियेचा कालावधी कमी केला जातो आणि प्रतिभूती व रोख रक्कम अनावश्यकपणे अधिक काळ गुंतून राहत नाही.

४) **खात्यावरील अद्ययावत माहिती व सूचना :** गुंतवणूकदारास डी.पी.द्वारे तसेच डिपॉझिटरीद्वारे धारण केलेल्या प्रतिभूतींची आणि व्यवहाराच्या स्थितीची माहिती दिली जाते.

५) **कर्जास तारण :** डिमॅट प्रतिभूती बँक आणि वित्तीय संस्था कर्जासाठी तारण म्हणून अग्रक्रमाने स्वीकारतात आणि व्याज आकारणीचा दर देखील कमी असतो.

६) **संच खरेदीची आवश्यकता नाही :** सम आणि व्यस्तसंच (lots) स्वरूपात भागधारण करण्याची पद्धती नष्ट करते.

७) **नामनिर्देशन सुविधा :** वैयक्तिक गुंतवणूकदार नामनिर्देशन सुविधेचा लाभ घेऊ शकतात त्यामुळे गुंतणूकदाराचा मृत्यू झाल्यास वारस नोंद प्रक्रिया सुलभ होते.

८) **स्वचलित जमा नावे :** प्रतिभूतीवर परिणाम करणाऱ्या कंपनीने केलेल्या बदलाच्या कृतीच्या बाबतीत गुंतवणूकदाराचे खाते आपोआप जमा नावे केले जाते. यालाच 'व्यवसायिक कृती' (Corporate action) म्हणतात. कॉर्पोरेट ॲक्शनची काही उदाहरणे : लाभांश वाटप, बोनस भाग वाटप, हक्कभाग वाटप, मुदती पूर्वीच कर्जरोख्याची परतफेड, विलीनीकरण आणि अधिग्रहण, इत्यादी.

### ब) कंपनीच्या दृष्टीने :

१) **अद्ययावत महिती :** गुंतवणूकदारांविषयी अद्ययावत माहिती डिपॉझिटरीद्वारे पुरवली जाते.

२) **खर्च व श्रम याची बचत :** नवीन प्रतिभूती वाटप, बोनस वाटप, हस्तांतरण, इत्यादीचे वेळी प्रमाणपत्र मुद्रणासाठी व वितरणात येणारा खर्च, वेळ श्रम कमी होतात.

३) **उत्तम गुंतवणूकदार व कंपनी नातेसंबंध :** कंपनी संबंधी प्रमाणपत्रे गहाळ झाल्यामुळे, स्वाक्षरीत फरक पडल्यामुळे, येणाऱ्या तक्रारी व विनंती निवारणामध्ये जाणारा वेळ वाचतो. गुंतवणूकदारांशी अधिक चांगले संप्रेषण होऊन कंपनीची पत वाढते.

४) **आंतराष्ट्रीय गुंतवणूक :** चांगल्या आणि जलद सेवा देऊन परदेशी गुंतवणूक आकर्षित करता येते.

## ९.४ भागपेढी पद्धतीचे घटक :

भागपेढी पद्धती खालील घटकाच्या मदतीने कार्यान्वित होते.

**डिपॉझिटरी प्रणालीचे घटक**

- डिपॉझिटरी
- डिपॉझिटरी पार्टिसिपंट (डीपी)
- बेनिफिशियल ओनर (बीओ)
- कंपनी

### १) भागपेढी :

१) भागपेढी ही मध्यवर्ती बँकेसारखी एक संस्था आहे जिथे गुंतवणुकदाराच्या विनंतीनुसार प्रतिभूती इलेक्ट्रॉनिक स्वरूपात ठेवल्या जातात.

२) अशा प्रतिभूतींच्या व्यवहाराशी संबंधित वेगवेगळ्या सेवा पुरवतात.

३) गुंतवणूकदारांच्या प्रतिभूती सुरक्षित ठेवण्यासाठी डिपॉझिटरी जबाबदार आहे.

४ ) डिपॉझिटरीबरोबर गुंतवणूकदारांचा थेट संबंध/व्यवहार नसतो.

५ ) डिपॉझिटरी ही कंपनी व गुंतवणूकदार यांच्यात दुवा म्हणून कार्य करते.

**अधिक माहिती**

**भारतातील भागपेढी :**

१) सेबीकडे नोंदणी झालेल्या NSDL व CDSL या दोन डिपॉझिटरी संस्था आहेत.

२) कंपनी कायद्याखाली डिपॉझिटरीची 'कंपनी' म्हणून नोंदणी झालेली असते.

३) सेबी कायदा १९९२ नुसार डिपॉझिटरी म्हणून नोंदणीकृत असणे आवश्यक आहे व सेबीकडून व्यवसाय प्रारंभ प्रमाणपत्र घ्यावे लागते.

४) सेबीच्या पूर्वमान्यतेसह पोटनियम/नियमावली तयार करावे लागतात.

५) डिपॉझिटरी सेवा पुरविण्यासाठी एकापेक्षा अधिक डी.पी. शी करार केले पाहिजेत.

६) सेबीच्या सर्वोत्तम निर्देशन व समाधानासाठी व्यवहारातील आवश्यक माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी आणि व्यवहाराची अयोग्य हाताळणी रोखण्यासाठी पुरेशी यंत्रणा उपलब्ध असली पाहिजे.

७) डिपॉझिटरी पुढीलपैकी एक किंवा अधिक संस्थांनी स्थापन केली पाहिजे.

अ) सार्वजनिक वित्तीय संस्था

ब) बँक

क) विदेशी बँक

ड) मान्यताप्राप्त भाग बाजार

ई) वित्तीय सेवा देणारी व्यावसायिक संस्था/कंपनी

फ) विदेशात स्थापन झालेली किंवा मान्यताप्राप्त असलेली प्रतिभूती बाजारात परिरक्षक, शोधन किंवा व्यवहार पूर्ण करण्यासंबंधी सेवा देणारी केंद्र शासन मान्यताप्राप्त व्यवसायिक संस्था.

ग) वित्त सेवा पुरविणारी विदेशात स्थापन झालेली व केंद्र शासन मान्यताप्राप्त संस्था.

८) डिपॉझिटरी ही गुंतवणूकदारांच्या (लाभप्रद मालकाच्या) वतीने प्रतिभूतीची नोंदलेली मालक असते व त्यांच्या वतीने प्रतिभूतीचे हस्तांतरण करते.

९) डिपॉझिटरीची कायदेशीर चौकट

अ) सेबी कायदा १९९२

ब) सेबी (भागपेढी व प्रतिनिधी) सुधारणा नियमन २०१२

क) भागपेढीची नियमावली

ड) कंपनी कायदा.

**२) डिपॉझिटरी पार्टिसिपंट (डी. पी.) / भागपेढीचा प्रतिनिधी**

१) ही डिपॉझिटरीची प्रतिनिधी असते.

२) सेबी कायद्यान्वये डिपॉझिटरी पार्टिसिपंट ही नोंदणीकृत असते. सेबी अधिनियम (डिपॉझिटरी ॲन्ड पार्टिसिपंट) १९९६ अंतर्गत नमूद केलेले अधिकार व जबाबदाऱ्या प्राप्त असतात.

३) डिपॉझिटरीद्वारे नियुक्त मध्यस्थ म्हणून डी. पी. काम करते.

४) डिपॉझिटरी व गुंतवणूकदार यांच्यामधील दुवा म्हणून डी.पी. काम करते.

५) हे थेट ग्राहकाशी व्यवहार करते हे वेळोवेळी खात्याचे विवरण पाठवते.

६) याची कार्ये प्रतिकृती बँकेत सुरक्षित आहेत. प्रतिभूतीची बँक म्हणून डी. पी. चे कार्य असते.

७) हा डिमटेरियलायझेशन सुलभ करतो.

८) हक्कभाग, बोनसभाग इत्यादी वाटपाच्या वेळी डी. पी. कडून प्रतिभूती डिमॅट खात्यात जमा केल्या जातात.

९) दिलेला लाभांश, व्याज इत्यादी पटकन जमा करण्याचे काम डी. पी. कडून होते.

१०) इलेक्ट्रॉनिक पद्धतीने व्यवहार पूर्तता डी. पी. करते.

११) डी. पी. म्हणून खालील संस्था कार्य करतात.

अ) वित्तीय संस्था

ब) बँका

क) मान्यताप्राप्त विदेशी बँक

ड) परिरक्षक (Custodian)

ई) भागदलाल

फ) शोधन व्यवसाय संस्था (Clearing Corporation)

ग) बिगर बँकिंग वित्त पुरवठा संस्था (NBFC)

ह) भागविक्री निबंधक संस्था/भाग हस्तांतर नोंदणी संस्था (Share Transfer Agent)

१२) प्रत्येक गुंतवणूकदाराच्या प्रतिभूती (Registrar to an issue) डिमॅट खात्याची डी. पी. नोंद ठेवते.

१३) डी.पी ला अद्वितीय ओळख क्रमांक असतो.

### ३) बेनिफिशयल ओनर (बी. ओ.)

१) बी. ओ. हा प्रतिभूतीचा गुंतवणूकदार आहे. ज्यांनी डिपॉझिटरीच्या सेवेचा लाभ घेतला आहे.

२) डिपॉझिटरीने धारण केलेल्या प्रतिभूतीवरील बी.ओ.चे सर्व हक्क, फायदे हे प्रतिभूती संदर्भात असलेल्या जबाबदाऱ्यांना आधिन राहून असतात.

३) बी. ओ. हा गुंतवणूकदार आहे ज्याचे नावे इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रतिभूती ठेवण्याच्या उद्देशाने डिपॉझिटरीमध्ये डिमॅट खाते उघडले जाते. डी. पी. कडून मिळणाऱ्या सेवेसाठी बी. ओ. सेवा शुल्क देत असतो.

४) बी. ओ.ना डिपॉझिटरी आणि डी.पी.चा ग्राहक देखील म्हटले जाऊ शकते.

५) बी. ओ.ला विशिष्ट खाते क्रमांक दिलेला असतो ज्यामध्ये प्रतिभूती ठेवल्या जातात.

### ४) इश्युअर कंपनी

१) याचा अर्थ अशी कंपनी जिने प्रतिभूतीचे डिमॅटीकरण केले आहे.

२) कंपनीने डिपॉझिटरीकडे नोंदणी करणे आवश्यक आहे.

## ९.५ भागपेढी पद्धतीच्या संबंधित संकल्पना/संज्ञा

भागपेढी पद्धतीला अधिक स्पष्टपणे समजण्यासाठी काही संकल्पना स्पष्ट करणे आवश्यक आहे.

१) **डिमटेरियलायझेशन – (डिमॅट)** – ही अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे नोंदणीकृत डी.पी.कडे भौतिक प्रमाणपत्रे देऊन इलेक्ट्रॉनिक स्वरूपात रूपांतरित केली जातात. गुंतवणूकदाराने भरलेला DRF डिमॅट विनंती अर्ज डी. पी. कडे व डिपॉझिटरीकडे पाठविला जातो व त्याच्या मान्यतेनंतर डिपॉझिटरी डी. पी. कडे डिमॅट खात्यात प्रतिभूती जमा करते.

२) **रिमटेरियलायझेशन (रिमॅट)** – ही अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रतिभूतीचे भौतिक कागद स्वरूपातील प्रमाणपत्रात रूपांतरण केले जाते. ग्राहकास आर.आर.एफ (RRF) च्या स्वरूपात लेखी विनंती इन्श्युअर कंपनीला आणि डिपॉझिटरीला पाठविले जाते. इश्युअर कंपनी प्रमाणपत्रे, मुद्रित करते आणि ग्राहकाला पाठवते आणि त्याच वेळी डिपॉझिटरीला रिमॅट विनंती मान्य केल्याची पृष्टी करते. डिपॉझिटरी ही डिपीद्वारे त्या प्रतिभूतीचे खाते नावे करते.

३) **फंगिबिलीटी (Fungibility)** – वित्तीय संज्ञेनुसार फंगिबिलीटी म्हणजे अदलाबदल करता येण्याजोगे काही वित्तीय मालमत्ता फंगिबिल असतात तर काही फंगिबिल नसतात.

उदाहरणार्थ –

अ) जमीन ही फंगिबल नाही कारण प्रत्येक जागेला विशिष्ट गुणवत्ता असते. त्यामुळे त्याचे मूल्य कमी अधिक होते.

ब) चलनी नोटा या फंगिबल असतात. एकाच मूल्याच्या दोन चलनी नोटांमध्ये भिन्नता नसते.

डिपॉझिटरीमध्ये सर्व प्रतिभूती फंगिबल असतात. डिमॅट केलेल्या प्रतिभूतींना विशिष्ट क्रमांक नसतात. त्यास वेगळे प्रमाणपत्र नसते. कंपनीने वाटप केलेले समान प्रकारच्या समान मूल्याच्या प्रतिभूती या समान असतात त्याची मालकी कोणाकडेही असली तरी इलेक्ट्रॉनिक डिमॅट स्वरूपातील प्रतिभूती या अदलाबदल करता येणाऱ्या, एक दुसऱ्याला पर्यायी असतात आणि त्या एक दुसऱ्यापासून भिन्न नसतात.

४) **आय एस आय एन (ISIN) (इंटरनॅशनल सिक्युरिटीज आयडेंटीफिकेशन नंबर) –**

१) हा प्रतिभूतीचा सांकेतांक असतो ज्याने विशिष्ट प्रतिभूती ओळखली जाते.

२) त्या-त्या देशातील NNA (नॅशनल नंबरिंग एजन्सी) कडून कंपनीच्या प्रतिभूतींना ISIN दिले जातात.

३) आय.एस.आय.एन. ही मानक क्रमांकन प्रणाली आहे ज्याला जागतिक मान्यता आहे.

४) आय.एस.ओ. (ISO) (इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ स्टॅन्डर्डलायझेशन) हे आय एस आय एन ची रचना परिभाषित करते.

५) भारतामध्ये आय एस आय एन चे कार्य सेबीने एन एस डी एल ला प्रदान केले आहे. भारतामध्ये सेबी NNA ची भूमिका बजावते.

६) रिझर्व बँक ऑफ इंडिया ही सरकारी प्रतिभूतीसाठी आय एस आय एन वाटप करते.

७) आय एस आय एन (ISIN) हा १२ अंकी वर्णांक (alpha-numeric) सांकेतांक असतो. जो तीन गटात विभागलेला असतो.

८) कंपनीला तिच्या प्रतिभूतीसाठी आय एस आय एन साठी आवश्यक दस्तावेज जसे : माहितीपत्रक सादर करावे लागते.

**अधिक माहिती**

**(ISIN) :** १) हा १२ वर्णांक ओळख क्रमांक असतो.

२) याचे तीन घटक आहेत – अ) उपसर्ग ब) मूळ क्रमांक क) तपासणी अंक

अ) उपसर्ग : हा दोन अंकी देशाचा सांकेतांक असतो. जो ISO 6 कडून दिला जातो IN हे भारतासाठी.

ब) मूळ क्रमांक : यामध्ये ९ अंक किंवा अक्षर असतात.

क) तपासणी अंक : हे ISIN मधील शेवटचा अंक असून वैधता तपासणीसाठी असते.

**अधिक स्पष्टीकरण :**

१) पहिले दोन वर्ण – देशाच्या सांकेतांकासाठी असतो. उदा. भारतासाठी IN

२) तिसरा वर्ण जे वाटप करणाऱ्या कंपनीचा प्रकार असतो ते पुढील प्रकारे–

| | |
|---|---|
| i) केंद्र सरकार : A | iv) केंद्र शासित प्रदेश : D |
| ii) राज्य सरकार : B | v) कंपनी, नियामक, कंपनी महामंडळ : E |
| iii) महानगरपालिका : C | vi) म्युच्युअल फंड : F |

३) पुढील चौथे ते सातवे स्थानांक (4th to 7th Character) हे कंपनीची ओळख दर्शवितात. यातील चौथे, पाचवे, सहावे स्थानांक (4th, 5th, 6th Character) हे अंक स्वरूपात (numericals) आणि सातवे स्थानांक हे वर्णांक रूपात (Alphabet) असते.

४) ८ वा आणि ९ वा अंक हे प्रतिभूतीचा प्रकार दर्शवते काही प्रतिभूती सांकेतांक खाली दिले आहेत :
प्रतिभूतीचा प्रकार : समहक्क भाग – 1, डाक बचत योजना – 2, अग्रहक्क भाग – 3 कर्जरोखे – 2 , सरकारी प्रतिभूती –4 .

५) १० वा आणि ११ वा अंक हा भागपेढीच्या ISIN पद्धतीत प्रवेश करणाऱ्या इश्युअर कंपनीच्या प्रतिभूतींच्या अनुक्रमाने येणारा क्रमांक असतो.

६) शेवटचा अंक हा तपासणी अंक असतो.

उदा. ISIN मध्ये पुढील प्रकारे सांकेतांक दिला जातो.

INE002A01018 = [IN] [E] [002A] [01] [01] [8]

IN = देशाचा सांकेतांक – भारत India

E = हे वाटप करणारी ही एक कंपनी आहे हे दर्शवते.

002A = कंपनी ओळख

01 = समहक्क भाग

01 = इश्युअर कंपनीच्या प्रतिभूतींना दिलेला अनुक्रमांक नंबर.


8 = तपासणी अंक

## ९.६ भागपेढी पद्धतीची कार्यपद्धती

### ९.६.१ भौतिक स्वरूपातील प्रतिभूतीचे इलेक्ट्रॉनिक स्वरूपात रूपांतर करणे/डिमॅट प्रक्रिया :

१) गुंतवणूकदार हा डीआरएफच्या तीन प्रती आणि भाग प्रमाणपत्र डी.पी.कडे सादर करतो.
२) डी.पी. डिमॅटची विनंती त्यांच्या प्रणालीमध्ये नमूद करते आणि डिपॉझिटरीला डी.आर.एफ. पाठवते.
३) डी.पी. भाग प्रमाणपत्र आणि डी.आर.एफ. इश्युअर कंपनीकडे पाठवते.
४) इश्युअर कंपनी डिमॅटकरणाची तपासणी करते आणि डिपॉझिटरला डिमॅटीकरणासाठी कळविते.
५) डिपॉझिटरी ही आपल्या प्रणालीमध्ये विनंती नमूद करते आणि इश्युअरला पाठवते.
६) डिपॉझिटरी गुंतवणूकदाराच्या लाभप्रद मालकाला डिमॅट खात्यात प्रतिभूती जमा करते आणि डी.पी. ला कळविते.
७) डी.पी. डीमॅट खात्याचा उतारा गुंतवणूकदाराला कळवते.

**उदाहरणासह स्पष्टीकरण (प्रवाह आकृती Flow Diagram)**



### ९.६.२ प्राथमिक समहक्क भाग विक्री (IPO) संदर्भातील भागपेढीची कार्यपद्धती

१) इश्युअर कंपनीला प्रतिभूती मागणी अर्ज गुंतवणूकदाराने (लाभप्रद मालकाने BO) सादर करावा.

२) इश्युअर कंपनीला लाभप्रद मालकासंबंधीच्या माहितीची पडताळणी डिपॉझिटरीकडे करते.


३) लाभप्रद मालकासंबंधी माहितीची पडताळणी करून डिपॉझिटरी आपला अहवाल इश्युअर कंपनीला देते.

४) इश्युअर कंपनी डिपॉझिटरीला भाग वाटपाचा तपशील देते.

५) डिपॉझिटरी लाभप्रद मालकाच्या डिमॅट खात्यात प्रतिभूती इलेक्ट्रॉनिक रूपात जमा करते.

६) डिपॉझिटरी लाभप्रद मालकाच्या डिमॅट खात्यात प्रतिभूती जमा केल्याची माहिती डि. पी. ला कळविते.

७) डीपी लाभप्रद मालकाला/गुंतवणूकदाराला डिमॅट खाते उतारा देते.





### ९.६.३ भागपेढी पद्धतीमधील इलेक्ट्रॉनिक/डिमॅट भागांचे हस्तांतरण

**१) भाग विक्री संदर्भात :** हस्तांतरक किंवा गुंतवणूकदार डीआयएसद्वारे (Delie ry Ia tru tion Slip) भाग विक्रीची संपूर्ण माहिती डी.पी.ला कळवतो. DTS मध्ये विकावयाच्या भागासंबंधीची माहिती त्यावर सही करतो. प्रतिभूतींची विक्री होते आणि व्यवहाराच्या शेवटी गुंतवणूकदाराच्या डिमॅट खात्यातून प्रतिभूती खर्ची टाकल्या जातात. भाग हस्तांतरण हे ऑफ मार्केट ट्रेड किंवा मार्केट ट्रेडमध्ये करता येते.

**अ) ऑफ मार्केट ट्रेड :** असे व्यवहार जे दोघांच्या परस्पर सहमतीने परंतु भाग दलाल, भाग बाजार, भाग समाशोधन गृह अशा कोणाच्याही मध्यस्तीशिवाय केले जातात.

उदा. : कायदेशीर हस्तांतरण, भेट, ग्राहक आणि उपदलाल यांच्यातील प्रतिभूतीचे स्थलांतर नोंद नसलेल्या प्रतिभूतीचे व्यवहार.




**प्रक्रिया :**

१) हस्तांतरक म्हणजे विक्रेता – हा डीपीला हस्तांतरणाची सूचना देतो म्हणजे खरेदीदाराच्या खात्याची माहिती डीपीला देतो.

२) डीपी डिपॉझिटरीच्या पुष्टीनंतर प्रतिभूती खरेदीदाराच्या म्हणजे हस्तांतरितीच्या खात्यामध्ये जमा करते.

३) खरेदीदार विक्रेत्याला थेट पैसे देतो.

**ब) मार्केट ट्रेड –** शोधन संस्थाद्वारे जे व्यवहार पूर्ण केले जातात त्यास मार्केट ट्रेड असे म्हणतात. हे व्यवहार भाग बाजारात दलालामार्फत केले जातात.




**प्रक्रिया :**

१) हस्तांतरक हस्तांतरणाची सूचना डीपीला देतो तर हस्तांतरकाच्या खात्यातून प्रतिभूती हस्तांतरकाच्या दलालाच्या खात्यात जमा होतात.

२) हस्तांतरकाच्या दलालाच्या खात्यातून भाग बाजाराच्या शोधन कक्षाच्या खात्यात वितरण सूचनेनुसार प्रतिभूती जमा केल्या जातात.

३) निधी देय दिवस–प्रतिभूती शोधन कक्षाच्या खात्यातून खरेदीदाराच्या दलालाच्या प्रतिभूती खात्यात जमा होतात.

४) त्यानंतर डिपॉझिटरीच्या मान्यतेनुसार प्रतिभूती खरेदीदाराच्या खात्यात जमा होतात.

२) **भाग खरेदी संदर्भात :** भाग खरेदीदार/हस्तांतरी आपल्या डी. पी. ला खरेदी केलेल्या भागांच्या तपशीलाबाबत माहिती कळवितो. डिपॉझिटरी योग्य कार्यवाहीनंतर डी. पी. ला भाग हस्तांतरीच्या खात्यात भाग जमा करण्यास सांगते. डी. पी. गुंतवणूकदाराच्या खात्यात भाग खरेदी/विक्रीच्या पुस्तकी नोंदी पूर्ण करते.

## ९.७ भारतातील भागपेढी

डिपॉझिटरी कायदा १९९६ मुळे भारतात डिपॉझिटरी स्थापनेचा मार्ग खुला झाला. भारतात दोन डिपॉझिटरीज आहेत.

अ) एनएसडीएल ब) सीडीएसएल या दोन संघटनेची माहिती घेऊ या.

**अ) एनएसडीएल –** (नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड)

१) याची नोव्हेंबर १९९६ मध्ये स्थापना करण्यात आली. ही भारतातील सर्वात मोठी डिपॉझिटरी आहे.

२) आयडीबीआय – (इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया), युटीआय (युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया) आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एनएसई) मार्फत स्थापना झाली.

३) एनएसडीएल चे मुख्यालय मुंबई येथे आहे.

४) एनएसडीएल ही कंपनी कायद्यानुसार नोंदणीकृत सार्वजनिक मर्यादित कंपनी आहे.

५) एनएसडीएल भांडवल बाजारातील गुंतवणूकदार व इतर घटक जसे भाग बाजार, बँका, इश्युअर कंपनी यांना विविध सेवा प्रदान करते.

६) एनएसडीएल पुढील सेवाही वितरित करतात जसे खात्याची देखभाल डिमटेरियलायझेशन आणि रिमटेरियलायझेशन, व्यवहारांची पूर्तता हस्तांतरण आणि नामनिर्देशन, संक्रमण लाभांश वितरण, गुंतवणूकदाराचे तक्रार निवारण इत्यादी. गुंतवणूकदाराचे खाते फ्रीज/लॉक सेवा देवा, व्यावसायिक संस्थेची कृती (Corporate action) उदा. हक्कभाग, बोनस भाग वाटप इत्यादी करणे.

**ब) सीडीएसएल – सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस लिमिटेड–**

१) सीडीएसएल ने फेब्रुवारी १९९९ मध्ये आपले कामकाज सुरू केले.

२) याचे प्रवर्तन मुंबई भाग बाजाराने (BSE) इतर बँकासोबत केले.

i) याचे मुख्यालय मुंबई येथे आहे.

ii) सीडीएसएल कडे विस्तृत डीपी नेटवर्क आहे आणि देशभरात डिमॅट सेवा उपलब्ध आहेत.

या दोन्ही संस्थांनी भारतात डिपॉझिटरी पद्धतीच्या यशात महत्त्वाची भूमिका साकारली आहे. या दोन्ही प्रक्रिया या एकमेकांच्या अगदी उलट प्रक्रिया आहेत. रिमॅट हे डिमॅटच्या परिणामांच्या उलट आहे.

## ९.८ फरक

**डिमटेरियलायझेशन आणि रिमटेरियलायझेशन**

| मुद्दे | डिमटेरियलायझेशन | रिमटेरियलायझेशन |
|---|---|---|
| १) अर्थ | प्रतिभूतीचे भौतिक प्रमाणपत्राचे इलेक्ट्रॉनिक स्वरूपात रूपांतरित करण्याची ही प्रक्रिया. | प्रतिभूतीचे इलेक्ट्रॉनिक स्वरूपातून भौतिक स्वरूपात रूपांतरित करण्याची ही प्रक्रिया. |
| २) रूपांतर | यामध्ये प्रतिभूतीचे कागदी प्रमाणपत्र स्वरूपातून इलेक्ट्रॉनिक/डिजिटल स्वरूपात रूपांतर केले जाते. | यामध्ये इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रतिभूतीचे भौतिक कागदी स्वरूपात रूपांतर केले जाते. |
| ३) विहित अर्जाचा वापर | यामध्ये (डीआरएफ) डिमॅट विनंती अर्ज गुंतवणूकदार डीपीला डिमटेरियलायझेशन साठी देतो. | यामध्ये (आरआरएफ) रिमॅट विनंती अर्ज गुंतवणूकदार डीपीला रिमटेरियलायझेशनसाठी देतो. |
| ४) क्रम | ही एक प्रारंभिक प्रक्रिया आहे. डिपॉझिटरी पद्धतीचे हे प्राथमिक आणि मुख्य कार्य आहे. | ही एक उलट प्रक्रिया आहे. हे डिपॉझिटरीचे दुय्यम व सहाय्यक कार्य आहे. आधीच डिमॅट केलेल्या प्रतिभूती कागदी स्वरूपात केल्या जातात. |
| ५) प्रतिभूतीची ओळख | डिपॉझिटरी प्रतिभूतीचा परिरक्षक असते आणि नोंदी ठेवते. डिमॅट भागांना स्वतंत्र ओळख क्रमांक नसतात. म्हणजेच डिमॅट भाग फंगीबल असतात. | रिमटेरियलाईज केलेले भाग हे भाग प्रमाणपत्राच्या रूपात असतात आणि त्यांना स्वतंत्र ओळख क्रमांक असतात. |
| ६) सुरक्षितता | डिजीटल स्वरूपामुळे अनेक धोके कमी झाले आहेत. | यामध्ये प्रमाणपत्र गहाळ होणे, फसवणूक इत्यादी अनेक धोक्याचा सामना करावा लागतो. |
| ७) प्रक्रियेतील कठीणता | डिमॅट ही सोपी प्रणाली आहे. तसेच वेळ खाऊ पद्धत नाही. | रिमॅट ही वेळखाऊ आणि गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. |

**टीप :** या दोन्ही प्रक्रिया या एकमेकांच्या अगदी उलट प्रक्रिया आहेत. रिमॅट हे डिमॅटच्या परिणामांच्या उलट आहे.

## सारांश

- प्रतिभूती या (अ) भौतिक स्वरूपात किंवा (ब) इलेक्ट्रॉनिक/डिजिटल/अमूर्त (Dematerialised) स्वरूपात धारण करता येतात.
- भौतिक/कागद स्वरूपात प्रतिभूती धारण करण्यात मर्यादा आहेत. उदा. हाताळणीमध्ये फाटणे, जीर्ण होणे, गहाळ चोरी होणे धोके, हस्तांतरणात विलंब , कष्टांचे वाढते प्रमाण, वेळेच्या व आर्थिक दृष्ट्या खर्चिक इ.
- भागपेढी कायदा 1996 मध्ये संमत व प्रस्थापित करून कागदविरहित प्रतिभूती हाताळणे शक्य/सुरू झाले आहे.
- इश्युअर कंपनी व गूंतवणूकदार यांना भागपेढी पद्धतीमुळे अनेक फायदे होतात.
- भागपेढी पद्धतीचे मुख्य घटक - भागपेढी (Depository) , भागपेढी प्रतिनिधी (D. P.), लाभप्रद मालक (B. O.), आणि इश्युअर कंपनी होय.
- डिमटेरियलायझेशन म्हणजे भौतिक रूपातील प्रतिभूतींचे इलेक्ट्रॉनिक/ अमूर्त स्वरूपात रूपांतर करणे आणि रिमटेरियलायझेशन म्हणजे इलेक्ट्रॉनिक/ अमूर्त रूपातील प्रतिभूतींचे भौतिक कागद स्वरूपात रूपांतर करणे.
- भारतात बहुभागपेढी पद्धती (Multi Depository System) आहे. दोन भागपेढ्या (अ) एन.एस.डी.एल (१९९६) (ब) सी.डी. एस.एल. (१९९९)

## स्वाध्याय

**प्र.क्र. १ अ) खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१) .......... मध्ये कागदी रूपात प्रतिभूती धारण केल्या जातात.

अ) भौतिक स्वरूप ब) डिमटेरियलायझेशन क) डिजिटल

२) ......... पद्धतीमध्ये विद्यमान प्रमाणपत्र गहाळ होण्याचा धोका असतो.

अ) भौतिक ब) डिमटेरियलायझेशन क) डिजीटल

३) भागपेढी पद्धतीमध्ये प्रतिभूती ..........स्वरूपात धारण केल्या जातात.

अ) प्रमाणपत्र आधारित ब) इलेक्ट्रॉनिक क) भौतिक

४) ......... ही प्रतिभूती इलेक्ट्रॉनिक स्वरूपात धारण करणारी संस्था आहे.

अ) डीपी ब) इश्युअर कंपनी क) डिपॉझिटरी

५) जेव्हा प्रतिभूतीचे डिमॅटीकरण केले जाते तेव्हा ......... शुल्क दिले जात नाही.

अ) जकात ब) संपत्तीकर क) मुद्रांक

६) भारतात डिपॉझिटरी कायदा .......... मध्ये समंत झाला.

अ) 1919 ब) 1996 क) 1999

७) भारतात ............. डिपॉझिटरी पद्धती आहे.

अ) एकल ब) बहु क) एक

८) .................. हा डिपॉझिटरी पद्धतीचा घटक आहे.

अ) सरकार ब) इश्युअर कंपनी क) विश्वस्त

९) .................. ही भारतातील सर्वात जुनी डिपॉझिटरी आहे.

अ) डिओ जोन्स ब) एनएसडीएल क) सीडीएसएल

१०) डिमॅट खाते .................. कडून उघडले जाते.

अ) बेनिफिशीअल ओनर　ब) सीडीएसएल　क) सेबी

११) डिमॅट केलेले भाग ................ आहेत.

अ) अहस्तांतरणीय　ब) फंगीबल　क) वाहक

१२) प्रतिभूतींना विशिष्ट ओळख क्रमांक देणे म्हणजे .................. होय.

अ) आयबीएम　ब) बीबीएम　क) आयएसआयएन

१३) भारतात संस्थात्मक प्रतिभूतींना आयएसआयएन ........... कडून दिले जातात.

अ) एनएसडीएल　ब) केंद्र सरकार　क) राज्य सरकार

१४) .................. ISIN साठी आवेदन सादर करावे लागते.

अ) कंपन्यांना　ब) डीपींना　क) डिपॉझिटरीला

१५) .................. यांना डिमॅट खात्याचे शुल्क भरावे लागते.

अ) गुंतवणूकदार　ब) इश्युअर　क) डिपॉझिटरी

१६) एनएसडीएलचे प्रवर्तक .................. होय.

अ) एनएसई　ब) बीएसई　क) एफटीएसई

१७) सीडीएसएलचे प्रवर्तक .................. होय.

अ) एनएसई　ब) बीएसई　क) एफटीएसई

**ब) जोड्या जुळवा.**

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | अनियमित/बनावट हस्तांतरण | १) | १९५६ |
| ब) | भागपेढी कायदा | २) | १२ वर्णांक/सांकेतांक |
| क) | आयएसएयएन | ३) | सरकार आणि बँकेशी संलग्न |
| ड) | डिपॉझिटरी पार्टीसिपंट | ४) | भारतातील दुसरी भागपेढी |
| इ) | सीडीएसएल | ५) | इश्युअर कंपनी |
| फ) | भागपेढी | ६) | भौतिक पद्धतीमधील समस्या |
| ग) | बी ओ/ लाभप्रद मालक | ७) | १० वर्णांक/सांकेतांक |
| | | ८) | भागपेढी आणि गूंतवणूकदार यांना जोडणे |
| | | ९) | जगातील पहिली भागपेढी |
| | | १०) | इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रतिभूतीचा परिरक्षक |
| | | ११) | इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील समस्या |
| | | १२) | १९९६ |
| | | १३) | सरकारी संस्था |
| | | १४) | गुंतवणूकदार |

**क) खालील प्रत्येक विधानासाठी एक शब्द किंवा शब्दसमूह किंवा संज्ञा लिहा.**

१) या स्वरूपातील प्रतिभूती गहाळ व प्रमाणपत्रांची चोरी होऊ शकते.

२) इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रतिभूती सांभाळणारी संस्था.

३) यापद्‌धतीत प्रमाणपत्रांचे संग्रहण नाहीसे होते.

४) ही प्रणाली प्रतिभूती जलद आणि सुलभ हस्तांतरणाची सोय उपलब्ध करते.

५) भारतातील सर्वांत जुनी भागपेढी.

६) या देशात प्रथम डिपॉझिटरी पद्‌धती सुरू झाली.

७) प्रतिभूतीचा नोंदणीकृत मालक.

८) भागपेढीचा मध्यस्त/प्रतिनिधी.

९) ही प्रकिया प्रतिभूतीचे भौतिक स्वरूपातून इलेक्ट्रॉनिक स्वरूपात रूपांतर करते.

१०) ही प्रक्रिया प्रतिभूतीचे इलेक्ट्रॉनिक स्वरूपातून भौतिक स्वरूपात रूपांतर करते.

११) याचा अर्थ प्रतिभूतींना विशिष्ट ओळख क्रमांक नसतो.

१२) डिपॉझिटरी पद्‌धतीमध्ये सुरक्षिततेसाठी प्रतिभूतींना देण्यात आलेला विशिष्ट साकेतांक.

**ड) खालील विधाने बरोबर की चूक ते लिहा.**

१) भौतिक स्वरूपातील प्रतिभूती धारण करणे जोखमीचे आहे.

२) भौतिक स्वरूपातील प्रतिभूती वाटप करण्यात अधिक विलंब लागतो.

३) इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रतिभूती हस्तांतरण करणे सुलभ जाते.

४) डिपॉझिटरी/भागपेढी पद्‌धतीमध्ये बनावट/फसवे हस्तांतर होण्याची शक्यता असते.

५) भागपेढी पद्‌धतीचा जगामध्ये सर्वप्रथम अमेरिके (युएसए) मध्ये प्रारंभ झाला.

६) भारतामध्ये एकापेक्षा जास्त भागपेढी पद्‌धती आहेत.

७) भागपेढी पद्‌धती ही बँकिंग पद्‌धती सारखीच असते.

८) भागपेढी प्रतिनिधी (डी.पी.) हा भागपेढी पद्‌धतीचा एक घटक आहे.

९) डीपी हा डिपॉझिटरीचा मध्यस्थ आहे.

१०) बँक ही एक डी.पी. म्हणून कार्य करू शकते.

११) भौतिक स्वरूपातून इलेक्ट्रॉनिक स्वरूपात रूपांतर करण्यासाठी डिमॅट विनंती अर्ज (DRF) आवश्यक आहे.

१२) विशिष्ट प्रतिभूतींना दिलेला अद्‌वितीय ओळख क्रमांक (Unique No.) म्हणजे आयएसआयएन (ISIN) होय.

**इ) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) प्रमाणपत्र संग्रह संपुष्टात आणणे, प्रमाणपत्राची चोरी, प्रमाणपत्र फाटणे.

२) एनएसडीएल, सीडीएसएल, एनबीएफसी.

३) डिपॉझिटरी, डीपी, आरबीआय.

४) डीपी, बीओ, राज्य सरकार.

५) इश्युअर, बीओ, केंद्र सरकार.

६) डीआरएफ, आरआरएफ, पीपीएफ.

## फ) खालील विधाने पूर्ण करा.

१) डिमॅट स्वरूपातील प्रतिभूती जतन करण्याचे मध्यवर्ती ठिकाण ........... आहे.

२) ............ मध्ये प्रतिभूती जमा/खर्च टाकणे, फ्रीज/कुलूपबंद करणे (freezing/locking) शक्य आहे.

३) जगामध्ये सर्वात प्रथम डिपॉझिटरी .......... या वर्षी सुरू झाली.

४) भारतीय डिपॉझिटरी कायदा .......... या वर्षी संमत झाला.

५) डिपॉझिटरी आणि गुंतवणूकदारामधील ......... हा दुवा आहे.

६) गुंतवणूकदाराच्या प्रतिभूतीचे खाते ........... सांभाळते.

७) भौतिक स्वरूपातील प्रतिभूती इलेक्ट्रॉनिक स्वरूपात रूपांतर करण्याच्या प्रक्रियेला ......... म्हणतात.

८) डिजिटल प्रतिभूतीचे भौतिक प्रतिभूतीमध्ये रूपांतर करण्याच्या प्रक्रियेला ........... म्हणतात.

९) इश्युअर कंपनी .......... कडे नोंदणीकृत पाहिजे.

१०) एखादया प्रतिभूतीचा अद्‌वितीय ओळख क्रमांक म्हणजे ............ होय.

११) भारतातील पहिली डिपॉझिटरी ............. आहे.

## ग) कंसातील अचूक पर्याय निवडा.

१)

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | डिमटेरियलायझेशन | १) | ................................................... |
| ब) | ............................................. | २) | डीपी |
| क) | जगातील पहिली भागपेढी | ३) | ................................................... |
| ड) | सीडीएसएल | ४) | ........................ |

(१९९६, भागपेढीचा मध्यस्थ, जर्मनी, भौतिक स्वरूपातून इलेक्ट्रॉनिक स्वरूपात)

२)

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | भारतातील पहिली भागपेढी | १) | ................................................... |
| ब) | ............................................. | २) | रिमटेरियलायझेशन |
| क) | फंगिबिलिटी | ३) | ................................................... |
| ड) | ................. | ४) | आयएसआयएन |

(१२ वर्णांक सांकेतांक, एनएसडीएल, इलेक्ट्रॉनिक स्वरूपातून भौतिक स्वरूपात, भेददर्शक क्रमांक नसणे.)

## ह) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) भागपेढी पद्‌धत म्हणजे काय?

२) 'व्यावसायिक संस्थेच्या कृती' (corporate action) या संज्ञेची उदाहरणे द्या.

३) भारतात डिपॉझिटरी कायदा कधी समंत झाला?

४) डीपी म्हणजे काय?

५) डिमटेरियलायझेशन म्हणजे काय?

६) रिमटेरियलायझेशन म्हणजे काय?

७) आयएसआयएन म्हणजे काय?

८) भारतातील भागपेढींची नावे द्या.

**ई) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१) इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रतिभूती धारण करणे जोखमीचे असते.

२) इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रतिभूतीचे वाटप व हस्तांतर वेळखाऊ असते.

३) बॅंकिंग पद्धती भांडवल बाजारात प्रतिभूती कागदविरहीत कार्य करते.

४) भौतिक पद्धतीमध्ये प्रमाणापत्र जतन करणे आवश्यक नसते.

५) भारतात एकल भागपेढी पद्धती आहे.

६) डी. पी. ची नोंदणी भागिदारी कायद्याखाली करावी लागते.

७) डिमॅट खाते डिपॉझिटरीद्वारे उघडले जाते व त्याची देखभाल केली जाते.

८) भौतिक स्वरूपातील प्रतिभूती फंगिबल असतात.

९) ISIN हा कंपनीला देण्यात आलेला क्रमांक आहे.

१०) भारत सरकारच्या प्रतिभूतींना ISIN देण्याचे कार्य हे एनएसडीएल कडून केले जाते.

**ज) योग्य क्रम लावा.**

१. अ) खात्याचे विवरण मिळवणे.

ब) डिमॅट खाते उघडणे.

क) डिमॅट विनंती अर्ज (DRF) सादर करणे.

२. अ) गुंतवणूकदार (बीओ) इश्युअर कंपनीला प्रतिभूतीसाठी अर्ज सादर करतात.

ब) बीओ च्या खात्यात भाग जमा करण्यासंबंधी भागपेढी डीपीला सूचना देते.

क) इश्युअर कंपनी भागपेढीला भाग वाटपाचा तपशील देते.

**प्र.क्र. २) खालील संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा.**

१) डिपॉझिटरी पद्धती

२) डिमटेरियलायझेशन

३) रिमटेरियलायझेशन

४) फंगिबिलीटी

५) आयएसआयएन

**प्र.क्र. ३) खालील घटना परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा.**

१) श्री झेड यांनी पेक्युलर कंपनी लि.चे १०० भाग भौतिक स्वरूपात धारण केले असून ते इलेक्ट्रॉनिक स्वरूपात करण्याची त्यांची इच्छा आहे.

अ) श्री झेड यांचे सीएफडीएच बॅंक लि. मध्ये बचत खाते आहे या खात्यात डिमॅटसाठी त्याचे भाग जमा केले जाऊ शकतात?

ब) त्यासाठी कोणत्या प्रकारचे खाते आवश्यक आहे ?

क) डिमॅट नंतर श्री झेड यांच्या समभागाचे परिरक्षक (Custodian) आरबीआय असेल का?

२) श्री आर यांनी पेक्युलर कंपनी लि.चे १०० भाग डिमॅट पद्धतीमध्ये घेतले आहेत.

अ) त्यांना प्रत्येकी एक भाग पत्नी, मुलगी आणि मुलाकडे हस्तांतरित करायचा आहे ते असे करू शकतात का?

ब) त्यांना भाग हस्तांतर करण्यासाठी (DRF) किंवा (DIS) सादर करण्याची आवश्यकता आहे?

क) ते त्यांच्या पत्नीला डिमॅटखात्यामध्ये नामनिर्देशित करू शकतात का?

३) सौ. झेड यांची स्वतःच्या नावे डिमॅट खाते उघडण्याची इच्छा आहे.

अ) एनएसडीएलच्या मुंबई कार्यालयात जाऊन ते उघडू शकतात का?

ब) त्यांना खाते उघडण्यासाठी व देखभालीसाठी पैसे द्यावे लागतील का?

क) डिमॅटीकरणासाठी तिला संबंधित कंपनीकडे भाग पाठवावे लागतील का?

४) श्री. एल यांना त्याच्या २५ भागांचे डिमॅटीकरण करायचे आहे. त्याचा भाग प्रमाणपत्र क्रमांक १०० आहे आणि भागांचे अनुक्रमांक ७६-१०० असे आहे.

अ) डीपीला विनंती म्हणून कोणता अर्ज भरावा करावा लागेल?

ब) डिमॅटनंतर तेच भाग हस्तांतरित करायचे असल्यास त्यास हस्तांतरण अर्ज भरावा लागेल का?

क) डिमॅटीकरणानंतर जर भाग हस्तांतरित करायचे असतील तर त्यास भाग प्रमाणपत्र क्रमांक व भाग अनुक्रमांक नमूद करावा लागेल का?

५) श्री. एस यांनी पेक्युलर कं. लि. चे ५० भाग डिमॅट स्वरूपात धारण केले आहेत. कंपनीने रु. ५ प्रतिभाग लाभांश आणि १ : १ बोनस जाहीर केला आहे.

अ) श्री. एस यांना त्याचा लांभाश कसा मिळेल?

ब) त्यांना भौतिक का डिमॅट स्वरूपात बोनस भाग मिळेल?

क) लांभाश व बोनस भाग कोणाला मिळणार? श्री. एस की डिपॉझिटरी (एनएसडीएल)ला.

**प्र.क्र. ४) फरक स्पष्ट करा**

१) डिमटेरियलायझेशन आणि रिमटेरियलायझेशन

**प्र.क्र. ५) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) प्रतिभूती जतन करण्याच्या भौतिक पद्धतीचे तोटे स्पष्ट करा.

२) गुंतवणूकदारास भागपेढी पद्धतीचे कोणतेही चार फायदे स्पष्ट करा.

३) कंपनीस भागपेढी पद्धतीचे कोणतेही चार फायदे स्पष्ट करा.

४) भागपेढी पद्धतीचा घटक म्हणून भागपेढी स्पष्ट करा.

५) भागपेढी पद्धतीचा घटक म्हणून डीपी स्पष्ट करा.

**प्र.क्र. ६) खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१) इलेक्ट्रॉनिक प्रतिभूती या भौतिक स्वरूपातील प्रतिभूतीपेक्षा अधिक सुरक्षित आहेत.

२) डिपॉझिटरी ही सहज आणि जलद भाग हस्तांतरण करते.

३) डिपॉझिटरी पद्धतीमुळे वेळ खर्च आणि श्रम कमी होतात.

४) भागपेढी पद्धती ही बॅंकिंग पद्धती सारखीच आहे.

५) डीपी हा भागपेढी पद्धतीचा महत्त्वाचा घटक आहे.

६) भागपेढी पद्धती भौतिक चे इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रॉनिकचे भौतिक प्रतिभूतीत रूपांतरची सुविधा देते.

७) आयएसआयएन (ISIN) हा डीमॅटचा आवश्यक घटक आहे.

**प्र.क्र. ७) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) भागपेढी परिभाषित करा आणि त्याचे फायदे स्पष्ट करा.

२) भागपेढी पद्धतीचे घटक स्पष्ट करा.

❑❑❑

# १० लाभांश आणि व्याज

**१०.१ लाभांश अर्थ**
**१०.२ लाभांशाची वैशिष्ट्ये**
**१०.३ लाभांशासंबंधी कायदेशीर तरतुदी**
१०.३.१ लाभांश स्रोतासंबंधी कायदेशीर तरतुदी
१०.३.२ लाभांश घोषणेसंबंधीच्या कायदेशीर तरतुदी
१०.३.३ लाभांश वाटपासंबंधीच्या कायदेशीर तरतुदी
**१०.४ न दिलेला आणि मागणी न केलेला लाभांश**
**१०.५ लाभांश वाटपाच्या पद्धती**
**१०.६ अंतरिम लाभांश**
**१०.७ व्याज**
१०.७.१ अर्थ
१०.७.२ वैशिष्ट्ये
**१०.८ फरक**

## प्रस्तावना

कंपनीसह सर्व व्यवसाय संस्थांचे मुख्य उद्दिष्ट नफा मिळवणे व त्याचे महत्तीकरण हे असते. भागधारक हे नफा मिळवण्याच्या उद्देशाने कंपनीमध्ये गुंतवणूक करतात.

## १०.१ लाभांश – अर्थ :

डिव्हिडंड शब्द 'डिव्हिडेंटम' (diiv den m ) या लॅटिन शब्दापासून निर्माण झाला आहे. डिव्हिडेंटम म्हणजे 'ज्याचे विभाजन होऊ शकते.'

लाभांश म्हणजे कंपनीच्या नफ्यातील असा भाग जो भागधारकांमध्ये वाटला जातो.

कंपनीच्या वितरणयोग्य नफ्यातील अशा हिस्सा जो घोषित केल्यानंतर मिळण्यास भागधारक पात्र असतो.

### व्याख्या :

१) दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट ऑफ इंडियाने लाभांशाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे – ''भागधारक कंपनीच्या नफ्यातून अथवा या उद्देशाने उपलब्ध असलेल्या राखीव निधीतून होणारे वितरण.''

२) भारतीय सर्वोच्च न्यायालयाच्या मते : ''कार्यरत कंपनीचे भाग धारण करणाऱ्या व्यक्तींना कंपनीच्या नफ्यातील दिला जाणारा हिस्सा म्हणजे लाभांश होय.''

### अधिक माहिती :

*अ) कार्यरत कंपनी म्हणजे ज्या कंपन्या सुरू आहेत व नफा मिळवितात.*

*ब) वितरणासाठी उपलब्ध नफा व लाभांश वाटपासाठी उपलब्ध नफा या भिन्न संकल्पना आहेत.*

*वितरणासाठी उपलब्ध नफा म्हणजे कंपनीला भागधारकांना लाभांशाद्वारे वितरित करण्यास कायद्याने अनुमती असलेला जास्तीत जास्त नफा.*

*लाभांश वाटपासाठी उपलब्ध नफा हा संचालकांनी राखीव निधीची तरतूद केल्यानंतर व मागील नुकसान भरून काढल्यानंतर वितरित करण्यायोग्य नफा.*

## १०.२ लाभांशाची वैशिष्ट्ये :

१) लाभांश हा प्रत्येक भागधाकास वाटणीस येणारा नफ्यामधील हिस्सा होय.

२) लाभांश हा कंपनीच्या नफ्यातूनच देय असतो.

३) लाभांश हा कंपनी विनाअट वितरित करते.

४) कंपनी फक्त भागधारकांनाच लाभांश वितरित करते.

(१) समहक्क भाग (२) अग्रहक्क भाग

५) कंपनीने लाभांशाच्या बाबतीत भेददर्शक मताधिकाराचे समहक्क भाग वाटप केले असतील तर लाभांश देण्यास अधिकार राहत नाही.

६) भांडवलातून लाभांश जाहीर करता येत नाही.

७) संचालक मंडळाच्या शिफारशीनुसारच लाभांश जाहीर करता येतो.

८) लाभांश हा संचालक मंडळाने शिफारस करून भागधारकाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये ठराव संमत करून जाहीर केला पाहिजे.

९) वार्षिक हिशेब वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर झाल्यानंतर मागील कोणत्याही वर्षाचा लाभांश जाहीर केला जाऊ शकत नाही.

१०) भागधारकांना एकदा मंजूर व जाहीर केलेला लाभांश सामान्यत: रद्द केला जाऊ शकत नाही.

११) लाभांशामध्ये अंतरिम लाभांश समाविष्ट आहे.

१२) लाभांश रोख स्वरूपात देणे आवश्यक आहे. वस्तूरूपात नाही.

१३) भागाच्या पूर्ण देय मूल्यावरच लाभांश दिला जातो.

१४) आगाऊ भरलेल्या मागणी हप्त्यावर लाभांश देता येत नाही.

**टीप :** विशेष करून अंतरिम/मध्य लाभांश असे जोपर्यंत स्पष्ट म्हटले जात नाही तोपर्यंत सर्वसाधारणपणे लाभांश ही संज्ञा 'अंतिम लाभांश' या अर्थाने वापरली जाते.

## १०.३ लाभांशासंबंधी कायदेशीर तरतुदी

### १०.३.१ लाभांशाच्या स्रोताबाबत कायदेशीर तरतुदी (कलम १२३)

**अ) कंपनी पुढीलपैकी कोणत्याही आर्थिक वर्षासाठी लाभांश जाहीर आणि वाटप करू शकते.**

१) चालू नफ्यातून कंपनीचा नफा म्हणजे घसारा तरतूद व राखीव निधीस रक्कम हस्तांतरित केल्यानंतरची शिल्लक.

२) मागील आर्थिक वर्षाच्या नफ्यातून घसारा वजा केल्यानंतर.

३) लाभांश वाटपासाठी केंद्र किंवा राज्य सरकारने पुरवलेल्या निधीतून.

**ब) भांडवली नफ्यातून लाभांश देता येतो.**

पुढील अटींची पूर्तता केल्यानंतर

१) भांडवली नफा रोखीने मिळतो.

२) अशा वाटपाची अनुमती नियमावलीने दिली पाहिजे.

३) सर्व मालमत्ता आणि दायित्वांचे पुनर्मूल्यांकन केल्यावर जो नफा म्हणून राहील.

***भांडवली नफा :*** *भांडवली नफा हा कंपनीची स्थिर मालमत्ता ही मूळ किमतीपेक्षा चढ्या दराने विकून किंवा वाढावा घेऊन विकल्याने मिळालेला नफा होय.*

**क)** भांडवलातून लाभांश देता येत नाही.

**ड)** कंपनीच्या मुक्त राखीव निधीतून लाभांश देता येतो.

> ***मुक्त राखीव निधी :*** *कंपनीच्या नवीनतम लेखा परीक्षित ताळेबंदानुसार नफा वितरणासाठी राखीव ठेवलेला निधी.*

### १०.३.२ लाभांश घोषणेसंबंधी कायदेशीर तरतुदी :

**१) संचालक मंडळाची सभा :** संचालक मंडळाची शिफारस असल्यासच लाभांश घोषित करता येतो. सभेत खालील बाबतीत ठराव संमत करण्यात येतो.

अ) लाभांशाचा दर व लाभांश म्हणून घ्यावयाची रक्कम.

ब) लाभांशासाठी नोंदवही बंदची (BookC losn e) तारीख

क) वार्षिक सर्वसाधारण सभेचा दिनांक

ड) लाभांश रक्कम वाटपासाठी बँकेत स्वतंत्र खाते उघडले पाहिजे.

**२) भागधारकांची मंजुरी :**

अ) वार्षिक सर्वसाधारण सभेत सामान्य ठराव संमत करून भागधारकाकडून लाभांश मंजूर होतो.

ब) भागधारक संचालक मंडळाने शिफारस केलेल्या लाभांश दरापेक्षा कमी लाभांश दर जाहीर करू शकतात, परंतु त्यापेक्षा जास्त लाभांश दर जाहीर करता येत नाही.

क) वार्षिक सर्वसाधारण सभेत लाभांश जाहीर झाल्यानंतर कंपनीला त्यावर्षी दुसऱ्यांदा लाभांश जाहीर करण्यासाठी परवानगी नाही.

**३) स्वतंत्र बँक खाते :**

कंपनीने लाभांश घोषणेपासून ५ दिवसांत लाभांश वाटपाच्या उद्देशाने उघडलेल्या स्वतंत्र खात्यात निधी जमा करणे आवश्यक आहे.

- **सूचीबद्ध कंपनी :** सूचीबद्ध कंपनी म्हणजे ज्या कंपनीचे भाग भागबाजारामध्ये नोंदणी केलेले असतात. अशा कंपनीने नोंदणी करारानुसार काही जादा बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे त्या खालीलप्रमाणे.

  अ) कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीच्या (ज्यामध्ये लाभांशाची शिफारस विचारात घेतली जाणार आहे.) तारखेच्या किमान 2 दिवस अगोदर कंपनीचे भाग नोंदणीकृत असलेल्या भाग बाजाराला सूचित करावे.

  ब) संचालक मंडळाच्या बैठकीनंतर लाभांशाची घोषणा केल्यासंबंधीची सूचना भागबाजाराला देणे.

  क) नोंदवही बंदची (Book Closn e) सूचना : भागबाजाराला नोंदवही बंद करण्यापूर्वी किमान ७ दिवस आधी सूचना द्यावी.

  ड) सभासद नोंद पुस्तिका व हस्तांतरण नोंद पुस्तिका बंद ठेवणे.

  इ) भारतीय मध्यवर्ती बँकेने (RBI) अनुमती दिलेल्या इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सर्व्हिस (ECS) किंवा (NEFT) द्वारे लाभांश वाटप केले जावे.

> *१)* ***बुक क्लोजर :*** *नोंदवही बंदची सूचना : या काळात कंपनी सभासद नोंदणी पुस्तिकेत कोणतेही बदल करीत नाही व कोणतेही हस्तांतरण स्वीकारत नाही.*
>
> *२)* ***रेकॉर्ड डेट :*** *ही तारीख म्हणजे लाभांश व बोनस देणे इ. साठी योग्य सभासद कोण आहे ते ठरविणारी तारीख.*

  फ) नोंदणीकृत कंपनीला प्रत्येक भागासाठीचा लाभांश याप्रमाणे लाभांशाची घोषणा करावी लागते.

### ४) लाभांश वाटपास मनाई

अ) कंपनी जर ठेवीची परतफेड व ठेवीवरील व्याज देण्यास असमर्थ ठरली असेल तर समहक्क भागासाठी लाभांशाची घोषणा करू शकत नाही.

ब) पुढील परिस्थितीत कंपनी लाभांश वाटप करू शकत नाही.

१) कंपनीने कर्जरोख्यावरील व्याज दिले नसेल किंवा परतफेड केली नसेल, परतफेडीसाठी राखीव निधीची तरतूद केली नसेल किंवा अग्रहक्क भागधारकांना लाभांशाचे वाटप केले नसेल किंवा आर्थिक संस्थांना व्याज दिले नसेल तर इत्यादी.

## १०.३.३ लाभांश वाटपाबाबत कायदेशीर तरतुदी :

१) लाभांश फक्त रोख स्वरूपातच देता येतो, वस्तूरूपात नाही.

२) लाभांशाचे धनादेश किंवा अधिपत्राद्वारे भागधारकास कोणत्याही इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे वाटप केले जाऊ शकते.

३) **संयुक्त भागधारक :** सभासद नोंदवहीतील नोंदीनुसार संयुक्त भागभांडवल धारण केलेल्या व्यक्तीच्या बाबतीत प्रथम क्रमांकाला नाव असणाऱ्या व्यक्तीच्या नावे किंवा भागधारकांनी लेखी दिल्यानुसार त्याच्या नावे पत्त्यावर लाभांश अधिपत्र पाठवले जाते.

४) **लाभांश वाटप कालावधी (कलम १२४)** कंपनीने लाभांश घोषणेच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत लाभांश वाटप करणे आवश्यक आहे.

५) लाभांश फक्त कंपनीच्या नोंदणीकृत भागधारकांनाच देय असतो.

समहक्क भागधारकांना लाभांश वाटपापूर्वी अग्रहक्क भागधारकांना लाभांश मिळविण्याचा हक्क आहे. अग्रहक्क भागधारक व संचयी अग्रहक्क भागधारकाचे लाभांश वाटप झाल्यानंतर उर्वरित नफ्यातून समहक्क भागधारकांना लाभांश वाटप केले जाते.

६) जर डिमॅट स्वरूपात भाग खरेदी केले असतील तर डिपॉझिटरीकडून कळविलेल्या लाभप्रद मालकांना (Beneficial owner) लाभांश दिला जातो आणि जर कागदपत्र/ भौतिक स्वरूपात भाग धारण केले असतील तर कंपनीच्या सभासद नोंद पुस्तकात नावे असणाऱ्या सभासदांना लाभांश दिला जातो.

७) **कर्तव्यात चूक :** दिलेल्या कालावधीत लाभांश वाटप न केल्यास–

अ) प्रत्येक संचालक हे शिक्षेस पात्र असतात.

ब) जोपर्यंत लाभांश वाटप होत नाही तोपर्यंत १२% दराने व्याज देण्यास जबाबदार असेल.

- जर कंपनी या कलमाच्या कोणत्याही आवश्यकतेचे पालन करण्यात अयशस्वी ठरली तर कंपनी व संचालक दंड भरण्यास जबाबदार असतील.

## १०.४ वाटप न केलेला/मागणी न केलेला लाभांश :

कंपनीने लाभांशाची घोषणा केल्यापासून ३० दिवसांच्या आत लाभांशाचे वाटप केले नाही किंवा भागधारकाकडून लाभांशाची मागणी झाली नाही. अशा लाभांशास वाटप न केलेला आणि मागणी न केलेला लाभांश असे म्हणतात.

- **वाटप न केलेल्या व मागणी न केलेल्या लाभांशाबाबत नियम :**
  **लाभांश देणे खाते :**

अ) वाटप न केलेले व मागणी न केलेल्या एकूण लाभांशाची रक्कम 'लाभांश देणे खाते' यामध्ये वर्ग करण्यात यावी. कंपनीकडून हे खाते शेड्युल्ड बँकेत उघडावे.

ब) सदर रक्कम लाभांश घोषणेपासून ३० दिवस संपल्यानंतर ७ दिवसांत वर्ग करावी.

क) न दिलेला व न मागणी न केलेला लाभांश देणे खात्यात वर्ग केल्यानंतर ९० दिवसांच्या आत कंपनीने आपल्या संकेतस्थळावर किंवा इतर संकेतस्थळावर सदर भागधारकाची नावे, पत्ते, लाभांशाची देय रक्कम ही माहिती प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

ड) लाभांश देणे खात्यातून लाभांश मिळण्यासाठी भागधारकास कंपनीकडे अर्ज सादर करावा लागतो.

ई) लाभांश देणे खात्यात वर्ग केलेली लाभांश रक्कम वर्ग केल्याच्या तारखेपासून ७ वर्षाच्या आत न वाटप झाल्यास अथवा नेल्यास कंपनीस सदर रक्कम गुंतवणूकदार शिक्षण व सुरक्षा निधी (Investors Education and Protection Fund - IEPF ) मध्ये वर्ग करावी लागते.

फ) या खात्यातून IEPF मधून रकमेची मागणी करताना योग्य पद्धतीप्रमाणे आवश्यक कागदपत्रासह विहित नमुन्यातील अर्जातील माहिती सादर करावी लागते.

**IEPF :** *केंद्र सरकारने २००१ पासून आयईपीएफची स्थापना केली आहे. आयईपीएफ वर हस्तांतरित करावयाची काही रकमेचे उदाहरणे कंपनीकडील मुदत ठेव, कंपनीकडील कर्जरोखे इ.*

## १०.५ लाभांश वाटपाची माध्यमे (कलम १२३)

भागधारकांना लाभांशाचे वाटप रोखीने केले जाते ते धनादेश, अधिपत्र किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या आधारे केले जाते.

लाभांश वाटपाचे विविध मार्ग :

१) **लाभांश अधिपत्र :** यामध्ये कंपनी धनादेशाद्वारे भागधारकांच्या नोंदणीकृत पत्त्यावर लाभांशाची रक्कम पाठवते.

२) **लाभांश आदेश :** भागधारकाच्या विनंतीवरून कंपनी भागधारकाच्या नावे त्याच्या बँक खात्यामध्ये सदर लाभांशाची रक्कम वर्ग करते. त्यास लाभांश आदेश असे म्हणतात. लाभांश आदेश कंपनीस लाभांश थेट भागधारकाच्या बँक खात्यात जमा करण्याचा अधिकार देते.

**अधिक माहिती :**

**लाभांश आदेशाचे फायदे :**

१) वेळेची बचत : लाभांश आदेशामुळे धनादेश तयार करणे व पाठविण्याचा कंपनीचा वेळ वाचतो तसेच भागधारकाचा धनादेश बँकेत जमा करण्याचा व लाभांश खात्यावर जमा होण्याची वाट पाहण्याचा वेळ वाचतो.

२) धनादेश हाताळणी, गहाळ होण्याची शक्यता कमी.

३) **इलेक्ट्रॉनिक माध्यम :** कंपनी भागधारकांना लाभांशाचे वाटप इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या सहाय्याने करू शकते.

अ) सूचीबद्ध कंपनी बँकेने मान्य केलेल्या इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे लाभांशाचे वाटप करते. जसे : ईसीएस (इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सर्व्हिस) एनईएफटी (नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर)

ब) लाभांश अधिपत्राच्या सहाय्याने लाभांश वाटपासाठी बँक व इतर बँकांच्या सहकार्याने व्यवस्था करावी लागते.

*ईसीएस आणि एनईएफटी दोन्ही इलेक्ट्रॉनिक साधनाच्या सहाय्याने निधी हस्तांतरित केला जातो. ईसीएस मुख्यत: कमी रकमेच्या व्यवहारासाठी डेबिट आणि क्रेडीट साठी वापरले जाते. ज्याची वारंवार पुनरावृत्ती होते तर एनईएफटी हे जास्त रकमेच्या व्यवहारासाठी वापरले जाते.*

*लाभांश अधिपत्र हे धनादेश आहे जे कोणत्याही राज्यात त्याच्या बदल्यात काहीही शुल्क न देता त्यास रकमेचा लाभांश स्वीकारू शकतात.*

## १०.६ अंतरिम लाभांश : अर्थ

संचालक मंडळाने दोन वार्षिक सर्वसाधारण सभांच्या दरम्यान जाहीर केलेल्या लाभांशास अंतरिम लाभांश म्हणतात. जर लेखा कालावधीसाठी कंपनीचा नफा पुरेसा न्याय ठरला तरच अंतरिम लाभांश देता येतो. त्यासाठी कंपनीच्या लेखा अंकेक्षकाचे मत घेतले पाहिजे. कंपनीच्या नियमावलीने दिलेल्या अधिक्रमानुसार संचालक मंडळ मध्यावधी लाभांश घोषित करते.

**अंतरिम लाभांशाची वैशिष्ट्ये :**

१) अंतरिम लाभांश जाहीर करण्याचे अधिकार संचालक मंडळाला असतात.

२) अंतरिम लाभांश वर्षाच्या त्या कालावधीतील लाभांश फक्त देय असेल.

३) अंतरिम लाभांश जाहीर करण्यापूर्वी कंपनीने वर्षातील काही महिन्यांच्या प्रमाणात नव्हे तर संपूर्ण वर्षांसाठी घसाऱ्याची तरतूद केली पाहिजे.

४) कोणत्याही राखीव निधीतून अंतरिम लाभांश देता येत नाही.

५) कंपनीच्या नियमावलीने अंतरिम लाभांश जाहीर करण्याचा अधिकार संचालक मंडळाला दिलेला असला पाहिजे.

६) संचालक मंडळाच्या सभेत अंतरिम लाभांश घोषित करण्याचा ठराव संमत करावा लागतो.

७) अंतरिम लाभांशाची घोषणा केल्यानंतर ५ दिवसांच्या आत घोषित केलेल्या लाभांशाची रक्कम शेड्युल्ड बँकेच्या स्वतंत्र खात्यात जमा करणे आवश्यक आहे.

८) अंतरिम लाभांशाची घोषणा केल्यापासून ३० दिवसांच्या आत वाटप करणे आवश्यक आहे.

९) न दिलेला किंवा मागणी न केलेला अंतरिम लाभांश 'लाभांश देणे खाते' या खात्यात लाभांश वाटपाची मुदत संपल्यानंतर ७ दिवसांच्या आत म्हणजे घोषणेपासून ३० दिवसांनंतर किंवा घोषणा झाल्यानंतर ३७ दिवसांच्या आत वर्ग करावी लागते.

१०) लाभांश देणे खात्यात वर्ग केलेली लाभांश रक्कम वर्ग केलेल्या तारखेपासून ७ वर्षाच्या आत न दिल्यास कंपनीस सदर रक्कम गुंतवणूकदार शिक्षण व सुरक्षा निधी खाते आयईपीएफ (Investor's Education and Protection Fund - IEPF) मध्ये वर्ग करावी लागते.

## १०.७ व्याज

### १०.७.१ अर्थ

आर्थिक तरतुदी : दुसऱ्याच्या निधीचा वापर करण्यासाठी दिलेली रक्कम, कर्जदाराकडून घेतलेल्या रकमेवरील परतावा.

व्याज म्हणजे पैसे घेणाऱ्याला पैसे घेण्याची द्यावी लागणारी किंमत आणि कर्ज देणाऱ्यास देण्यातून मिळणारे उत्पन्न आहे.

### १०.७.२ वैशिष्ट्ये

१) व्याज म्हणजे भांडवलाने दिलेल्या उत्पादित सेवांसाठी दिलेली किंमत होय.

२) व्याजाचा थेट जोखमीशी संबंध आहे. जास्त जोखीम तेथे जास्त व्याज.

३) व्याजद हा मुद्‌दलाची वार्षिक टक्केवारी म्हणून व्यक्त केला जातो.

४) पत पुरवठा, वित्तीय धोरण, कर्जाचे प्रमाण, चलनवाढीचा दर या बाबींद्‌वारे व्याज दर निश्चित केला जातो.

५) नफा नसल्यासही कंपनीला व्याज द्यावेच लागते.

६) व्याज हे निश्चित दराने दिले जाते. सामान्यत: पूर्ण-निर्धारित दरानुसार.

जर कंपनीने जनतेकडून कर्जरोखे व ठेवीच्या स्वरूपात निधी गोळा केला असेल तर व्याज द्यावे लागते.

## १०.८ फरक

### १) अंतरिम लाभांश व अंतिम लाभांश

| मुद्‌दे | अंतरिम लाभांश | अंतिम लाभांश |
|---|---|---|
| **१. अर्थ** | अंतरिम लाभांश, दोन वार्षिक सभांच्या मधल्या काळात घोषित केला जातो व दिला जातो. | अंतिम लाभांश आर्थिक वर्षाच्या समाप्तीनंतर घोषित केला जातो व वाटप केले जाते. |
| **२. कोण जाहीर करतो ?** | संचालक मंडळाच्या सभेत संचालक मंडळ निर्णय घेते व घोषित करते. | अंतिम लाभांश संचालक मंडळ शिफारस करते व भागधारक वार्षिक सर्वसाधारण सभेत घोषित करतात. |

| मुद्दे | अंतरिम लाभांश | अंतिम लाभांश |
|---|---|---|
| **३. अधिकृतता/अधिकृत परवानगी** | नियमावलीने दिलेल्या अधिकारानुसार अंतरिम लाभांश घोषित केला जातो. | अंतिम लाभांश घोषित करण्यासाठी नियमावलीच्या तरतुदींची/अधिकारपत्राची आवश्यकता नाही. |
| **४. केव्हा घोषित केला जातो?** | दोन वार्षिक सभांच्या मधल्या काळात घोषित केला जातो. | कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये घोषित केला जातो. |
| **५. लाभांश दर** | अंतरिम लाभांशाचा दर अंतिम लाभांश दरापेक्षा कमी असतो. | अंतिम लाभांश दर अंतरिम लाभांश दरापेक्षा जास्त असतो. |
| **६. स्रोत** | चालू आर्थिक वर्षातील आवश्यक नफा प्राप्ती उपलब्ध असल्यास अंतरिम लाभांश जाहीर केला जातो. | अंतिम लाभांश जाहीर करण्यासाठी वेगवेगळ्या स्रोताचा अवलंब केला जातो. आर्थिक वर्षाच्या नफ्यातून, संचित राखीव निधीतून, भांडवली नफ्यातून, केंद्र सरकारने लाभांश वाटपासाठी निधीतून. |
| **७. लेखासंबंधी बाबी** | कंपनीचे अंतिम लेखे तयार करण्यापूर्वी जाहीर केला जातो. | हा अंतिम लेखे तयार केल्यानंतर जाहीर केला जातो. |

## २) लाभांश व व्याज

| मुद्दे | लाभांश | व्याज |
|---|---|---|
| **१. अर्थ** | लाभांश म्हणजे भागधारकाच्या भांडवल गुंतवणुकीवरील परताव्याची रक्कम होय. | हे कंपनीच्या धनकोंना कर्जासाठी दिला जाणारा परतावा आहे. जसे : कर्जरोखेधारक ठेवीदार. |
| **२. कोणाला दिले जाते?** | लाभांश सभासदांना दिला जातो. म्हणजेच कंपनीच्या मालकांना दिला जातो. | व्याज कंपनीच्या धनकोंना दिले जाते. |
| **३. बंधन** | जेव्हा कंपनीने नफा कमवला असेल तेव्हाच लाभांश देय असतो. लाभांश देण्याची सक्ती नाही. | हे कंपनीच्या नफ्याशी जोडलेले नाही. व्याज देणे हे बंधन आहे आणि ते कंपनीने सक्तीने दिले पाहिजे. |
| **४. कधी दिला जातो?** | सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता झाल्यावर व नफा पुरेसा असल्यास लाभांश दिला जातो. | कंपनीच्या नफ्याची पर्वा न करता व्याज दरवर्षी देय असतो. |
| **५. दर** | समहक्क भागधारकांना अस्थिर दराने लाभांश दिला जातो. तो कंपनीच्या नफ्याशी जोडलेला असतो. | व्याजाचा दर हा प्रतिभूतीच्या वाटपावेळी निश्चित आणि निर्धारित केला जातो. |
| **६. ठराव** | अंतिम लाभांश वाटपासाठी संचालक मंडळाचा ठराव आणि वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सामान्य ठराव व अंतरिम लाभांश वाटपासाठी संचालक मंडळाच्या सभेत ठराव संमत करावा लागतो. | व्याज देण्यासाठी कोणत्याही सभेत ठराव संमत करण्याची आवश्यकता नाही. |
| **७. उपचार/उपचारात्मक बाब** | लाभांश हा नफ्याचा विनियोग आहे. | व्याज हे नफ्यावरील आकार आहे. |

## सारांश

- भागधारक हे नफा मिळविण्याच्या उद्देशाने कंपनीमध्ये गुंतवणूक करतात.
- लाभांश म्हणजे कंपनीच्या नफ्यातील असा भाग जो (अ) अग्रहक्क भागधारक (ब) समहक्क भागधारक यांच्यामध्ये वाटला जातो.
- लाभांश हा (अ) अंतरिम किंवा (ब) अंतिम असू शकतो.
- कंपनीस (अ) लाभांशाचा स्रोत (ब) लाभांशाची घोषणा (क) लाभांश वाटप या संबंधीच्या कायदेशीर तरतुदींचे पालन करावे लागते.
- अंतरिम लाभांश हा अंतिम लाभांशाचा एक भाग आहे. तो आर्थिक वर्ष संपण्यापूर्वीच त्या वर्षातील नफ्यातून दिला जातो.
- अंतिम लाभांश आर्थिक वर्षाच्या समाप्तीनंतर व अंतिम लेखे तयार केल्यानंतर वास्तविक नफ्यातून दिला जातो.
- संचालक मंडळ लाभांशाचे प्रमाण ठरवितात.
- जेव्हा एखादी कंपनी देय देण्यास असमर्थ आहे किंवा भागधारक ३० दिवसांच्या आत दावा करण्यास असमर्थ आहे, तेव्हा वाटप न केलेल्या वा मागणी न केलेल्या लाभांशाचा प्रश्न उद्भवतो.
- व्याज देणे हे बंधनकारक असून ते (अ) कर्जरोखे (ब) बंधपत्रे (क) कर्ज या स्वरूपातील कर्जाऊ रकमेवर द्यावे लागते.

## स्वाध्याय

**प्र.क्र. १ अ) खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१) लाभांश .................... दिला जातो.

अ) भागधारकांना ब) कर्जरोखे धारकांना क) ठेवीदारांना

२) .................... म्हणजे नफ्यातील हिस्सा जो कंपनीद्वारे भागधारकांना दिला जातो.

अ) व्याज ब) भाडे क) लाभांश

३) लाभांशाची शिफारस .................... करतात.

अ) व्यवस्थापकीय संचालक ब) चिटणीस क) संचालक मंडळ

४) अंतरिम लाभांशाची घोषणा .................... करतात.

अ) संचालक मंडळ ब) कर्जरोखेधारक क) ठेवीदार

५) अंतिम लाभांशाची घोषणा .................... करतात.

अ) संचालक मंडळ ब) भागधारक क) ठेवीदार

६) .................... मधून लाभांश घोषित केला जाऊ शकत नाही.

अ) भांडवल ब) नफा क) राखीव निधी

७) लाभांश घोषित झाल्यानंतर .................... दिवसाच्या आत स्वतंत्र बँक खात्यात लाभांश रक्कम हस्तांतरित करावी लागते.

अ) ५ ब) १५ क) ५०

८) लाभांशाची घोषणा झाल्यानंतर ………………… दिवसाच्या आत त्याचे वाटप करावे लागते.

अ) ३ ब) १३ क) ३०

९) ……………… भागधारकांना उर्वरित नफ्यातून लाभांश दिला जातो.

अ) समहक्क ब) अग्रहक्क क) कर्जरोखे

१०) लाभांश प्रथम ………………… भागधारकांना दिला जातो.

अ) समहक्क ब) अग्रहक्क क) इतर

११) ………………… अधिपत्र म्हणजे धनादेशाद्वारे भागधारकांना कंपनीने पाठवलेली लाभांश रक्कम असते.

अ) लाभांश ब) भाग क) व्याज

१२) न दिलेला लाभांश कंपनीद्वारे हस्तांतरित केला जातो त्या आयईपीएफची स्थापना ……………… कडून केली आहे.

अ) केंद्रसरकार ब) कंपनी क) भागधारक

१३) ………………… लाभांशाची घोषणा ही नियमावलीच्या अधिकारानेच केली जाणे आवश्यक आहे.

अ) अंतरिम ब) अंतिम क) बोनस

१४) ………………… हा कंपनीने धनकोंना दिलेला परतावा आहे.

अ) लाभांश ब) व्याज क) भाडे

१५) ………………… चा कंपनीच्या नफ्याशी संबंध नाही.

अ) लाभांश ब) व्याज क) बोनस

**ब) जोड्या जुळवा.**

**(I)**

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | लाभांश | १) | समहक्क भागधारक |
| ब) | व्याज | २) | नफ्याचा विनियोग |
| क) | अंतरिम लाभांश | ३) | चिटणिसाच्या शिफारशीनुसार |
| ड) | अंतिम लाभांश | ४) | कंपनी नोंदणी अधिकारी |
| इ) | लाभांशाचा अस्थिर दर | ५) | वाटप बंधनकारक |
| | | ६) | संचालक मंडळाकडून निश्चिती व घोषणा |
| | | ७) | संचालक मंडळाकडून निश्चिती व सभासदांकडून घोषणा |
| | | ८) | राष्ट्रपतींकडून निश्चिती |
| | | ९) | कंपनीला वाटपाचा अधिकार नाही |
| | | १०) | भारत सरकारकडून घोषणा |

**(II)**

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | लाभांश | १) | लाभांश वाटपाच्या घोषणेची माहिती भाग बाजाराला देणे आवश्यक |
| ब) | व्याज | २) | धनको |
| क) | आयईपीएफ | ३) | नोंदणीकृत भागधारक |
| ड) | लाभांश देणे खाते | ४) | न दिलेल्या लाभांशाची शिल्लक रक्कम येथे हस्तांतरित केली जाते |
| इ) | सूचीबद्ध कंपनी | ५) | नोंद नसलेली कंपनी |
| | | ६) | असूचीबद्ध असलेली कंपनी |
| | | ७) | न दिलेला/मागणी न केलेला लाभांश |
| | | ८) | न दिलेल्या बोनसची शिल्लक हस्तांतरित केली जाते |
| | | ९) | लाभांश वाटपाच्या घोषणेची माहिती सरकारला द्यावी लागते |
| | | १०) | सर्वसाधारण जनता |

**क) खालील प्रत्येक विधानासाठी एक शब्द किंवा शब्दसमूह किंवा संज्ञा लिहा.**

१) कंपनीच्या भागधारकांना मिळणारा गुंतवणुकीवरील परतावा.

२) अंतिम लाभांश  या सभेत जाहीर केला जातो.

३) लाभांशाच्या घोषणेची सूचना भाग बाजाराला द्यावी लागणारी कंपनी.

४) असे भागधारक ज्यांना स्थिर दराने लाभांश मिळतो.

५) असे भागधारक ज्यांना अस्थिर दराने लाभांश मिळतो.

६) भागधारकाच्या बँक खात्यात थेट लाभांश रक्कम मिळण्यासाठी भागधारकाने केलेली विनंती.

७) असा कालावधी ज्यामध्ये लाभांश घोषित झाल्यापासून लाभांश वाटप पूर्ण केले जाते.

८) दोन वार्षिक सर्वसाधारण सभांच्या दरम्यान घोषित केला जाणारा लाभांश.

९) संचालक मंडळाकडून निश्चिती व घोषणा केला जाणारा लाभांश.

१०) कंपनीकडून धनकोंना दिला जाणारा परतावा.

**ड) खालील विधाने बरोबर की चूक ते लिहा.**

१) कंपनीच्या नोंदणीकृत भागधारकांना लाभांश वाटप केले जाते.

२) लाभांश संचालक मंडळ निश्चित करते.

३) लाभांश भागधारक निश्चित करतात.

४) एकदा जाहीर केलेला लाभांश रद्द करता येत नाही.

५) लाभांश भांडवलातून देता येत नाही.

६) भागधारक लाभांश म्हणून द्यावयाचा दर आणि नफा किती असावेत याचा निर्णय घेतात.

७) सर्व प्रकारच्या भागधारकांना निश्चित दराने लाभांश मिळतो.

८) आयईपीएफ हा कंपनीने तयार केलेला निधी आहे.

९) व्याज ही कंपनीची देयता आहे.

१०) कंपनीच्या भागधारकांना व्याज दिले जाते.

**इ) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) अंतिम लाभांश, अंतरिम लाभांश, व्याज

२) भांडवलातून, मुक्त राखीव निधीतून, सरकारने पुरवलेल्या निधीतून

३) लाभांश खाते, लाभांश आदेश, न दिलेला/मागणी न केलेला लाभांश खाते

४) लाभांश अधिपत्र, लाभांश आदेश, धनादेश

**फ) खालील विधाने पूर्ण करा.**

१) डिव्हिडंड हा शब्द लॅटीन भाषेतील ...................... शब्दापासून आला आहे.

२) लाभांशाचे वाटप ...................... यांना करतात.

३) लाभांशाची घोषणा ...................... यांची शिफारस असल्यासच केली जाते.

४) लाभांशाचे वाटप ...................... स्वरूपात केले जाते.

५) ...................... या सभेत अंतिम लाभांशास मंजुरी घ्यावी लागते.

६) लाभांशाचे वाटप .................... मधून करू शकत नाही.

७) अंतरिम लाभांश निश्चिती व घोषणा ...................... कडून केली जाते.

८) पूर्ण निर्धारित आणि स्थिर दराने लाभांशाचे वाटप ...................... भागधारकांना केले जाते.

९) घोषित केलेल्या लाभांशाचे वाटप हे ...................... दिवसात पूर्ण केले पाहिजे.

१०) अंतरिम लाभांश वाटप करण्यासाठी ...................... मधील तरतूदीने अधिकृतता/परवानगी दिली पाहिजे.

११) कंपनीने त्यांच्या धनकोना ...................... देणे बंधनकारक आहे.

**ग) कंसातील अचूक पर्याय निवडा.**

**(I)**

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | डिव्हीडंटम (Diiv den m ) | १) | .............................................. |
| ब) | व्याज | २) | .............................................. |
| क) | .............................................. | ३) | अंतिम लाभांश |
| ड) | .............................................. | ४) | अंतरिम लाभांश |
| इ) | सरकारी निधी | ५) | .............................................. |

(धनको, आयईपीएफ, लॅटीन शब्द, संचालक मंडळाच्या सभेमध्ये, वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये)

**(II)**

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | अग्रहक्क भाग | १) | ............. |
| ब) | समहक्क भाग | २) | .................... |
| क) | ठेवीदार | ३) | ........................... |
| ड) | .................... | ४) | लाभांशाचे वाटप |
| इ) | .......................... | ५) | लाभांश जाहीर परंतु देय/मागणी नाही |

(न दिलेला/मागणी न केलेला लाभांश, लाभांशाचा स्थिर दर, लाभांशाचा अस्थिर दर, व्याज, ३० दिवसाच्या आत)

**ह) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) लाभांश म्हणजे काय?

२) लाभांशाची शिफारस करण्याचा अधिकार कोणाला असतो?

३) अंतिम लाभांश म्हणजे काय?

४) अंतरिम लाभांश म्हणजे काय?

५) अंतरिम लाभांश कोण घोषित करते?

६) कोणत्या भागांवर स्थिर दराने लाभांश मिळतो?

७) कोणत्या भागांवर अस्थिर दराने लाभांश मिळतो?

८) अंतरिम लाभांश हा कोणत्या सभेत निश्चित व घोषित केला जातो?

९) व्याज म्हणजे काय?

१०) न दिलेला लाभांश हा न दिलेल्या लाभांश खात्यात किती कालावधीत हस्तांतरित करावयाचा असतो?

**ई) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१) धनकोंना लाभांशाचे वाटप करतात.

२) भागधारकांना व्याज दिले जाते.

३) अंतिम लाभांश दोन वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दरम्यान दिला जातो.

४) अंतिम लाभाशांच्या घोषणेसाठी विशेष ठरावाची आवश्यकता असते.

५) लाभांशाचे वाटप त्याच्या घोषणेपासून ६० दिवसाच्या आत केले जाते.

६) जाहीर केलेल्या लाभांशाचे वाटप करण्यासाठी ३० दिवसाच्या लाभांश खात्यामध्ये हस्तांतरित करावा लागतो.

७) लाभांश दरवर्षी देणे हे कंपनीवर बंधनकारक आहे.

८) अग्रहक्क भागधारकांना लाभांश मिळण्याचा शेवटचा प्राधान्यकृत असतो.

९) अग्रहक्क भागधारकांना अविशिष्ट नफ्यामधून लाभांश मिळतो.

१०) कंपनी नफ्याची पर्वा न करता दरवर्षी लाभांश देते.

**ज) योग्य क्रम लावा.**

१. अ) लाभांशाची शिफारस
ब) नफा पुरेसा असल्याचे तपासणे
क) संचालक मंडळाची सभा

२. अ) लाभांश खात्यात वर्ग
ब) आयईपीएफ मध्ये वर्ग
क) न दिलेले लाभांश खात्यात वर्ग

३. अ) सभासद नोंद पुस्तक बंद ठेवणे
ब) संचालक मंडळाच्या सभेची सूचना भाग बाजाराला देणे
क) लाभांशाच्या घोषणेची सूचना भाग बाजाराला देणे

४. अ) लाभांश दराचा निर्णय
ब) आयईपीएफमध्ये वर्ग
क) लाभांशाचे वाटप

५. अ) अंतरिम लाभांशाचे वाटप

ब) संचालक मंडळाच्या सभेत अंतरिम लाभांश ठरवणे व घोषित करणे.

क) नियमावलीची परवानगी.

## प्र.क्र. २) खालील संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा.

१) नफा
२) लाभांश
३) व्याज
४) अंतिम लाभांश
५) अंतरिम लाभांश
६) न दिलेला लाभांश
७) न दिलेला लाभांश खाते
८) लाभांश आदेश
९) आयईपीएफ
१०) लाभांश दर

## प्र.क्र. ३) खालील घटना/परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा.

१) एलएमएन कंपनीने सन २०१८-१९ वर्षासाठी लाभांश जाहीर करण्याचे निश्चित केले त्यावर्षी कंपनीला अपेक्षेपेक्षा कमी नफा झाला आहे.

अ) संचालक मंडळाने मुक्त राखीव निधीतून रु. ५/- प्रतिभाग दराने लाभांशाची शिफारस करू शकते का?

ब) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या संमतीशिवाय संचालक मंडळ लाभांश जाहीर करू शकते का?

क) संचालक मंडळ भेटीच्या स्वरूपात लाभांश देऊ शकते का?

२) ए. बी. सी. कंपनी लि. ने अंतरिम लाभांश देण्याचे निश्चित केले.

अ) मुक्त राखीव निधीतून लाभांश देता येईल का?

ब) संचालक मंडळाला संचालक मंडळाच्या सभेमध्ये तो लाभांश जाहीर करण्याचा अधिकार आहे का?

क) लाभांशाची घोषणा केल्यापासून कंपनी ३० दिवसाच्या आत लाभांश वाटप करू शकते का?

३) राज कंपनी लिमिटेड ने अंतरिम लाभांश देण्याचे निश्चित केले.

अ) पुरेशा नफ्याअभावी रु. ५/- प्रतिभाग लाभांश देण्याचा संचालक मंडळाचा निर्णय योग्य आहे का?

ब) संचालक मंडळ मुक्त राखीव निधीतून लाभांश देऊ शकते का?

क) संचालक मंडळ भांडवलातून लाभांश जाहीर करू शकते का?

४) डायमंड कंपनी लिमिटेड ने अंतरिम लाभांश देण्याचा विचार करत आहे.

अ) जाहीर केल्यापासून किती दिवसामध्ये लाभांश खात्यात लाभांश निधी हस्तांतरित केला पाहिजे.

ब) भागधारकांना किती दिवसामध्ये लाभांश वाटप केले पाहिजे.

क) न दिलेला लाभांश निधी किती दिवसानंतर न दिलेला लाभांश खात्यात वर्ग केला जातो.

५) स्टार कंपनी लिमिटेड च्या संचालकांनी रु.१५/- प्रतिभाग लाभांश देण्याची शिफारस केली आहे.

अ) अग्रहक्क भागधारकांना लाभांश वाटप झाल्यानंतर समहक्क भागधारकांना लाभांश वाटप करणे हे योग्य आहे का?

ब) वार्षिक सर्वसाधारण सभेस सदर लाभांशास संमती देण्याचा अधिकार आहे का?

क) कंपनी रोखीने लाभांश देऊ शकते का?

६) गोल्ड कंपनी लिमिटेड ने रु.१०/- प्रतिभाग लाभांश आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी जाहीर केला आहे.

अ) लाभांश जाहीर केल्यापासून ३० दिवसांच्या आत वाटप न केल्यास कंपनीने कतर्व्य करण्यात कसूर केली असे होईल का?

ब) कंपनीने न दिलेला लाभांश कर्जरोखा राखीव निधी खात्यास वर्ग करणे योग्य आहे का?

क) कंपनीने ३० दिवसानंतर न दिलेला लाभांश आयईपीएफला वर्ग करावा का?

**प्र.क्र. ४) फरक स्पष्ट करा.**

१) अंतिम लाभांश आणि अंतरिम लाभांश

२) लाभांश आणि व्याज

**प्र.क्र. ५) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) लाभांशाच्या बाबतीत सूचीबद्ध कंपनीने लक्षात ठेवावयाचे चार मुद्दे सांगा.

२) लाभांशाच्या कोणत्याही चार वैशिष्ट्यांची चर्चा करा.

३) व्याजाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**प्र.क्र. ६) खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१) लाभांश कंपनीच्या नफ्यातून दिला जातो.

२) अंतरिम लाभांश मुक्त राखीव निधीतून देता येत नाही.

३) अंतिम लाभांशासाठी वार्षिक सर्वसाधारण सभा निर्णायक आहे.

४) सूचीबद्ध कंपनीला लाभांश वाटपासंदर्भात अतिरिक्त मार्गदर्शक मार्गाचे अनुसरण करावे लागते.

५) समहक्क भागधारक लाभांशामध्ये शेवटचे प्राधान्य मिळते.

६) कंपनीस न दिलेला लाभांश वापरता येत नाही.

७) व्याज देणे हे कंपनीचे उत्तरदायित्व/कर्तव्य आहे.

८) अंतरिम लाभांश वाटपाकरीता सभासदाच्या मंजुरीची आवश्यकता नसते.

**प्र.क्र. ७) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) लाभांश परिभाषित करा आणि त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) व्याज परिभाषित करा आणि त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३) लाभांशाच्या घोषणेबाबत कायदेशीर तरतुदींची चर्चा करा.

४) अंतरिम लाभांश स्पष्ट करा.

❑❑❑

# ११ वित्तीय बाजार

**११.१ वित्तीय बाजार – अर्थ**
**११.२ वित्तीय बाजाराची कार्ये**
**११.३ वित्तीय बाजाराचे प्रकार**
११.३.१ नाणे बाजार
- अर्थ
- वैशिष्ट्ये
- महत्त्वाचे भागीदार
- साधने

११.३.२ भांडवल बाजार
- अर्थ
- वैशिष्ट्ये
- प्रकार
- साधने

**११.४ फरक**
१. नाणे बाजार आणि भांडवल बाजार
२. प्राथमिक बाजार आणि दुय्यम बाजार

## प्रस्तावना

व्यक्ती, संस्था, सरकार इत्यादींकडे अतिरिक्त निधी असल्यास आणि त्यांना तो गुंतवण्याची इच्छा असते त्यांनाच आपण गुतवणूकदार असे म्हणतो. त्याचप्रमाणे या निधीची आवश्यकता असणारे व्यावसायिक संस्था व सरकार असे कर्जदार असतात. गुंतवणूकदार अशा कर्जदारांना वित्तीय बाजारामार्फत निधीचा पुरवठा करतात.

## ११.१ वित्तीय बाजार – अर्थ

वित्तीय बाजार हा असा बाजार आहे की जेथे वित्तीय मालमत्तेची म्हणजेच वित्तीय साधनांची देवाणघेवाण किंवा खरेदी-विक्री केली जाते. वित्तीय बाजार बचतीला गुंतवणुकीत रूपांतरित करून बचतीची गतिशीलता वाढवतो. अशा प्रकारे गुंतवणूकदार व कर्जदार यांच्यातील मध्यस्थ म्हणून वित्तीय बाजार कार्य करते.

वित्तीय साधने म्हणजे दोन पक्षांमधील कायदेशीर करार असणारे मूल्यात्मक दस्तावेज असतात. ही साधने एका पक्षासाठी वित्तीय मालमत्ता तर दुसऱ्या पक्षासाठी वित्तीय जबाबदारी/देयता निर्माण करतात. उदा. भाग, बंधपत्रे, डेरिव्हेटीव्हज् (अनुकर्षित), व्यापारी विपत्र इ. वित्तीय साधने आहेत.

***डेरिव्हेटीव्हज :*** *डेरिव्हेटीव्हज हे एक असे वित्तीय साधन आहे की ते त्यात दर्शविलेल्या मालमत्तेचे म्हणजेच भाग, भागसाठा, चलन इत्यादींचे मूल्य दर्शवते.*

वित्तीय बाजार गुंतवणूकदारांकडून निधी गोळा करून तो निधी विविध व्यवसाय संघटनांपर्यंत प्रवाहित करतात. दीर्घकालीन वित्त पुरवठ्यासाठी भांडवल बाजार तर अल्पकालीन वित्त पुरवठ्यासाठी नाणे बाजार कार्य करते.

## ११.२ वित्तीय बाजाराची कार्ये

**१) संसाधनांचे हस्तांतरण :** वित्तीय बाजारामुळे सावकारांकडून अंतिम वापरकर्त्यांपर्यंत आर्थिक संसाधनांचे हस्तांतरण सुलभतेने होते.

२) **उत्पादनक्षम वापर :** वित्तीय बाजारामुळे गुंतवणूकदारांकडील अतिरिक्त अनुत्पादक निधी उत्पादन कार्याकडे वळवण्यास मदत होते.

३) **उत्पन्नात वाढ :** वित्तीय बाजारात गुंतवणूक केलेल्या गुंतवणूकदारांना त्यांनी केलेल्या गुंतवणुकीवर व्याज किंवा लाभांश दिला जातो. ज्यामुळे गुंतवणूकदारांच्या वैयक्तिक तसेच राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते.

४) **भांडवल उभारणी :** वित्तीय बाजारामुळे गुंतवणूकदारांकडील अतिरिक्त निधी वाणिज्य व औद्योगिक संघटनांकडे वळविला जातो. त्यामुळे भांडवल निर्मितीस चालना मिळते.

५) **किंमत निर्धारण :** वित्तीय बाजारातील वित्तीय साधनांच्या किमती या मागणी आणि पुरवठ्याच्या नियमानुसार निर्धारित होत असतात. निधीचा पुरवठा करणारे गुंतवणूकदार आणि निधीचा वापर करणारे उद्योजक यांच्यातील समन्वय आणि बाजारातील इतर घटक किंमत निर्धारणास मदत करतात.

६) **विक्री यंत्रणा :** आर्थिक बाजारपेठ गुंतवणूकदारासाठी आर्थिक मालमत्ता विक्रीसाठी एक यंत्रणा प्रदान करते. अशा मालमत्तेला एक बाजारपेठ व तरलता उपलब्ध करून देते.

७) **निधीस गतिशीलता :** गुंतवणूकदारानी बचत केलेली रक्कम उद्योग व्यवसायामध्ये गुंतवणूक करणे आवश्यक असते. वित्तीय बाजारामुळे गुंतवणूकदारांना त्यांच्या निवडीनुसार आणि जोखीम मूल्यांकनानुसार बचतीची गुंतवणूक करता येते यामुळे निधीचा योग्य उपयोग होऊन अर्थव्यवस्था तेजीत येते.

८) **तरलता :** वित्तीय बाजारामध्ये प्रतिभूतींच्या तरलतेची व्यवस्था असते. म्हणजेच गुंतवणूकदार वित्तीय साधनांची कमी वेळेत विक्री करून त्याचे रूपांतर पैशामध्ये करू शकतो. दीर्घकालीन मुदतीसाठी गुंतवणूक न करू इच्छिणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी हा महत्त्वाचा घटक आहे.


९) **सुलभ प्रवेश :** गुंतवणूकदार आणि उद्योग दोघांनाही एकमेकांची गरज असते. वित्तीय बाजारपेठ एक व्यासपीठ प्रदान करते. जिथे खरेदीदार किंवा विक्रेता दोघेही एकमेकांना सहज शोधू शकतात.

१०) **औद्योगिक विकास :** बचतीचे भांडवलात रूपांतर करण्यासाठी वित्तीय बाजारपेठ मदत करते. गुंतवणूकदारांच्या निधीचा उपयोग व्यावसायिक विकासासाठी उत्पादनक्षम पद्धतीने केला जातो ज्यायोगे आर्थिक विकास होऊ शकतो.

## ११.३ वित्तीय बाजाराचे प्रकार

वित्तीय बाजाराचे मुख्यत: नाणे बाजार आणि भांडवल बाजार यामध्ये वर्गीकरण केले जाते.

**वित्तीय बाजाराचे वर्गीकरण**




### ११.३.१ नाणे बाजार :

- **अर्थ :** नाणे बाजार हा अल्प मुदतीसाठी निधी देणे आणि कर्ज घेण्यासाठीची बाजारपेठ आहे. येथे व्यापार केलेल्या आर्थिक साधनांचा कालावधी एक दिवसापासून जास्तीत जास्त एक वर्षाचा असतो. तसेच या साधनांचे रूपांतर कालावधी आणि मूल्याचे नुकसान न करता सहज रोख स्वरूपाने केले जाऊ शकते. कंपनी, बँका, वित्तीय संस्था, सरकारी संस्था

इत्यादींच्या अल्प मुदतीच्या व अत्यंत अल्प मुदतीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मदत करणाऱ्या वित्तीय व्यवस्थेचा नाणे बाजार हा एक महत्त्वाचा भाग आहे. पैशास नजीकचा पर्याय ठरू शकेल अशा वित्तीय मालमत्तांची ही बाजारपेठ आहे. राजकोषपत्रे, व्यापारी पतपत्र इ. साधनांच्या आधारे नाणे बाजारात व्यापार केले जातात.

- **नाणे बाजाराची वैशिष्ट्ये :**

१) नाणे बाजारात कर्ज दिलेली किंवा घेतलेली रक्कम ही अल्प मुदतीची असते. नाणे बाजारातील साधनांचा कालावधी जास्तीत जास्त एक वर्ष इतका असतो.

२) नाणे बाजारात घडणाऱ्या व्यवहारांची संख्या जास्त असल्याने हा अल्पमुदतीच्या कर्जाऊ निधीचा घाऊक बाजार म्हणून ओळखला जातो.

३) नाणे बाजारातील व्यवहार हे बऱ्याचदा दूरध्वनीच्या सहाय्याने होत असतात व नंतर त्याचे लेखी पुष्टीकरण ई-मेल द्‌वारे केले जाते.

४) बँका, म्युच्युअल फंड, वित्तीय संस्था, मध्यवर्ती बँक इ. नाणे बाजारातील सहभागी घटक आहेत.

५) नाणे बाजारात सहभागी गुंतवणूकदार व कर्जदार यांच्यात व्यवहारिक संबंध असतात.

६) नाणे बाजारात व्यवहार करण्यासाठी कोणतेही निश्चित स्थान नाही.

७) नाणे बाजारातील साधनांचे कमीत कमी खर्चात व कमी कालावधीत सहजतेने पैशात रूपांतरण करता येते. या साधनांवर मिळणारा परतावा देखील कमी असतो.

८) नाणे बाजारातील पाच प्रमुख प्रकार

अ) कॉल मनी बाजार

ब) ठेव प्रमाण-पत्राचा बाजार

क) राजकोषपत्राचा बाजार

ड) व्यापारी विपत्राचा बाजार

इ) व्यापारी पतपत्राचा बाजार

- **नाणे बाजारामधील महत्त्वाचे भागीदार :**

**१) भारतीय रिझर्व्ह बँक (RBI) :** नाणे बाजारातील हा प्रमुख भागीदार आहे. रिझर्व्ह बँक नाणे बाजारामार्फत पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवते व वित्त धोरण राबवते. रिझर्व्ह बँक सरकारच्या वतीने प्रतिभूतींचे वाटप करते व विमेकरी म्हणूनही काम करते. रिझर्व्ह बँक बाजारातील मध्यस्थ व नियंत्रक म्हणून काम करते.

**२) केंद्र सरकार :** केंद्र सरकार नाणे बाजारामध्ये राजकोषीय पत्राद्‌वारे कर्जे घेतात. मध्यवर्ती बँक राजकोषीय पत्राची विक्री करते. राजकोषीय पत्रे हा शून्य जोखीम दस्तावेज आहे. या जोखीमविरहित पद्‌धतीमुळे बँक, व्यवसाय संस्था इ. राजकोषीय पत्राची खरेदी करतात आणि सरकारला अल्प कालावधीत कर्जे किंवा निधी पुरवतात. राज्य सरकार निधी उभारणीसाठी बाँडची विक्री करते. त्यास राज्य विकास कर्ज असे म्हटले जाते.

**३) सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम :** खेळते भांडवल उभारण्यासाठी सर्व सूचीबद्‌ध सरकारी कंपनी व्यापारी विपत्राची विक्री करतात आणि नाणे बाजारामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या निधी उभारतात.

**४) शेड्यूल्ड व्यापारी बँका :** शेड्यूल्ड व्यापरी बँका या नाणे बाजारामध्ये मोठ्या प्रमाणावर कर्ज घेणाऱ्या व देणाऱ्या असतात. कॉल मनी मार्केट, शॉर्ट नोटीस मार्केट, रेपो आणि रिव्हर्स रेपो मार्केटमध्ये कर्ज देतात व घेतात.

**५) विमा कंपनी :** सर्वसाधारण आणि जीवन विमा कंपनी दोन्हींही नाणे बाजारामध्ये निधीचा पुरवठा करतात. या कंपन्या भांडवल बाजारातील साधनांमध्ये अधिक गुंतवणूक करतात. नाणे बाजारातील विमा कंपन्यांची भूमिका मर्यादित असते.

६) **परस्पर निधी (म्युच्युअल फंड) :** म्युच्युअल फंड लोकांच्या गुंतवणुकीच्या विविध उद्दिष्टांसाठी विविध योजना देतात. म्युच्युअल फंड योजना या तरल योजना आहेत. या योजनांचे उद्दिष्ट नाणेबाजारातील साधनांमध्ये गुंतवणूक हे आहे.

> ***अधिक माहिती :***
> *म्युच्युअल फंड हे एक प्रकारचे साधन आहे जे गुंतवणूकदारांकडून निधी गोळा करते आणि प्रतिभूतींमध्ये जसे भाग, बाँड, नाणे बाजाराची साधने आणि इतर संपत्तीमध्ये गुंतवणूक करते.*

७) **बिगर बँकिंग वित्तीय संस्था (Non Banking Financial Corporations - NBFCs) :** बिगर बँकींग वित्तीय संस्था त्यांच्याकडील निधी सरकारी प्रतिभूती, बाँडस इ. मध्ये गुंतवतात. (बिगर बँकींग वित्तीय संस्था उदा. युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया)

८) **व्यवसाय संस्था :** व्यापारी पतपत्र हे अल्प मुदतीची वचन चिठ्ठी आहे. त्याद्वारे व्यवसाय संस्था कर्ज घेतात. जेव्हा बँक ठेव प्रमाणपत्र विक्रीस काढते तेव्हा व्यवसाय संस्था त्या खरेदी करून बँकेस कर्ज पुरवठा करतात.

९) **प्राथमिक विक्रेते :** सरकारी प्रतिभूतींमधील व्यवहार वाढविण्यात यांची प्रमुख भूमिका असते. ते सरकारी प्रतिभूती खरेदी करतात तसेच त्यासाठी भाग विक्री हमीदार म्हणून काम करतात.

- **नाणे बाजारातील साधने (Instruments of Money Market) :** नाणे बाजारामध्ये फक्त अशाच वित्तीय साधनांचा वापर केला जातो. जे पैशासाठी तात्काळ पर्याय असतात. यांपैकी काही साधने खाली स्पष्ट केली आहेत :

१) **कॉल मनी आणि नोटीस मनी (Call Money and Notice Money) :** भारतामध्ये नाणे बाजाराचे कॉल मनी आणि नोटीस मनी हे महत्त्वाचे घटक आहेत. कॉल मनी मध्ये अती अल्प मुदतीची कर्जे दिली जातात. उदा. १ दिवसासाठी. नोटीस मनी मध्ये कर्जे दिली व घेतली जातात. ज्याची मुदत २ दिवस ते १४ दिवस असते. पैसे देणाऱ्याकडून नोटीस मिळाल्याप्रमाणे कर्जाची परतफेड विशिष्ट मुदतीत करावी लागते. जेव्हा एखादी बँक तात्पुरता पैशाचा तुटवडा जाणवतो तेव्हा दुसरी बँक तो पैसा पुरवते म्हणून कॉल आणि नोटीस कॉल बाजाराला दोन बँकेतील कॉल मनी बाजार म्हणतात.

२) **राजकोषपत्रे (Treasury Bills) :** राजकोषपत्रे म्हणजे भारतीय मध्यवर्ती बँकेने केंद्र सरकारच्या वतीने जारी केलेली अल्प मुदतीची प्रतिभूती जी सरकारच्या अल्प मुदतीच्या निधीची गरज भागविण्यासाठी वितरित केली जातात. राजकोषपत्रांना ९१ दिवस, १८२ दिवस आणि ३६४ दिवस याची मर्यादा असते. ही पत्रे बँक, व्यक्ती, कंपनी, संस्था इत्यादींना विक्री केली जाते. ही पत्रे मुक्त हस्तांतरणक्षम असतात. राजकोषपत्राची किमान किंमत रु. २५,००० किंवा रु. २५,००० च्या पटीत असू शकते. याची विक्री सूट देऊन केली जाते. मात्र परतफेड दर्शनी किमतीला केली जाते. यास शून्य व्याज बंधपत्र असेही म्हणतात.

३) **व्यापारी विपत्र किंवा हुंडी (Trade Bill / Commercial Bills) :** व्यापारी विपत्राला व्यापारी हुंडी असे म्हणतात. ही हुंडी विक्रेता खरेदीदारावर तयार करतो. यादवारे खरेदीदारावर मालाच्या किमती एवढी विपत्र किंवा पावती बनवून उधारीवर वस्तूची विक्री केली जाते. यासाठी अल्प मुदत असते. सामान्यत: ९० दिवस आणि सहजपणे हस्तांतरित केले जाऊ शकते. जेव्हा विक्रेत्याला पैशाची गरज असेल त्यावेळी बँकेत जाऊन व्यापारी विपत्र वटवू शकतो. जेव्हा व्यापारी विपत्र व्यापारी बँकेद्वारे स्विकारले जाते तेव्हा व्यापारी विपत्र हे व्यवसायिक विपत्र म्हणून ओळखले जाते. विपत्राची मुदत पूर्ण होईपर्यंत बँक कितीही वेळ विपत्र परत कसर देऊन वटवू शकतात.

४) **व्यापारी पतपत्र (Commercial Papers) :** ही असुरक्षित असणारी वचनचिठ्ठी आहे. ज्याची मोठ्या कंपन्या विक्री करतात. अखिल भारतीय वित्तीय संस्था जसे की, सिडबी (SIDBI), एक्झिम बँक (Exim Bank) इ. आणि प्राथमिक विक्रेते जे ठराविक कालावधीच्या जसे की, व्यापारी पतपत्र विक्री करतात. जसे की, ७ दिवसांपासून ते जास्तीत जास्त १ वर्षापर्यंत व्यापारी पतपत्राची खरेदी किंमत किमान रु. ५ लाख आणि रु. ५ लाखाच्या पटीत

असते. हे दर्शनी किमतीवर सूट देऊन विकले जाते आणि सर्वसाधारण बँक ठेवीपेक्षा जास्त परतावा देते व जास्त तरलता असते. व्यक्ती, बँका, म्युच्युअल फंड कंपनी इ. व्यापारी पतपत्रात गुंतवणूक करतात.

५) **ठेव प्रमाणपत्र (Certificate of Deposits) :** व्यावसायिक बँक आणि वित्तीय संस्था ठेवी प्रमाणपत्राची विक्री करतात. या असुरक्षित वचनचिठ्ठी आहेत. बँकेमध्ये ठराविक मुदतीसाठी विशिष्ट व्याजदरांवर ठेव ठेवल्यानंतर मिळणारी ही पावती असते. किमान रु. १ लाख किंवा रु. १ लाखाच्या पटीतील रकमेसाठी याचे वाटप केले जाते. हे दर्शनी मूल्याला सूट देऊन विक्री केली जाते. त्याची मुदत ७ दिवसापासून १ वर्षापर्यंत असते. जर वित्तीय संस्थेने ठेव प्रमाणपत्र विक्री केले असेल तर त्याची मुदत ३ वर्ष असू शकते. ठेव प्रमाणपत्र व्यक्ती, कंपनी इ. खरेदी करतात.

६) **सरकारी प्रतिभूती (Government Securities) :** सरकारी आणि निमसरकारी संस्था विक्री योग्य कर्ज प्रतिभूती विक्रीस काढतात. जे सरकारवर मागणी आणि दाव्याचे दर्शक असतात. त्यांना सरकारी प्रतिभूती म्हणतात. केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था उदा. महानगरपालिका इ. हे या प्रतिभूती विक्रीस काढतात. या प्रतिभूती सुरक्षित प्रतिभूती म्हणून ओळखल्या जातात कारण त्यांची परतफेड करण्याची सरकारद्वारे हमी दिली जाते.

७) **रिझर्व्ह बँकेच्या पुनर्खरेदी कराराचा दर :** रेपो (Repo) किंवा पुनर्खरेदी करार हे असे करार ज्यामध्ये विक्रेता त्याच्या विक्री केलेल्या प्रतिभूती भविष्यात जास्त किमतीस पुनर्खरेदी करण्याचा करार करतो. भारतीय रिझर्व्ह बँक आणि व्यावसायिक बँकेमध्ये असे करार होतात. रेपो दर हा असा दर आहे ज्या दराने बँक रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घेतात आणि रिव्हर्स रेपो दर हा असा दर आहे ज्या दराने आरबीआय बँकेकडून कर्ज घेते. अर्थव्यवस्थेतील निधीच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँक कराराचा उपयोग करते. हे करार सर्व नाणे बाजारातील गुंतवणुकीतील सर्वांत तरल असतात. याची मुदत २४ तासापासून ते काही महिन्यांपर्यंत आहे.

८) **नाणे बाजार म्युच्युअल फंड (Money Market Mutual Funds) :** असा म्युच्युअल फंड जो नाणे बाजार दस्तावेजामध्ये गुंतवणूक करतो. उदा. कॉल मनी, रेपो, राजकोषपत्रे, ठेव प्रमाणपत्रे इ. अशा प्रकारच्या म्युच्युअल फंडाची कर्जरोख्यामध्ये गुंतवणूक केली जाते ज्याची मुदत १ वर्षापेक्षा कमी असते आणि कमी जोखीम असते. व्यक्ती, व्यवसाय संस्था यामध्ये नाणे बाजार म्युच्युअल फंड मध्ये गुंतवणूक करू शकतात.

**कृती :**
राजकोषपत्रे आणि व्यापारी विपत्र याबाबत अधिक माहिती मिळवा.

### ११.३.२ भांडवल बाजार (Capital Market) :

- **अर्थ :** ज्या ठिकाणी व्यावसायिक संस्थांना आवश्यक असणाऱ्या दीर्घ मुदतीचे भांडवल घेतले किंवा दिले जाते त्या बाजाराला भांडवल बाजार असे म्हणतात. भांडवल बाजाराच्या वित्तीय मालमत्तेला दीर्घ व अनिश्चित मुदत असते. देशाच्या आर्थिक व्यवस्थेचा भांडवल बाजार एक महत्त्वाचा घटक आहे जो संसाधने गतिशील करण्यास मदत करतो.

  'सेबी' नुसार भांडवल बाजार हा दीर्घ मुदतीची कर्ज आणि समहक्क भागासाठीचा बाजार आहे. या बाजारामधील भांडवल निधीत कर्ज आणि समहक्क भाग यांच्या खरेदी-विक्रीचा समावेश होतो. यामध्ये खाजगीरित्या कर्जरोखे व समहक्क भाग विक्री आणि संघटित बाजार या भाग बाजाराचाही समावेश होतो.

  भांडवल बाजाराचे एक महत्त्वाचे कार्य म्हणजे गुंतवणूकदार आणि कंपन्यांचे व्यवहार सुलभ करणे.

- **भांडवल बाजाराची वैशिष्ट्ये :** भांडवल बाजाराची मुख्य वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :

१) **गुंतवणुकदार आणि कर्जदार यांच्यातील दुवा :** भांडवल बाजार गुंतवणुकदारांना निधीच्या कर्जदाराशी जोडते. हे इतरकडील निधी उद्योजकांकडे वळवते.

२) **मध्यम आणि दीर्घ मुदतीची गुंतवणूक :** भांडवल बाजार एक बाजार आहे जेथे मध्यम आणि दीर्घ मुदतीच्या वित्तीय साधनाचा व्यापार केला जातो. या बाजारामध्ये व्यवसाय संस्था, औद्योगिक संस्था, वित्तीय संस्था देशांतर्गत आणि विदेशी दोन्ही बाजारांमधून दीर्घ मुदतीच्या निधीवर उभारतात.

**३) मध्यस्थाची उपस्थिती :** मध्यस्थ जसे दलाल, भाग विक्री हमीदार, व्यापारी, बँकर्स, कलेक्शन बँकर्स इ. च्या मदतीने भांडवल बाजार कार्यरत असते. हे मध्यस्थ भांडवल बाजाराचे महत्त्वाचे घटक आहेत.

**४) भांडवल निर्मितीला प्रोत्साहन देणे :** भांडवल बाजार गुंतवणूकदारांना आणि कर्जदारांना दीर्घकालीन निधीच्या व्यापारासाठी व्यासपीठ प्रदान करते. यामधून निधी गोळा होतो त्यामुळे अर्थव्यवस्थेत भांडवल तयार होते.

भांडवलाची निर्मिती ही अर्थव्यवस्थेच्या भांडवलाच्या सध्याच्या साठ्यात निव्वळ भर असते.

**५) सरकारी नियम आणि धोरणे याद्वारे नियमन केले जाते :** भांडवल बाजार मुक्तपणे चालतात. तथापि नियम आणि धोरणे याचे सरकारी नियमांद्वारे नियमन केले जाते. उदा. 'सेबी' भांडवल बाजाराची नियामक आहे.

**६) विक्रीयोग्य आणि विक्रीयोग्य नसलेल्या प्रतिभूतीचा व्यापार :** भांडवल बाजारामध्ये दोन्ही विक्रीयोग्य आणि विक्रीयोग्य नसलेल्या प्रतिभूतींचे व्यवहार होतात. विक्रीयोग्य प्रतिभूती हस्तांतरित केल्या जाऊ शकतात. उदा. भाग, कर्जरोखे इ. आणि विक्रीयोग्य नसलेल्या प्रतिभूती हस्तांतरित केल्या जाऊ शकत नाहीत. उदा. मुदत ठेव, कर्ज आणि आगाऊ रक्कम.

**७) विविध गुंतवणूकदार :** भांडवल बाजारामध्ये विविध प्रकारचे गुंतवणूकदार असतात. यामध्ये दोन्ही व्यक्ती जसे – सामान्य जनता आणि संस्थात्मक गुंतवणूकदार जसे – म्युच्युअल फंड, विमा कंपनी, वित्तीय संस्था इ.

**८) जोखीम :** या साधनामध्ये गुंतवणूक दीर्घ कालावधीची असल्याने जोखीम खूप जास्त असते. तथापि गुंतवणुकीवरील परतावा खूप जास्त असतो.

- **भांडवल बाजारातील साधने (Instruments in capital market) :**

१) समहक्क भाग

२) अग्रहक्क भाग

३) कर्जरोखे

४) बंधपत्र

५) सरकारी प्रतिभूती

६) सार्वजनिक ठेवी

- **भांडवल बाजाराचे प्रकार :** भांडवल बाजार प्रामुख्याने खालीलप्रमाणे वर्गीकृत केला जातो.

**१) सरकारी प्रतिभूती बाजार किंवा धोका नसलेल्या ठेवीचा बाजार :** या बाजारामध्ये सरकारी आणि निमसरकारी प्रतिभूतीचा व्यापार केला जातो.

**२) औद्योगिक प्रतिभूती बाजार :** या बाजारामध्ये नवीन किंवा विद्यमान व्यवसाय संस्थांच्या औद्योगिक प्रतिभूती जसे की भाग आणि कर्जरोखे यांचा व्यापार केला जातो. या बाजाराची विभागणी पुढीलप्रमाणे :

अ) प्राथमिक बाजार : येथे कंपनी प्रथमच नवीन भाग, कर्जरोखे इ. ची विक्री करते.

ब) दुय्यम बाजार : येथे विद्यमान भाग, कर्जरोखे इ. चा भाग बाजारामार्फत व्यापार केला जातो.

### अ) प्राथमिक बाजार :

प्राथमिक बाजारात कंपनी भाग, कर्जरोखे इ. प्रतिभूतींची प्रथमच विक्री करून नवीन भांडवल उभारणी करत असते. हा पूर्णत: नवीन प्रतिभूतींचा बाजार आहे, ज्या ठीकाणी प्रतिभूतींची विक्री प्रथमच गुंतवणूकदारांना केली जाते आणि म्हणूनच याला नवीन प्रतिभूतींचा बाजार असेही म्हटले जाते.

कंपन्या, सरकार, संस्था इत्यादींना भांडवल उभारणी करून देणे हे प्राथमिक बाजाराचे प्रमुख कार्य आहे. या ठिकाणी गुंतवणूकदार यांच्याकडील अतिरिक्त निधी फायदेशीर कंपन्यांमध्ये गुंतवून कंपन्या सुलभतेने भांडवल उभारणी करत असतात. भांडवल उभारणीच्या पद्धतीनुसार प्राथमिक बाजाराचे समहक्क किंवा मालकीचा बाजार

व कर्जाऊ बाजार असे प्रकार पडतात. समहक्क बाजारात समहक्क भाग, अग्रहक्क भाग इ. विक्रीस काढले जातात तर कर्जाऊ बाजारात कर्जरोखे , बंधपत्रे, कायम ठेवी इ. ची विक्री केली जाते.

- **प्राथमिक बाजारातील भांडवल उभारणीच्या पद्धती :**

**१) प्रारंभिक/प्राथमिक भाग विक्री (IPO) :** प्रारंभिक भाग विक्री म्हणजे कंपनीने विक्रीस काढलेले भाग थेट सर्वसामान्य लोकांमध्ये प्रथमत: विक्रीस काढणे होय. गुंतवणूकदार थेट कंपनीकडून भागांची खरेदी करू शकतो.

**२) फॉलोऑन/पुढील सार्वजनिक विक्री (FPO) :** भागांची प्रारंभिक सार्वजनिक विक्री झाल्यावर कंपनी पुन्हा एकदा नवीन भाग विक्रीस काढते तेव्हा त्यास 'पुढील सार्वजनिक विक्री' असे म्हणतात.

**३) हक्कभाग विक्री :** कंपनी विस्तार करते वेळी किंवा निधी गोळा करत असताना विद्यमान भागधारकांना नवे भाग खरेदी करून गुंतवणूक करण्याची प्रथमत: संधी देते. तेव्हा त्यास 'हक्कभाग विक्री' असे म्हणतात. यामध्ये नवीन भाग विक्रीस काढल्यानंतर सर्वसामान्य जनतेच्या आधी कंपनीच्या विद्यमान समहक्क भागधारकांना नवीन विक्रीस काढलेल्या भागांच्या खरेदीचा 'हक्क' दिला जातो.

**४) खाजगीरित्या विक्री :** खाजगीरित्या विक्री म्हणजे २०० पेक्षा कमी निवडक व्यक्ती, वित्तीय संस्था, बँका, विमा कंपन्या यांना गुंतवणुकीची दिलेली संधी होय. या पद्धतीमुळे कमी कालावधीत व खर्चात अधिक कार्यक्षमतेने निधी उभारण्यास मदत होते.


**ब) दुय्यम बाजार :**

दुय्यम बाजाराला प्रामुख्याने 'भाग बाजार' देखील ओळखले जाते. या बाजारात अगोदरच वितरित केलेल्या प्रतिभूतींच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार गुंतवणूकदारांमार्फत होत असतात. प्रारंभिक भाग विक्री नंतर जेव्हा भागांची भाग बाजारात नोंदणी केली जाते. तेव्हा हे भाग विक्रीस काढले जातात.

प्राथमिक बाजार व दुय्यम बाजार यातील मुख्य फरक म्हणजे प्राथमिक बाजारात नवीन प्रतिभूतींची विक्री केली जाते तर दुय्यम बाजारात अगोदरच अस्तित्वात असलेल्या प्रतिभूतींची पुनर्विक्री केली जाते. दुय्यम बाजारात नवीन प्रतिभूतींची विक्री केली जात नाही.

**अधिक माहिती :**

**वित्तीय बाजाराचे इतर प्रकार**




**अ) वस्तू बाजार :** असा बाजार ज्यामध्ये वस्तू उत्पादक, व्यापारी, निर्यातदार आणि ग्राहक यांच्यात विकल्या जातात.

**ब) वितरण बाजार (डेरिव्हेटिव्हज बाजार) :** या बाजारपेठेत डेरिव्हेटिव्हजचा व्यापार होतो. डेरिव्हेटिव्हज हे भविष्यातील करार, पुढील करार, पर्याय, अदलाबदल इ. मध्ये वर्गीकृत केले जाऊ शकतात.

**क) परकीय चलन बाजार :** (फॉरेन एक्सेंज मार्केट) या बाजारात परकीय चलनांचा व्यापार होतो. परकीय चलने देशी चलनाने विकत घेतली जातात आणि परदेशी चलने देशांतर्गत चलनांसाठी विकली जातात.

## ११.४ फरक

### १) नाणे बाजार व भांडवल बाजार

| मुद्दे | नाणे बाजार | भांडवल बाजार |
|---|---|---|
| १) अर्थ | वित्तीय बाजाराचा असा घटक ज्यामध्ये अल्प मुदतीच्या कर्जाची देव-घेव केली जाते. | वित्तीय बाजाराचा असा घटक ज्यामध्ये दीर्घ मुदतीच्या निधीच्या देवघेवीचा व्यवहार केला जातो. |
| २) कालावधी | या बाजारातून अल्पमुदतीच्या निधीची उभारणी केली जाते. हा कालावधी एक वर्ष किंवा त्यापेक्षाही कमी असतो. | या बाजारातून दीर्घ मुदतीच्या निधीची उभारणी केली जाते. हा कालावधी एक वर्षाहून जास्त असतो. |
| ३) साधने | ठेव प्रमाणपत्र, पुनर्खरेदी करार, व्यापारी पतपत्र, राजकोषपत्रे इत्यादी नाणे बाजारातील वित्तीय साधने आहेत. | भाग, भागसाठा, कर्जरोखे, बंधपत्रे व इतर प्रतिभूती ही भांडवल बाजारातील वित्तीय साधने आहेत. |
| ४) कर्जाचा उद्देश | अल्प मुदतीच्या गुंतवणुकीसाठी किंवा खेळत्या भांडवलाची गरज पूर्ण करण्यासाठी अल्पकालीन निधीची गरज पूर्ण करण्यासाठी निधी घेतला जातो. | व्यवसाय वाढीसाठी स्थिरस्थावर करण्यासाठी, मालमत्ता खरेदी करण्यासाठी दीर्घकालीन निधीची आवश्यकता असते. |
| ५) सहभागी संस्था | मध्यवर्ती बँक, व्यावसायिक बँका, बिगर-बँक वित्तीय संस्था, विपत्र दलाल इ. | भाग बाजार, व्यावसायिक बँका, बिगर-बँक वित्तीय संस्था, वित्तीय मध्यस्थ इ. |
| ६) जोखीम | नाणे बाजाराचा कालावधी खूपच कमी असल्याने जोखीम कमी असते. | भांडवल बाजाराचा कालावधी जास्त असल्याने नाणे बाजाराच्या तुलनेत जोखीम जास्त असते. |
| ७) गुंतवणुकीवरील परतावा | नाणे बाजारातील गुंतवणूक अधिक तरल व सुरक्षित असल्याने मिळणारा परतावा हा कमी असतो. | भांडवल बाजारातील गुंतवणूक अधिक जोखमीची असल्याने मिळणारा परतावा जास्त असतो. |
| ८) अर्थव्यवस्थेतील भूमिका | नाणे बाजारामुळे अर्थव्यवस्थेतील निधीची तरलता वाढण्यास मदत होते. | भांडवल बाजार अर्थव्यवस्थेतील बचतीचा कार्यक्षम वापर करण्यास मदत करतो. |

### २) प्राथमिक बाजार व दुय्यम बाजार

| मुद्दे | प्राथमिक बाजार | दुय्यम बाजार |
|---|---|---|
| १) अर्थ | कंपनीच्या नवीन प्रतिभूतींची विक्री प्राथमिक बाजारात केली जाते. | अस्तित्वात असलेल्या प्रतिभूतींच्या पुनर्विक्रीचा व्यवहार दुय्यम बाजारात केला जातो. |
| २) गुंतवणुकीची पद्धत | प्रतिभूतींची थेट कंपनीकडून खरेदी केल्याने ही थेट गुंतवणुकीची पद्धत म्हणून ओळखली जाते. | प्रतिभूतींच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार गुंतवणूकदारांमध्ये आपापसांत होत असल्याने ही अप्रत्यक्ष गुंतवणुकीची पद्धत म्हणून ओळखली जाते. |
| ३) कृतिशील घटक | कंपनी आणि गुंतवणूकदार हे या बाजारात व्यवहार करणारे कृतिशील घटक असतात. | फक्त गुंतवणूकदार हेच या बाजारातील कृतिशील घटक असतात. |

| मुद्दे | प्राथमिक बाजार | दुय्यम बाजार |
|---|---|---|
| ४) मध्यस्थ | या बाजारात भाग विमेकरी मध्यस्थ म्हणून असतात. | या बाजारात प्रतिभूतींचे दलाल मध्यस्थ म्हणून काम पाहतात. |
| ५) प्रतिभूतींचे मूल्य | प्राथमिक बाजारात कंपनीने ठरविल्याप्रमाणे प्रतिभूतींचे मूल्य निश्चित होते. | दुय्यम बाजारात मागणी व पुरवठा यानुसार प्रतिभूतींच्या किमतीत चढ-उतार होत असतात. |

## सारांश

- **वित्तीय बाजार**

  वित्तीय बाजार म्हणजे असा बाजार ज्यामध्ये लोक आर्थिक प्रतिभूती आणि डेरिव्हेटिव्हजचा कमी व्यवहार किमतीवर व्यापार करतात.

- **वित्तीय बाजाराची कार्ये**

  १) संसाधनाचे हस्तांतरण　　२) उत्पादनक्षम वापर
  ३) उत्पन्नात वाढ　　४) भांडवल उभारणी
  ५) किंमत निर्धारण　　६) विक्री यंत्रणा
  ७) निधीस गतिशीलता　　८) तरलता
  ९) सुलभ प्रवेश　　१०) औद्योगिक विकास

- **नाणे बाजार :**

  नाणे बाजार हे अल्प मुदतीचे बाजार म्हणून ओळखले जाते. असा बाजार ज्यामध्ये अल्प मुदतीसाठी कर्ज दिले आणि घेतले जाते. ज्याची मुदत १ दिवस ते १ वर्ष असू शकते.

- **भांडवल बाजार :**

  भांडवल बाजार म्हणजे असा बाजार ज्यामध्ये व्यवसायिक उपक्रमासाठी आवश्यक असलेले दीर्घ मुदतीचे भांडवल दिले किंवा घेतले जाते. वित्तीय मालमत्ता ज्याचा दीर्घ किंवा अनिश्चित कालावधी असतो असे व्यवहार भांडवल बाजारात करतात.

- **प्राथमिक बाजार :**

  प्राथमिक बाजार हा भांडवल बाजाराचा महत्वाचा प्रकार आहे यास नवीन विक्री बाजार म्हणूनही ओळखले जाते.

- **दुय्यम बाजार :**

  साधारणत: दुय्यम बाजार हा भाग बाजार म्हणून ओळखला जातो. येथे गुंतवणूकदाराद्वारे विद्यमान प्रतिभूतींची खरेदी किंवा विक्री केली जाते.

## स्वाध्याय

**प्र.क्र. १ अ) खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१) वित्तीय बाजार असा बाजार आहे ज्यामध्ये लोक ...................... आणि डेरिव्हेटीजचा कमी व्यवहार किमतीवर व्यापार करतात.

अ) सोने　　ब) वित्तीय प्रतिभूती　　क) वस्तू

२) व्यापारी बँक व्यापारी विपत्र स्वीकारते यास ...................... म्हणतात.

अ) राजकोष पत्र　　ब) व्यावसायिक विपत्र　　क) व्यापारी पतपत्र

३) नाणे बाजार हा ..................... मुदतीसाठी निधी देणे आणि कर्ज घेण्यासाठीचा बाजार आहे.

अ) अल्प ब) मध्यम क) दीर्घ

४) केंद्र सरकार नाणे बाजारात ..................... चे वाटप करून कर्जाऊ रक्कम उभारते.

अ) व्यापारी पतपत्र ब) व्यापारी विपत्र क) राजकोष पत्र

५) ..................... बाजारात व्यावसायिक संस्थांना आवश्यक असणारे दीर्घ मुदतीचे भांडवल घेतले किंवा दिले जाते.

अ) नाणे ब) भांडवल क) सोने

**ब) जोड्या जुळवा.**

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | वित्तीय बाजार | १) | दीर्घ मुदत निधी |
| ब) | नाणे बाजार | २) | नवीन विक्री बाजार |
| क) | प्राथमिक बाजार | ३) | वस्तूंचा व्यापार |
| ड) | व्यापारी पतपत्र | ४) | अल्प मुदत निधी |
| | | ५) | वित्तीय प्रतिभूतीचा व्यापार |
| | | ६) | भाग बाजार |
| | | ७) | असुरक्षित वचन चिठ्ठी |
| | | ८) | सुरक्षित वचन चिठ्ठी |

**क) खालील प्रत्येक विधानासाठी एक शब्द किंवा शब्दसमूह किंवा संज्ञा लिहा.**

१) असा बाजार ज्यामध्ये कमी व्यवहार किमतीवर प्रतिभूतीचा आणि डेरिव्हीटीजचा व्यापार केला जातो.

२) दीर्घ मुदतीसाठी निधी पुरवतो असा बाजार.

३) अल्प मुदतीसाठी निधी पुरवतो असा बाजार.

४) बँकेला तात्पुरत्या निधीचा तुटवडा होतो त्यावेळेस बँक नाणे बाजाराचे हे साधन स्वीकारते.

५) सरकारच्या वतीने मध्यवर्ती बँकेने सादर केलेले विपत्र.

६) नवीन विक्रीस काढलेल्या प्रतिभूतीचे व्यवहार होतात असा बाजार.

**ड) खालील विधाने बरोबर की चूक ते लिहा.**

१) वित्तीय बाजार म्हणजे असा बाजार ज्यामध्ये जास्त व्यवहार किमतीवर वित्तीय प्रतिभूती आणि वितरणाचा व्यापार केला जातो.

२) नाणेबाजार हा दीर्घ मुदतीच्या निधीसाठी आहे.

३) भांडवल बाजार हा दीर्घ मुदतीच्या निधीसाठी आहे.

४) प्राथमिक बाजार नवीन प्रतिभूतींचा बाजार म्हणून ओळखला जातो.

५) दुय्यम बाजारास साधारणतः भाग बाजार म्हणून ओळखले जाते.

६) व्यापारी पतपत्र ही सुरक्षित वचनचिठ्ठी आहे.

७) व्यापारी बँकेद्वारे राजकोष पत्रे वाटप केली जातात.

**इ) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) राजकोषपत्रे, भाग, ठेव प्रमाणपत्रे.

२) नंतरची सार्वजनिक विक्री, खाजगीरित्या विक्री, व्यापारी पतपत्र.

३) नवीन विक्री बाजार, कॉल मनी मार्केट, दुय्यम बाजार.

**फ) खालील विधाने पूर्ण करा.**

१) नाणेबाजार हा ………………… मुदतीसाठी निधी देणे आणि कर्ज घेण्यासाठीची बाजारपेठ आहे.

२) जेव्हा व्यापारी विपत्र व्यापारी बँकेद्वारे स्वीकारले जाते तेव्हा ते ………………… म्हणून ओळखले जाते.

३) व्यावसायिक बँकेने जारी केलेली असुरक्षित वचनचिठ्ठी म्हणजेच ………………… होय.

४) ………………… बाजारात नवीन भाग व नवीन कर्जरोखे इत्यादि प्रतिभूतींची विक्री होते.

५) भांडवल बाजारात ………………… वर्षापेक्षा जास्त मुदतीच्या वित्तीय साधनांचा व्यापार केला जातो.

**ग) कंसातील अचूक पर्याय निवडा.**

| गट 'अ' | | गट 'ब' | |
|---|---|---|---|
| अ) | नाणे बाजार | १) | ………………… |
| ब) | शून्य जोखमीचे बंधपत्र | २) | ………………… |
| क) | ………………… | ३) | भांडवल बाजार |
| ड) | ………………… | ४) | दुय्यम बाजार |

(अस्तित्वात असलेल्या प्रतिभूतींची पुनर्विक्री, राजकोषपत्रे, दीर्घकालिन निधी, अल्प मुदतीचे निधी)

**ह) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) वित्तीय बाजार म्हणजे काय?

२) कॉल मनी बाजार म्हणजे काय?

३) ठेव प्रमाणपत्र म्हणजे काय?

४) व्यापारी विपत्र म्हणजे काय?

५) नवीन विक्री बाजार म्हणजे काय?

**ई) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१) अस्तित्वाने असलेल्या प्रतिभूतींच्या पुनर्विक्रीचा व्यवहार <u>प्राथमिक</u> बाजारात केला जातो.

२) <u>दुय्यम</u> बाजारात कंपनी जनतेला प्रथमत: नवीन भागांची विक्री करते.

३) <u>नाणे बाजारात</u> एका वर्षापेक्षा जास्त मुदतीच्या वित्तीय साधनांचा व्यापार केला जातो.

४) वित्तीय बाजाराचे मुख्यत: भांडवल बाजार आणि <u>कॉल मनी मार्केट</u> यामध्ये वर्गीकरण केले जाते.

**प्र.क्र. २) खालील संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा.**

१) वित्तीय बाजार २) भांडवल बाजार

३) नाणे बाजार ४) कॉल मनी बाजार

५) राजकोष पत्रे ६) व्यापारी विपत्र

७) पुनर्खरेदी करार ८) प्राथमिक बाजार

९) दुय्यम बाजार

**प्र.क्र. ३) खालील घटना/परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा.**

१) जॉय कं.लि. ही नव्याने स्थापन झालेली कंपनी आहे. जिला प्रथमच भांडवल उभारणीसाठी समहक्क भागाची विक्री करावयाची आहे.

अ) भाग विक्रीसाठी प्राथमिक बाजारात का दुय्यम बाजारात जावे लागेल?

ब) सार्वजनिक भाग विक्रीला हक्क भाग म्हणून भाग विक्रीचे आवाहन करता येईल?

क) जॉय कं. लि. ने समहक्क भाग विक्री केली तर त्यास काय म्हणता येईल? प्राथमिक भाग विक्री का दुय्यम भाग विक्री?

२) श्री. क्ष हे पी.क्यु.आर कं.लि.चे मुख्य वित्त अधिकारी आहेत. जी बांधकाम व्यवसायातील नामांकित कंपनी आहे. अनेकदा श्री. क्ष यांना कमी कालावधीसाठी कंपनीच्या अतिरिक्त निधीमध्ये गुंतवणूक करण्याचा निर्णय घ्यावा लागतो आणि कधी कधी कमी कालावधीसाठी निधी कसा उभा करायचा हे देखील ठरवावे लागते.

अ) समजा श्री क्ष यांना कंपनीच्या वतीने कमी कालावधीसाठी ५ लाख रुपयांची गुंतवणूक करावयाची आहे तर ते समहक्क भागामध्ये गुंतवणूक करतील की ठेव प्रमाणपत्रामध्ये गुंतवणूक करतील?

ब) कंपनीकडे असलेली शिल्लक रक्कम कंपनीला गुंतवणूक करायची आहे. ती रक्कम कंपनीला ४ महिन्यात परत पाहिजे तर कंपनी राजकोष पत्रामध्ये गुंतवणूक करेल की सरकारी प्रतिभूतीमध्ये गुंतवणूक करेल?

क) कंपनी ठेव प्रमाणपत्र विक्री करू शकते का?

**प्र.क्र. ४) फरक स्पष्ट करा.**

१) प्राथमिक बाजार आणि दुय्यम बाजार

२) नाणे बाजार आणि भांडवल बाजार

**प्र.क्र. ५) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) वित्तीय बाजाराची कोणतीही चार कार्ये विशद करा.

२) नाणे बाजाराची कोणतीही चार वैशिष्टये विशद करा.

३) भांडवल बाजाराची कोणतीही चार वैशिष्टये विशद करा.

४) नाणे बाजारातील कोणतीही चार साधने स्पष्ट करा.

**प्र.क्र. ६) खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१) गुंतवणूकदार आणि कर्जदार यांच्यातील वित्तीय बाजारपेठ हा दुवा आहे.

२) नाणे बाजारामध्ये विविध साधनांद्वारे अल्प मुदतीसाठी वित्त उपलब्ध केले जाते.

३) भांडवल बाजार व्यवसाय क्षेत्रासाठी उपयुक्त आहे.

४) नाणे बाजारात विविध भागीदार समाविष्ट असतात.

**प्र.क्र. ७) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) वित्तीय बाजाराची कार्ये स्पष्ट करा.

२) नाणे बाजारातील साधने विशद करा.

३) भांडवल बाजाराची वैशिष्ट्ये विशद करा.

# १२ भाग बाजार


**१२.१ भाग बाजार : अर्थ**

**१२.२ भाग बाजाराची कार्ये**

**१२.३ भारतातील प्रमुख भाग बाजार**

**१२.४ भाग बाजाराशी संबंधित महत्वाच्या संज्ञा**

**१२.५ भारतीय प्रतिभूती विनिमय मंडळ (सेबी)**

१२.५.१ सेबीची कार्ये

**१२.६ फरक**


### प्रस्तावना :

भाग बाजार हा भांडवल बाजारातील एक महत्वाचा घटक आहे. भाग बाजार हा प्रतिभूतींची खरेदी विक्री केल्या जाणाऱ्या वित्तीय बाजाराचाच एक घटक आहे. भाग बाजार ही एक अशी संघटित भांडवली बाजारपेठ आहे की जेथे गुंतवणूकदार गुंतवणूक व सट्टेबाजीच्या उद्देशाने प्रतिभूतींची खरेदी व विक्री करतात. भाग बाजारात केवळ सूचीबद्ध प्रतिभूतींचेच व्यवहार केले जातात.

सूचीबद्ध प्रतिभूती : म्हणजे अशा प्रतिभूती ज्यांच्या भाग बाजाराच्या व्यवहार यादीमध्ये समावेश आहे. कोणत्याही कंपनीला आपल्या प्रतिभूती भाग बाजारात नोंदणी करण्यासाठी नोंदणीसाठीचा अर्ज करून भाग बाजाराच्या नियम व कायद्याचे पालन करावे लागते.

भाग बाजाराला दुय्यम बाजार किंवा शेअर बाजार किंवा शेअर मार्केट असेही म्हणतात.

### १२.१ भाग बाजार – अर्थ

भाग बाजार ही एक अशी विशिष्ट जागा आहे की जेथे विविध प्रकारच्या प्रतिभूतींची खरेदी विक्री केली जाते. प्रतिभूती या संकल्पनेत म्युच्युअल फंडचे युनिट, समहक्क भाग, अग्रहक्क भाग, कर्जरोखे, सरकारी प्रतिभूती, बंधपत्रे इत्यादींचा समावेश होतो. भाग बाजार हे गुंतवणूकदार व कर्ज घेणाऱ्या कंपन्या यांच्यातील मध्यस्थ म्हणून काम करतात. गुंतवणूकदारांना गुंतवणुकीची सुरक्षितता व स्थिरता देण्यासाठी भारतातील भाग बाजारांचे सेबीद्वारे नियमन केले जाते.

सन १५७१ मध्ये स्थापन झालेला लंडन भाग बाजार हा जगातील सर्वात जुना भाग बाजार आहे. तर सन १८७५ मध्ये स्थापन झालेला मुंबई (बॉम्बे) भाग बाजार (Bomb yS tockE x h g ) हा भारतातील सर्वात जुना भाग बाजार आहे.

### भाग बाजाराची व्याख्या :

प्रतिभूती करार (नियमन) कायदा १९५६ नुसार भाग बाजार म्हणजे ''प्रतिभूतींच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारासाठी मार्गदर्शन करणे, त्यांचे नियंत्रण व नियमन करण्याच्या उद्देशाने स्थापन केलेली, कायदेशीर मान्यता असलेली वा नसलेली व्यक्तींची संघटना, संस्था किंवा मंडळ होय.''

हजबंड व डॉकरेरी यांच्या मते –

''भाग बाजार म्हणजे खाजगीरित्या संघटित केलेला असा बाजार की जो प्रतिभूतींच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहाराची सुविधा पुरवतो.''

#### भाग बाजाराची महत्वाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

१) **प्रतिभूतींचा बाजार** : भाग बाजार हे एक असे स्थान आहे जेथे सर्व प्रकारच्या कंपन्या, सरकारी, निमसरकारी प्रतिभूतींचा व्यवहार केला जातो.

२) **प्रतिभूतींचा पुनर्व्यवहार :** भाग बाजारात कंपन्यांनी अगोदर विक्री केलेल्या प्रतिभूतींच्या खरेदी-विक्रीचे पुनर्व्यवहार होत असतात. अनेक गुंतवणूकदारांमध्ये आपल्याकडील प्रतिभूतींच्या खरेदी विक्रीचे व्यवहार होतात.

३) **सूचीबद्ध केलेल्या/प्रतिभूती :** भाग बाजारात फक्त सूचीबद्ध केलेल्या/नोंदविलेल्या प्रतिभूतींचेंच व्यवहार करता येतात. सूचीबद्ध कंपन्यांची यादी गुंतवणूकदारांच्या हिताचे रक्षण करते; कारण अशा कंपन्यांना भाग बाजाराने ठरवून दिलेल्या कठोर नियमांचे काटेकोर पालन करावे लागते.

४) **संघटित आणि नियमन केलेला बाजार :** भाग बाजारात सूचीबद्ध केलेल्या कंपन्यांना भाग बाजार व सेबीने ठरवून दिलेल्या नियमांचे, मार्गदर्शक सूचनांचे व कायद्याचे पालन करावे लागते.

५) **निश्चित स्थान :** भाग बाजार ही विशिष्ट अशी भौतिक जागा आहे जेथे प्रतिभूतींचा व्यवहार केला जातो. ही एक अशी बाजारपेठ आहे जेथे दलाल व मध्यस्थ व्यवहार करण्यासाठी एकत्र येतात. आता भाग बाजारातील सर्व व्यवहार इलेक्ट्रॉनिक पद्धतीने केले जातात.

६) **केवळ सदस्यांद्वारे व्यवहार :** भाग बाजारातील प्रतिभूतींचे व्यवहार हे भाग बाजाराचे सदस्य किंवा अधिकृत दलाल यांच्या मार्फतच केले जाऊ शकतात.

### • भाग बाजाराचे व्यवस्थापन :

भाग बाजाराची कार्यकारी समिती भाग बाजाराचे एकूण व्यवहार व व्यवस्थापन पाहते. या कार्यकारी समितीची रचना, अधिकार आणि नावे प्रत्येक भाग बाजारानुसार बदलतात. कार्यकारी समितीला मदत करण्यासाठी सल्लागार समिती, नोंदणी समिती इत्यादी कार्यरत असतात.

### • भारतातील भाग बाजारांचा संघटन प्रकार :

भारतामध्ये भाग बाजार पुढील तीन पैकी एक स्वरूपात संघटित केला जाऊ शकतो.

१) नफा न मिळवणारी ऐच्छिक संस्था.

२) भागांनी मर्यादित जबाबदारीची कंपनी.

३) हमीने मर्यादित जबाबदारीची कंपनी.

प्रतिभूती करार (नियमन) कायदा १९५६ मध्ये भाग बाजाराचे कामकाज, परवाना देणे, मान्यता आणि सट्टेबाजीवर नियंत्रण ठेवण्याचे नियम दिले आहेत.

### • भाग बाजारचे सदस्यत्व :

भाग बाजाराच्या सदस्यतेसाठी पात्रता निकष प्रत्येक भाग बाजारानुसार भिन्न असू शकतात. (अतिरिक्त माहितीसाठी संबंधित भाग बाजाराचे संकेतस्थळ पहा.)

## १२.२ भाग बाजाराची कार्ये :

१) **बचतीची गतीशिलता :** भाग बाजाराचे सूनियोजित रीतीने नियमन व नियंत्रण केले जाते. ज्यामुळे गुंतवणूकदारांच्या हिताचे रक्षण होते. त्यामुळे लहान व मोठे गुंतवणूकदार भाग बाजाराच्या माध्यमातून प्रतिभूतींमध्ये गुंतवणूक करायला प्रोत्साहित होतात. अशा प्रकारे प्रतिभूतींच्या खरेदी विक्रीसाठी तयार बाजारपेठ उपलब्ध होते.

२) **भांडवल उभारणी :** गुंतवणुकीवरील चांगला परतावा व भांडवलवृद्धीमुळे प्रतिभूतींमधील गुंतवणूकदार भाग बाजारामार्फत अधिक गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित व आकर्षित होतात. कंपन्या देखील गुंतवणूकदारांच्या विविध प्रकारच्या गरजा भागविण्यासाठी विविध प्रकारच्या प्रतिभूती वितरित करून सुलभतेने निधी गोळा करू शकतात. अशा प्रकारे भाग बाजार भांडवल उभारणीचे साधन म्हणून काम करतात.

३) **प्रतिभूतींचे मूल्यनिर्धारण :** भाग बाजार मागणी आणि पुरवठ्याच्या नियमाद्वारे प्रतिभूतींचे मूल्य निर्धारित करण्यास मदत करतो. नफा कमावणाऱ्या वृद्धीष्ठित (g owth orien ed) कंपन्यांच्या प्रतिभूतींना जास्त मागणी असल्याने त्यांचे मूल्य जास्त असते. प्रतिभूतींचे मूल्यांकन करणे; गुंतवणूकदार, सरकार, धनको इत्यादींसाठी उपयुक्त ठरते. गुंतवणूकदारांना

त्यांच्या प्रतिभूतींचे मूल्य समजते त्यामुळे योग्य गुंतवणूकीचा निर्णय घेता येतो. धनकोंना कंपनींच्या पतपात्रतेचा निश्चित अंदाज करता येतो.

४) **अर्थ व्यवस्थेचा भारमापक :** भाग बाजार हा देशाच्या आर्थिक स्थितीचे मोजमाप करणारा विश्वासार्ह भारमापक आहे. देश आणि अर्थव्यवस्थेतील प्रत्येक छोट्या मोठ्या बदलांचा परिणाम भागांच्या किमतीमध्ये दिसून येतो. भागांच्या किमतीमधील वाढ किंवा घट अर्थ व्यवस्थेतील तेजी वा मंदीचे संकेत दर्शवतात, म्हणूनच भाग बाजाराला अर्थव्यर्वस्थेची नाडी किंवा आरसा म्हणून ओळखले जाते जी देशाची आर्थिक परिस्थिती प्रतिबिंबीत करते.

५) **गुंतवणूकदारांच्या हिताचे रक्षण करणे :** भाग बाजार गुंतवणूकदारांच्या हिताचे रक्षण करतो. भाग बाजारात फक्त सूचीबद्ध/नोंदणीकृत प्रतिभूतींचा व्यवहार केला जातो. कंपनीची योग्यता पडताळल्यानंतरच कंपनी भाग बाजारात सूचीबद्ध केली जाते. ज्या कंपन्या सूचीबद्ध केल्या जातात त्याना भाग बाजाराच्या नियम व कायद्यांचे पालन करावे लागते. त्यामुळे भाग बाजारामार्फत व्यवहारांच्या सुरक्षिततेची हमी मिळते.

६) **तरलता :** भाग बाजाराचे मुख्य कार्य म्हणजे प्रतिभूतींच्या खरेदी विक्रीसाठी तयार बाजारपेठ उपलब्ध करणे. भाग बाजारामुळे गुंतवणूकदारांना त्यांची गुंतवणूक केव्हाही अल्प किंवा मध्यम मुदतीत आणि पैशात रूपांतरित करता येणार याची खात्री असल्याने गुंतवणूकदार संकोच न बाळगता दीर्घकालीन प्रकल्पात गुंतवणूक करू शकतात.

७) **भांडवलाचे योग्य वाटप :** नफा कमावणाऱ्या कंपन्यांच्या भागांच्या किमती जास्त असतात. त्यांचा व्यापार (खरेदी व विक्री) सुलभतेने सुरू असतो अशा कंपन्या भाग बाजारातून सहजतेने नवीन भांडवल उभारू शकतात. भाग बाजारातील प्रतिभूतींच्या आकषर्क किमती गुंतवणूकदारांना गुंतवणुकीच्या संधी उपलब्ध करून देतात त्यामुळे गुंतवणूकदारांकडील निधी उत्पादनक्षम आणि फायदेशीर प्रकल्पांकडे वळविता येतो.

८) **आर्थिक विकासास हातभार :** भाग बाजारात विविध कंपन्यांच्या प्रतिभूतींचे खरेदी-विक्रीचे व्यवहार होतात. गुंतवणूकदार चांगला परतावा देणाऱ्या कंपन्यांमध्ये गुंतणूक करतात. त्यामुळे कंपन्यादेखील फायदेशीर व उत्पादनक्षम प्रकल्पात गुंतवणूक करतात. त्यामुळे भांडवल उभारणी व आर्थिक विकासास चालना मिळते.

९) **सट्टेबाजीला वाव :** प्रतिभूतींची मागणी व पुरवठा तसेच तरलता राखण्यासाठी भाग बाजारात प्रतिभूतींच्या सुट्टेबाजीला परवानगी दिली जाते.

१०) **बचत आणि गुंतवणुकीच्या सवयींना प्रोत्साहन देणे :** भाग बाजारात विविध प्रतिभूतींमध्ये गुंतवणूक करण्याची आकर्षक संधी उपलब्ध असते. या संधी लोकांनी सोने, चांदी, इत्यादी अनुत्पादक मालमत्तांमध्ये गुंतवणूक करण्याऐवजी अधिक बचत करण्यासाठी व कॉर्पोरेट क्षेत्राच्या प्रतिभूतींमध्ये गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित करतात.

## १२.३ भारतातील प्रमुख भाग बाजार :

पुढील दोन भाग बाजार भारतातील महत्त्वाचे भाग बाजार म्हणून ओळखले जातात.

१) **मुंबई भाग बाजार/बॉम्बे स्टॉक एक्सचेंज (Bombay Stock Exchange - BSE) :** मुंबई येथील दलाल स्ट्रीटवर असणाऱ्या या भाग बाजाराची स्थापना १८७५ साली करण्यात आली. त्यावेळी हा भाग बाजार 'दि नेटीव्ह शेअर्स ॲन्ड स्टॉक ब्रोकर्स असोसिएशन' या नावाने ओळखला जाई.

हा भाग बाजार आशियातील सर्वांत पहिला भाग बाजार म्हणून ओळखला जातो. हा भारतातील पहिला सूचीबद्ध भाग बाजार आहे. भांडवलाच्या बाजार किमतीनुसार (Market Capitalisation) हा जगातील ११व्या क्रमांकाचा मोठा भाग बाजार आहे. या भाग बाजारात सर्वांत जास्त म्हणजे ५००० पेक्षा जास्त कंपन्यांची नोंद झाली आहे. हा भाग बाजार कंपनी कायदा १९५६ अंतर्गत नोंदणीकृत भाग बाजार आहे.

१९९२ साली मुंबई भाग बाजाराने इलेक्ट्रॉनिक ट्रेडिंग यंत्रणा स्वीकारली. या स्वयंचलित व दर्शनी पटलावर दृष्याधारित (screen based) यंत्रणेला 'बी.एस.सी. ऑनलाईन ट्रेडिंग (BOLT)' असे ओळखले जाते. तसेच जगभरातील गुंतवणूकदारांना मुंबई भाग बाजारासोबत जोडण्यासाठी या भाग बाजाराने bsewebx.co.in अशी इंटरनेटवर मध्यवर्ती अदलाबदल आधारित ट्रेडिंग सिस्टिम देखील सुरू केली आहे.

२) **राष्ट्रीय भाग बाजार नॅशनल स्टॉक एक्सचेंज National Stock Exchange - NSE) :** १९९२ रोजी भारतातील काही प्रमुख वित्तीय संस्थांनी एकत्र येऊन राष्ट्रीय भाग बाजाराची एक कंपनी म्हूणन स्थापना केली. १९९३ साली प्रतिभूती करार (नियमन) कायदा १९५६ अंतर्गत भाग बाजार म्हणून मान्यता मिळाली आणि १९९४ साली या भाग बाजाराने व्यवहारांना सुरुवात केली. राष्ट्रीय भाग बाजार हा भारतातील एक मोठा आणि अत्याधुनिक भाग बाजार म्हणून ओळखला जातो.

मुंबई येथे स्थित असलेला राष्ट्रीय भाग बाजार हा इलेक्टॉनिक पद्धतीने चालणारा देशातील पहिला भाग बाजार आहे. गुंतवणूकदारांना पूणर्पणे स्वयंचलित स्क्रीन आधारित इलेक्ट्रॉनिक व्यापार प्रणाली प्रदान करणारा हा देशातील पहिला आधुनिक भाग बाजार आहे. १९९६ साली सादर केलेला राष्ट्रीय भाग बाजाराचा निर्देशांक निफ्टी या नावाने ओळखला जातो. राष्ट्रीय भाग बाजाराचा मुख्य निर्देशांक 'निफ्टी NIFTY' हा प्रथम १९९६ मध्ये जाहीर झाला.

## १२.४ भाग बाजाराशी संबधित महत्त्वाच्या संज्ञा :

१) **दलाल (Broker) :** भाग दलाल हा गुंतवणूकदारांच्या वतीने भाग बाजारात रोख्यांच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार करणारा अधिकृत परवानधारक सदस्य असतो. दलाल हा गुंतवणूकदार व अडत्या यांच्यातील मध्यस्थ असतो. दलाल त्याचे उत्पन्न दलाली किंवा कमिशन या स्वरूपात मिळवतो.

२) **अडत्या (Jobber) :** अडत्या हा भाग बाजारात स्वतःच्या नावावर प्रतिभूतींचे खरेदी विक्रीचे व्यवहार करतो. अडत्या प्रतिभूतींची स्वतःच्या नावावर खरेदी करून त्या प्रतिभूती जास्त किमतीने विकतो, या व्यवहारातील नफा हे अडत्याचे उत्पन्न असते. हा भाग बाजारातील व्यावसायिक सट्टेबाज म्हणून ओळखला जातो. अडत्याला प्रत्यक्ष गुंतवणूकदारांसोबत व्यवहारांची परवानगी नसते.

३) **तेजीवाला (Bull) :** भविष्यकाळात भागांच्या किमतीत वाढ होईल असा अंदाज असलेला हा सट्टेबाज भागांच्या किमती वाढतील या आशेवर भविष्यात विक्री करून नफा मिळवण्याच्या उद्देशाने हा प्रतिभूतींची खरेदी करतो. याचा दृष्टिकोन आशावादी असतो. प्रतिभूतींच्या किमती वाढतील असा आशावादी असल्याने हा प्रतिभूतींच्या खरेदीचे व्यवहार करतो. तेजीवाल्यांमुळे भाग खरेदी संख्या ही विक्री संख्येपेक्षा जास्त होऊन प्रतिभूतींच्या किमती वाढतात.

४) **मंदीवाला (Bear) :** मंदीवाला हा भविष्यात प्रतिभूतींच्या किमती कमी होतील असा अंदाज बांधतो. प्रतिभूतींच्या किमती भविष्यात आणखी कमी होतील त्यामुळे अधिक नुकसान टाळण्याच्या उद्देशाने प्रतिभूतींची विक्री करतो. प्रतिभूतींच्या किमती कमी होतील असा अंदाज असल्याने हा प्रतिभूतींच्या विक्रीचे व्यवहार करतो. मंदीवाल्यांमुळे भाग विक्री संख्या ही खरेदी संख्येपेक्षा जास्त होऊन प्रतिभूतींच्या किमती घटतात.

५) **स्टॅग (Stag) :** स्टॅग हा प्रतिभूती जेव्हा प्राथमिक बाजारात विक्रीस उपलब्ध होतात तेव्हा मोठ्या प्रमाणावर खरेदी करतो व त्या प्रतिभूतींची भाग बाजारात नोंदणी झाल्यावर जास्त किमतीने विकून या व्यवहारात नफा कमावतो.

६) **लॅम डक (Lame Duck) :** लॅम डक हा एक मंदीवाला दलाल असून भविष्यात प्रतिभूतींच्या किमती कमी होतील असा त्याचा अंदाज चुकीचा ठरतो व तोटा होतो. प्रत्यक्षात प्रतिभूतींच्या किमती कमी होण्याऐवजी वाढतात.

७) **वॉल्व्ह (Wolves) :** हा अतिशय हुशार सट्टेबाज दलाल आहे. जो बाजारातील बदलत्या परिस्थितीचा पटकन अंदाज बांधतो आणि त्याप्रमाणे व्यवहार करून नफा कमावतो.

८) **व्यवहाराची पूर्तता (Settlement) :** सेटलमेंट म्हणजे ट्रेडिंग कालावधी संपल्यावर दलालाद्वारे निर्माण केलेली पूर्तता होय. (उदा. इक्विटी स्पॉट मार्केटमध्ये ट्रेडिंग प्रतिभूतीनिहाय कालावधी + २ दिवस)

९) **कॉन्ट्रॅक्ट नोट (Contract note) :** कॉन्ट्रॅक्ट नोट दलालाकडून त्याच्या गुंतवणूक करणाऱ्या ग्राहकाला दिली जाते. ही नोट एका विशिष्ट नमुन्यामध्ये असते. या नोंदीमुळे झालेला देवघेवीचा व्यवहार अधिकृत समजण्यात येतो. व्यापारी व्यवहार पूर्ण झाल्यावर त्यासंबंधीची नोंद पावती २४ तासांच्या आत गुंतवणूकदार व दलाल या दोघांनाही माहितीस्तव मिळते.

१०) **व्यापारी रिंगण (Trading ring) :** प्रतिभूतींच्या खरेदी विक्रीचे व्यवहार किंवा लिलाव हा भाग बाजाराच्या विशिष्ट मजल्यावर रिंगणामध्ये सर्व दलाल व अडते उभे राहून करतात यालाच व्यापारी रिंगण किंवा ट्रेडिंग रिंग असे म्हणतात. सध्याच्या काळात प्रतिभूतींचे सर्व व्यवहार इलेक्ट्रॉनिक पद्धतीने होत असल्याने व्यापारी रिंगण अस्तित्वात नाही.

**११) अंतर्गत व्यवहार/इनसाईडर ट्रेडिंग (Insider trading) :** इनसाईडर ट्रेडिंग म्हणजे सार्वजनिक सूचीबद्ध कंपनीच्या प्रतिभूतींची कंपनीची खाजगी माहिती ज्ञात असलेल्या व्यक्तीकडून खरेदी विक्री करणे होय. अशा प्रकारे, व्यवहार करणे बेकायदेशीर आहे कारण अंतर्गत व्यवस्थापनाची माहिती नसलेल्या गुंतवणूकदारांवर हा अन्याय ठरतो.

**१२) डे ट्रेडिंग (Day trading) :** एकाच दिवसात त्या दिवसाची भाग बाजारपेठ बंद होण्यापूर्वी केल्या जाणाऱ्या व्यापारास 'डे ट्रेडिंग' असे म्हणतात.

**१३) सेन्सेक्स (Sensex) :** मुंबई भाग बाजारातील ठरावीक कंपन्याच्या प्रतिभूतींच्या किमतीमध्ये होणारा चढउतार दर्शवणारा निर्देशांक म्हणजे 'सेन्सेक्स' होय. भाग बाजारातील मोठ्या व सक्रीय प्रतिभूती व्यवहार असलेल्या ३० सूचीबद्ध कंपन्यांच्या प्रतिभूतींच्या किमतीवरून हा निर्देशांक निश्चित केला जातो. सर्वप्रथम १९८६ मध्ये निर्देशांक निर्माण करण्यात आला. हा भाग बाजाराचा मापदंड असतो.

***इंडेक्स :** म्हणजे प्रतिभूतींच्या किमतीचे मोजमाप करणारे साधन होय, हा भाग बाजाराचा मापदंड असतो.*

**१४) निफ्टी (Nifty) :** निफ्टी हा राष्ट्रीय भाग बाजाराचा निर्देशांक आहे. जो ५० सूचित कंपन्यांच्या आधारे काढला जातो. ज्यामध्ये सेन्सेक्स मधील ३० कंपन्यांचा समावेश असतो. हा १९९६ साली निर्माण करण्यात आला.

**१५) रॅले (Rally) :** जर १४ ते २० दिवसांच्या कालावधीत सेन्सेक्स किंवा निफ्टी हे निर्देशांक हे तेजी दर्शवत असतील तर त्याला रॅले असे म्हटले जाते. या कालावधीत तेजीवाले (Bulls) कार्यरत असतात.

**१६) क्रॅश (Crash) :** जर सेन्सेक्स किंवा निफ्टी हे निर्देशांक बाजारातील मंदी दर्शवत असतील तर त्या कालावधीला क्रॅश म्हणून ओळखले जाते. या कालावधीत मंदीवाला (Bear) कार्यरत असतो.

**१७) बाजार भांडवलीकरण (Market Capitalisation) :** बाजार भांडवलीकरण म्हणजे कंपनीच्या विक्री केलेल्या (Issues) भागांचे बाजार मूल्यानुसार काढलेले एकूण मूल्य होय. याद्वारे कंपनीची पत निश्चित होते.

**१८) स्टॉप लॉस (Stop loss) :** स्टॉप लॉस ही गुंतवणूकदाराने दलालास प्रतिभूती विशिष्ट किमतीपर्यंत गेल्यास खरेदी किंवा विक्री करण्याबाबत दिलेली सूचना असते. विशिष्ट किमतीपेक्षा (stop price) प्रतिभूतींची किमत कमी झाल्यास होणारा तोटा टाळण्यासाठी अशी सूचना दिली जाते.

## १२.५ भारतीय प्रतिभूती विनिमय मंडळ / सेबी (Securities and Exhcange Board of India - SEBI) :

भारतीय प्रतिभूती विनिमय मंडळ ही भांडवल बाजाराचे नियमन करणारी यंत्रणा/नियंत्रक आहे. भारतीय प्रतिभूती विनिमय मंडळ कायदा, १९९२ च्या अंतर्गत सेबी ची स्थापना करण्यात आली. सेबी चे मुख्य कार्यालय मुंबई येथे असून याशिवाय क्षेत्रीय आणि स्थानिक कार्यालये भारतभर विखुरली आहेत.

### १२.५.१ सेबीची कार्ये :

प्रतिभूती बाजाराला चालना देणे, गुंतवणूकदारांच्या हिताचे रक्षण करणे आणि प्रतिभूती बाजाराचे नियमन करणे या उद्देशाने सेबी ची स्थापना करण्यात आली. सेबी ने निश्चित केलेल्या नियम व कायदयाचे पालन प्रतिभूती वितरित करणाऱ्या कंपन्या, भाग बाजार, मध्यस्थ व गुंतवणूकदार यांना करावे लागते. भारतातील सर्व भाग बाजारांचे नियमन करणारी ही यंत्रणा आहे.

**सेबीची कार्ये पुढीलप्रमाणे –**

१) प्रतिभूती बाजारातील गुंतवणूकदारांच्या हिताचे रक्षण करणे.

२) प्रतिभूती बाजाराच्या विकासाला चालना देणे.

३) भाग बाजारातील तसेच इतर प्रतिभूती बाजारातील व्यवहारांचे नियमन करणे.

४) प्रतिभूती बाजाराशी संबंधित भाग दलाल, उपदलाल, भाग हस्तांतरण मध्यस्थ, बँकर्स, विश्वस्त करारातील विश्वस्त, भाग विक्री निबंधक, मर्चंट बँकर्स, भाग विमेकरी आणि इतर मध्यस्थी यांची नोंदणी करणे आणि त्यांच्या कार्याचे नियमन करणे.

५) भागपेढी, डिपॉझिटरी पार्टीसिपंट, प्रतिभूतींचे ताबेदार, विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार, पत मानांकन संस्था या सर्वांच्या कार्याचे नियमन व नियंत्रण करणे.

६) व्हेंचर कॅपिटल फंड, म्युच्युअल फंड्स, यांचे नियंत्रण व नियमन करणे.

७) स्वयं नियमन करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन देणे व देखरेख ठेवणे.

८) प्रतिभूती बाजारातील गैरव्यापारी व भ्रष्ट प्रथांना आळा घालणे.

९) प्रतिभूती बाजारातील गुंतवणूकदार व मध्यस्थ यांच्या प्रशिक्षणास प्रोत्साहन देणे.

१०) इनसाईडर ट्रेडिंगची पद्धत प्रतिबंधित करणे.

**कृती :** बीटा, ब्लू-चीप स्टॉक, पेनी स्टॉक, मिड कॅप स्टॉक या शब्दांचे अर्थ शोधा.

## १२.६ फरक :

**अडत्या व दलाल**

| मुद्दा | अडत्या | दलाल |
|---|---|---|
| (१) अर्थ | अडत्या हा स्वतःच्या नावाने प्रतिभूतींच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार करतो. | दलाल हा गुंतवणूकदाराच्या वतीने प्रतिभूतीच्या खरेदी विक्रीचे व्यवहार करणारा मध्यस्थ असतो. |
| (२) व्यवहारांचे स्वरूप | अडत्या हा फक्त दलालांसोबत प्रतिभूतींचे व्यवहार करतो. | दलाल हा गुंतवणूकदाराच्या वतीने अडत्याशी व्यवहार करतो. |
| (३) व्यवहारांवरील मर्यादा | अडत्या हा थेट भाग बाजारामार्फत व्यवहार करू शकत नाही. तसेच तो थेट गुंतवणूकदारांशी देखील व्यवहार करू शकत नाही. | दलाल हा अडत्या व गुंतवणूकदार यांच्यातील दुवा म्हणून कार्य करतो. तो गुंतवणूकदाराच्या वतीने प्रतिभूतीच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार करतो. |
| (४) अभिकर्ता | अडत्या हा विशेष व्यापारी अभिकर्ता आहे. | दलाल हा सर्वसामान्य व्यापारी अभिकर्ता आहे. |
| (५) मोबदला | अडत्याला नफ्याच्या स्वरूपात मोबदला मिळतो. | दलालाला कमिशन किंवा दलालीच्या स्वरूपात मोबदला मिळतो. |

**कृती :**

१) दलालाच्या कार्यालयास भेट द्या.

२) भाग बाजारास भेट द्या.

## सारांश

- **भाग बाजार :**

प्रतिभूतींच्या खरेदी विक्रीचे संघटित पद्धतीने होणाऱ्या व्यवहारांचे ठिकाण म्हणजे भाग बाजार होय.

प्रतिभूती करार (नियमन) कायदा १९५६ नुसार भाग बाजार म्हणजे ''प्रतिभूतींच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारासाठी मार्गदर्शन करणे, त्यांचे नियंत्रण व नियमन करण्याच्या उद्देशाने स्थापन केलेली कायदेशीर मान्यता असलेली वा नसलेली व्यक्तींची संघटना, संस्था किंवा मंडळ होय.''

- **भाग बाजाराची कार्ये :**

१) बचतीची गतिशिलता

२) भांडवल उभारणी

३) अर्थव्यवस्थेचा भारमापक

४) प्रतिभूतींचे मूल्य निर्धारण

५) गुंतवणूकदारांच्या हिताचे रक्षण करणे

६) तरलता

७) भांडवलाचे योग्य वाटप

८) आर्थिक विकासास हातभार

९) सट्टेबाजीला चालना देणे

१०) बचत आणि गुंतवणुकीच्या सवयींना प्रोत्साहन देणे.

- **मुंबई भाग बाजार (BSE) व राष्ट्रीय भाग बाजार (NSE) हे भारतातील प्रमुख भाग बाजार आहेत.**

- **सेबी (भारतीय प्रतिभूती विनिमय मंडळ)**

  भारतीय प्रतिभूती विनिमय मंडळ ही भांडवल बाजाराचे नियमन करणारी यंत्रणा आहे. सेबीची स्थापना भारतीय प्रतिभूती विनिमय कायदा १९९२ नुसार करण्यात आली.

## स्वाध्याय

**प्र.क्र. १ अ) खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१) भाग बाजार ही एक अशी जागा आहे जेथे भाग दलाल व व्यापारी हे ............... च्या खरेदी विक्रीचे व्यवहार करतात.

अ) सोने ब) प्रतिभूती क) वस्तू

२) ............... हा भारतीय प्रतिभूती करार नियमन कायद्यांतर्गत नोंदविलेला भारतातील पहिला भाग बाजार म्हणून ओळखला जातो.

अ) बी.एस.ई. ब) एन.एस.ई. क) ओ.टी.सी.ई.आय.

३) ............... हा भाग बाजारात स्वतःच्या नावावर प्रतिभूतींचे व्यवहार करणारा अधिकृत अभिकर्ता आहे.

अ) अडत्या ब) दलाल क) तेजीवाला

४) ............... हा भागांच्या किमती कमी होतील असा अंदाज वर्तवतो.

अ) तेजीवाला ब) मंदीवाला क) अडत्या

५) एका दिवसात होणाऱ्या भागांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहाराला ............... असे म्हणतात.

अ) इनसाईडर ट्रेडिंग ब) डे ट्रेडिंग क) लिलाव

**ब) जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| अ) | सेबी | १) | भागांच्या किमती वाढण्याबाबत आशावादी. |
| ब) | डे ट्रेडिंग | २) | भागांच्या किमती कमी होतील अशी अपेक्षा करणारा. |
| क) | तेजीवाला | ३) | एका दिवसात केलेला प्रतिभूतींचा व्यवहार |
| ड) | मंदीवाला | ४) | गुंतवणूकदारांच्या हिताचे रक्षण करणे. |
| इ) | बीएसई | ५) | विशिष्ट गुंतवणूकदारांना प्रतिभूतींची खरेदी विक्री करणे. |
| | | ६) | भारतातील सर्वांत जुना भाग बाजार. |
| | | ७) | भांडवल बाजारातील कंपनी हिताचे रक्षण करणे. |
| | | ८) | एका आठवड्यात भाग खरेदी-विक्री करणे. |
| | | ९) | भारतातील सर्वांत नवीन भाग बाजार. |
| | | १०) | नवीन प्रतिभूती विक्रीमध्ये गुंतवणूक करणारा. |

**क) खालील प्रत्येक विधानासाठी एक शब्द किंवा शब्दसमूह किंवा संज्ञा लिहा.**

१) संघटित पद्धतीने भागांच्या खरेदी विक्रीचे व्यवहार होणारी जागा.

२) प्रतिभूती करार नियमन कायद्यांतर्गत नोंदणी झालेला भारतातील पहिला भाग बाजार.

३) प्रतिभूतींच्या खरेदी विक्रीचे स्वतःच्या नावावर व्यवहार करणारा अधिकृत अभिकर्ता.

४) भागांच्या किमती भविष्यात वाढतील असा अंदाज करणारा सट्टेबाज.

**ड) खालील विधाने बरोबर की चूक ते लिहा.**

१) भाग बाजार हा देशाच्या आर्थिक स्थितीचे मोजमाप करणारा विश्वासू भारमापक आहे.

२) मुंबई भाग बाजार (BSE) हा भारतातील सर्वांत जुना भाग बाजार आहे.

३) दलाल हा स्वतःच्या नावावर गुंतवणुकीचे व्यवहार करणारा भाग बाजारातील एक अभिकर्ता आहे.

४) मंदीवाला हा भागांच्या किमती भविष्यात वाढतील अशी अपेक्षा करतो.

**इ) खालील विधाने पूर्ण करा.**

१) .............. हा भारतातील सर्वांत जुना भाग बाजार आहे.

२) .............. हा भारतातील एक मोठा व अत्याधुनिक भाग बाजार म्हणून ओळखला जातो.

३) .............. गुंतवणूकदाराच्या वतीने भागांची खरेदी व विक्री करतो.

४) .............. भविष्यात प्रतिभूतींच्या किमती कमी होतील असा अंदाज बांधतो.

**फ) कंसातील अचूक पर्याय निवडा.**

| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| अ) | भांडवल बाजाराचे नियमन | १) | ............... |
| ब) | ............... | २) | निफ्टी |
| क) | अडत्या | ३) | ............... |
| ड) | ............... | ४) | जुना भाग बाजार |

(लंडन भाग बाजार, राष्ट्रीय भाग बाजाराचा निर्देशांक, सेबी, स्वत:च्या नावावर प्रतिभूतींची खरेदी व विक्री)

**ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) भाग बाजार म्हणजे काय ?

२) दलाल म्हणजे काय ?

३) अडत्या म्हणजे कोण ?

४) तेजीवाला म्हणजे कोण ?

५) मंदीवाला म्हणजे कोण ?

६) लॅमडक म्हणजे कोण ?

७) व्यापारी रिंगण म्हणजे काय ?

८) सेन्सेक्स म्हणजे काय ?

९) रॅली म्हणजे काय ?

१०) क्रॅश म्हणजे काय ?

**ह) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१) प्रतिभूती बाजारातील प्रतिभूतींचे वाटप करणाऱ्याच्या हिताचे रक्षण करणे हे सेबीचे एक कार्य आहे.

२) दलालास प्रत्यक्ष गुंतवणूकदारासोबत व्यवहार करण्याची परवानगी नसते.

३) मंदीवाला भागांच्या किमतीत वाढ होईल असा अंदाज बांधतो.

४) तेजीवाला प्राथमिक बाजारातून प्रतिभूती विकत घेतो.

५) भागबाजार हा नाणे बाजाराचा एक महत्वाचा घटक आहे..

**प्र.क्र. २) खालील संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा.**

१) भाग बाजार

२) दलाल

३) अडत्या

४) तेजीवाला

५) मंदीवाला

६) कॉन्ट्रॅक्ट नोट

**प्र.क्र. ३) खालील घटना/परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा.**

१) श्री. वाय. हे कंपनी सचिव म्हणून कार्यरत आहेत. ते विविध कंपन्यांना कंपनी कायद्यासंदर्भात सल्ला देण्याचे कार्य करतात. त्यांच्या ग्राहकांच्या काही समस्या आहेत आणि श्री वाय. यांना समस्या सोडवण्यासाठी मदत करा.

अ) BDI बँक डिपॉझिटरी पार्टीसिपंट म्हणून कार्य करू इच्छिते तिने कोणाकडे नोंदणी करावी ?

ब) KM फिनान्शिअल कर्जरोखे विश्वस्त म्हणून सेवा देऊ इच्छितात, तर त्यांनी नोंदणीसाठी कोणाकडे अर्ज करावा ?

क) T.T. लि. कं. प्रारंभिक भाग विक्री करू इच्छिते तर तिने सेबी कडे नोंदणी करावी का ?

२) श्री. पी. हे नुकतेच विज्ञान शाखेचे पदवीधर बनले आहेत आणि त्यांनी प्रतिभूती बाजाराच्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे त्यांना हा विषय नवीन असल्याने काही समस्या आहेत.

अ) कंपनीच्या प्रतिभूतींची भाग बाजारातून विक्री करण्यासाठी कंपनीची भाग बाजारात नोंदणी करणे आवश्यक आहे का ?

ब) भाग बाजाराची देशाच्या आर्थिक परिस्थितीला प्रतिबिंबीत करणाऱ्या संज्ञेला कोणत्या नावाने ओळखले जाते ?

क) प्रतिभूतींची कोणत्याही क्षणी खरेदी विक्री करून तयार बाजारपेठ मिळवून देणारे भाग बाजाराचे कार्य कोणत्या नावाने ओळखले जाते ?

**प्र.क्र. ४) फरक स्पष्ट करा.**

१) अडत्या व दलाल

**प्र.क्र. ५) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) सेबी ची कार्ये स्पष्ट करा.

२) भाग बाजाराची कोणतीही चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**प्र.क्र. ६) खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१) भारतीय प्रतिभूती विनिमय मंडळ (सेबी) भारतातील प्रतिभूतींच्या व्यवहारांचे नियमन करते.

२) भाग बाजार हे भारतीय अर्थ व्यवस्थेच्या विकासासाठी कार्य करतात.

**प्र.क्र. ७) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) भाग बाजाराची कार्ये स्पष्ट करा.

❑❑❑

# उत्तरसूची

## प्रकरण १ : संस्थात्मक वित्त व्यवस्था

**प्र.१. अ)** १) वित्त, २) आर्थिक, ३) भांडवलाचे, ४) कर, ५) स्थिर भांडवल, ६) खेळते भांडवल, ७) मोठ्या प्रमाणावर, ८) वाढविण्यासाठी, ९) चालू मालमत्ता, १०) भांडवल संरचना

**ब)** अ-६) गुंतवणुकीचा निर्णय, ब-५) स्थिर मालमत्ता, क-१) एकूण चालू मालमत्ता,
ड-९) विविध वित्त स्रोतांचे मिश्रण, इ-२) भांडवल संपादन व त्याचा विनियोग

**क)** १) वित्त, २) वित्तीय निश्चितीचा निर्णय, ३) वित्त गुंतवणुकीचा निर्णय, ४) स्थिर भांडवल
५) खेळते भांडवल, ६) खेळते भांडवल ७) उत्पादन चक्र ८) व्यवसाय चक्र
९) भांडवल संरचना १०) प्रतिधारण नफा/संचयी नफा

**ड)** १) बरोबर, २) बरोबर ३) बरोबर ४) चूक ५) चूक ६) चूक ७) बरोबर ८) बरोबर ९) बरोबर
१०) बरोबर

**इ)** १) रोख रक्कम, २) कर्जरोखे भांडवल ३) भांडवल संरचना

**फ)** १) वित्तीय व्यवस्थापक, २) वाढ ३) उत्पादन चक्र ४) घट

**ग)**

| | |
|---|---|
| अ) निश्चितीचा निर्णय, | १) भांडवल योग्य प्रमाणात असणे. |
| ब) स्थिर भांडवल | २) दीर्घ कालावधी |
| क) वित्त गुंतवणुकीचा निर्णय | ३) पद्धतशीरपणे निधी तैनात करणे. |
| ड) खेळते भांडवल | ४) अभिसरण भांडवल |
| इ) प्रतिभूतींचे मिश्रण | ५) भांडवल संरचना. |

**ई)** १) व्याज, २) तेजी ३) कर्जरोखे ४) अग्रहक्क

## प्रकरण २ : संस्थात्मक वित्तव्यवस्थेचे स्रोत

**प्र.१. अ)** १) भाग, २) आंतरराष्ट्रीय, ३) समहक्क भागधारक, ४) समहक्क भागधारक, ५) बोनस भाग, अधिलाभांश भाग
६) निश्चित, ७) संचयी ८) परिवर्तनीय ९) धनको १०) व्याज ११) व्याज १२) समहक्क भाग
१३) अंतर्गत १४) धनको १५) सहा १६) ३६ १७) यु.एस.ए

**ब)** अ-४) जोखमीचे भांडवल, ब-९) विश्वस्त करार, क-१०) सावध गुंतवणूकदार,
ड-८) कर्जाचे दस्तावेज इ-२) नफ्याचे भांडवलीकरण

**क)** १) समहक्क भागधारक, २) भाग प्रमाणपत्र, ३) लाभभागी अग्रहक्क भाग, ४) कर्जरोखे विश्वस्त
५) समहक्क भागधारक, ६) दर्शनी मूल्य ७) बाजार मूल्य ८) संचयी मिळकत/नफा ९) ठेव पावती
१०) अमेरिकन ठेव पावती ११) जागतिक ठेव पावती १२) सार्वजनिक ठेवी १३) व्यापारी कर्जे
१४) आधिविकर्ष

**ड)** १) बरोबर, २) चूक ३) बरोबर ४) चूक ५) चूक ६) बरोबर ७) बरोबर ८) बरोबर ९) चूक

**इ)** १) प्रतिधारण नफा, २) परतफेडीचे मूल्य ३) अमेरिकन ठेव पावती ४) व्यापारी कर्ज

**फ)** १) भांडवल, २) समहक्क भाग ३) संचालक मंडळ ४) समहक्क भागधारक ५) धनको
६) जागतिक ठेव पावती ७) १९४८ ८) व्यापारी कर्ज

**ग)** अ) समहक्क भाग — १) चढउतार होणारा लाभांशाचा दर
ब) अग्रहक्क भाग — २) निश्चित दराचा लाभांश
क) कर्जरोखे — ३) निश्चित दराचे व्याज
ड) संचयी मिळकत — ४) कंपनीचा साठलेला नफा
इ) सार्वजनिक ठेवी — ५) अल्पमुदतीचे कर्ज

**ई)** १) कायमस्वरूपी २) बदलत्या/अस्थिर ३) स्थिर ४) अंतर्गत ५) धनको ६) दीर्घ ७) अमेरिकन ठेव पावती

## प्रकरण ३ : भाग विक्री

**प्र.१. अ)** १) भाग भांडवल, २) अधिकृत, ३) सार्वजनिक भाग विक्री, ४) बुक बिल्डींग, ५) प्राथमिक भाग विक्री, ६) हक्क भाग , ७) विद्यमान समहक्क भागधारकांना ८) कर्मचारी भाग विकल्प योजना (इएसओएस) ९) प्रायव्हेट प्लेसमेंट १०) संचालक मंडळ ११) भाग वाटप १२) भाग प्रमाणपत्र १३) एक महिना १४) जप्ती १५) हस्तांतर १६) संक्रमण

**ब) १)** अ-५) भागांचे संक्रमण, ब-४) भागांचे समर्पण, क-९) स्थिर किंमत भाग विक्री पद्धत, ड-३) विद्यमान कर्मचाऱ्यांना देणे, इ-६) भाग वाटप न करणे.

**२)** अ-४) जनतेला भाग विक्री करून भांडवल उभारणी, ब-२) आय.पी.ओ. नंतर कोणतीही विक्री, क-७) विद्यमान समहक्क भागधारकांना विनामूल्य भाग देणे, ड-५) भाग प्रमाणपत्र, इ-१) भाग मागणी रक्कम न येणे

**क)** १) भाग भांडवल, २) खपलेले भांडवल, ३) राखीव भांडवल, ४) कमाल मर्यादा किंमत/कॅप प्राईस ५) प्राथमिक भाग विक्री (आय.पी.ओ), ६) पुढील भाग विक्री (एफ.पी.ओ) ७) हक्क भाग ८) बोनस भाग ९) भागांचे वाटप १०) भाग वाटप समिती ११) किमान भांडवल/अभिदान रक्कम १२) भाग प्रमाणपत्र १३) भागांची जप्ती १४) हस्तांतरी १५) भागांचे संक्रमण

**ड)** १) चूक, २) बरोबर ३) बरोबर ४) चूक ५) बरोबर ६) चूक ७) चूक ८) बरोबर ९) चूक १०) बरोबर

**इ)** १) समहक्क भाग भांडवल, २) हक्क भाग ३) दर्शनी किंमत ४) ई.एस.ओ.एस. ५) भाग वाटप

**फ)** १) अग्रहक्क भाग, २) न मागविलेले भांडवल ३) भागांचे संक्रमण ४) हस्तांतरी ५) भागांचे समर्पण ६) अंशत: भरणा केलेले समहक्क भाग ७) भाग प्रमाणपत्राची दुय्यम/दुसरी प्रत ८) हस्तांतर दस्तावेजाची पावती मिळाल्यावर १ महिन्याच्या ९) भाग वाटप पत्र १०) भागांना जास्त मागणी ११) कट ऑफ प्राईस/विक्री किंमत १२) बोनस भाग

**ग)** अ) भागांची सार्वजनिक मागणी — १) जनतेला भाग देणे.
ब) प्रथम/सुरुवातीला भाग विक्री — २) प्राथमिक भाग विक्री
क) हक्क भाग — ३) विद्यमान समहक्क भागधारकांना भाग देणे.
ड) विद्यमान कर्मचाऱ्यांना भाग देणे — ४) इ. एस. ओ. एस. (ESOS)
इ) कायद्यानुसार कृती — ५) भागांचे संक्रमण

**ई)** १) अधिकृत भाग भांडवल २) बुक बिल्डींग ३) आय. पी. ओ. ४) अंशत: रक्कम ५) समहक्क भागधरकांना ६) भाग विक्री हमीदाराबरोबर ७) तीन महिन्यात ८) २५% ९) दिलगिरी पत्र

**ज)** १) क) भागांचे वाटप ब) भागावरील हप्ते मागणी अ) भागांची जप्ती
२) क) भाग मागणी अर्ज ब) भाग वाटप पत्र अ) भाग प्रमाणपत्र
३) ब) भाग मागणी अर्ज क) किमान भांडवल/अभिदान रक्कम अ) भाग वाटप विवरणपत्र

## प्रकरण ४ : कर्जरोखे विक्री

**प्र.१. अ)** १) कर्जरोखे, २) अंशत: किंवा पूर्णत:, ३) कर्जरोखे परतफेड राखीव निधी,
४) कर्जरोखे विश्वस्त, ५) १० वर्षे, ६) सुरक्षित, ७) ६ महिन्यात
८) कर्जरोखे नोंदवही ९) कर्जरोखे विश्वस्त १०) कर्जरोखे विश्वस्त करार ११) ६० दिवस

**ब)** अ-७) कर्जरोखेधारकांच्या हिताचे रक्षण करणे, ब-५) मतदानाचा अधिकार नाही, क-३) सुरक्षित कर्जरोखे,
ड-१) कर्जरोखे विक्रीचा अधिकार इ-१०) कर्जरोखे वाटपानंतर ६ महिन्याचे आत देणे.

**क)** १) विशेष ठराव, २) कर्जरोखे परतफेड राखीव निधी, ३) कर्जरोखे विश्वस्त, ४) १० वर्षे
५) सुरक्षित कर्जरोखे, ६) कर्जरोखे विश्वस्त करार ७) ६० दिवस ८) कर्जरोखे वाटपानंतर ६ महिन्यात
९) कर्जरोखे विश्वस्त १०) संचालक मंडळ

**ड)** १) बरोबर, २) चूक ३) बरोबर ४) बरोबर ५) चूक ६) चूक ७) बरोबर ८) चूक ९) बरोबर
१०) चूक

**इ)** १) लाभांश, २) कोर्ट ३) न परतफेडीचे कर्जरोखे ४) भागधारक

**फ)** १) कर्जरोखे विश्वस्त करार, २) कर्जरोखे विश्वस्त ३) ६० दिवस ४) संचालक मंडळ
५) कर्जरोखे विक्रीच्या तारखेपासून १० वर्षे ६) एन.सी.एल.टी ७) कर्जरोखे विश्वस्त ८) व्याज
९) विक्रीच्या ७५% १०) पत श्रेणी

**ग)**

| | |
|---|---|
| अ) कर्जरोखे विश्वस्त | १) विश्वस्त करार |
| ब) सुरक्षित कर्जरोखे | २) मालमत्तेवर बोजा |
| क) कर्जरोखे नोंदवही | ३) कर्जरोखेधारकांची नावे |
| ड) कर्जरोखे वाटपानंतर ६ महिन्यात देणे. | ४) भागांचे संक्रमण |
| इ) मतदान हक्क नाही. | ५) कर्जरोखेधारक |

**ई)** १) कर्जरोखे नोंदवही, २) १० वर्षे ३) सुरक्षित ४) व्याज ५) कर्जरोखेधारक ६) ६ महिने
७) ६० दिवस ८) पतमानांकन संस्था

**ज)**

| | | |
|---|---|---|
| १) अ) पतमानांकन मिळविणे. | क) रोख रकमेसह अर्ज | ब) कर्जरोखे नोंदवहीत नोंद करणे. |
| २) ब) माहितीपत्रक वाटप | क) बँकेत खाते उघडणे. | अ) कर्जरोखे प्रमाणपत्र वाटप |
| ३) क) रोख रकमेसह अर्ज प्राप्त | अ) संचालक मंडळाने सभा भरविणे. | ब) कर्जरोखे प्रमाणपत्राचे वाटप |

## प्रकरण ५ : ठेवी

**प्र.१. अ)** १) अल्प मुदतीचे कर्ज, २) आमजनतेकडून, ३) १००, ४) सरकारी, ५) ३६, ६) परिपत्रक,
७) ३०, ८) ठेव विश्वस्त, ९) सुरक्षित ठेवी, १०) २१, ११) १, १२) ३० जून

**ब)** अ-५) पूर्ण वसूल भाग भांडवल आणि मुक्त राखीव निधीच्या १००%,
ब-२) जाहिरात प्रसिद्ध करण्यापूर्वी ७ दिवस अगोदर सही केली जाते.
क-४) स्थिर मालमत्ता तारण,
ड-८) जास्तीत जास्त ३६ महिने,
इ-१०) प्रत्येक वर्षी ३० जून किंवा त्या अगोदर दाखल करणे.

**क)** १) खाजगी कंपनी, २) सरकारी कंपनी, ३) ६ महिने, ४) ३६ महिने,
५) ठेवी स्वीकारल्यापासून ३० दिवस, ६) परिपत्रक, ७) ठेव विश्वस्त करार ८) ठेवी परतफेड निधी खाते
९) ठेवी स्वीकारल्यापासून २१ दिवसाच्या आत १०) ठेव नोंदवही

**ड)** १) चूक, २) बरोबर ३) चूक, ४) चूक, ५) बरोबर ६) चूक ७) बरोबर ८) बरोबर ९) चूक,
१०) बरोबर

**इ)** १) सरकारी कंपनी, २) विशेष ठराव ३) कंपनी नोंदणी अधिकाऱ्याची नियुक्ती

**फ)** १) अल्प मुदतीचे कर्ज, २) आम जनतेकडून ३) १०० कोटी ४) ३५% ५) ३६ महिने
६) मागणी ७) ३ महिने ८) जाहिरात ९) पत मानांकन संस्था १०) ठेव परतफेड निधी खाते

**ग)**

| | |
|---|---|
| अ) सरकारी कंपनी | १) आम जनतेकडून ठेवी |
| ब) खाजगी कंपनी | २) सभासदाकडून ठेवी |
| क) ३६ महिने | ३) ठेवीचा जास्तीत जास्त कालावधी |
| ड) सुरक्षित ठेवी | ४) मूर्त मालमत्तेवर बोजा निर्माण करणे. |
| इ) ठेव विवरणपत्र | ५) ३० जून किंवा त्या अगोदर दाखल करणे. |

**ई)** १) सार्वजनिक, २) परिपत्रक ३) ठेव विश्वस्तांची ४) २१ दिवस ५) ठेवीचे विवरणपत्र ६) सुरक्षित
७) सहा

**ज)** १) ब) सर्वसाधारण सभा भरविणे. अ) ठेव विश्वस्ताची नेमणूक क) मालमत्तेवर बोजा आकारणे.
२) क) जाहिरात प्रसिद्ध करणे. ब) ठेव पावती देणे. अ) ठेव विवरणपत्र दाखल करणे.
३) अ) पत मानांकन दाखला मिळविणे. क) ठेव पावती देणे. ब) ठेव रजिस्टरमध्ये नोंद करणे.

## प्रकरण ६ : सभासदांशी पत्रव्यवहार

**प्र.१. अ)** १) भागधारकाचे प्रतिनिधी, २) ३०, ३) लाभांश, ४) बोनस, ५) २, ६) तत्पर व थोडक्यात,
७) संचालक मंडळ, ८) नफा, ९) लाभांश अधिपत्र

**ब)** अ-९) लाभांश वाटपासाठीचे कागदपत्र,
ब-६) लाभांश,
क-४) राखीव निधीचे भांडवलीकरण,
ड-३) इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सर्व्हीस,
इ-५) नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर.

**क)** १) बोनस भाग, २) लाभांश अधिपत्र, ३) समहक्क भागधारक, ४) संचालक मंडळ,
५) कंपनी चिटणीस, ६) लाभांश अधिपत्र,

**ड)** १) बरोबर, २) चूक, ३) बरोबर, ४) चूक, ५) चूक, ६) चूक, ७) चूक

**इ)** १) गोपनीयता, २) संचालक मंडळ, ३) डी मॅट (भौतिकीकरण), ४) सोपी भाषा

**फ)** १) संचालक मंडळ, २) बोनस, ३) ३०, ४) भागधारकां, ५) चिटणीस

**ग)**

| | |
|---|---|
| अ) भागावरील परतावा | १) लाभांश |
| ब) राखीव निधीचे भांडवलीकरण | २) बोनस भाग |
| क) पत्रव्यवहार | ३) लेखी संदेशवहन |
| ड) ECS | ४) इलेक्ट्रॉनिक पद्धतीने लाभांशाचे वाटप |

ई) १) संचालक मंडळ, २) भागधारक, ३) विद्यमान समहक्क, ४) ३०, ५) दोन

ज) १) ब) भागासाठी अर्ज. अ) भागाचे वाटप क) भाग प्रमाणपत्र

२) ब) अर्जदार अ) सभासद क) बोनस भागधारक

## प्रकरण ७ : कर्जरोखेधारकांशी पत्रव्यवहार

प्र.१. अ) १) कर्जाऊ, २) धनको, ३) कर्जरोखेधारक, ४) व्याज अधिपत्र, ५) कर्जरोखेधारक, ६) व्याज कूपन्स, ७) व्याज, ८) कर्जरोखा, ९) परतफेडीचे, १०) स्थिर, ११) कर्जरोखा, १२) कर्जरोखाधारक

ब) अ-९) धनको, ब-५) व्याज अधिपत्र, क-१०) समहक्क भागांमध्ये परिवर्तन, ड-३) कर्जाचा पुरावा, इ-४) सुरक्षित गुंतवणूक फ-११) ठरावीक मुदतीनंतर परतफेड ग-१) कर्जाऊ भांडवल

क) १) व्याज, २) कर्जरोखा प्रमाणपत्र, ३) धनको, ४) परिवर्तनीय कर्जरोखे, ५) कर्जरोखाधारक, ६) कर्जरोखा, ७) नोंदवलेले कर्जरोखे

ड) १) चूक, २) बरोबर, ३) बरोबर, ४) बरोबर, ५) चूक, ६) चूक, ७) चूक, ८) चूक, ९) चूक १०) बरोबर

इ) १) डिपॉझिटरी, २) डी मॅट, ३) डिमटेरिअलायझेशन, ४) सेबी (SEBI)

फ) १) धनको, २) कर्जरोखे, ३) व्याज, ४) अधिपत्र, ५) चिटणीस, ६) कर्जरोखेधारक, ७) नफा, ८) मतदान, ९) सहा, १०) कर्जरोखे विश्वस्त ११) संचालक मंडळ

ग)

| | |
|---|---|
| अ) कर्जरोख्यावरील परतावा | १) व्याज |
| ब) कर्जरोखे प्रमाणपत्र | २) ६ महिन्याच्या आत पाठविणे. |
| क) धनको | ३) कर्जरोखेधारक |
| ड) कर्जाऊ भांडवल | ४) कर्जरोखे |
| क) संचालक मंडळ | ५) कर्जरोखे वाटपाचा अधिकार |

ई) १) कर्जरोखेधारक, २) व्याज, ३) कर्जरोखे प्रमाणपत्र, ४) कर्जरोखे, ५) कर्जरोखे परतफेड अर्ज ६) ६

ज) १) क) संचालक मंडळाची सभा. अ) संचालक मंडळाचा ठराव ब) कर्जरोख्याचे वाटप

२) क) संचालक मंडळाची सभा ब) कर्जरोख्यांचे वाटप अ) व्याज अधिपत्र

## प्रकरण ८ : ठेवीदारांशी पत्रव्यवहार

प्र.१. अ) १) धनको, २) अल्प मुदत, ३) ३६, ४) ६, ५) अल्प मुदत, ६) खेळते, ७) संचालक मंडळ, ८) स्थिर, ९) व्याज

ब) अ-६) धनको, ब-१) स्थिर, क-७) ठेवीचा पुरावा,

क) १) व्याज, २) व्याज अधिपत्र, ३) मुदत ठेव पावती, ४) ठेवीची परतफेड, ५) ३६ महिने,

ड) १) बरोबर, २) बरोबर, ३) चूक, ४) चूक, ५) बरोबर, ६) चूक

इ) १) लाभांश, २) विश्वस्त करार

फ) १) धनको, २) चिटणीस, ३) अल्प, ४) ६, ५) व्याज

**ग)** अ) ठेवीदार — १) धनको
ब) ठेवीवरील परतावा — २) व्याज
क) ३६ महिने — ३) ठेवीची जास्तीत जास्त मुदत
ड) ठेवीची कमीतकमी मुदत — ४) ६ महिने

**ई)** १) धनको, २) बाहेरील (बाह्य), ३) अल्प, ४) व्याज,

**ज)** १) ब) ठेवीची स्वीकृती. क) ठेव पावती अ) ठेवीचे नुतनीकरण
२) क) ठेवीची स्वीकृती ब) ठेव पावती अ) देय व्याज

## प्रकरण ९ : भागपेढी पद्धती

**प्र.१. अ)** १) भौतिक स्वरूपात, २) भौतिक, ३) इलेक्ट्रॉनिक, ४) डिपॉझिटरी, ५) मुद्रांक, ६) १९९६, ७) बहु, ८) इश्युअर कंपनी, ९) एनएसडीएल, १०) बेनिफिशीअल ओनर, ११) फंगीबल, १२) आयएसआयएन, १३) एनएसडीएल, १४) कंपन्यांना, १५) गुंतवणूकदार १६) एनएसई, १७) बीएसई

**ब)** अ-६) भौतिक पद्धतीमधील समस्या, ब-१२) १९९६, क-२) १२ वर्णांक/सांकेतांक, ड-८) भागपेढी आणि गूंतवणूकदार यांना जोडणे, इ-४) भारतातील दुसरी भागपेढी, फ-१०) इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रतिभूतींचा परिरक्षक, ग-१४) गुंतवणूकदार.

**क)** १) भौतिक स्वरूपातील, २) भागपेढी, ३) भागपेढी, ४) भागपेढी, ५) एनएसडीएल, ६) जर्मनी ७) बेनिफिशिअल ओनर, ८) डिपॉझिटरी पार्टीसिपंट, ९) डिमॅट, १०) रिमॅट, ११) फंगिबिलिटी १२) आयएसआयएन

**ड)** १) बरोबर, २) बरोबर, ३) बरोबर, ४) चूक, ५) चूक, ६) बरोबर ७) बरोबर ८) बरोबर ९) बरोबर १०) बरोबर ११) बरोबर १२) बरोबर

**इ)** १) प्रमाणपत्र संग्रह संपुष्टात आणणे, २) एनबीएफसी, ३) आरबीआय, ४) राज्य सरकार,
५) केंद्र सरकार, ६) पीपीएफ

**फ)** १) भागपेढी, २) भागपेढी, ३) १९४७, ४) १९९६, ५) डीपी, ६) डीपी, ७) डिमॅट, ८) रिमॅट, ९) भागपेढी १०) आयएसआयएन, ११) एनएसडीएल

**ग)** १)
अ) डिमटेरियलायझेशन — १) भौतिक स्वरूपातून इलेक्ट्रॉनिक स्वरूपात
ब) भागपेढीचा मध्यस्थ — २) डीपी
क) जगातील पहिली भागपेढी — ३) जर्मनी
ड) सीडीएसएल — ४) १९९९

२)
अ) भारतातील पहिली भागपेढी — १) एनएसडीएल
ब) इलेक्ट्रॉनिक स्वरूपातून भौतिक स्वरूपात — २) रिमटेरियलाझेशन
क) फंगिबिलिटी — ३) भेददर्शक क्रमांक नसणे.
ड) १२ वर्णांक/सांकेतांक — ४) आयएसआयएन

**ई)** १) भौतिक, २) भौतिक, ३) भागपेढी, ४) भागपेढी, ५) बहु ६) सेबी कायदा, ७) डीपी,
८) इलेक्ट्रॉनिक, ९) प्रतिभूतीला, १०) आर.बी.आय.

**ज)** १) ब) डिमॅट खाते उघडणे. क) डिमॅट विनंती अर्ज सादर करणे. अ) खात्याचे विवरण मिळवणे.
२) अ) गुंतवणूकदार इश्युअर कंपनीला प्रतिभूतीसाठी अर्ज सादर करतात. क) इश्युअर कंपनी भागपेढीला भाग वाटपाचा तपशील देते. ब) बीओ च्या खात्यात भाग जमा करण्यासंबंधी भागपेढी डीपीला सूचना देते.

**प्र.१. अ)** १) भागधारकांना, २) लाभांश, ३) संचालक मंडळ, ४) संचालक मंडळ, ५) भागधारक, ६) भांडवल, ७) ५, ८) ३०, ९) समहक्क, १०) अग्रहक्क, ११) लाभांश, १२) केंद्र सरकार, १३) अंतरिम, १४) व्याज, १५) व्याज.

**ब)** **I)** अ-२) नफ्याचा विनियोग, ब-५) वाटप बंधनकारक, क-६) संचालक मंडळाकडून निश्चिती व घोषणा, ड-७) संचालक मंडळाकडून निश्चिती व सभासदांकडून घोषणा, इ-१) समहक्क भागधारक.

**II)** अ-३) नोंदणीकृत भागधारक, ब-२) धनको, क-४) न दिलेल्या लाभांशाची शिल्लक रक्कम येथे हस्तांतरित केली जाते, ड-७) न दिलेला/मागणी न केलेला लाभांश, इ-१) लाभांश वाटपाच्या घोषणेची माहिती भाग बाजाराला देणे आवश्यक.

**क)** १) लाभांश, २) वार्षिक सर्वसाधारण सभा, ३) सूचीबद्ध कंपनी, ४) अग्रहक्क भागधारक, ५) समहक्क भागधारक, ६) लाभांश आदेश, ७) ३० दिवस, ८) अंतरिम लाभांश, ९) अंतरिम लाभांश, १०) व्याज.

**ड)** १) बरोबर, २) बरोबर, ३) चूक, ४) बरोबर, ५) बरोबर, ६) चूक ७) चूक ८) चूक ९) बरोबर १०) चूक.

**इ)** १) व्याज , २) भांडवलातून , ३) लाभांश आदेश, ४) लाभांश आदेश.

**फ)** १) डिव्हिडेंटम, २) नोंदणीकृत भागधारक, ३) संचालक मंडळ, ४) रोख, ५) वार्षिक सर्वसाधारण सभा, ६) भांडवला, ७) संचालक मंडळ, ८) अग्रहक्क भागधारक, ९) ३० दिवस १०) नियमावली, ११) व्याज

**ग)** १)

| | |
|---|---|
| अ) डिव्हीडंटम | १) लॅटीन शब्द |
| ब) व्याज | २) धनको |
| क) वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये | ३) अंतिम लाभांश |
| ड) संचालक मंडळाच्या सभेमध्ये | ४) अंतरिम लाभांश |
| इ) सरकारी निधी | ५) आयईपीएफ |

२)

| | |
|---|---|
| अ) अग्रहक्क भाग | १) लाभांशाचा स्थिर दर |
| ब) समहक्क भाग | २) लाभांशाचा अस्थिर दर |
| क) ठेवीदार | ३) व्याज. |
| ड) ३० दिवसांच्या आत | ४) लाभांशाचे वाटप |
| इ) न दिलेला/मागणी न केलेला लाभांश | ५) लाभांश जाहीर परंतु देय/मागणी नाही. |

**ई)** १) नोंदणीकृत भागधारक २) धनको, ३) अंतरिम, ४) साधारण ठराव, ५) ३० दिवस, ६) ५ दिवस, ७) व्याज, ८) समहक्क, ९) समहक्क, १०) व्याज.

**ज)** १) ब) पुरेसा नफा तपासणे. क) संचालक मंडळाची सभा. अ) लाभांशाची शिफारस

२) अ) लाभांश खात्यात वर्ग. क) न दिलेला लाभांश खात्यात वर्ग ब) आयईपीएफ मध्ये वर्ग

३) ब) संचालक मंडळाच्या सभेची सूचना भाग बाजाराला देणे. क) लाभांशाच्या घोषणेची सूचना भाग बाजाराला देणे, अ) सभासद नोंद पुस्तक बंद ठेवणे.

४) अ) लाभांश दराचा निर्णय. क) लाभांशाचे वाटप ब) आयईपीएफमध्ये वर्ग

५) क) नियमावलीची कायदेशीर परवानगी. ब) संचालक मंडळाच्या सभेत अंतरिम लाभांश ठरवणे व घोषित करणे. अ) अंतरिम लाभांशाचे वाटप

## प्रकरण ११ : वित्तीय बाजार

**प्र.१. अ)** १) वित्तीय प्रतिभूती, २) व्यावसायिक विपत्र, ३) अल्प, ४) राजकोष पत्र, ५) भांडवल

**ब)** अ-५) वित्तीय प्रतिभूतींचा व्यापार, ब-४) अल्प मुदत निधी, क-२) नवीन विक्री बाजार, ड-७) असुरक्षित वचन चिठ्ठी,

**क)** १) वित्तीय बाजार, २) भांडवल बाजार, ३) नाणे बाजार, ४) कॉल मनी/नोटीस मनी
५) राजकोष पत्र ६) प्राथमिक बाजार/नवीन विक्री बाजार

**ड)** १) चूक, २) चूक ३) बरोबर ४) बरोबर ५) बरोबर ६) चूक ७) चूक

**इ)** १) भाग, २) व्यापारी पतपत्र ३) कॉल मनी मार्केट

**फ)** १) अल्प , २) व्यापारी विपत्र ३) ठेव प्रमाणपत्र ४) प्राथमिक/नवीन विक्री, ५) एक

**ग)**

| | |
|---|---|
| अ) नाणेबाजार | १) अल्प मुदतीचे निधी |
| ब) शून्य जोखमीचे बंधपत्र | २) राजकोष पत्रे |
| क) दीर्घकालीन निधी | ३) भांडवल बाजार |
| ड) अस्तित्वात असलेल्या प्रतिभूतींची पुनर्विक्री | ४) दुय्यम बाजार |

**ई)** १) दुय्यम २) प्राथमिक ३) भांडवल ४) नाणे बाजार

## प्रकरण १२ : भाग बाजार

**प्र.१. अ)** १) प्रतिभूती, २) बीएसई, ३) अडत्या, ४) मंदीवाला, ५) डे ट्रेडिंग,

**ब)** अ-४) गुंतवणूकदारांच्या हिताचे रक्षण करणे, ब-३) एका दिवसात केलेला प्रतिभूतींचा व्यवहार, क-१) भागांच्या किमती वाढण्याबाबत आशावादी, ड-२) भागांच्या किमती कमी होतील अशी अपेक्षा करणारा, इ-६) भारतातील सर्वांत जुना भाग बाजार.

**क)** १) भाग बाजार, २) मुंबई भाग बाजार/बॉम्बे स्टॉक एक्सचेंज, ३) अडत्या, ४) तेजीवाला

**ड)** १) बरोबर, २) बरोबर, ३) चूक ४) चूक

**इ)** १) मुंबई भाग बाजार/बॉम्बे स्टॉक एक्सचेंज, २) राष्ट्रीय भाग बाजार ३) दलाल ४) मंदीवाला

**फ)**

| | |
|---|---|
| अ) भांडवल बाजाराचे नियमन | १) सेबी |
| ब) राष्ट्रीय भाग बाजाराचा निर्देशांक | २) निफ्टी |
| क) अडत्या | ३) स्वत:च्या नावावर प्रतिभूतींची खरेदी व विक्री |
| ड) लंडन भाग बाजार | ४) जुना भाग बाजार |

**ह)** १) गुंतवणूकदारांच्या, २) अडत्या, ३) तेजीवाला, ४) स्टॅग, ५) भांडवल

# List of References

**Books :**


- Company Law and Practice - A comprehensive Text Book on Companies Act 2013 - As amended by companies (Amendment) Act 2019 - Dr. G. K. Kapoor and Dr. Sanjay Dhamija - Taxmann Publications Pvt. Ltd. 24th Edition
- Compain es Act 0 ad Rlu es ad Forms with concise commen ary ad Referen es - Corporate Professiona ls, 0 Edition
- Tanm an 's Corporate Laws - By Ain l Km ar.
- Tanm an 's Corporate Law ad Practice - Majm dar ad Kapoor.
- Bsu ie ss Fia n e - Prin iples ad Prob ems - By P. V. Klu k rn - Himalay Pb ish ng Hos e - 8
- Fia n ial Maa g men - By Dr. R. H. Sh iv stav Prag ti Prak sh n - 9
- Corporate Fia n e - By B. L. Math - Sb ie Pb ication - 2
- Maa g rial Fia n e - Fred Weston ad Eg n F Brig m.
- Prin iples of Corporate Fia n e - Rich rd Break y, Steward My rs.


# Websites

- www.aishmg aa .me
- www.complian esppor t.in
- www.caclb di a.com
- www.corporatelawreporter.com
- www.icsi.edu
- www.mca.gv .in
- www.m.econm ictimes.com
- www.iv estopedia.com
- www.cleartax n
- www.s dl.co.in
- www.cdslidi a.com
- www.sebi.gv .in
- www.b eidi a.com
- www.manag men studg de.com
- www.corporatefinance.blogspot
- www.wikifinancepedia.com

❑❑❑

## Notes

















महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
पुणे-४११००४.

₹ 106.00